१९७९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चारित्र
सं. क्र. 2292
2292
REFBK-0001636

मकरन्द-पुस्तकमाला.

पुस्तक ४६ वें.

# भारतवर्षीय युवतिरत्नमाला.

लेखक

कै. वा. अनंत केशव चितळे वांईकर.

REFBK-0001636

नरहर नारायण पटवर्धन, मकरन्द-कार्यालय, वाई.

मुद्रक,

अच्युत चिंतामण भट, यशवंत प्रेस, पुणें.

एप्रिल, सन १९१९.

आवृत्ति दुसरी.

किंमत १ रुपाया.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें
रजिस्टर करून सर्व हक्क प्रकाशकानें
आपले स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

भारतवर्षीय युवतिरत्नांची माळा गुंफून तिच्या द्वारें मातृभाषेची यथामति सेवा करावी, असा फार दिवसांपासून आमच्या मनाचा संकल्प झाला होता. पुढील अल्प कृति हें त्याच संकल्पवृक्षाचें फल होय. भारतवर्षाच्या इतिहासखनींत अनेक युवतिरत्नें चमकतांना दृष्टीस पडतात; परंतु, त्या सर्वांचीं समग्र चरित्रें उपलब्ध नाहींत. आम्हांस उपलब्ध झालेल्या बहुतेक चरित्रांचा या मालेंत समावेश केला आहे.

या पुस्तकास मुख्य आधार प्रसिद्ध बंगाली ग्रंथकार मन्मथनाथ दत्त एम्. ए. यांनीं इंग्रजी भाषेंत लिहिलेल्या "Heroines of Ond" या पुस्तकाचा, आणि लाला काशीनाथ खत्री यांनीं हिंदी भाषेंत लिहिलेल्या "भारतवर्षकी विख्यात रानियोंके चरित्र" या पुस्तकांचा घेतला आहे. शिवाय, महाराष्ट्रभाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या लोकमित्र, महाराष्ट्रकोकिल, गृहिणी, स्त्रीशिक्षणचंद्रिका, करमणूक इत्यादि मासिकांतून आणि साप्ताहिकांतून उपलब्ध झालेल्या माहितीचाहि योग्य स्थानीं उपयोग केला आहे. त्याबद्दल आम्ही वरील दोघां ग्रंथकारांबरोबरच महाराष्ट्रीय लेखकांचेहि अत्यंत आभारी आहोत.

पुढील चरित्रांमध्यें कित्येक ठिकाणीं स्थळ आणि काळ ह्यांचा जितका खुलासा व्हावयास पाहिजे होता तितका झालेला नाहीं, याचें कारण आम्हांजवळ उपकरणांची कमतरता हें होय. शिवाय आमचा मुख्य हेतु स्त्रियांच्या वाचनास योग्य आणि पातिव्रत्यादि सद्गुणांचा मनावर ठसा उमटविणारें पुस्तक व्हावें असा असल्यामुळें जेथें तशा प्रकारची माहिती मिळाली तेथें आम्ही इतर स्थलकालादिकांची माहिती मिळण्याविषयीं जिकीर केली नाहीं. मराठी भाषेंत अशा प्रकारचें हें पाहिलेंच पुस्तक आहे असें म्हटलें तरी चालेल. कारितां, सहृदय वाचकांनीं कृपा करून गुणांवर दृष्टि ठेवून दोषांचा त्याग करावा, अशी त्यांस सविनय प्रार्थना आहे. प्रस्तुत पुस्तक तयार करण्याचे कामीं आमचे परमप्रिय मित्र महादेव हरी मोडक बी. ए, आणि बापूराव नरसिंह भावे यांचें आम्हांस चांगलें साह्य झालें, याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. तसेंच मोदवृत्त पत्राचे विद्वान् संपादक वे. शा. सं. काशीनाथ वामन लेले यांनीं आस्थापूर्वक पुस्तकाचें प्रकाशन केलें याबद्दलही आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

पुढील पुस्तकापासून वाचकांच्या मनावर पातिव्रत्य, दृढनिश्चय, सत्यप्रियता, तेजस्विता इत्यादि अत्युत्तम गुणांचा ठसा उमटावा अशी उत्कट इच्छा आहे, ती सत्यसंकल्पाचा दाता परमेश्वर पूर्ण करो अशी प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी कारितों.

तीर्थराज ( प्रयाग ) }
२९–९–९९ }

अनंत केशव चितळे.
वाईकर.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

भारतवर्षीय युवतिरत्नमाला पुस्तक किती उत्तम आहे, तें आम्हीं आमच्या शब्दांनीं सांगण्यापेक्षां आमच्या वाचकांनीं पुस्तकाच्या शेवटल्या चारपांच पानांकडे लक्ष्य दिल्यास त्यांना तें सहज समजून येण्यासारखें आहे. पूर्वीच्या आवृत्तींत आणखी कित्येक अभिप्राय छापलेले आहेत परंतु केवळ स्थलाभावास्तव आम्ही ते येथें छापले नाहींत. असो. सदर पुस्तक आमचे पहाण्यांत प्रथम १९०८ सालीं आलें. तेव्हां-पासून पुस्तकाची प्रत जवळजवळ दुर्मिळच आहे. आम्ही हें पुस्तक प्रथम वाचलें तेव्हांपासून तें मकरन्दाच्या वाचकांना जरूर एकवार द्यावें अशी फार इच्छा होती. तो सुयोग आज जमून येत आहे. पुस्तकांतील कोणतेंही चरित्र वाचतांना मनावर सात्विक करारीपणाचा दाब बराच वेळ बसतो व त्यामुळें आनंद होतो. कै. वा. चितळ्यांनीं चरित्रांची निवड करतांना फार श्रम केले आहेत. त्यांच्या श्रमांचें चीज वाच-कांकडून होवो अशी त्या मंगलमय प्रभूजवळ मागणी आहे.

वाई,<br>
चै. शु. १ शके १८४१

न. ना. पटवर्धन.

श्रुतं दृष्टं स्पृष्टं स्मृतमपि नृणां ल्हादजननं
न रत्नं स्त्रीभ्योन्यत्क्वचिदपि कृतं लोकपतिना ॥
तदर्थं धर्मार्थौ सुतविषयसौख्यानि च ततो
गृहे लक्ष्म्यो मान्या सततमबला मानविभवैः ॥ १ ॥
अ० ७४ श्लो० ४.

दर्शनानें, श्रवणानें, स्पर्श झाल्यानें आणि स्मरणानेंही पुरुषांना अल्हाद उत्पन्न करणारें असें स्त्रियांवांचून दुसरें कोणतेंही रत्न लोकाधिपति ब्रह्मदेवानें कोठेंही निर्माण केलेलें नाहीं. इतकेंच नव्हे. परंतु, धर्म व अर्थ यांची प्राप्ति स्त्रियांमुळेंच होत असून पुत्र आणि विषयसंबंधीं सुखें हींही स्त्रियांवरच अवलंबून आहेत. तस्मात्, गृहामध्यें लक्ष्मीरूपच असलेल्या ज्या स्त्रिया त्या सत्कार व ऐश्वर्याचा उपभोग यांच्या योगानें मानमान्यतेस पात्र आहेत.

येऽप्यङ्गनानां प्रवदन्ति दोषान्वैराग्यमार्गेण गुणान् विहाय ॥ ते दुर्जना मे मनसो वितर्कः सद्भाववाक्यानि न तानि तेषाम् ॥ अ० ७४ । ५

केवल वैराग्यदृष्टीनें स्त्रियांच्या गुणांचा उच्चार न करितां जे त्यांना दोषच देत असतात, ते दुर्जन असून त्यांचीं तीं भाषणें सद्बुद्धीनें केलेलीं नसतात असें मला वाटतें.

—वराहमिहिरकृतायां बृहत्संहितायां·
चतुःसप्ततितमोऽध्यायः ॥

# अनुक्रमणिका.


| रत्नसंख्या. | रत्ननाम. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | राणी संयोगिता ... ... ... | १ |
| २ | राणी पद्मिनी ... ... ... | १४ |
| ३ | अर्गलची राणी ... ... ... | २६ |
| ४ | कर्मदेवी ... ... ... ... | ३१ |
| ५ | ताराबाई ... ... ... ... | ४० |
| ६ | राजधात्री... ... ... ... | ५२ |
| ७ | गनोरची राणी ... ... ... | ५९ |
| ८ | राणी दुर्गावती ... ... ... | ६६ |
| ९ | राणी जसरेश्वरी. ... ... ... | ७७ |
| १० | जोधपूरची राणी ... ... ... | ८७ |
| ११ | राणी अहल्याबाई. ... ... | ९५ |
| १२ | देवी चौधराणी. .. ... ... | १०८ |
| १३ | कृष्णा कुमारी. ... ... ... | ११५ |
| १४ | श्रेष्ठिकन्या असामान्या. ... ... | १२२ |
| १५ | राणी भवानी. ... ... ... | १३१ |
| १६ | मैनाबाई पवारीण. ... ... | १४४ |
| १७ | महाराणी चंद्रावती. ... ... | १५२ |
| १८ | महाराणी लक्ष्मीबाई. .... .... | १६० |
| १९ | महाराणी राजबाई. .... .... | १७३ |
| २० | साध्वी मीराबाई. .... .... | १७९ |
| | उपसंहार .... .... .... .... | १९४ |

# भारतवर्षीय युवतिरत्नमाला.

## रत्न पहिलें.

### राणी संयोगिता.

भरतखंडांत अविंधबादशाहीचा पाया घालणारा बादशहा महमद घोरी यानें जेव्हां या देशावर प्रथम स्वारी केली, तेव्हां कनोज येथें राठोडवंशीय राजा जयचंद आणि दिल्ली येथें चव्हाणवंशीय राजा पृथ्वीराज असे दोन महान् पराक्रमी राजे राज्य करीत होते. त्यांपैकीं राजा जयचंद यास संयोगिता नांवाची एक अत्यंत सुंदर कन्या होती. राजाला पुत्रसंतान नसल्यामुळें त्याचें संयोगितेवर फार प्रेम होतें. ही कांहीं सामान्य कन्या नव्हती. ती आपल्या अंगच्या असाधारण रूपगुणांनीं केवळ मोहिनीच बनली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. जसजसें तिचें शरीर वृद्धिंगत होत चाललें, तसतशी ती आपल्या अनेक तऱ्हेच्या बाललीलांनीं जयचंदाच्या नयनयुगुलास चंद्रोदयकाळीं चकोरांस होणाऱ्या आनंदाचा अनुभव देऊं लागली. तिच्या अंगच्या लोकोत्तर सौजन्यानें सर्व लोक संतुष्ट होत असत. वयपरत्वें तिचा बालभाव कमी होत जाऊन, विद्या, विनय व तारुण्य यांचीं सर्व चिन्हें तिच्या वर्तनांत दिसूं लागलीं.

संयोगितेला तारुण्यावस्था प्राप्त होतांच जयचंदास तिच्या विवाहाची मोठी चिंता लागली. तिच्या रूपलावण्याची कीर्ति दूरवर पसरली असल्यामुळें अनेक देशच्या राजांना तिच्या पाणिग्रहणाची लालसा उत्पन्न झाली होती, व त्याप्रमाणें अनेक राजांकडून तिला मागण्या घालण्यांत आल्या होत्या. विशेषतः दिल्लीच्या चव्हाणवंशीय पृथ्वीराजास तर तिजविषयीं केवळ वेडच लागलें होतें. आणि संयोगितेनेंही त्याच्या पराक्रमाची आणि रूपगुणसंपन्नतेची कीर्ति ऐकली असल्यामुळें त्यासच वरण्याचा निश्चय केला होता.

आपल्या कन्येला योग्य वराची प्राप्ति व्हावी म्हणून त्या वेळच्या संप्रदायाप्रमाणें जयचंदानें तिच्या स्वयंवराचा निश्चय करून देशोदेशींच्या राजेलोकांस स्वयंवरास येण्याविषयीं निमंत्रणपत्रिका पाठविल्या. स्वयंवराचे पूर्वी प्रथमतः राजसूय करावा असा त्यानें निश्चय केला. जयचंद हा मोठा पराक्रमी राजा असून सर्व मांडलिक राजे त्याचा फार वचक बाळगीत असत. त्याचें निमंत्रणपत्र पोंचतांच बहुतेक सर्व राजे कनोज शहरास येऊन दाखल झाले. परंतु दिल्लीचा पृथ्वीराज मात्र तेथें आला नाहीं. याचें कारण या दोन राजांचें पूर्वीपासूनच हाडवैर चालत आलें होतें. आपल्या यज्ञसमारंभास पृथ्वीराज आला नाहीं असें पाहून जयचंद रागानें लाल झाला. त्यानें पृथ्वीराजाची एक मूर्ति बनवून ती यज्ञमंडपाच्या द्वारीं पहारेकऱ्याचे जागीं उभी केली, व अशा रीतीनें आपल्या अपमानाचा सूड उगविला. यज्ञसमारंभ शेवटास जातांच स्वयं-

वराची गडबड सुरू झाली. अनेक देशचे राजे एकत्र झाले असल्यामुळें कनोज शहरास त्या वेळीं फारच नामी स्वरूप प्राप्त झालें होतें.

स्वयंवराचे दिवशीं सर्व जागा उत्तम प्रकारें सुशोभित केल्या होत्या. राजाज्ञेप्रमाणें मंत्रिजनांनीं सर्व राजेलोकांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप स्थानांवर आणून बसविल्यानंतर राजकन्या संयोगिता हातांत जयमाला घेऊन स्वयंवरमंडपांत आली. राजकन्या दृष्टीस पडतांच जिकडे तिकडे सामसूम होऊन आतां कोणत्या राजाचें भाग्य उदयास येतें तें पाहण्याकडे सर्वांचे डोळे लागले. संयोगितेनें मोठ्या सलज्ज आणि गंभीर मुद्रेनें सर्व सभा अवलोकन केली. आपलें चित्त हरण करणारा पुरुष या समारंभाला आला नसून विडंबनापूर्वक त्याची मूर्ति मात्र एके जागीं उभी केली आहे, ही गोष्ट तिला माहीत होती. संयोगितेसारख्या एकनिष्ठ स्त्रीनें एकदां एका पुरुषरत्नास आपला पति मानिल्यावर दुसऱ्या कोणास ती प्राप्त होणार होती! तिनें क्षणभर इकडे तिकडे पाहिलें, आणि चटकन् ज्या ठिकाणीं दिल्लीश्वराची मूर्ति उभी होती, त्या ठिकाणीं येऊन सर्वांसमक्ष आपले हातानें त्या मूर्तीच्या गळ्यांत माळ घातली! तें पाहतांच जिकडे तिकडे एकच गडबड उडून गेली. जयचंद तर रागानें वेडा होऊन गेला. असल्या विलक्षण तऱ्हेच्या अपमानानें त्यास फार त्वेष चढला. त्यानें एकदम त्या मूर्ख आणि उद्धट पोरीला बंदिशाळेंत नेण्याचा हुकूम फर्माविला. आणि हा

विलक्षण प्रकार पाहून त्या स्थळीं आलेले सर्व राजे निराश होत्साते लागलीच आपआपल्या नगरास निघून गेले.

ही सर्व हकीगत ऐकून पृथ्वीराजास जो आनंद झाला तो गगनांत मावेना. जयचंदाच्या कृतीनें अपमानित, आणि संयोगितेच्या अकृत्रिम प्रेमाला वशीभूत झालेल्या पृथ्वीराजानें कूच करण्याच्या सूचनेचा डंका वाजविला. कन्हलंगरीराय आणि चंदबरदाई आदिकरून निवडक सरदारांसह तो कनोज शहरास येऊन पोहोंचला; आणि एके दिवशीं वेळ साधून गुप्त रूपानें आपल्या प्राणप्रिया संयोगितेला भेटला, व तेथें तिजबरोबर त्याचा गांधर्व विवाहही झाला.

इतकी गोष्ट झाली तरी ती एक दोन दासीजनांखेरीज दुसऱ्या कोणासही कळली नव्हती. पृथ्वीराज आपल्या नगराच्या सीमेवर येऊन बसला आहे, अशी बातमी लागतांच जयचंदानें आपलें तीन लक्ष सैन्य त्याला पकडून आणण्याकरितां पाठविलें. शत्रूचें सैन्य कहरकंठीर नामक सरदारास पुढें करून आपणावर चालून येत आहे असें जाणून पृथ्वीराजही त्याजबरोबर सामना करण्यास उभा राहिला. या वेळीं पृथ्वीराजाकडील सरदार आतताई आणि जयचंदाकडील पुढारी कहरकंठीर या दोघांनीं मोठें तुंबळ युद्ध चालविलें. दोघेही वीर मोठमोठ्यानें सिंहनाद करून एकमेकांशीं लढत होते. दोन्ही सैन्यांची खवळलेल्या मेघांप्रमाणें हालचाल चालली होती. त्या वेळीं सर्व आकाश धूलिधूसर होऊन गेलें होतें, व वीरगर्जनांनीं दशदिशा दणाणून गेल्या होत्या. इत-

क्यांत मृतवीरांच्या रक्ताची नदी होऊन खळखळा वाहूं लागली. असें होतां होतां कहरकंठीराचा रणावेश अनावर होऊन तो रथावरून उतरला आणि त्यानें आततार्ईच्या मस्तकावर खड्गप्रहार करून पृथ्वीराजाच्या कंठावरही पाश टाकिला. कहरकंठीराच्या अद्भुत पराक्रमानें पृथ्वीराजाच्या सैन्यांत हलकल्लोळ झाला. इतक्यांत मेघमंडळांतून जशी विद्युल्लता खालीं उतरावी तद्वत् कोणी एक महापराक्रमी वीरमूर्ति तेथें येऊन तिनें मोठ्या चातुर्यानें पृथ्वीराजाच्या गळ्यावरील पाश तोडून त्यास मुक्त केलें! ही अद्भुत शक्ति तेथें कशी आली हें कोणासही विदित झालें नाहीं.

वाचकहो, हा कोणी वीरपुरुष नव्हता; तर वीरभूमींत जन्मलेली वीरांगना होती! जिनें पूर्वीं कधीं असल्या घोर युद्धाचें दर्शनही घेतलें नव्हतें, किंवा जी कधींही असल्या अत्यंत खवळलेल्या अपार संकटसागरांत गेली नव्हती. कसेंही असलें तरी सिंहीण कधीं कोल्ह्याला भिऊन घरीं बसेल काय? ज्या वीरव्रतधारिणीच्या पवित्र धमनींत पातिव्रत्याचें शोणित वहात होतें, जिच्या हृदयांत भक्ति आणि प्रीति या दोन सुवासिक पुष्पांचा सुगंध भरला होता, जिनें पतिदर्शन होण्याच्या पूर्वीच सांगून ठेविलें होतें कीं, "जर कदाचित् प्राणेश्वराच्या जिवास कांहीं अमंगल झालें, तर ही अभागिनी सती जाऊन आपल्या पातिव्रत्याचा निभाव लावील." तीच प्रेमपाशबद्ध झालेली संयोगिता या भयंकर रणभूमीवर आली! आणि असें वीरजनोचित कर्म करून तिनें प्रिय पतीचें संरक्षण केलें. या-

प्रमाणें पाशमुक्त होतांच पृथ्वीराजानें कहरकंठीराच्या सैन्याची, धूळधाण उडवून दिली, आणि संयोगितेसह तो दिल्ली शहरास येऊन पोहोंचला. दिल्ली येथें आल्यावर कांहीं काळपावेतों या दांपत्याचा नीरक्षीरसंयोगाप्रमाणें संयोग होता. नित्य नवा मंगलमोद होत असतां दोघांचाही अंतकाल अकस्मिक येऊन पोहोंचला. कारण, शहाबुद्दीन महमद घोरीनें इ. स. ११९३ या वर्षी या प्रेमळ जोडीची ताटातूट केली. त्याचा इतिहास पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

आपल्या सैन्याचा पराभव करून पृथ्वीराज आपल्या कन्येसही घेऊन गेला, हें पाहून जयचंदाचा क्रोधवह्नि पूर्वीपेक्षांही दुणावला; आणि त्याचें चित्त या गोष्टीचा सूड उगविण्याच्या विचारांनीं व्याप्त झालें. हा गृहकलह सुरू झाल्यानंतर लौकरच शाहबुद्दीन महमद घोरी हिंदुस्थानावर चाल करून आला. त्यानें केवळ प्रलयकालच्या प्रभंजन वायूप्रमाणें जिकडे तिकडे नासधूस करण्यास आरंभ केला. त्यानें देवळें पाडिलीं, सुंदर देवमूर्तींचा विध्वंस केला, आणि अनेक स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग करून त्यांना आपल्या दासी बनविल्या. ज्या ज्या स्थळांवरून घोरी आपलें सैन्य घेऊन गेला, त्या त्या स्थळीं अपमान आणि मृत्यु जणूं काय राक्षसी स्वरूपानें नाचूं लागले होते. या भयंकर शत्रूची खोड मोडण्याकरितां आणि हिंदुस्त्रियांचें पातिव्रत्य रक्षून मठमंदिरांची पवित्रता कायम राखण्याकरितां पृथ्वीराजानें सर्व राजेरजवाड्यांस आपल्या सैन्यास येऊन मिळण्याविषयीं विनंति केली. जयचंद

खेरीज करून बहुतेक सर्व राजे त्यास येऊन मिळालें; जयचंद मात्र मानवजातीचा मोठेपणा विसरून जाऊन केवळ वैर साधण्याच्या उद्देशानें उदासीन राहिला. तो या वेळीं घोरीस जाऊन मिळावयाचा, परंतु देशाच्या सुभाग्यानें तो या वेळीं तरी त्यास जाऊन मिळाला नाहीं. अस्तु.

तिलावडीच्या मैदानांत हिंदुमुसलमानांचें घनचक्कर रण माजून घोरीच्या सैन्याची दाणादाण झाली, व तो बिचारा मोठ्या कष्टानें जीव घेऊन त्या रणभूमीवरून पळाला, आणि पृथ्वीराजा विजयी होऊन मोठ्या डौलानें सामंतवीरांसह दिल्लीस परत आला.

पृथ्वीराजाचा जय झालेला पाहून जयचंदास अत्यंत वाईट वाटलें. ती गोष्ट त्याच्या मनास एकसारखी टोचूं लागली. आपल्या हाडवैऱ्याचें वैभव पाहण्याऐवजीं तो वाटेल तें पाहण्यास तयार झाला होता! त्यानें त्या वेळीं वाटेल तसला अपमान देखील सहन केला असता! पण पृथ्वीराजाचें वैभव त्यास सहन झालें नाहीं. व यामुळें त्यानें अत्यंत नीच उपायांनीं शत्रूचा सूड घेण्याचा विचार चालविला. त्यानें मुद्दाम आपले दूत पाठवून घोरीस परत हिंदुस्थानांत बोलाविलें. आणि उघडपणें त्याच्या सैन्यास मिळून त्याला साह्य करण्याचें अभिवचन दिलें! त्यानें आपल्या वकिलाबरोबर त्यास असेंही सांगून पाठविलें कीं, "आम्हीं येथील सर्व राजेरजवाड्यांत फितूर करून त्यांचा एकोपा मोडून टाकिल्यामुळें आतां पृथ्वीराजास एकट्यालाच युद्ध करणें भाग पडेल,

आणि यांत आपणांस विजय प्राप्त होईल."

याप्रमाणें जयचंदाचें वचन मिळतांच महमदघोरी पुन्हां आपल्या सैन्याची जमवाजमव करून त्वरेनें दिल्ली शहरावर चालून आला. जयचंद मोठ्या उत्सुकतेनें त्यास सामोरा गेला. कारण, आतां आपले सर्व मनोरथ उत्तम प्रकारें शेवटास जातील असें त्यास कळून चुकलें होतें. जळो ती त्याची मनोरथपूर्ति, कीं जिनें आम्हां भारतवासी जनांच्या पायांत परतंत्रतेची शृंखला अडकावून टाकिली! जयचंद फक्त घोरीलाच बोलावून स्वस्थ बसला नाहीं, तर त्यानें खरोखरच सर्व बुद्धिमत्ता आणि राजनीतिकौशल्य परस्परांत वैर उत्पन्न करण्याचे कामीं खर्च केलें! अशा रीतीनें सर्व राजे आपापल्या ठिकाणीं स्वस्थ राहून एकट्या पृथ्वीराजासच घोरीसारख्या प्रचंड वीराशीं तोंड द्यावें लागलें. दुर्जना जयचंदा' आपल्या दुर्बुद्धीचा चांगलाच प्रत्यय आणून दिलास!

कालिंदी नदीच्या तीरीं जयचंदाचे सैन्याचा तळ पडला होता. एके दिवशीं आपल्या तंबूंत बसून पृथ्वीराजाच्या पराभवापासून प्राप्त होणाऱ्या भावी आनंदाच्या विचारांत तो गर्क झाला असतां, एक शिपाई येऊन त्यानें त्यास वर्दी दिली कीं, " महाराज, आपल्या शत्रूकडून एक तरुण शिपाई आला असून तो आपली भेट घेऊं चाहतो आहे." त्यावर जयचंद आश्चर्यानें म्हणाला, "काय! तरुण शिपाई! आणि शत्रूकडून आला आहे म्हणतोस? त्याला काय पाहिजे आहे?" जयचंदाच्या शिपायानें उत्तर दिलें "तो वकील होऊन

आला आहे. आणि म्हणूनच मी त्यास आपल्या तंबूत येऊं दिलें." "जा, आण त्याला;—अथवा असें नको— तूं जरासा बाहेर उभा रहा, आणि त्याला आंत पाठवून दे." असें उत्तर देऊन जयचंद आपली तरवार घेण्यास उठला.

शिपायानें सांगितल्याप्रमाणें एक तरुण शिपाई तंबूत आला आणि त्यानें एकदम जयचंदाचे पाय घट्ट धरिले; तेव्हां जयचंद आश्चर्यानें म्हणाला 'तुला काय पाहिजे?' वाचकहो, हा शिपाई तरी कोण होता! हा खरा शिपाई नव्हता, तर ही आपली विषयनायिका संयोगिता होती! ती मोठ्या काकुळतीनें आपल्या पित्यास म्हणाली "तात! मी आपला आशीर्वाद घेण्यासाठीं आलें आहें. मी आपला देशशत्रु जो घोरी त्याजबरोबर युद्ध करण्यास जाणार आहें; परंतु वडिलांच्या आशीर्वादाशिवाय अशा दुर्धर प्रसंगीं जय मिळणें कठिण आहे. आपला आशीर्वाद असला म्हणजे मी खात्रीनें विजय पावेन." हें कन्येचें भाषण ऐकून जयचंद कांहींसा स्तब्ध राहिला. नंतर कांहीं वेळानें तो बोलूं लागला. तो म्हणाला "कुलकलंके, या सर्व गोष्टीस तूंच मुख्य कारण आहेस. जा; चालती हो. तुझ्या येथें येण्याचा कांहीं एक उपयोग नाहीं." त्यावर संयोगिता मोठ्या आर्जवानें म्हणाली, "ताता, प्रिय ताता! आपल्या जन्मभूमीकडे जरा दयार्द्र दृष्टीनें पहा; हजारों निराधार स्त्रियांचा अपमान होईल इकडे थोडी तरी दृष्टि फिरवा; देवमूर्तींचा भंग होईल याचा कांहीं तरी विचार करा; पवित्र तीर्थें भ्रष्ट होतील त्यांची कांहीं

तरी काळजी असूं द्या, आणि–" संयोगितेचें बोलणें थांबवून जयचंद म्हणाला "गप रहा पोरी, चल चालती हो."
"एकूण माझ्या सर्व प्रार्थना निष्फळ होणार काय?" असें म्हणत संयोगिता उभी राहिली; आणि खवळलेल्या सिंहिणीप्रमाणें जयचंदाकडे पाहून म्हणाली "आपल्या पूर्वजांच्या नांवाला कलंक लावून स्वतःच्या दुष्कीर्तीचा झेंडा या भूतलावर रोंवण्यापूर्वी आपल्या या अभागी कन्येला मारून तरी टाकायची होतीत! धिक्कार! बाबा, धिक्कार असो तुमच्या कृतीला. परमेश्वरा!"

गोष्ट अगदीं निकरावर आलेली पाहून जयचंद उठून बाहेर आला, आणि त्यानें आपल्या शिपायांस हुकूम केला कीं, मजकडे आलेल्या शिपायास नीट रीतीनें त्याच्या छावणींत पोंचवा; व नंतर तो घोड्यावर बसून मुसलमानांच्या छावणींत निघून गेला. इकडे संयोगितेनें बराच वेळ त्याची वाट पाहून पुष्कळ शोधही केला. परंतु त्याचा ठिकाण लागेना. तेव्हां ती निराश होऊन मुकाट्यानें आपल्या पतीकडे निघून आली.

या प्रसंगीं आपणास जय प्राप्त व्हावयाचा नाहीं, ही गोष्ट पृथ्वीराजास खास कळून चुकली होती. संयोगितेलाही तेंच भविष्य दिसत होतें. त्या प्रसंगीं त्यांनीं एकमेकांस शेवटचें आलिंगन दिलें. संयोगिता परत दिल्लीस गेली, आणि पृथ्वीराजा आपल्या शिबिरांतच राहिला. जातेवेळीं संयोगितेनें आपल्या प्रिय पतीस उपदेश केला "नाथ, आपण क्षत्रिय

आहांत; आतां आपलीं शस्त्रास्त्रें संभाळा, आणि संग्रामाची तयारी करा. क्षत्रियांनीं आपला वंश, देश, आणि प्रतिष्ठा यांकरितां प्राण जरी खर्ची घातला तरी त्यास मृत्यु म्हणत नाहींत. या संसारांत मनुष्यानें सुयशाची प्राप्ति करून घेऊन अमर झालें पाहिजे. यद्यपि आपण रणांत देहत्याग केलात, तरी मी आपणाबरोबर स्वर्ग-वास करण्यास येण्यास चुकावयाची नाहीं." हें संयोगितेचें भाषण ऐकून पृथ्वीराज म्हणाला "प्रिये, तुझी खात्री असूं दे कीं, जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत शत्रूला पाठ दाखवून हें अपजयानें काळें झालेलें मुख मी कोणासही दाखविणार नाहीं. आणि माझी खात्री आहे कीं, माझे सैनिकही मजप्रमाणेंच कीर्तीचे भुकेले आहेत; तेही कधीं अपयश घेऊन माघारे फिरावयाचे नाहींत." त्यावर संयोगिता म्हणाली—"आणि म्हणूनच मी देखील एवढ्याकरितां दिल्लीस जातें कीं, तेथील निराधार स्त्रिया आपलें स्वतःचें संरक्षण करण्यास समर्थ होणार नाहींत. मी न गेलें तर त्या गरीब बिचाऱ्या भीतीनें घाबरून गडबडून जातील. परंतु, तुम्हांला एवढी खात्री असूं द्या कीं, दुर्दैवानें आपला पराभव होऊन तो अविंध दिल्लीस आला तर त्यास एकही रजपूत स्त्री जिवंत सांपडावयाची नाहीं." असें म्हणून ती दिल्लीस निघून गेली.

दोन्ही सैन्यें कित्येक दिवस एकमेकांच्या हल्ल्याची वाट पहात बसलीं होतीं. दोघांनाही आपल्या सामर्थ्याचा गर्व होता. यांना वाटे ते प्रथम हल्ला करितील, आणि त्यांना वाटे हे

प्रथम हल्ला कारितील. पृथ्वीराजाचा तर निश्चयच झाला होता कीं, शत्रूचा हल्ला आल्याशिवाय आपण होऊन युद्धास सुरुवात करावयाची नाहीं. हे सर्व दिवस संयोगितेनें दिल्लींत केवळ योगिनीप्रमाणें व्रताचरणांत घालविले. कोणी म्हणतात, पृथ्वीराजानें युद्धास जातेसमयीं पाणी पिऊन जेवढें पाणी पेल्यांत शिल्लक राहिलें होतें, तेवढेंच पाणी पिऊन संयोगिता राहिली होती! नगरांतील सर्व स्त्रिया तिचेंच अनुकरण करीत होत्या. तिच्या मुखांतून अनुज्ञेचे शब्द निघतांच त्या सर्व मरण्यास तयार होत्या. राणी संयोगितेपासून तों एखाद्या झोपडींत राहण्यास मजूरणीपर्यंत सर्व स्त्रिया जयप्राप्तीकरितां परमेश्वराची अनन्यभावें प्रार्थना करीत होत्या. परंतु, या वेळीं परमेश्वरास दया आली नाहीं!

सरतेशेवटीं लढाईचा दिवस येऊन ठेपला. उभय सैन्यांतील वीर रणावेशानें एकमेकांवर तुटून पडले. तरवार सुरूं झाली. दिशा धुंद दिसूं लागल्या. प्रेतांचे ढीग पडले. रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या. आणि आज आतां सर्व मानवजातीचा संहार होतो कीं काय असें वाटलें. भाकित केल्याप्रमाणें पृथ्वीराजाचा पराभव होऊन त्याचें सर्व सैन्य रणभूमीवर पतन पावलें. परंतु एकही मनुष्य शरण गेला नाहीं, किंवा मागें फिरला नाहीं! विश्वासू सेवकांच्या प्रेतांच्या ढिगांत एके ठिकाणीं हजारों जखमांनीं व्याप्त झालेलें पृथ्वीराजाचें प्रेत सांपडलें. महमद घोरीस पूर्ण यश प्राप्त झालें. तेव्हां तो मोठ्या आनंदानें जयचंदाचें अभिनंदन करावयास गेला. परंतु काय

असेल तें असो, त्याला जें वाटत होतें कीं पृथ्वीराजाचा पराभव झाला म्हणजे आपणास समाधान वाटेल, तसें कांहीं घडलें नाहीं. त्यापासून त्याला अधिकच दुःख झालें.

महमद घोरी विजयानंदानें दुंदुभी वाजवीत दिल्लीकडे जावयास निघाला. जयचंदही त्याचे बरोबर होताच. ते दोघे दिल्लीस येऊन पाहतात तों तेथील राजवाड्यासमोर मोठी थोरली चिता पेटली असून संयोगितेसह सर्व स्त्रियांनीं अग्निकाष्ठें भक्षण केलीं आहेत! तो राजवाड्यासमोर धडाडलेला प्रचंड अग्नि आणि एकामागून एक अनेक स्त्रियांनीं आपल्या प्राणांची त्यास दिलेली आहुति पाहून महमद घोरीस मोठा विस्मय वाटला! दिल्लींतील शूर पुरुषांनीं स्वातंत्र्यरक्षणार्थ समरांगणीं आपले देह ठेविले, आणि पतिव्रता स्त्रियांनीं आपल्या पातिव्रत्यरक्षणार्थ चितेवर आपले देह ठेविले. इतकेंही करून ही भरतभूमि अक्षय पारतंत्र्यांत पडली ती पडलीच!

अभागी जयचंदास अखेर अत्यंत पश्चात्ताप वाटला. परंतु आतां पश्चात्ताप वाटून काय उपयोग! तो आपलें सैन्य घेऊन कनोज शहरास गेला; आणि इतिहास-वाचकांस ठाऊकच आहे कीं, त्याच्या पुढल्याच वर्षी त्याच्या मित्र म्हटलेल्या महमद घोरीनें त्याजवरच स्वारी करून त्याचा पराभव केला, आणि त्याचें मस्तक उडवून त्याचा प्राण घेतला; व त्याचें राज्यही दिल्लीच्या मुसलमानी राज्यांत सामील केलें.

# रत्न दुसरें.

## राणी पद्मिनी.

बाराव्या शतकाच्या प्रारंभीं उत्तर हिंदुस्थानांत जीं सुप्रसिद्ध रजपूत राज्यें होतीं, त्यांत मेवाडचें राज्य सर्वांत श्रेष्ठ आणि सामर्थ्यवान् होतें. त्याची राजधानी जी चितोड ती रजपूतस्थानाच्या वीरभूमींत अत्यंत महत्वाची मानिली जात असे. त्या ठिकाणीं शौर्य, सौंदर्य, आणि सुधारणा या गोष्टी एकोप्यानें वास करीत होत्या. ज्या काळचा इतिहास आम्ही पुढें देत आहों, त्या काळीं चितोडच्या गादीवर राणा लक्ष्मणसिंह नांवाचा एक बालराजा राज्य करीत होता. परंतु, तो वयानें फारच लहान असल्यामुळें त्याचा चुलता भीमसिंह हाच सर्व राज्याचा कारभार पहात असे. तो मोठा शूर, चतुर आणि बुद्धिमान् पुरुष होता. त्याच्यासारखा उत्तम कारभार कधींच कोणाच्या दृष्टीस पडला नसेल. राज्यांत सर्व प्रकारें शांतता असून भीमसिंह आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस अत्यंत प्रिय झाला होता.

परंतु, मेवाडवासी जनांची ही सुखद स्थिति त्यांना फार दिवस उपभोगावयास सांपडली नाहीं. त्यांच्या दुर्दैवानें दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दीन यानें चितोडावर स्वारी केली. अल्लाउद्दीनाची स्वारी म्हणजे प्रत्यक्ष टोळधाडच होती. त्यानें

साऱ्या उत्तर हिंदुस्थानांत प्रलय करून सोडिला होता. मूर्ति फोडणें, पवित्र क्षेत्रें भ्रष्ट करणें आणि पशूंप्रमाणें मनुष्यांचा संहार करणें या गोष्टी जणूं काय मुसलमानांच्या पांचवीला पुजलेल्या असत ! अशा स्थितींत अल्लाउद्दीन चितोड शहराजवळ येऊन पोहोंचला. भीमसिंहासारखा महापराक्रमी पुरुष आणि मेवाडचे कडवे रजपूत वीर यांच्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं, व आपण आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तीस मात्र बट्टा लागेल, असें समजुन अल्लाउद्दिन चितोडचा नाद सोडून देऊन दुसऱ्या एकाद्या शहरावर आपला मोर्चा फिरविण्याच्या बेतांत होता. परंतु, चितोडवासी जनांच्या खचितर दुर्दैवानें तशी गोष्ट घडून आली नाहीं. भीमसिंहाची पद्मिनी नांवाची राणी अत्यंत रूपवती आणि गुणवती आहे असें ऐकून तिच्या अभिलाषार्थ त्यानें मुद्दाम हठयुद्ध करण्याचा निश्चय केला.

ही भीमसिंहाची राणी सिंहलद्वीपच्या हमीरसिंग चव्हाणाची कन्या होती. हिच्यासारखी चतुर आणि लावण्यवती स्त्री आजपर्यंत झालीच नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. ती अत्यंत रूपवती होती, म्हणून तिचें नांव पद्मिनी ठेविलें होतें. रजपूतान्यांतील भाट कवींनीं तिच्या रूपलावण्याचें फार सुरस वर्णन केलें आहे. परंतु हें तिचें लावण्यच तिच्या आणि साऱ्या मेवाड प्रांताच्या नाशास कारण झालें. अल्लाउद्दिनास तिच्या प्राप्तीची लालसा उत्पन्न होऊन त्यानें चितोडजवळ आपल्या सैन्याचा तळ दिला. त्यानें प्रथमतः गुप्तपणें तिला

वश करण्याचा प्रयत्न चालविला. त्यानें आपले हेर शहरांत पाठवून कित्येक दासींना द्रव्याची लालूच दाखवून पद्मिनीकडे पाठविल्या. परंतु पद्मिनीसंबंधानें त्याची अटकळ सर्वथैव चुकीची ठरली. त्याला वाटलें होतें कीं, आपल्या ऐश्वर्याला भुलून ती आपणास वश होईल. परंतु कालांतरींही तशी गोष्ट होणें दुर्घट होतें. खरोखर रजपूत रमणींच्या नीतिमत्तेची आणि पातिव्रत्यादि सद्‌गुणांची दुराचारी मुसलमानांस कल्पना देखील करितां आली नसती. अशा रीतीनें पद्मिनी वश होणें अशक्य आहे असें जेव्हां त्यास कळून चुकलें, तेव्हां चितोडास वेढा देऊन बलात्कारानें तिचें हरण करण्याचा त्यानें निश्चय केला.

अल्लाउद्दिनानें चितोडास वेढा घातलेला पाहतांच रजपूत वीर मोठ्या त्वेषानें त्याजबरोबर लढाई देण्यास उभे राहिले. तरवारीशीं तरवार लागून गेली. मेवाडभूमीच्या शूर पुत्रांचें ठाणमाण त्यांच्या गडाप्रमाणेंच अढळ होतें. उभयपक्षांकडील लोकांच्या रात्रंदिवस घनचक्कर लढाया सुरू होत्या. "जय मिळवूं किंवा युद्ध करितां करितां प्राणही खर्ची घालूं." असा रजपूत वीरांचा निर्धार ! तिकडे मुसलमानांचाही किल्ला सर करण्याचा पक्का निश्चय ! अल्लाउद्दिनानें तर शपथ घेतली होती कीं, "पद्मिनी तरी मिळवीन, नाहीं तर या रजपुतस्थानच्या गिरिप्रदेशांतच समरांगणीं आपला देह ठेवीन."

दिवसांमागें दिवस व महिन्यांमागें महिने लोटत चालले, तरी रजपूत वीर कांहीं केल्या हार जाईनात. त्यांची संख्या

मात्र कमी कमी होत चालली. मुसलमानांच्या सैन्यांत रोज बाहेरून नवीन लोकांची भरती होत होती. 'जिवापाड मेहनत करूनही किल्ल्याभोंवतीं पडलेला वेढा उठेना, तेव्हां भीमसिंह अगदीं टेकीस आला. त्याचे असंख्य लोक जखमी होऊन कित्येक तर मृत्युमुखींच पडले. शेवटीं निरुपायास्तव त्यानें मुसलमान लोकांशीं तहाचें बोलणें सुरू केलें. त्या वेळीं भीमसिंहाला मरणप्राय दुःख झालें! परंतु युद्ध सुरू ठेवून अगणित मनुष्यांचा संहार होऊं देणें त्यास इष्ट वाटेना. अल्लाउद्दिनानें तह करावयास आलेल्या लोकांचे हातीं परत निरोप पाठविला कीं, मला पद्मिनी प्राप्त झाल्याखेरीज मी रजपूत लोकांना शांततेचा उपभोग घेऊं देणार नाहीं! हा निरोप ऐकून रजपूत वीर एखाद्या डवचलेल्या सर्पाप्रमाणें खवळून गेले. रजपुतांसारख्या मानी लोकांना असला अपमान कोठून सहन होणार! या कामीं सर्व रजपूत कुळाचा विध्वंस झाला तरी बेहेत्तर आहे, परंतु अल्लाउद्दिनास पद्मिनी प्राप्त होऊं द्यावयाची नाहीं, असा त्यांनीं दृढ निश्चय केला. असें झाल्यामुळें चितोडचा वेढा जास्त दृढ होऊन पुन्हां मुसलमान आणि रजपूत यांच्या नित्यशः निकराच्या लढाया सुरू झाल्या.

सुमारें दीड वर्ष होत आलें, तरी रजपूत कांहीं हार जाईनात. ते धैर्यमेरु एकसारखे अल्लाउद्दिनाच्या प्रचंड सेनेशीं टक्कर देऊन आपल्या किल्ल्याचें संरक्षण करीत होते. शेवटीं चितोड सर करून पद्मिनीचें हरण करण्याचा नाद सोडून

देणें अल्लाउद्दिनास भाग पडलें. तरी पण, पद्मिनीच्या सौंदर्यास मोहित झालेलें त्याचें मन त्याला तेथून जाऊं देईना. तेव्हां त्यानें आपण होऊनच निरोप पाठविला कीं, मला पद्मिनी प्राप्त होण्याची आतां बिलकूल आशा राहिली नाहीं. एक वेळ मला जर तिचें दर्शन होईल तर माझें जन्मसार्थक्य झालें असें मी समजेन; करितां ती एक वेळ माझे दृष्टीस तरी पडेल असें करा, ह्मणजे मी आपल्या सैन्याचा तळ उठवून येथून निघून जाईन."

इकडे रजपूत लोकही त्याच्याशीं युद्ध करितां करितां अगदीं टेंकीस आले असल्यामुळें, त्याच्या म्हणण्यास पर्यायानें रुकार देण्यास ते तयार झाले. त्यांनीं सर्वानुमतें असें ठरविलें कीं, त्यास पद्मिनीचें प्रत्यक्ष दर्शन तर होणार नाहींच, परंतु त्यास पाहिजे असल्यास त्यानें एक दोन सेवक बरोबर घेऊन किल्ल्यांत यावें व आरशांत पद्मिनीचें रूप पाहून चालतें व्हावें. अल्लाउद्दिनास हें म्हणणें मान्य होऊन त्यानें युद्ध करण्याचें बंद केलें. मग ठरलेल्या दिवशीं अल्लाउद्दीन फक्त एक दोन सेवकांसह किल्ल्यांत आला व पद्मिनीला पाहण्याची आपली इच्छा तृप्त करून परत जावयास निघाला. परत जातेवेळीं त्यानें आपल्या दुर्वर्तनाबद्दल पश्चाताप प्रदर्शित करून म्हटलें " या वेळीं भीमसिंहमहाराजांची क्षमा मागितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. इतउत्तर मी चितोडच्या राजघराण्याशीं सलोख्यानेंच वागेन. रजपूत लोकांचें शौर्य आणि भीमसिंह यांचें वैभव यांची जर मला यापूर्वीं

यत्किंचित् तरी माहिती झाली असती, तर मी त्यांच्याशीं युद्ध करण्याचें मनांतही न आणितां उलट त्यांची मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न केला असता. असो. झालें तें झालें. आपण मला आपला मित्र म्हटल्यानें मी आपणास धन्य मानीत आहें. यापुढें रजपुतांचें आणि मुसलमानांचें वैर चिरनष्ट झालें असें समजा." इतकें बोलून त्यानें आपल्या हातानें भीमसिंहाचा हात धरून म्हटलें "राणाजी, माझी आपणापाशीं एक शेवटची विनंति अशी आहे कीं, उदयीक आपण आमचे छावणींत येऊन आमच्या अल्प सत्काराचा स्वीकार करावा. माझी खात्री आहे कीं, यासंबंधानें आपण मला निराश करणार नाहीं." सत्वशील, सत्यवचनी, आणि थोर अंतःकरणाच्या भीमसिंहानें तें त्याचें म्हणणें मोठ्या आदरानें मान्य केलें.

परंतु, अल्लाउद्दिनाचें हें भाषण केवळ मायावीपणाचें होतें. वस्तुतः त्याचे मनांत दगा करून भीमसिंहास कैद करावयाचें होतें. वचनाप्रमाणें अगदीं थोडे लोक बरोबर घेऊन भीमसिंह अल्लाउद्दिनाचे गोटांत जावयास निघाला. अल्लाउद्दिनानें विश्वासघातानें त्यास पकडण्याकरितां आपले लोक दबा धरून बसविले होते. भीमसिंह गोटाजवळ येतांच एकदम ते लोक त्याचे भोंवतीं गोळा झाले; आणि भीमसिंहास तेथून निघून जाण्यास यत्किंचितही अवसर न देतां त्यांनीं त्यास अचानक कैद करून टाकिलें. मग काय विचारितां! भीमसिंह हातीं आलेला पाहतांच मुसलमानांचे

छावणींत आनंदीआनंद भरला, आणि चितोडचे लोकांवर दुर्धर प्रसंग गुदरला. अल्लाउद्दिनानें चितोडास निरोप पाठविला कीं, "पद्मिनी जर माझे स्वाधीन झाली नाहीं, तर मी भीमसिंहाचा प्राण घेऊन पुन्हां रजपूत लोकांशीं युद्ध सुरूं करीन." हा निरोप ऐकून तर रजपूत लोकांचे काळजानें ठाव सोडिला.

चितोडचा राणा लक्ष्मणसिंह हा केवळ पोरवयाचा असून भीमसिंहाचे बारा मुलगेदेखील वयानें अगदींच लहान होते. परंतु, अशा आणीबाणीच्या प्रसंगींही पद्मिनीनें धीर सोडला नाहीं. सुदैवानें या वेळीं तिचा भाऊ गोरासिंह आणि त्याचा मुलगा बादल असे दोघे नामांकित शूर पुरुष तेथें होते. त्यांच्या सल्ल्यानें तिनें आपल्या पतीची सुटका करण्याची एक विलक्षण हिकमत योजिली. तिनें, जसा कांट्यानें कांटा काढावा, तसा कपटानेंच अल्लाउद्दिनास फशीं पाडण्याचा उपाय काढिला. तिनें अल्लाउद्दिनास सांगून पाठविलें कीं, "भीमसिंहाची मुक्तता करून जर तुम्ही चितोडचा वेढा उठवीत असाल तर मी खुशीनें तुमच्याकडे येण्यास तयार आहें; परंतु माझ्या वैभवास शोभेल असा इतमाम बरोबर घेऊन मी येईन. माझ्या दासींची आदब राखण्याकरितां तुमच्या गोटांतील कोणाही मनुष्यानें त्यांजकडे पाहतां कामा नये." हा पद्मिनीचा निरोप ऐकून अल्लाउद्दिनाचे आनंदास पारावार नाहींसा झाला. पद्मिनीच्या सौंदर्यदर्शनानें वेडावलेला अल्लाउद्दीन तिचें कोणतेंही म्हणणें या वेळीं कबूल

करिता. मग तिनें पाठविलेल्या निरोपांत तर विशेष कठीण असें कांहींच नव्हतें. त्यानें ती गोष्ट तत्काळ कबूल केली, आणि निरोप घेऊन आलेल्या मनुष्यास तिला लौकर घेऊन येण्यास सांगितलें.

अल्लाउद्दिनाचा निरोप येतांच पद्मिनी त्याचे गोटांत जावयास निघाली. तिनें सातशें बुरख्यांचा पालख्या तयार करून प्रत्येक पालखींत तीन तीन हत्यारबंद शिपाई दासींच्या वेषानें बसवून दिले. तसेंच प्रत्येक पालखीबरोबर सहा सहा हत्यारबंद शिपाई आपलीं हत्यारें लपवून भोयांच्या वेषानें पालखी उचलावयास लाविले होते. याप्रमाणें ती राक्षसी सेना स्त्रीरूप धारण करून अल्लाउद्दिनाचे गोटांत जावयास निघाली. पद्मिनीनें आपला भाऊ गोरासिंग आणि बालवीर बादल यांसही बरोबर घेतलें होतें. पद्मिनीची प्राप्ति होण्याचे आशेनें मोहित झालेल्या अल्लाउद्दिनास या कपटप्रबंधाचा यत्किंचित्‌ही संशय आला नाहीं. त्यानें मोठ्या आदरानें आणि बिनहरकत त्या सर्व पालख्या आपल्या गोटांत येऊं दिल्या.

पद्मिनीचे भेटीविषयीं आतुर झालेला अल्लाउद्दीन, ती आपल्या तंबूंत केव्हां येते म्हणून, अगदीं चातकाप्रमाणें वाट पहात बसला होता. इतक्यांत पद्मिनीनें, आपली आणि भीमसिंहाची शेवटची भेट व्हावी, म्हणून बुरख्यांतूनच त्याची प्रार्थना केली. अल्लाउद्दिनास हें तिचें म्हणणें नाकारितां येईना, म्हणून त्यानें तिजला भीमसिंहाचे तंबूंत जाण्याची परवानगी दिली. पद्मिनी दृष्टीस पडतांच भीमसिंह आश्चर्य-

चकित होऊन म्हणाला, " हें काय ! तूं या ठिकाणीं कशी आलीस ! ". पद्मिनी म्हणाली " आतां बोलण्यास अवधि नाहीं. तयारी करा. आपल्या सुटकेबद्दलची सर्व व्यवस्था उत्तम रीतीनें केली आहे. " याप्रमाणें पद्मिनीनें सांगतांच भीमसिंह तयार झाला व तीं दोघेंजण इतक्या त्वरेनें तंबूचे बाहेर आलीं कीं, पहारेवाल्यांस त्यांना आडवून धरण्याचाही अवसर मिळाला नाहीं. तंबूतून सुटका होतांच भीमसिंह आणि पद्मिनी, त्यांच्याकरितां तयार असलेल्या घोड्यांवर बसून, वायुवेगानें अल्लाउद्दिनाचे गोटांतून बाहेर पडलीं; आणि सुरक्षितपणें चितोडास येऊन पोहोंचलीं.

इकडे अल्लाउद्दिनानें " भेटीस किती हा उशीर ? " असें म्हणतांच तें दासींच्या रूपानें गोटांत आलेलें घटोत्कचीं सैन्य आपलीं शस्त्रास्त्रें सावरून एकदम अल्लाउद्दिनावर तुटून पडलें. अल्लाउद्दीनही गैरसावध नव्हता; त्यानें " दगा रे दगा ! " असें म्हणून आपले लोकांस रजपूत सैन्याची कत्तल करण्याचा हुकूम फर्माविला. त्या वेळीं जी रणधुमाळी माजली तिचें वर्णन करण्यास बारामतीकर पंतांचीच वाणी पाहिजे. " अन्योन्य ह्मंगुल्ही, राहों देती न धड कलेवर ते " हें पंतांचें वर्णन या स्थळीं अक्षरशः लागू पडतें. रजपूत लोकांनीं आपले शौर्याची कमाल केली. सेनापति गोरासिंग या तुंबळ युद्धांत कामास आला ! तें पाहतांच अर्जुनपुत्र अभिमन्यूप्रमाणें त्याचा पराक्रमी पुत्र बादल यानें सेनापत्य स्वीकारिलें. बादलसारख्या बारा वर्षांच्या कोमल मुलाचें तें अचल

धैर्य पाहून रजपूत वीरांच्या अंगांत अनावर रणावेश भरला. त्यांनीं मुसलमानांची एकसहा कत्तल आरंभिली;. परंतु दुर्दैवानें बादलही त्या संग्रामांत पतन पावून सारें रजपूत सैन्य नष्टप्राय झालें. रजपूत वीरांनीं आपल्या धन्याच्या संरक्षणार्थ आपल्या प्राणांचे त्या रणमेधास बळी दिले, आणि जगाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें. या गोष्टीस शेंकडों वर्षें लोटून गेलीं आहेत, तरी देखील रजपुतान्यांतील शेतकरी लोक गोरा आणि बादल यांचीं वीररसपूर्ण कवनें मोठ्या प्रेमानें अद्याप गात असतात.

भीमसिंह अल्लाउद्दिनाच्या गोटांतून पद्मिनीसह सुरक्षितपणें परत आला, याबद्दल चितोडचे लोकांस महदानंद झाला खरा, परंतु गोरा आणि बादल या दोघांचे मृत्यूमुळें त्यांना जें दुःख झालें त्याचें परिमार्जन कशानेंही होणारें नव्हतें. अस्तु. वर लिहिल्याप्रमाणें रजपूत लोकांचा संहार होऊनही राणा भीमसिंह याचें दुःख संपलें नाहीं. कांहीं काळ लोटल्यानंतर अल्लाउद्दिनानें पुन्हां चितोडावर स्वारी केली. या वेळीं तो फार मोठें सैन्य घेऊन आला होता. पूर्वीप्रमाणेंच युद्धांत शत्रूस मारूं किंवा मरूं अशा प्रतिज्ञेनें दोघांचें युद्ध जुंपलें. परंतु या वेळीं एक अद्भुत गोष्ट घडून आली, तेणेंकरून रजपुतांस यश येण्याची यत्किंचितही आशा उरली नाहीं. एके दिवशीं रात्रीं भीमसिंहास एक स्वप्न पडलें. त्यांत चितोडची नगरदेवी त्याजपुढें येऊन त्यास म्हणाली " मैं प्यासी हूं, और बारा रजपूतोंका खून पियेबिना मेरी प्यास न मिटेगी."

खरोखर त्याप्रमाणेंच झालें. मुसलमानांशीं चाललेल्या युद्धांत भीमसिंहाचे एकामागून एक अकरा पुत्र समरांगणीं ठार झाले, तरी देखील रजपूतांनीं धीर सोडिला नाहीं. त्यांनीं मुसलमान लोकांना चितोडच्या दरवाजापासून हुसकून लावण्याकरितां अखेरची आणि निकराची लढाई सुरू केली. त्यांना या प्रयत्नांत यश येण्याची आशाही नव्हतीच. तथापि हार खाऊन शत्रूस शरण जाण्यापेक्षां सर्वांनीं युद्ध करितां करितां मरावें हेंच त्यांस श्रेयस्कर वाटलें आपणां सर्वांस या युद्धांत मरावें लागणार आहे व त्यामुळें सिसोदिया वंशाचा समूळ उच्छेद होईल, ही गोष्ट रजपुतांच्या मनांत पूर्णपणें येऊन चुकली; म्हणून त्यांनीं सिसोदिया वंशाचा एकादा तरी अंकुर कायम रहावा म्हणजे अनकूल काल आल्यास तो चितोडचें राज्य परत घेईल, अशा विचारानें भीमसिंहाच्या सर्वांत धाकट्या पुत्रास एका दाईच्या स्वाधीन करून, गुप्तपणें तिला चितोडच्या बाहेर एका अरण्यांत पोंचतें केलें. अशा रीतीनें आपल्या तडाक्यांतून सुटून शत्रूचा मुलगा बाहेर निघून गेला ही गोष्ट त्या गर्विष्ठ मुसलमानांस माहीत देखील झाली नाहीं.

चितोड नगरांतील जखम झालेलीं माणसें आणि लहान अर्भकें खेरीज करून बाकींचे सर्व लोक भीमसिंहाबरोबर धारातीर्थीं देह ठेवण्यास तयार झाले. ज्या युद्धांत रजपुतांसारखे कट्टे वीर प्रतिज्ञापूर्वक मुसलमानांचा संहार करण्यास सिद्ध झाले होते, त्याचें काय वर्णन करावें ? सूर्योदयापासून सायं-

काळपर्यंत एकसारखी धुमश्चकी चालून दिनमणीच्या अस्ताबरोबरच सारे रजपूतवीर अस्तंगत झाले, व अल्लाउद्दिनास जय प्राप्त झाला. त्याचेंही असंख्य सैन्य रजपुतांच्या माराखालीं नष्टप्राय होऊन गेलें होतें.

सायंकाळीं ही बातमी जेव्हां चितोडनगरास पोंचली, तेव्हां पद्मिनीसह सर्व रजपूत स्त्रियांनीं सती जाण्याचा निश्चय केला. त्यांनीं शहराचे मध्यभागीं मोठी थोरली चिता रचून तीस अग्नि लाविला, आणि सात वेळ प्रदक्षिणा घालून एकामागून एक पद्मिनीसह सर्व स्त्रियांनीं गंभीर मुद्रेनें त्या चितेंत प्रवेश केला. अल्लाउद्दीन विजयानंदानें प्रेरित होत्साता चितोड नगरींत शिरला, व पाहतो तों मोठीथोरली चिता धडकली असून तिच्या ज्वाला गगनास जाऊन पोहोंचल्या आहेत व त्या चितेंत जिच्याकरितां त्यानें एवढा भगीरथ प्रयत्न केला ती पद्मिनी भस्मरूप होऊन गेली आहे ! कोणी इतिहासकार ह्मणतात कीं, खुद्द भीमसिंहानेंच अखेरचें युद्ध सुरूं करण्यापूर्वीं चितोडच्या सर्व स्त्रियांस पद्मिनीसह एका गुहेंत कोंडून त्या गुहेस अग्नि लाविला. कोणताही इतिहास खरा मानिला तरी तात्पर्य एकच आहे. असो. अल्लाउद्दिनानें एवढा खटाटोप करून काय मिळविलें म्हणाल, तर सर्व मनुष्यें नाहींशीं होऊन भयाण झाल्यामुळें स्मशानवत् भासूं लागलेलें चितोड हें होय. अशा प्रकारच्या लोकोत्तर प्रसंगांनीं राजस्थानचा इतिहास सर्व जगाचे इतिहासांत उच्च स्थान पावला आहे.

---

# रत्न तिसरें.

## अर्गलची राणी.

बहार प्रांतांतील सांप्रतच्या बक्सार नामक शहराजवळ, पूर्वी अर्गल नांवाचें एक मांडलिक राज्य होतें. तेथील राजाचें नांव गौतम असें होतें. आणि आपली चरित्र-नायिका ही त्याची पट्टराणी होती. त्यानें एकदां दिल्लीच्या बादशहास खंडणी देण्याचें नाकारल्यावरून बादशहानें अयोध्येचे नबाबास त्याजवर स्वारी करण्याचा हुकूम केला. दिल्लीश्वराचे हुकुमाप्रमाणें अयोध्येचा नबाब अर्गल-वर स्वारी करावयास गेला खरा परंतु अर्गलचा राजा आप-णाला चांगलाच भारी आहे असें त्यास कळून आलें. कारण, अर्गलच्या सैन्यानें बादशाही सेनेची फार भयंकर रीतीनें कत्तल उडवून तिचा पराभव केला. तेव्हां उरलेसुरले लोक आपला जीव घेऊन मोठ्या त्वरेनें मागें फिरले. इकडे अर्ग-लाधिपति राजा गौतम मोठ्या थाटानें जयघोष करीत आपल्या किल्ल्यांत परत गेला, व तेथें गेल्यावर त्यानें त्याच दिवशीं जयप्राप्तीच्या आनंदप्रदर्शनार्थ आपल्या सर्व सरदारांस मेज वानी देण्याचा बेत केला.

वर सांगितल्याप्रमाणें गोष्ट घडल्यानंतर दुसरा एका चम-त्कारिक प्रसंग घडून आला, तो असाः—प्रत्येक पौर्णिमेल

गंगातीरीं स्नान करावयास जाण्याचा राणीनें नियम केला होता. आणि तो तिचा नियम मोडून जर तिचें गंगास्नान अंतरलें, तर खात्रीनें अर्गलच्या राज्यावर कांहीं तरी अनर्थ गुदरेल अशी तिची समजूत होती. ज्या दिवशीं गौतमानें मुसलमान फौजेचा पराभव करून तीस मागें हटविलें, त्याचे दुसरे दिवशींच पौर्णिमा आली होती. इकडे राजदरबारांत सर्व लोक आनंदमग्न झाले असतां, तिकडे राणीच्या चित्तास मात्र चिंतेनें घेरिलें. कारण तिला पौर्णिमेनिमित्त गंगास्नानास जावयाचें होतें, आणि ज्या प्रदेशांतून गंगा वहात होती तो प्रदेश युद्धांत पराभव पावून मागें परतलेल्या शत्रूच्या ताब्यांत होता. राणीनें आपल्या मनाशीं पुष्कळ विचार केला आणि शेवटीं कोणाला न कळत रात्रीच्या वेळीं कांहीं थोड्या दासी बरोबर घेऊन गंगातीरीं जाण्याचा तिनें निश्चय केला. अर्गलपासून कांहीं मैलांच्या अंतरावर बक्सार येथेंच गंगाप्रवाह असून त्यावर स्नान वगैरे करण्याकरितां घाट बांधले आहेत. राणीच्या मनांत रात्रीच्या रात्रीं कोणास न कळूं देतां त्या ठिकाणीं जाऊन स्नानविधि सारून परत मुकाम्यानें घरीं यावयाचें होतें. परंतु तसें घडलें नाहीं.

वर सांगितलेला निश्चय झाल्यावर थोड्याशा दासी बरोबर घेऊन राणी किल्ल्याबाहेर आली, आणि कांहीं एक हालचाल न होऊं देतां रात्रीच्या वेळीं झपाट्यानें मार्ग क्रमावयास लागली. परंतु किल्ल्यांतून बाहेर पडण्यास बराच विलंब लागल्यामुळें राणी मार्ग क्रमीत असतां प्रभात होऊन चोहोंकडे प्रकाश

पडूं लागला, आणि "प्रचंड नदनद्यांची केवळ जननीच, वैराग्यसंपन्न मुनिजनांस परम पूज्य, सर्वप्रिय, निरुपम आणि युगायुगांचें ठायीं जिची प्रसिद्धि अशी जी गंगा," त्या गंगेच्या तीरावर ती येऊन पोहोंचली. तेथें आल्यावर मोठ्या आनंदानें ती घाटावर गेली, आणि पौर्णिमेसंबंधीं सर्व प्रकारचे तीर्थविधि करून तिनें त्या पवित्र गंगाजलांत स्नान केलें. येथपर्यंत सर्व गोष्टी नीटपणें पार पडल्या. परंतु राजस्त्रीचें इतक्या सर्व गोष्टी करून कोणास न कळत परत जाणें कसें घडावें? लागलीच ती बातमी तेथून जवळच तळ देऊन बसलेल्या नबाबाच्या कानीं गेली, आणि गंगेवर स्नानास आलेली स्त्री दुसरी कोणी नसून अर्गलच्या राजाची राणी आहे अशी त्याची खात्री झाली. त्यास वाटलें कीं, या प्रसंगीं राणीस पकडून कैद केलें असतां सहजच गौतम आपल्याशीं तह करण्यास तयार होईल, व त्याचा पराभव करून खंडणी वसूल करून आणल्याबद्दल आपणास दिल्लीश्वराजवळ फुशारकी मारावयास सांपडेल. त्यानें लागलीच तिला धरून आणण्याचा आपले लोकांस हुकूम केला.

गंगास्नानाचे सर्व विधि उरकून राणी अर्गलच्या किल्ल्याकडे परत जात असतां एकाएकीं तिचे भोंवतीं नबाबाचा सैन्याचा वेढा पडला. या वेळीं राणीच्या अंतःकरणाची काय स्थिति झाली असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी. परंतु, अशा दुर्धर प्रसंगींही राणी घाबरून गेली असें मात्र कोणीं समजूं नये. आपले भोंवतीं शत्रुसैन्याचा वेढा पडलेला

पाहून ती रागानें लाल झाली. तिनें त्या प्रसंगीं अचल धैर्य प्रकट करून शत्रूशीं सामना देण्याचा निश्चय केला. तिजप्रमाणेंच तिच्या दासीही धैर्य धरून तिजबरोबर उभ्या राहिल्या. त्यांनीं आपल्या बरोबर आणलेल्या कट्यारी बाहेर काढिल्या. राणीचें हें लोकोत्तर धैर्य पाहून मुसलमान लोकांच्यानेंही एकदम तिजवर शस्त्र टाकवेना. तथापि त्या भैरवी रूप धारण केलेल्या राणीनेंच जेव्हां शस्त्र चालविण्यास सुरवात केली, तेव्हां मुसलमान लोकांनींही तिजवर शस्त्र चालविलें; अशा रीतीनें कांहीं वेळ थोडीशी चकमक झडून राणीस आपणाला यश येण्याची आशा दिसेनाशी झाली, तेव्हां ती मोठ्यानें ओरडून म्हणाली "या प्रसंगीं माझें संरक्षण करील असा एकही हिंदुवीर नाहीं काय ? जर असा कोणी वीरपुरुष या ठिकाणीं असेल, व त्याला हिंदुस्त्रियांचा अभिमान असेल, तर त्यानें माझ्या संरक्षणार्थ मुसलमानांशीं युद्ध केल्याशिवाय राहूं नये. त्यास माझी द्वाही आहे."

राणीच्या मुखांतून हें आवेशाचें भाषण बाहेर पडतांच अभयचंद आणि निर्भयचंद नांवाचे दोघे वीर थोड्याशा लोकांसहवर्तमान नबाबाच्या सैन्यावर उलटून पडले आणि त्यांची कत्तल करीत ते ज्या ठिकाणीं आपल्या दासींसहवर्तमान राणी धैर्य धरून उभी होती त्या ठिकाणीं येऊन पोहोंचले. आपल्या साह्यास दोन हिंदू वीर आलेले पाहून राणीस पुन्हां आवेश चढला व त्यांच्या साह्यानें शत्रुसैन्याची फळी फोडून आपल्या दासींसहवर्तमान ती सुरक्षितपणें बाहेर पडली. आ-

पल्या हातीं सांपडत असलेली राणी निसटून जातेसें पाहून नबाबाच्या सैन्यानें मोठ्या निकरानें तिचा पाठलाग केला. त्या वेळच्या युद्धांत निर्भयचंदास जबरदस्त जखम लागून तो पडला, आणि त्याचे कित्येक साथीदारही जाया झाले. इतक्यांत राणीला अर्गलाहून मदत येऊन पोहोंचली. ही सर्व हकीकत राजा गौतम यास समजल्यावरून तो मोठ्या त्वरेनें तिला साह्य करण्यास धांवत आला.

हें नवीन आलेलें सैन्य पहातांच नबाबाच्या सैन्याची अगदीं गाळण उडाली, आणि तें आपला जीव घेऊन पळून गेलें. अभयचंदानें राजाजवळ राणीच्या अचल धैर्याची आणि लोकोत्तर शौर्याची फारच तारीफ केली. तसेंच अभचंदाचा पराक्रम पाहून राणी इतकी खुष झाली कीं, तिनें राजाच्या संमतीनें आपल्या कन्येचें त्याबरोबर लग्न लावून दिलें. यानंतर मुसलमान लोकांनीं त्यांस कधींही त्रास दिला नाहीं. बिचारा नबाब मात्र या अपयशाबद्दल जन्मभर लोकांचा अपमान सहन करीत राहिला.

---

# रत्न चवथें.

## कर्मदेवी.

ज्या वीरबालेचें जीवनचरित्र पुढें यावयाचें आहे तिचें जन्म मारवाडांतील औरिंत नामक संस्थानचा अधिपति मोहिलराज माणिकराज याच्या श्रेष्ठ कुलांत झालें होतें. ती रूपानें सुंदर, वयानें तरुण, ज्ञानानें श्रेष्ठ, आणि दृढ अंतःकरणाची असल्यामुळें अनेक राजेरजवाड्यांकडून तिजविषयीं मागण्या घालण्यांत आल्या होत्या. ती आपल्या आईबापांस तर प्राणाहूनही प्रिय झाली होती. अनेक राजांकडून मागण्या घालण्यांत आल्यामुळें आतां हें कन्यारत्न कोणास अर्पण करावें याचा त्यांस मोठा विचार पडला. पुष्कळ प्रकारें वाटाघाट होतां होतां शेवटीं मुंदराधिपति राजा चंड याचा चवथ मुलगा अरण्यकमल याजबरोबर तिचा विवाह करून देण्याचें ठरलें. कर्मदेवीसारखी सुंदर आणि सद्गुणी राजकन्या आपणांस प्राप्त होणार असें समजतांच अरण्यकमलास अतिशय आनंद झाला. परंतु परमेश्वरी योजना कांहीं निराळीच होती.

कर्मदेवी नुसत्या रूपसौंदर्याला भुलणारी नव्हती. ज्या पुरुषाचे ठायीं शौर्यौदार्यादि सद्गुण वास करीत असतील अशा पुरुषास माळ घालण्याचा तिचा निश्चय झाला होता. आपल्या

लाडक्या कन्येस चांगलें स्थळ मिळाल्याबद्दल मोहिलराजास-ही मोठा आनंद प्राप्त झाला होता. परंतु कन्येच्या अंतः-करणांत ठाम होऊन बसलेल्या विचारांची त्यास कल्पना देखील नव्हती. जसजसा विवाहाचा दिवस जवळजवळ येऊं लागला, तसतशी मोहिलराजानें मोठ्या कडाक्यानें लग्नसमा-रंभाची तयारी चालविली इकडे कर्मदेवीची प्रेमवृत्ति दुस-ऱ्याच एका शूर पुरुषाच्या ठिकाणीं संलग्न झाली होती.

जसलमीरच्या भट्टी राजाच्या प्रांतांतील पुगल नांवाच्या परगण्याचा राणा रणंगदेव, याचा महापराक्रमी पुत्र जो साधू तो कर्मदेवीच्या अढळ प्रेमाचें स्थान झाला होता. त्या वीरानें अनेक देश पादाक्रांत करून यश व संपत्ति यांचा लाभ करून घेतला होता. नागोरपासून सिंधुनदाच्या तीरा-पर्यंतच्या प्रदेशावर अनेक वेळां स्वाऱ्या करून त्यानें अतो-नात संपत्ति मिळवून आणिली होती. त्याच्या अमर्याद साम-र्थ्याच्या कथा सर्व राजपूतानाभर सांगितल्या जात असून, अनेक ठिकाणचे लोक त्यास फार भीत व त्याच्याविषयीं अत्यंत आदरही बाळगीत. साधू हा सुंदर, तरुण व फार बलवान् असा होता. वीरता हेंच त्याचें मुख्य भूषण होतें. कोठेंही स्वारी करण्याचे वेळीं तो औरिंत नगरामधून जात येत असे. त्यामुळें औरिंत नगरांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस त्याची चांगली ओळख असे. कर्मदेवीचा पिता मोहिलराज हा कधीं कधीं साधूस आदरानें आपल्या घरीं बोलावी आणि त्याजबरोबर नाना प्रकारच्या स्वारीशिकारीच्या गोष्टी सांगे.

ते वेळीं कर्मदेवी आड उभी राहून त्याच्या शूरत्वाच्या गोष्टी चित्त देऊन ऐके, व त्यांपासून तिजला अतोनात आनंद होई. खरोखर रजपूत स्त्रियांचीं मनें क्षात्रतेजाचीं मूलस्थानेंच होत. जों जों साधूच्या शौर्यकथा कर्मदेवीच्या कानीं पडत, तों तों ती अधिकाधिकच त्यास मान देऊं लागली व त्या मानबुद्धीनें लौकरच प्रेमाचें स्वरूप धारण केलें. एके दिवशीं साधू आणि कर्मदेवी यांची दृष्टादृष्ट होऊन दोघांच्याही मनांत परस्परांविषयीं प्रेमांकुर उद्भवला. परंतु, या गोष्टीची मोहिलराजास वार्ताही नव्हती.

जसजशी ठरलेली लग्नतिथि जवळ येत चालली, तसतशी कर्मदेवीच्या चित्तास चिंतारूपी राक्षसी अत्यंत पीडा देऊं लागली. तिला कांहीं एक सुचेनासें झालें. अरण्यकमलाशीं आपलें लग्न लागल्यास आपला सारा जन्म व्यर्थ होणार असें वाटून तिला फार दुःख होत असे. शेवटीं एके दिवशीं योग्य समय पाहून आपल्या अमला नांवाच्या आवडत्या दासीजवळ तिनें आपलें हृदय उघडें केलें. अमलेनें तिची अनेक प्रकारांनीं समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. कर्मदेवीने तिजला स्पष्ट सांगितलें कीं, "हें हृदय धनैश्वर्यांचें लोभी नाहीं. केवळ वीर्यशौर्यांच्या गोष्टी ऐकून ज्याला या हृदयानें वरिलें आहे, त्याच्याशिवाय अन्य पुरुष त्यास पित्यासमान आहेत. ज्याला त्यानें एकवार वरिलें तोच या हृदयाचा आतां अधिदेव होय. हें हृदय आणि हें शरीर आतां दुसऱ्या कोणास कधींही प्राप्त होणार नाहीं." कर्म-

देवीनें हे शब्द इतक्या दृढतेनें उच्चारले कीं, अमलेस त्या-संबंधांत आणखी एक शब्दही उच्चारण्याचें धैर्य होईना. शेवटीं हें वर्तमान राणीस आणि मोहिलराजास कळवून त्याचें मन वळविण्याचें अभिवचन देऊन अमला तेथून निघून गेली.

अमलेच्या मुखानें ती सर्व हकीकत कर्मदेवीच्या मातापितरांस कळतांच, आतां याला काय उपाय करावा तें त्यांस सुचेना. अरण्यकमलास दिलेलें वचन मोडल्यास त्याला आपला अपमान झालासें वाटून, तो अनर्थ केल्यावांचून राहाणार नाहीं, अशी मोहिलराजास पूर्ण खात्री होती. आपल्या आवडत्या परंतु स्वच्छंदी पोरीच्या तंत्रानें वागून रक्तपाताचा प्रसंग येऊं देणें मोहिलराजास इष्ट वाटेना. परंतु राणीचें मत कन्येच्या इच्छेप्रमाणें तिजला साधूसच अर्पण करावी असें पडलें. ती म्हणाली–" ज्याच्या संगतींत तिला आपलें सर्व आयुष्य कंठावयाचें आहे, त्याचे ठायीं जर तिची मुळींच प्रीति नसली, तर त्याचा काय उपयोग ? त्यापेक्षां तिच्या इच्छेप्रमाणें तिचा विवाह करून देऊन आपलें अपत्यप्रेम तरी व्यक्त करावें, मग पुढें काय होईल तें होवो." याप्रमाणें भवति न भवति होऊन शेवटीं तिजला साधूसच देण्याचें मोहिलराजानें ठरविलें, व त्यास आपल्या राजधानींत धाडून देण्याविषयीं त्याचे पित्यास पत्र पाठविलें.

मोहिलराजाकडून बोलावणें येतांच सातशें शिपाई बरोबर घेऊन मोठ्या आनंदानें साधू औरिंत नगरास आला. तेथें आल्यावर मोठ्या समारंभानें कर्मदेवीशीं त्याचें लग्न

लागलें कर्मदेवीचा आनंद गगनांत मावेना. तिला आपल्या जन्माचें सार्थक झालेंसें वाटलें. लग्न झाल्यावर कांहीं दिवस औरिंत नगरांत राहून पुढें साधू आपल्या पित्याकडे जावयास निघाला. कर्मदेवी आपल्या आईबापांचा मोठ्या कष्टानें निरोप घेऊन प्रियपतीच्या समागमें श्वशुरदर्शनास जावयास निघाली.

कर्मदेवीच्या या विवाहाची वार्ता लौकरच अरण्यकमलापर्यंत जाऊन पोहोंचली. अशा तऱ्हेनें आपला अपमान झालेला पाहून अरण्यकमल नुसता क्रोधांध होऊन गेला. विषाद आणि क्रोध यांनीं त्याचें चित्त व्याप्त होऊन गेलें; व या कृत्याबद्दल साधूचा सूड उगवीन तरच मीं अरण्यकमल खरा, अशी त्यानें प्रतिज्ञा केली. आणि ती प्रतिज्ञा पार पाडण्यासाठीं आपलें सर्व सैन्य तयार करून, ज्या मार्गानें साधू आपल्या नगरांत जात होता त्या मार्गावर तो येऊन उभा राहिला.

साधूबरोबर सारे सातशें शिपाई होते. मोहिलराजानें त्यास आपलें चार हजार सैन्य बरोबर घेऊन जाण्यास सांगितलें, परंतु साधूनें ती गोष्ट मान्य केली नाहीं. त्याचा आपल्या सातशें शिपायांवरच अतोनात विश्वास होता. आपलें सैन्य आपल्यासाठीं प्राणाचीही पर्वा न करितां लढेल अशी त्याची पक्की खात्री होती. कांहीं थोडासा मार्ग चालून जातांच त्याची आणि अरण्यकमलाची गांठ पडली. दोघेही वीर कांहीं सामान्य नव्हते. दोन्ही सैन्यांची गांठ पडतांच लढाईला सुरवात झाली. हांहां म्हणतां दोन्हीकडले मोठमोठे वीर रणांगणीं पतन पावूं लागले. कोणी कोणास हार जाईना.

तेव्हां युद्धाचा तो प्रकार बंद होऊन अरण्यकमलाचें आणि साधूचें द्वंद्व-युद्ध होण्याचें ठरलें. अरण्यकमलाशीं जाऊन भिडण्यापूर्वी साधू आपल्या प्रियतम कांतेकडे आला, आणि त्यानें तिचा शेवटचा निरोप घेतला. कारण, या युद्धांत दोघांपैकीं कोणी तरी ठार मरावयाचा हें सिद्धच होतें. कर्मदेवी खरी वीरांगना होती. ती आपल्या हातानें पतीचे हातांत नंगी समशेर देऊन म्हणाली, "स्वामी, जा आणि वीरधर्माचें प्रतिपालन करा. या युद्धांत तुम्हांस जय प्राप्त झाला तर ठीकच आहे, आणि जर तुम्हांस मृत्यु आला तर मी सती जाऊन तुमच्या मागोमाग तुम्हांला भेटण्याकरितां स्वर्गीं येईन. कर्मदेवीनें त्यास अशा प्रकारें उत्तेजन देतांच तो वीरश्रेष्ठ साधू समरांगणीं ठाण रोखून उभा राहिला. अरण्यकमलही आपलें शौर्य दाखविण्यास तयार झाला; परंतु अगोदर कोणी कोणांवर वार करीना. अखेरीस साधूनेंच प्रथमतः अरण्यकमलाच्या मस्तकावर प्रहार केला. तेव्हां लागलीच अरण्यकमलानेंही उलट त्याजवर प्रहार केला. त्या वेळीं जी चकमक उडाली तिचें वर्णन होणें अशक्य आहे. तें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. हा सर्व प्रकार कर्मदेवी दुरून मोठ्या उत्सुकतेनें अवलोकन करीत होती. परंतु, तिच्या निर्घृण दुर्दैवानें साधूस एक दुस्सह वार लागून तो रणांगणीं पडला व त्यास वीरगति प्राप्त झाली.

वीरश्रेष्ठ साधू मरण पावतांच त्याच्या शिपायांत हलकल्लोळ सुरू झाला परंतु वीरभार्या कर्मदेवी हिच्या नेत्रांतून, एकही अश्रुबिंदु निघाला नाहीं. पतिमरणाबद्दल तिच्या अंतः-

करणांत खेद उत्पन्न होणें स्वाभाविकच होतें; परंतु त्याबद्दल ती शोक करीत बसली नाहीं; तिनें लागलीच आपल्या लोकांस सतीची तयारी करण्यविषयीं हुकूम केला. तिनें आपल्या पतीच्या हातांतील तरवार घेतली, आणि एकदम उजव्या हातानें आपला डावा हात खांद्यापासून उतरला! हें कृत्य तिनें इतक्या शिताफीनें आणि जलद केलें कीं, तिचे हातून तरवार हिसकावण्यास किंवा तिला तें घोर कृत्य करण्याची मनाई करण्यास कोणाला फुरसतच मिळाली नाहीं. लागलीच ती एका सेवकाकडे वळून म्हणाली, "हा हात घेऊन तूं माझा सासरा रणंगदेव याजकडे जा, आणि त्यास ही सर्व हकीकत कळवून सांग कीं, आपल्या सुनेनें आपला हस्त छेदन करून आपल्या सेवेस पाठविला आहे, व ती स्वतां सती जाऊन आपल्या शूर पुत्राच्या अक्षय समागमाकरितां स्वर्गलोकीं गमन करीत आहे. सर्व जगास हें विदित झालें पाहिजे कीं, रणंगदेव याची सून त्याच्या रणशूर पुत्राची भार्या होण्यास खरोखरच योग्य होती." हें भाषण करून लागलीच ती दुसऱ्या सेवकाकडे वळून म्हणाली, "हं आटप, तूं हा माझा उजवा हात तोड, आणि माझ्या पित्याकडे घेऊन जाऊन त्यास सांग कीं, तुमच्या कन्येनें मोहिलराजवंशाला शोभेल अशा रीतीनें आपला देहत्याग केला आहे. ती सती जाऊन तिनें आपल्या प्रियपतीच्या अक्षय समागमाचें साधन केलें आहे." प्रथमतः हें कृत्य करण्याची कोणाही सेवकाची छाती होईना; परंतु जेव्हां तिनें त्यांजकडे क्रोधदृष्टीनें अवलोकन

तेव्हां युद्धाचा तो प्रकार बंद होऊन अरण्यकमलाचें आणि साधूचें द्वंद्व-युद्ध होण्याचें ठरलें. अरण्यकमलाशीं जाऊन भिडण्यापूर्वी साधू आपल्या प्रियतम कांतेकडे आला, आणि त्यानें तिचा शेवटचा निरोप घेतला. कारण, या युद्धांत दोघां-पैकीं कोणी तरी ठार मरावयाचा हें सिद्धच होतें. कर्म-देवी खरी वीरांगना होती. ती आपल्या हातानें पतीचे हातांत नंगी समशेर देऊन म्हणाली, "स्वामी, जा आणि वीरधर्माचें प्रतिपालन करा. या युद्धांत तुम्हांस जय प्राप्त झाला तर ठीकच आहे, आणि जर तुम्हांस मृत्यु आला तर मी सती जाऊन तुमच्या मागोमाग तुम्हांला भेटण्याकरितां स्वर्गीं येईन. कर्मदेवीनें त्यास अशा प्रकारें उत्तेजन देतांच तो वीरश्रेष्ठ साधू समरांगणीं ठाण ठोकून उभा राहिला. अरण्यकमलही आपलें शौर्य दाखविण्यास तयार झाला; परंतु अगोदर कोणी कोणां-वर वार करीना. अखेरीस साधूनेंच प्रथमतः अरण्यकमलाच्या मस्तकावर प्रहार केला. तेव्हां लागलीच अरण्यकमलानेंही उलट त्याजवर प्रहार केला. त्या वेळीं जी चकमक उडाली तिचें वर्णन होणें अशक्य आहे. तें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. हा सर्व प्रकार कर्मदेवी दुरून मोठ्या उत्सुकतेनें अवलोकन करीत होती. परंतु, तिच्या निर्घृण दुर्दैवानें साधूस एक दुस्सह वार लागून तो रणांगणीं पडला व त्यास वीरगति प्राप्त झाली.

वीरश्रेष्ठ साधू मरण पावतांच त्याच्या शिपायांत हलकल्लोळ सुरू झाला. परंतु वीरभार्या कर्मदेवी हिच्या नेत्रांतून एकही अश्रुबिंदु निघाला नाहीं. पतिमरणाबद्दल तिच्या अंत-

करणांत खेद उत्पन्न होणें स्वाभाविकच होतें; परंतु त्याबद्दल ती शोक करीत बसली नाहीं; तिनें लागलीच आपल्या लोकांस सतीची तयारी करण्यविषयीं हुकूम केला. तिनें आपल्या पतीच्या हातांतील तरवार घेतली, आणि एकदम उजव्या हातानें आपला डावा हात खांद्यापासून उतरला! हें कृत्य तिनें इतक्या शिताफीनें आणि जलद केलें कीं, तिचे हातून तरवार हिसकावण्यास किंवा तिला तें घोर कृत्य करण्याची मनाई करण्यास कोणाला फुरसतच मिळाली नाहीं. लागलीच ती एका सेवकाकडे वळून म्हणाली, "हा हात घेऊन तूं माझा सासरा रणंगदेव याजकडे जा, आणि त्यास ही सर्व हकीकत कळवून सांग कीं, आपल्या सुनेनें आपला हस्त छेदन करून आपल्या सेवेस पाठविला आहे, व ती स्वतां सती जाऊन आपल्या शूर पुत्राच्या अक्षय समागमाकरितां स्वर्गलोकीं गमन करीत आहे. सर्व जगास हें विदित झालें पाहिजे कीं, रणंगदेव याची सून त्याच्या रणशूर पुत्राची भार्या होण्यास खरोखरच योग्य होती." हें भाषण करून लागलीच ती दुसऱ्या सेवकाकडे वळून म्हणाली, "हं आटप, तूं हा माझा उजवा हात तोड, आणि माझ्या पित्याकडे घेऊन जाऊन त्यास सांग कीं, तुमच्या कन्येनें मोहिलराजवंशाला शोभेल अशा रीतीनें आपला देहत्याग केला आहे. ती सती जाऊन तिनें आपल्या प्रियपतीच्या अक्षय समागमाचें साधन केलें आहे." प्रथमतः हें कृत्य करण्याची कोणाही सेवकाची छाती होईना; परंतु जेव्हां तिनें त्यांजकडे क्रोधदृष्टीनें अवलोकन

करून म्हटलें, "काय, तुम्ही माझी आज्ञा अमान्य करितां काय?" तेव्हां एक निधड छातीचा मनुष्य पुढें सरसावला आणि म्हणाला, "देवी, आपली आज्ञा अमान्य करावी अशी आमची मुळींच इच्छा नाहीं; परंतु, आपल्या ठिकाणीं असलेलें निस्सीम प्रेम आम्हांस तसें करूं देईना. आपला आग्रहच आहे त्या अर्थी आम्हीही आपल्या सत्कृत्याच्या आड येत नाहीं." असें म्हणून त्यानें त्याच तरवारीनें कर्म-देवीचा उजवा हात तोडला! तिचे दोन्ही हात तुटले तरी ती स्तंभासारखी अचलवृत्ति धारण करून उभी होती. आ-वेशाचे भरांत तिला त्यापासून यत्किंचित् देखील वेदना झा-लेल्या भासल्या नाहींत.

तिच्या आज्ञेप्रमाणें तिचे दोन्ही हात घेऊन सेवक लोक निघून गेल्यावर लागलीच ती सती जावयास निघाली. ज्या ठिकाणीं साधूचें मृत शरीर पडलें होतें त्या ठिकाणीं तिनें चिता तयार करविली, आणि उभय सैन्यांतील लोकांच्या आनंदमय स्तुतिघोषांत आणि वाद्यांच्या गजरांत तिनें चिता-प्रवेश केला. तेव्हां तिची अतुल कीर्ति आणि अमानुष क्षात्र-तेज हीं त्या चितेच्या ज्वालांबरोबरच नीलवर्ण आकाशापर्यंत जाऊन पोहोंचली. ती पवित्र स्वर्णलता त्या पवित्र अग्नीनें भस्मसात् करून टाकली.

इकडे पुत्रशोकानें व्याकुल झालेल्या वृद्ध रणगदेवानें आ-पल्या स्नुषेच्या हस्तास अग्नि देऊन त्या स्थलीं एक सरो-वर बांधिलें. त्या पवित्र सरोवरास अद्यापि "कर्मसरोवर"

असें म्हणतात. वाचकहो, बिचाऱ्या मोहिलराजाच्या शोकद अवस्थेचें वर्णन आतां कशाला पाहिजे ? साध्वी कर्मदेवी आनंदमय अशा स्वर्गसुखाचा अनुभव घ्यावयास गेली आणि तिची उज्वल कीर्ति अद्यापही या भरतखंडांत दश दिशा व्यापून राहिली आहे.

# रत्न पांचवें.

## ताराबाई.

भरतभूमीवर यवन लोकांचें पाऊल पडल्यापासून तिचा सौभाग्यसूर्य हळूं हळूं अस्तंगत होऊं लागला. भरतराज्यलक्ष्मी आर्य लोकांना सोडून म्लेंच्छ लोकांच्या सेवेविषयीं आपली आतुरता प्रकट करूं लागली. जणूं काय मायाबलानें भानरहित होऊन एकेक राज्य आपोआप म्लेंच्छ लोकांच्या हातांत शिरूं लागलें! त्या वेळीं किती तरी शूर वीर धारातीर्थीं पतन पावले; किती तरी मठमंदिरांचा विध्वंस झाला; आणि किती तरी देवमूर्तींची दुर्दशा झाली! खरोखर त्या दिवसांतील ती शोकमय दशा मनांत येतांच शरीरांतील प्रत्येक शीर गरम होऊन अतिशय वेगानें उचल खाऊं लागते; ऊर धडधडूं लागतें; आणि सर्व शरीर क्रोधाग्नीनें भडकून जातें. खचित त्याच दिवसापासून आमच्या अधःपाताला प्रारंभ झाला! त्याच दिवसापासून आमच्या स्वेच्छाचारी पायांत पराधीनतेची बिडी पडली. ही यवनांनीं आमच्या पायीं चढविलेली बिडी कधीं तुटेल तें "ईश्वरो वै वेत्ति."

राजपुतान्यांत वेदनगर नांवाचें एक लहानसें मांडलिक राज्य होतें. तेथील अधिपति राव सूरथान नांवाचा होता.

मुसलमानांनीं राजपुतान्यावर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली तेव्हां सूरथानरायास वार्धक्यदशा प्राप्त झाली होती; त्याचा वीरदेह कोमेजून जात चालला होता; अशा वेळीं त्याजवर कोणी चाल करून आल्यास त्याजबरोबर युद्ध करण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य राहिलें नव्हतें. तथापि भवितव्यता कोणासही चुकत नाहीं. लिल्ला नामक एका मुसलमान सरदारानें त्याजवर स्वारी करून त्यास वेदनगरांतून हाकून लाविलें. तेव्हां सूरथानराय आपल्या एकुलत्या एक कन्येस बरोबर घेऊन टंकथोदा—ज्याला तक्षशिला अथवा तकपूर असेंही म्हणतात—तेथें येऊन राहिला. त्या अत्यंत नित्रस्त अशा तक्षशिला नगरींत सूरथानराय आपल्या आवडत्या कन्यकेच्या मनोहर मुखाकडे पाहून कसे तरी आयुष्याचे दिवस लोटीत होता.

परंतु तेथेंही तो दुष्ट त्याची पाठ सोडीना. त्या वेळीं सुरथानरावानें मेवाडचा राणा रायमल्ल आणि इतर रजपूत राजे यांजकडे मदत मागितली. परंतु कोणीही त्याचे साह्यास येण्याचें कबूल करीना. कारण प्रत्येकास आपलें स्वतःचें राज्य कसें कायम राहतें याचीच मुळीं भीति पडली होती. सूरथानराय जरी वृद्ध झाला होता, तरी सोळांकी कुळाच्या स्वाभाविक वीरतेनें त्याच्या अंगांत नवीन तेजाचा संचार होऊन अशाही प्रसंगीं तो लढाईस सिद्ध झाला. परंतु त्या बलवान् आणि क्रूर यवनाच्या सेनासमुद्रापुढें बिचारा एकटा सूरथान किती तग धरणार? शेवटीं त्याला तें अत्यंत प्रिय झालेलें

थोदा शहरही मुसलमानांच्या स्वाधीन करून तेथून निघून जावें लागलें. तो आपल्या सुंदर कन्येसहवर्तमान अबूच्या पहाडावर जाऊन एकांतवास करून राहिला.

सूरथानरायास पुत्र झाला नव्हता. फक्त त्यानें बरोबर घेतलेली कन्याच काय तें एक अपत्य त्यास होतें. हीं सूरथानरायाची कन्याच जगद्विख्यात ताराबाई या नांवानें प्रसिद्ध झाली. याच ताराबाईच्या नांवानें एके वेळीं संपूर्ण आर्यवीरांचें नांव उज्वल झालें होतें, आणि याच ताराबाईच्या नांवाचे पोवाडे उत्तर हिंदुस्थानांतील भाट कवि आजपर्यंत गात आले आहेत. या आपल्या कन्येच्या हातून तरी मुसलमानांचा पराभव होऊन थोदा शहर आपणास परत मिळेल अशी सूरथानरायास बळकट आशा होती. ताराबाई आपल्या पित्याच्या शुश्रूषेनें त्या अबूच्या पहाडावर शुक्लपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें वाढत चालली. पहाडी हवापाण्याच्या सेवनानें शरीरवृद्धीबरोबरच तिचें अंतःकरणही कठोर बनत चाललें. पित्यानें तिजला युद्धविद्येचें शिक्षण देण्यास सुरवात केली असल्यामुळें तिच्या शरीराच्या प्रत्येक शिरेंत वीररसाचा संचार होऊं लागला; आणि प्राचीन पौराणिक तारेची केवळ प्रतिमाच अशी ही महिमावती तारा आपल्या वृद्ध पित्याच्या नेत्रांवर आपल्या वर्णनीय गुणांनीं आनंदामृताचा वर्षाव करूं लागली.

ताराबाई प्रौढवयांत आल्यावर, पित्यानें आपणास युद्धविद्येचें शिक्षण देण्याचें कारण तिच्या लक्षांत आलें. पित्याच्या चित्तांत नेहमीं क्रोधापमानाची आग धगधगत आहे,

अशी तिच्या मनाची पक्की खात्री झाली. तेव्हां त्याच्या चित्तांत एकसारखी अस्वस्थता वास करण्याचें कारण तिनें त्यास विचारिलें, व त्यानेंही आपलें पूर्व वृत्त सांगून तिच्या मनांत म्लेंच्छनिर्दालनाची प्रेरणा केली. तें सर्व वृत्त ऐकून व पित्याचें दुःख पाहून ताराबाईला क्षणभर देखील चैन पडेनासें झालें. ती रात्रंदिवस याच विचारांत मग्न रहात असे कीं, कोणत्या उपायानें पित्याच्या चित्तांतील पीडा दूर करितां येईल ? आणि कोणत्या उपायानें पित्याच्या घोर अपमानाचा सूड उगवावयास सांपडेल ? शेवटीं पित्याच्या अपमानाचा स्वतःच सूड उगविण्याचा संकल्प करून त्याच्या सिद्धीकरितां तिनें बाल्यदशेंतील अल्लडपणा सोडून दिला. आणि युद्धकलेचें पूर्ण ज्ञान करून घेण्यास सुरवात केली. रत्नजडित कंकणाऐवजीं तरवारीची मूठच तिच्या हस्तास शोभा देऊं लागली.

ताराबाई जशी शरीरानें सदृढ, तशीच मनानें थोर आणि रूपानें सुंदर अशी होती. तिच्यासारखी सर्वगुणसंपन्न पुतळी त्या वेळीं साऱ्या भरतखंडांत नव्हती, असें म्हटलें तरी चालेल. ती सिंहिणीप्रमाणें धीट, वाघिणीप्रमाणें तेजस्वी, आणि पंडिताप्रमाणें चतुर असून, रजपूत जातीला शोभण्यासारखी समरधीरता तिच्या अंगीं वास्तव्य करीत होती. तिच्या अंगच्या निरुपम सौंदर्याची आणि सर्वगुणसंपन्नतेची कीर्ति चहूंकडे पसरून, अनेक ठिकाणचे राजपुत्र तिच्या पाणिग्रहणाविषयींची आपली लालसा प्रकट करूं लागले. प्रथमतः

मेवाडचा राजपुत्र जयमल्ल यानें तिजविषयीं मागणी घातली. परंतु त्या वीरबालेच्या हृदयांत आपल्या पित्याचें दुःख नाहींसें करण्याची प्रतिज्ञा जागृत होती; ती पुरी करून पित्याच्या शत्रूचा विध्वंस केल्याशिवाय विवाहाची गोष्ट तिच्या मनांत कोठून येणार ? तिनें त्यास सांगून पाठविलें कीं, "जो कोणी शूर पुरुष माझ्या पित्याच्या शत्रूचें निर्दलन करील, तोच माझा पति होण्यास योग्य आहे; व त्यासच मी वरणार." शाबास ताराबाई ! तूं खरी वीरबाला आहेस. वाचकहो, असल्या प्रतिज्ञांचें माहात्म्य विसरून गेल्यामुळें सांप्रत भरतखंडवासी जन दुर्दशारूप नरकांत कुजत पडले आहेत.

सूरथानराय हा मेवाडच्या राण्याचा मांडलिक होता; त्यामुळें जयमल्लानें केलेली मागणी त्यास सन्मानाची वाटली. तथापि कन्येची प्रतिज्ञा जर तो शेवटास नेईल, तरच त्यास आपली कन्या अर्पण करावयाची, अशी कन्येप्रमाणें त्याचीही इच्छा होती. जयमल्ल हा अत्यंत रणभीरु असून गर्विष्ठ, मूर्ख आणि बदफैली असा होता. ताराबाईची प्रतिज्ञा शेवटास नेण्यापूर्वीच तिच्याशीं संलग्न होण्याची त्यानें आपली इच्छा प्रकट केली. ही गोष्ट ताराबाईस आणि सूरथान या उभयतांसही मान्य झाली नाहीं. आपणास मुसलमानांशीं युद्ध केल्यावांचून ताराबाई प्राप्त होत नाहीं असें जाणून, जयमल्लानें तिची निंदा करण्यास सुरवात केली. तो म्हणाला, "तुझा बाप भिकारी तशी तूंही भिकारीच. आज आमच्यासारखें सन्मान्य स्थळ तूं नाकारीत आहेस, पण उद्यां तुला

आपल्या घरच्या एखाद्या हलकट मोलद्याराला विकून द्यावें लागेल." सूरथानासारख्या मानी पुरुषाला असलीं दुर्भाषणें कोठून सहन होणार? त्यानें तत्क्षणींच खाडकन् म्यानांतून तरवार काढली, आणि कांहीं एक विचार मनांत न आणतां त्या मूर्ख राजपुत्राचा शिरच्छेद केला. ही गोष्ट त्याचा पिता रायमल्ल यास समजतांच त्यानेंही आपल्या दुराचारी पुत्राच्या निंद्य आचरणाबद्दल निर्भत्सना करून म्हटलें, "त्याला जी शिक्षा झाली ती ठीक झाली. ज्या पुत्रानें माझ्या निर्मळ वंशाला कलंक लागण्यासारखें कृत्य केलें त्याचा शिरच्छेद झाल्याबद्दल मला यत्किंचितही वाईट वाटत नाहीं; व याबद्दल सूरथानरायाची तारीफ करून मी त्याला क्षमाच करतों."

रायमल्लाचा पृथ्वीराज नांवाचा आणखी एक मुलगा होता. त्यास रायमल्लानें कांहीं कारणास्तव आपल्या राज्यांतून हाकून लाविलें होतें. परंतु जयमल्लाचा अशा रीतीनें शेवट झाल्यावर रायमल्लानें पृथ्वीराजास परत बोलावून त्यास वस्त्रें दिलीं. पृथ्वीराज परत आलेला पाहून चितोडच्या लोकांस आनंद झाला. पृथ्वीराजाच्या अनेक सद्गुणांस्तव तो लहानपणापासूनच सर्वांस प्रिय झाला होता. तो अत्यंत शूर आणि सुंदर असल्यामुळें खरोखरच ताराबाईसारख्या वीरस्त्रीचा पति होण्यास योग्य होता. इकडे ताराबाईनेंही त्याची कीर्ति ऐकिली असल्यामुळें तीही त्याच्याशीं लग्न लावण्यास अत्यंत उत्सुक झाली होती. पृथ्वीराजानें निश्चय केला कीं, आपण आपल्या आंगचें शौर्य दाखवून ताराबाईसारखें सुंदर स्त्रीरत्न मिळ-

विण्याचा यत्न करावा. ताराबाईला ही गोष्ट समजतांच तीही त्याचेबरोबर युद्धांत जावयास निघाली. ताराबाई लग्न होण्यापूर्वीच आपलेबरोबर पित्याच्या शत्रूचा विध्वंस करावयास निघालेली पाहून पृथ्वीराजास अतिशय आश्चर्य वाटलें. ताराबाईच्या वीरस्वभावानें तो अधिकच मोहित झाला. प्रथमतः तो फक्त सौंदर्याचा भुकेलेला होता. परंतु ताराबाईच्या या अप्रतिम गुणाचा परिचय झाल्यामुळें तो तिजकरितां प्रसंगीं आपले प्राणही खर्ची घालण्यास तयार झाला. पृथ्वीरायाच्या प्रयत्नानें पांच सहा हजार लोक जमा होऊन त्यास येऊन मिळाले. तेव्हां ताराबाईच्या नेत्रांतून आनंदजलाचे प्रवाह वाहूं लागले.

या नवीन जमविलेल्या सैन्यासह पृथ्वीराज आफगाण लोकांपासून थोदा शहर परत घेण्याकरितां निघाला. त्या वेळीं वीरबाला ताराबाई शत्रूच्या दुष्कृत्यांचा सूड घेण्यास्तव सज्ज होऊन त्याबरोबर चालली. आज ताराबाईनें आपल्या अंगावर वीरभूषणें परिधान करून अनुपम रूप धारण केलें आहे. अंगांतील कांचोळीवरून परम अभेद्य असें कवच धारण केलें आहे. हातांत धनुष्य आणि तरवार चमकत आहे. अश्वारूढ झालेली ही अपूर्व नारीमूर्ति स्वर्गीय वीरबालांप्रमाणें नेत्रांना प्रसन्न करीत आहे; जणूं काय आज प्रत्यक्ष महाशक्ति दैत्यवधाकरितां रणभूषणांनीं सुशोभित झाली आहे! व म्हणते आहे. " रे अधमा यवना, आतां एका क्षणांत तुझ्या आनंदलहरी दुःखसमुद्राला जाऊन मिळतील."

ज्या दिवशीं पृथ्वीराज थोडा शहरावर चाल करून गेला, तो मोहोरमच्या सणाचा दिवस होता. अफगाण लोकांच्या झुंडीच्या झुंडी नगरामध्यें इकडून तिकडे धामधूम करीत फिरत होत्या. सर्व लोक मोठ्या आनंदानें मर्फे वाजवीत ताबूत घेऊन थाटीमाटानें मिरवत मिरवत चालले होते. त्यांचा मुख्य अधिकारी लिल्ला आपल्या वाड्याच्या सज्जावर उभा राहून ताबूतांची मौज पहावयाकरितां आपला पोशाख चढवीत होता. इतक्यांत खालीं असलेल्या लोकांच्या गर्दीतून एक तीर निघून तो त्याच्या छातींतून पार निघून गेला! तेव्हां त्याचा सर्व देह रक्तानें तांबडा लाल होऊन मृत्युवेदनेनें तो जमिनीवर गडबडां लोळूं लागला. हां हां म्हणतां ही बातमी सर्व नगरभर पसरली; आणि मुसलमान लोकांत मोठा हाहाकार उडून गेला! वाचक हो, हा अलक्ष्य तीर कोणत्या वीराचा असावा? म्लेंच्छ लोकांच्या भर समुदायांत ठाण रेखून अशा भयंकर प्रकारानें खुद्द म्लेंच्छाधिकाऱ्याचे प्राण नष्ट करण्यास कोणाचा धीर झाला असावा! अर्थात् ताराबाईशिवाय हें अपूर्व निशाण दुसऱ्या कोणाचें असणार आहे?

नगरांत ताबूतांची गडबड चालली असतां पृथ्वीराजानें आपली सेना नगराबाहेर दबा धरून बसविली होती, व आपण स्वतः ताराबाईस बरोबर घेऊन फक्त एका शूर सरदारासह नगरांत प्रवेश केला होता; आणि वर सांगितल्याप्रमाणें मुसलमानलोकांच्या मेळ्यांत शिरून त्यांच्यासमक्ष ताराबाईनें एकाच बाणानें आपल्या पित्याच्या शत्रूचा प्राण घेतला.

मुख्य सरदाराच्या मरणानें यवन लोकांच्या मनास जो प्रचंड धक्का बसला, त्याचा वेग कांहींसा कमी होतांच ते शत्रूच्या शोधास लागले. त्यांनीं नगराचा दरवाजा बंद करून तेथें हत्तीचा पहारा बसविला. ताराबाई बाहेर निघण्याकरितां जेव्हां दरवाज्याजवळ आली, तेव्हां तेथें हत्ती उभा असलेला पाहून प्रथमतः ती किंचित् कचरली. उघडच आहे, अशा खवळून गेलेल्या मुसलमानांच्या तडाक्यांतून फक्त तीन असामींचें सुरक्षितपणें पळून जाणें कसें संभवेल ? परंतु पृथ्वीराज आणि ताराबाई यांच्यासारख्या शूर प्राण्यांच्या हृदयांत पुळपुळीत विचारांना क्षणभर देखील जास्त थारा मिळाला नाहीं. ताराबाईनें तत्काळ आपल्या कमरेचा निमचा उपसून त्यानें त्या उन्मत्त हत्तीची सोंड उतरली ! तेव्हां तो चीची करीत दूर झाला. अशा रीतीनें तीं तीनही धैर्यशाली मनुष्यें एका केंसासही धक्का न लागतां मोठ्या शिताफीनें सर्वांसमक्ष सुखरूपपणें बाहेर पडलीं.

नगरांतून बाहेर येतांच पृथ्वीराजानें आपल्या सैन्यास नगरावर हल्ला करण्याचा इशारा केला. पृथ्वीराजाचा इशारा होतांच त्याचे पांच हजार शूर लोक एकदम थोदा शहरावर तुटून पडले, व तेथील लोकांची त्यांनीं दाणादाण करून सोडिली. सुमारें तीन चतुर्थांश मुसलमान लोक या संग्रामास बळीं पडले; आणि थोदा शहरांत पृथ्वीराजाची सत्ता सुरू झाली. शहर हस्तगत होतांच, ताराबाईनें आपले लोकांस मुसलमान लोकांची कत्तल करण्याची मनाई केली. ती म्हणाली,

" आपलें मुख्य काम झालें. आपला उद्देश कांहीं मुसलमानांचा निर्वंश करावयाचा नाहीं, मग विनाकारण कत्तल करण्यांत काय फायदा आहे? "

याप्रमाणें जय मिळून थोडा शहर परत घेतल्यावर पृथ्वीराज आणि ताराबाई यांचें मोठ्या थाटानें लग्न लागलें. तेव्हां सूरथानरायाचा आनंद त्रैलोक्यांत मावेना. आपला इच्छित हेतु पूर्ण होतांच आपल्या गादीवर पृथ्वीराजाची स्थापना करून सूरथानराय एकांतवासाकरितां निघून गेला. पृथ्वीराज आणि ताराबाई सुमारें दोन वर्षें एकमेकांच्या प्रीतिसौख्याचा उपभोग घेत होतीं. इतक्यांत एक अत्यंत शोकदायक वर्तमान घडून त्या दोघांचा इहलोकचा वास समाप्त झाला.

पृथ्वीराजाचा प्रभुराय नांवाचा एक मेहुणा होता. तो अत्यंत दुराचारी असून विनाकारण आपले पत्नीचा छल करीत असे. पृथ्वीराजाचें आपल्या बहिणीवर अप्रतिम प्रेम होतें, त्यामुळें पृथ्वीराजानें प्रभुरायास आपल्या बहिणीस चांगल्या रीतीनें वागविण्याविषयीं अनेक प्रकारानें उपदेश केला. परंतु तो सदुपदेश त्या पातकी मनुष्यास रुचला नाहीं. त्यानें तेव्हांपासून आपल्या पत्नीचा अधिकच छल करण्यास सुरवात केली. ही गोष्ट पृथ्वीराजास समजतांच तो प्रभुरायाकडे गेला, आणि त्यानें त्याची चांगलीच कानउघाडणी केली. तो द्वेष मनांमध्यें ठेवून प्रभुरायानें अत्यंत हीन उपायानें पृथ्वीराजाचा प्राण घेण्याचा बेत केला. त्यानें वरवर चांगल्या रीतीनें वागण्याचा आव घालून एके दिवशीं पृथ्वीराजास आपले घरीं

भोजनास बोलाविलें. पृथ्वीराजाचे मनांत कोणत्याही प्रकारचा किंतु नसल्यामुळें त्यानें मोठ्या आदरानें त्याचें निमंत्रण स्वीकारून त्याचे घरीं भोजनास जाण्याचें मान्य केलें.

प्रभुरायानें निर्दयपणें कपट करून त्याला विषान्नाचें भोजन दिलें ! भोजन झाल्यावर पृथ्वीराज आपले घरीं परंत जांवयास निघाला असतां त्याचे अंगांत त्या जहार विषाचा संचार होऊन तो वाटेंतच घेरी येऊन पडला. ताराबाईस ही गोष्ट समजतांच ती त्या ठिकाणीं धावून आली. तिनें त्याला शुद्धीवर आणण्यासाठीं अनेक प्रकारचे उपाय करून पाहिले, परंतु तिच्या दुर्दैवानें ते सर्व निष्फळ झाले. शेवटीं आपल्या शोक करणाऱ्या पत्नीच्या अंकावर शिर ठेवून पृथ्वीराजानें प्राण सोडिला. झालें ! ताराबाईचा पुढील वृत्तांत समजून घेण्याची अवश्यकताच नाहीं. कारण रजपूत स्त्रियांनीं आपल्या पतीच्या पाठीमागें वैधव्यानें मलिन झालेलें शरीर जिवंत ठेविलें असें कधींच घडलें नाहीं, मग ताराबाई तरी या पवित्र नियमास कशी अपवादक होईल ? तिनें आपल्या पतीबरोबर सहगमन करून आपल्या पातिव्रत्याचा निभाव लाविला. एका क्षणांतच तिचें शरीर तिच्या प्रियपतीबरोबर भस्मरूप झालें !

वाचकहो, तेंच हें भरतखंड—कीं जेथें सहाशें वर्षांपूर्वी ही खरी गोष्ट घडली. प्रस्तुत काळच्या दुर्बल लोकांना तर अशा गोष्टी केवळ दंतकथाच वाटणार आहेत ! स्त्रियांची गोष्ट तीर सोडून द्या, परंतु पुरुषांच्या अंगींही असलें सामर्थ्य आणि असला दृढ निश्चय दृष्टीस पडणें सांप्रत मुष्किल झालें आहे.

चहूंकडे नेभळेपणाचेंच साम्राज्य दृष्टीस पडतें. हाय रे भारतवर्ष ! तूं आणखी किती तरी निर्बल होणार ?

---

दा. क्र. ९६३६

# रत्न सहावें.

## राजधात्री पन्ना.

मवाडचा राणा संग्रामसिंह मृत्यु पावल्यानंतर एकामागून एक त्याचे तीन पुत्र गादीवर बसले. त्यांपैकीं तिसरा पुत्र उदयसिंग हा लहान, केवळ पांच वर्षांचा होता, म्हणून सरदार मंडळीनें त्याचें पालन करण्याचें काम पृथ्वीराजाचा दासीपुत्र जो बनबीर त्याजकडे सोंपविलें होतें. बनबीर हा अगोदरच हीनक्षेत्रज, अविद्वान आणि विलक्षण महत्वाकांक्षी असा होता. तथापि रजपूत सरदारांना त्याचा भरंवसा वाटून त्यांनीं त्यास आपल्या बालराजाचा पालक—अर्थात् उदयसिंग मोठा होईपर्यंत मेवाडच्या गादीचा अधिकारी—असें मानिलें होतें.

उदयसिंगास पन्ना नांवाच्या एका विश्वासू दाईच्या शुश्रूषेंत ठेविलें होतें. पन्ना ही अत्यंत विश्वासु आणि राजभक्त असून, हें दाईपणाचें काम तिच्या घराण्यांत वंशपरंपरेनें चालत आलें होतें. तिच्या पूर्वजांनीं फार दिवसांपासून मेवाडच्या गादीची एकनिष्ठपणें सेवा केली होती. आपल्या अन्नदात्या यजमानाकरिता प्रसंगीं प्राणही खर्चीं घालणें, हेंच तिच्या घराण्यांतील लोकांचें अढळ ब्रीद होतें. तथापि पुढील गोष्टींत पन्ना दाईनें जो विलक्षण स्वार्थत्याग, जी निःसीम राजभक्ति

आणि जो दृढतर देशाभिमान दाखविला; तशा प्रकारचा स्वार्थत्याग, तशा प्रकारची राजभक्ति आणि तशा प्रकारचा देशाभिमान तिच्या पूर्वजांपैकीं कोणाच्याही वर्तनांत दिसून आला नसेल.

इकडे बनबीराची महत्वाकांक्षा अत्यंत अनावर होत चालली. त्याच्या अंगीं यत्किंचित्‌ही कर्तृत्व नसतां केवळ अगम्य दैवबलानें त्याला राजपालकत्व प्राप्त झालें होतें; तथापि तेवढ्यानें तो संतुष्ट नव्हता. त्याला आणखी राजपदप्राप्तीची हाव सुटली होती. परंतु राजपुत्र उदयसिंग जिवंत राहूनही त्याची महत्वाकांक्षा सफळ होणें मुष्किल होतें. राजपदप्राप्तीच्या अनावर दुर्वासनेनें तो केवळ राक्षस बनून त्यानें राजपुत्राचा प्राणघात करण्याचा विचार केला. हें घोर कर्म करण्यास तो स्वतःच प्रवृत्त झाला होता. कारण, हें काम दुसऱ्यावर सोंपविण्यानें जर बाहेर फुटलें तर एका क्षणांत आपलें स्वतःचें जीवित नष्टप्राय होईल अशी त्याची खात्री होती. तो पुरतेपणीं जाणून होता कीं, एकदां या कृत्याचा रजपूत सरदारांस सुगावा लागल्यावर आपण जरी पाताळांत दडून बसलों, तरी ते आपणांस तेथूनही ओढून काढून आपला शिरच्छेद करतील. परंतु, एकदां राजपुत्राच्या प्राणघाताचा आळ दुसऱ्या कोणावर जाऊन आपण निर्दोष ठरलों म्हणजे वाटेल त्या रीतीनें सरदार लोकांचीं मनें वळवून आपणास राजपदाची प्राप्ति करून घेतां येईल.

बनबीराच्या महत्वाकांक्षी अंतःकरणांतील या कृष्ण

विचारांचा कोणासही संशय आला नव्हता. त्याच्या सिंहासनप्राप्तीच्या मार्गांतील फक्त एकच अडथळा जो उदयसिंग त्याला दूर करण्याकरितां तो जे विचार करीत होता, ते त्यानें कोणासही कळूं दिले नव्हते. परंतु, ज्या राजवाड्यांत राहून तो आपला घोर हेतु शेवटास नेण्याचा विचार करीत होता, त्याच राजवाड्यांतील एक मनुष्य त्याच्या या पैशाचिक दारुण विचारांचा साक्षी होता. हा मनुष्य जातीचा नापित असून त्याच्या घराण्याकडेही तें काम वंशपरंपरेनेंच चालत आलें होतें; आणि पन्नादाईप्रमाणेंच तोही आपल्या धन्यावर स्वतःच्या प्राणापेक्षांही जास्त प्रेम ठेवीत असे. बनबीराचा आजपर्यंत झालेला उदय त्यास मुळींच सहन होत नव्हता. परमेश्वराचे मनांत उदयसिंगाचे प्राण वांचवावयाचे होते म्हणून त्यानेंच हा बनबीराच्या निंद्य विचारांचा साक्षी उत्पन्न केला असावा असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण, ज्या बनबीरानें स्फोट होण्याच्या भीतीस्तव असलें निंद्य कर्म स्वतः आचरण्याचें योजिलें, त्याचे विचार या नापितास कसे कळले असतील, तें एक परमेश्वरच जाणे!

सुमारें एक प्रहर रात्र उलटून गेली, व राजवाड्यांतील बहुतेक माणसें निद्रावश होण्याच्या बेतांत होतीं; अशा वेळी पन्नादाईनें मोठ्या ममतेनें राजपुत्रास व त्याच्याच वयाच्या आपल्या मुलास थोपटून झोंपीं घालविलें व आपण स्वतः त्याचे जवळ कांहीं शिवणकाम करीत बसली. इतक्यांत एकाएकीं तिला कोणा मनुष्याच्या पावलांची चाहूल लागून तिनें

आपली दृष्टि दिवाणखान्याच्या दाराकडे वळविली; आणि पहाते तों वर वर्णन केलेला नापित घाबऱ्या घाबऱ्या तिजपुढें येऊन उभा राहिला. त्यास पाहतांच पन्नादाईनें प्रश्न केला, "तूं असा घाबरल्यासारखा कां दिसतोस? कांहीं वाईट बातमी आहे कीं, काय?" नापितानें उत्तर केलें–"बातमी फारच वाईट आहे. थोडक्याच वेळांत तो दुष्ट बनबीर राजपुत्राला मारण्याकरितां इकडे येणार आहे." हे त्याचे शब्द कानीं पडतांच पन्नादाई दचकून उसासा टाकून म्हणाली–"ज्या गोष्टीचा मला धाक वाटत होता ती गोष्ट शेवटीं प्रत्ययास येणार! त्या दुष्टाचा मी पहिल्यापासूनच कांटा करीत होतें. परंतु उपयोग काय? मी पडलें बायकोमाणूस–छे छे, तें कांहीं नाहीं; राजपुत्राचें संरक्षण झालेंच पाहिजे." नापित म्हणाला "आपल्या हातून काम होण्यासारखें आहे? कांहीं एखादी युक्ति तरी सुचीव. तूं सांगशील तें करण्यास मी तयार आहें."

किंचित्कालपर्यंत पन्ना स्तब्ध बसली; आणि नंतर ह्मणाली "कसें तरी करून राजपुत्रास येथून काढून एखाद्या सुरक्षित स्थलीं नेऊन ठेवावें, असें मला वाटतें." त्यावर नापित म्हणाला, "तसें तर मुळींच करितां यावयाचें नाहीं. कारण, बनबीरानें आज चहूंकडे दुप्पट पहारेकरी बसवून त्यांस सक्त हुकूम फर्माविला आहे कीं, आज रात्रीं कोणाही मनुष्यास राजवाड्यांतून एखादें लहान मूल घेऊन जाऊं द्यावयाचें नाहीं." त्यावर पन्ना म्हणाली, "असें असेल तर त्याला आपण चांगलेंच चकवूं. तूं एक टोपली घेऊन ये; आपण

त्या टोपलींत राजपुत्राला निजवून त्यावर कांहीं केरकचरा घालूं; आणि ती केरानें भरलेली टोपली म्हणून तूं बिनधोकपणें वाड्याबाहेर घेऊन जा. असें केलें असतां कोणासही मूल घेऊन गेल्याचा संशय येणार नाहीं." त्यावर नापित म्हणाला "बनबीर लवकरच येथें येईल, आणि राजपुत्र नाहीं असें पाहून लागलीच त्याचा शोध लावण्याची व्यवस्था करील; आणि मग मात्र राजपुत्रास वांचविणें मुळींच अशक्य होईल. त्यावर पन्ना गंभीर मुद्रेनें त्यास म्हणाली "ठीक आहे, कांहीं चिंता नाहीं. तो येथें आला तर मी त्यास येथून राजपुत्र गेला ही गोष्ट कळूं देणार नाहीं. राजपुत्राचे जागीं मी आप त्या मुलास निजवितें ! माझ्या पुत्राच्या मरणानें मेवाडचा भावी राजा आणि माझ्या वंशाचा पिढीजाद पोशिंदा जर वांचत आहे, तर तें मला सुखदायकच आहे. माझ्या पुत्रानें जगून राजपुत्र मरण्यापेक्षां राजपुत्रास वांचविण्याकरितां माझा पुत्र बळी पडला तर तें मला भूषणावहच होईल." हे पन्नेच्या तोंडचे शब्द ऐकून नापित मूकस्तंभासारखा उभा राहिला. एक शब्दही त्याचे मुखावाटे बाहेर पडेना. परंतु पन्ना दाईनें चटकन उठून एक टोपली आणिली, तींत राजपुत्रास निजविलें, आणि त्यावर केरकचरा भरून ती टोपली नापिताचे डोक्यावर ठेविली; आणि त्यास बेलाशक त्या टोपलीसह राजवाड्याबाहेर निघून जावयास सांगितलें. बिचारा नापित अगदीं स्तब्ध होऊन उभा राहिला होता. पन्ना आपला आग्रह सोडीना, तेव्हां तो तीस म्हणाला, "पन्ने, हें तूं काय

आरंभिलें आहेस?" पन्ना म्हणाली "दुसरें कांहीं नाहीं, माझें कर्तव्य मी बजावीत आहें."

पन्ना कांहीं एक ऐकत नाहीं असें पाहून नापितास तिच्या म्हणण्याप्रमाणें करणें भाग पडलें. तेव्हां मोठ्या शिताफीनें तो ती टोपली घेऊन राजवाड्यांतून बाहेर पडला. इकडे पन्ना आपला पोटचा गोळा राजपुत्राच्या बिछान्यावर ठेवून शांत चित्तानें बनबीराच्या आगमनाची वाट पहात बसली. इतकें करीपर्यंत मध्यरात्रीचा सुमार झाला. चहूंकडे अगदीं सामसूम झालें. पन्ना बसली होती तें स्थळ भयाण दिसूं लागलें. कालरात्रीच ती! तिचें काय वर्णन करावयाचें? पन्ना बनबीराची मार्गप्रतीक्षा करीत असतां त्याच्या पावलांची चाहूल तीस लागली. इतक्यांत तो काळस्वरूप बनबीर तेथें आला आणि अत्यंत मायावी भाषणानें "राजपुत्राची प्रकृति कशी आहे? त्याला पाहण्याची मला फार इच्छा झाली आहे." असें म्हणत तो राजपुत्राच्या पलंगाजवळ गेला व तेथें कोण निजलें आहे हें कांहींएक न पाहतां त्यानें दडवून आणलेली कट्यार त्या गाढ निद्रेंत असलेल्या अर्भकाचे पोटांत खुपसली! हर हर! त्या दुष्टानें कट्यार खुपसतांच फक्त एकच किंकाळी होऊन तिचा प्रतिध्वनि मात्र साऱ्या राजवाड्याभर पसरला! आणि सर्व मानवजातीला कलंक लागेल असलें हें घोर कर्म करून तो पातकी असुर तेथून निघून गेला.

त्या अर्भकाची मरणसमयींची किंकाळी ऐकून राजवाड्यांतील सर्व लोक त्या स्थळीं धांवून आले, आणि पहातात

तों राजपुत्राचें शरीर रक्तबंबाळ झालें असून शेजारींच पन्ना- दाई मूर्च्छा येऊन पडली आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. राजपुत्र मृत झाला असें समजून सर्व नगरभर आकांत मातला. पन्ना शुद्धीवर आल्यानंतर राजपुत्राचा घात कोणीं केला म्हणून तीस विचारतां, ती म्हणाली, "कोणीएक काळा पुरुष एकाएकीं दिवाणखान्यांत आला आणि त्यानें हें घोर कर्म केलें." राजपुत्राच्या वध कोणीं केला असावा याविषयीं बहुतेक लोकांची स्वाभाविकपणें खात्री होऊन चुकली. नंतर पन्ना राजवाड्यांतून निघून ज्या ठिकाणीं राजपुत्रास नेलें होतें त्या ठिकाणीं गेली, आणि तो चांगला प्रौढ होईपर्यंत तिनें त्याचें योग्य रीतीनें पालनपोषण केलें.

पुढें राजपुत्र उदयसिंग मोठा झाल्यावर लोकांनीं त्याचें स्वामित्व कबूल केलें, व बनबीरास हकून लावण्याचें कामीं त्यास चांगलें साह्य केलें अशा रीतीनें पन्नादाईच्या लोकोत्तर कृतीनें व निस्सीम स्वामिभक्तीनें संग्रामसिंगाचा खरा वारस मेवाडच्या गादीवर पुनः येऊन बसला. या सत्कृत्याबद्दल पन्नेची कीर्ति सर्व भरतखंडभर पसरली; व राजपुत्र उदयसिंगानें तिचा देहांत होईपर्यंत आपल्या मातेप्रमाणें तिचा सन्मान राखिला.

वाचकहो, वरील एकंदर चारित्र वाचून पन्नेच्या कृतीच्या योग्यायोग्यतेबद्दल तुमचें मन घोटाळ्यांत पडेल, आणि तुमची सदसद्विवेकशक्ति नष्ट होऊन जाईल. कांहींही असो. परंतु पन्नेचें हें चारित्र चांगल्या अगर वाईट हेतूनें आचंद्रार्क कविजनांचा काव्यविषय होऊन बसेल यांत तिलमात्र संदेह नाहीं.

---

# रत्न सातवें.

## गनोरची राणी.

मध्य हिंदुस्थानांत सांप्रतच्या भोपाळ शहराजवळ गनोर नांवाचें एक लहानसें हिंदुराज्य होतें. ज्या वेळीं एकामागून एक हिंदुराज्यें मुसलमान लोकांच्या ताब्यांत जाऊं लागलीं, त्या वेळीं या छोटेखानी राज्यानें धैर्य धरून कांहीं काळपर्यंत आपलें स्वातंत्र्य कायम राखण्याचा प्रयत्न केला. मोंगल लोकांच्या झुंडीच्या झुंडी टोळधाडीप्रमाणें हिंदुस्थानांत शिरून त्यांनीं पठाण लोकांस दिल्लींतून हांकून लाविल्यामुळें ते साऱ्या हिंदुस्थानभर पसरले, आणि त्यांनीं गुजराथ, माळवा, वगैरे प्रांतांतील लहान मोठीं सर्व हिंदुराज्यें खालसा करण्याचा सपाटा लाविला. त्यां पैकीं एक पठाण मध्य हिंदुस्थानांत आला आणि आपल्या सांथीदारांच्या साह्यानें गनोरचें राज्य खालसा करून, तेथें मुसलमानी राज्य स्थापण्याच्या प्रयत्नास लागला. परंतु गनोरचें राज्य हस्तगत करणें त्यास जितकें सोपें वाटलें होतें, तितकें तें सोपें नसून, त्याच्या उलट तितकेंच कठीण होतें. पठाण लोकांनीं हल्ला करितांच गनोरचा राजा मोठ्या त्वेषानें त्यांच्याशीं लढाई करण्यास उभा राहिला. तेव्हां पठाण लोकांस गनोरच्या राज्यांतील एकेक पाऊल जमीन रक्तपातानेंच काबीज करावी लागली. राजानें आपल्या युद्धविद्येची आणि

पराक्रमाची शर्थ करून पाहिली, परंतु मुसलमान लोकांचें तकदीर जोरावर असल्यामुळें शेवटीं त्यांचाच जय झाला. गनोरचा राजा युद्धांत पतन पावला, आणि त्याचे शूर सरदारही त्याच्याच दुर्दैवाचे भागीदार झाले.

ही बातमी जेव्हां गनोर नगरींत पोंचली, तेव्हां तेथील राणीस फार दुःख झालें; परंतु तिनें आपलें सर्व दुःख गिळून जाऊन नवीन सैन्य जमविलें व त्याचें आधिपत्य आपणाकडे घेतलें आणि तें सैन्य घेऊन ज्या ठिकाणीं राजा पडल्यानंतरही त्याचे लोक धैर्य धरून पठाणांशीं लढत होते, त्या ठिकाणीं ती येऊन पोहोंचली. राणी आलेली पाहतांच त्या लोकांना फारच आवेश चढला. राणी आपल्या पतीप्रमाणेंच युद्धकलेंत प्रवीण असून त्याचप्रमाणें ती शूरही होती. तिच्या सेनापत्याखालीं गनोरचे शूर लोक मोठ्या निकरानें लढत होते. परंतु या वेळींही त्यांचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. पठाण लोकांना वरचेवर प्रचंड सैन्याचें पाठबळ मिळत गेलें आणि इकडे राणीच्या बाजूस फारच थोडे लोक उरले होते. त्यामुळें तिच्यानें मुसलमान लोकांबरोबर टिकाव धरवेना. तरी देखील तिनें त्या लोकांस युद्धावांचून एक पाऊलही पुढें सरकूं दिलें नाहीं. अशा रीतीनें तिचे एकामागून एक पांच किल्ले मुसलमानांच्या ताब्यांत जाऊन शेवटीं नर्मदानदीच्या तीरीं असलेला फक्त एक किल्ला तिच्या ताब्यांत राहिला. ती नर्मदा उतरून त्या किल्ल्यांत शिरते न शिरते तोंच त्या किल्ल्यास मुसलमानांनीं वेढा घातला. मुसलमान

लोक तेथेंही आलेले पाहून तिनें घाईनें किल्ल्याचे दरवाजे बंद करून घेतले. परंतु या गडबडींत तिचे पुष्कळ शूर लोक किल्याबाहेर राहून मुसलमानांच्या तावडींत सांपडले. मुसलमानांनीं निर्दयपणें सांपडेल त्याची कत्तल करण्यास सुरवात केली. या वेळीं जरी पुष्कळ हिंदु लोक मुसलमानांच्या तरवारीस बळी पडले तरी त्यानींही शेंकडों मुसलमानांस धुळींत लोळवून, त्यांस खडे खावयास लाविलें.

किल्ल्यांत राणीचे साह्यास फारच थोडे लोक राहिले असून त्यांनाही खवळलेल्या मुसलमानांनीं चोहींकडून वेढून टाकिलें होतें. तथापि, अंगांतील सर्व सामर्थ्य नाहींसें होईपर्यंत त्यांनीं राणीबरोबर शत्रूशीं झुंजण्याची शिकस्त केली. पठाण लोकांनीं किल्ल्यास शिडया लाविल्या आणि त्यांचे शेंकडोंशें वीर किल्ला चढून वर गेले. तेव्हां राणीला शरण जाण्यावांचून दुसरा उपायच राहिला नाहीं. त्या वेळीं तिनें दूताकरवीं मुख्य पठाणास सांगून पाठविलें कीं, मी किल्ला आपले ताब्यांत देण्यास राजी आहें, आपण लढाई बंद करावी.

राणीचा असा निरोप येतांच खानसाहेबास फार आनंद झाला. त्यानें राणीच्या अत्युत्तम सौंदर्याची कीर्ति ऐकिली असल्यामुळें तिच्या प्राप्तीची त्यास लालसा उत्पन्न झाली. त्यानें यत्किंचितही विचार न करितां त्याच दूताचे हातीं राणीस निरोप पाठविला कीं, " आपल्या आंगचें अप्रतिम शौर्य पाहून मी फार खूष झालों आहें. आपण आजपर्यंत महाराणीपदाचा उपभोग घेतला आहे, आणि यापुढेंही जेथ-

पर्यंत मी जिवंत आहे तेथपर्यंत आपलें तेंच पद कायम राहील, आणि हा नम्र सेवक आपल्या सेवेस हजर राहून गनोरचें राज्य चालवील." हा खानसाहेबाचा निरोप ऐकून त्याचे मनांतील आशय तिला कळून चुकला. तेव्हां नकाराचें उत्तर पाठवावें तर आतांच आपला प्राणांत होतो, व त्याचें ह्मणण्यास रुकार द्यावा तर तेणेंकरून आपलें पातिव्रत्य नष्ट होऊन आपल्या कीर्तीस अक्षय कलंक लागतो. याप्रमाणें तिला 'एकीकडे आड आणि एकीकडे विहीर,' असें होऊन गेलें.

राणीचे शरिरांत मुसलमानांच्या खडतर वैराग्नीनें तप्त झालेलें रक्त खेळत असल्यामुळें तिनें कांहीं वेळ आपल्या मनाशीं विचार करून, खानाचा कपटानें छल करून सूड उगविण्याचा निश्चय केला. तिनें त्यास परत निरोप पाठविला कीं, "मीही खानसाहेबांच्या अतुल पराक्रमास भुलून त्यांची पट्टराणी होण्याविषयीं आतूर झालें आहे. आम्हां रजपूत स्त्रियांना शौर्य आणि साहस हे गुण फार प्रिय होत असतात. माझ्यासारख्या स्त्रीचें पाणिग्रहण करण्यास खानसाहेब योग्य आहेत. माझा स्वीकार केल्यास त्यांनीं माझा मोठा सन्मान राखला असें होईल. परंतु, या गोष्टीस दोन घटकेचा अवधि पाहिजे. ह्मणजे त्या वेळांत माझ्या आणि आपल्या वैभवाला योग्य अशी सर्व प्रकारची तयारी करण्यास ठीक पडेल."

राणीचें सर्व म्हणणें खानानें कबूल केलें, हें सांगण्याची अवश्यकताच नाहीं. खानाच्या सर्व आयुष्यांत आजच्या

सारखा आनंद त्याला कधींच प्राप्त झाला नसेल. खानसाहेब आपल्या भावी सौख्याच्या विचारांत गढून गेले असतां राणीकडून लग्नाची पहिली भेट ह्मणून एक रत्नखचित पोशाख त्यांजकडे आला. तो पाहून तर खानसाहेब जणूं काय आनंदसागरांत पोहूं लागले. पूर्वीचा लढाईचा घोर ध्वनि नाहींसा होऊन आनंदाच्या गजरानें तो सर्व किल्ला दणाणून गेला. पठाण सरदार आपल्या पुढाऱ्याच्या लग्नसमारंभाचा दिवस आनंदांत घालवावा ह्मणून मदिरेचें सेवन करून गुंग होऊन पडले; आणि खानसाहेब राणीच्या लोकोत्तर सौंदर्यामृताचा घोट घेण्याच्या आशेनें तिनें पाठविलेला पोशाख चढवून तिच्या बोलावण्याची वाट पहात बसले होते.

राणीचें बोलावणें येतांच ज्या ठिकाणीं लग्नसमारंभाची तयारी केली होती त्या ठिकाणीं खानसाहेब आले. राणीचें दर्शन होतांच, तिच्या सौंदर्याची जी आपण कीर्ति ऐकली होती ती कांहींच नाहीं अशी खानसाहेबांची खात्री झाली. तिचें सौंदर्य शब्दांनीं वर्णन करतां येण्याजोगें नव्हतें. ज्या ठिकाणीं ही सर्व तयारी केली होती तें ठिकाण नर्मदेच्या बाजूस एका हवाशीर जागीं होतें. राणी सर्व प्रकारच्या अलंकारांनीं मंडित होऊन अत्यंत मृदु अशा मखमालीनें मढविलेल्या मंचकावर बसली होती; आणि राजवाड्यांतील दुसऱ्या सर्व स्त्रिया ज्यावर किनखाबाचा सरपोस घातला आहे अशा एका उंचशा जागीं बसल्या होत्या. त्यांनीं आपल्या हातांत लहान लहान पेटलेल्या दिवट्या धारण केल्या होत्या

खान येतांच राणीनें त्याला पलंगावर बसण्याची आज्ञा केली. तो तर तिचा बंदा गुलाम बनला होता; त्यामुळें तिच्या मुखांतील प्रत्येक शब्द झेलण्यास त्याची तयारी असे. राणीची आज्ञा होतांच तो पलंगावर बसला. कांहीं वेळ तिच्याशीं संभाषण करण्यांत गेल्यावर काय चमत्कार झाला पहा:—एकाएकीं खानाच्या अंगाची तलखी होण्यास सुरवात झाली! त्याचा चेहरा काळा पडला, जीभ जड झाली; आणि मृत्यु-वेदनेनें तो जमिनीवर गडबडां लोळूं लागला! तेव्हां राणी पलंगावरून उठून अत्यंत कठोरवाणीनें त्यास म्हणाली "नीचा, भोग आपल्या कर्माचीं फळें. कामांधा, तुझा अंतकाल समीप येऊन पोंचला आहे. तुझ्या अंगांत जो पोषाक आहे तो सर्व विषानें रंगविलेला आहे, व त्याचें विष तुझ्या सर्व शरीरांत भिनून तूं आतां मृत्यूचे द्वारीं येऊन पडला आहेस. माझ्या पातिव्रत्याचें संरक्षण करण्याचा दुसरा कांहीं एक मार्ग न राहिल्यामुळें हा निंद्य मार्गच मला स्वीकारावा लागला." खानसाहेबांची ती अवस्था पाहून त्यांचे अनुयायी भयचकित होऊन गेले, परंतु ते त्या स्थळीं येऊन कांहीं हालचाल करणार इतक्यांत राणीनें तेथून एकदम खालीं नर्मदेंत उडी टाकली! तेव्हा ते चवताळून कावरेबावरे झालेले पठाण तेथें असलेल्या इतर स्त्रियांचे अंगावर धांवून गेले. परंतु त्या स्त्रिया ज्या उंच जागेवर बसल्या होत्या ती जागा बंदुकीच्या दारूचीं पोतीं रचून तयार केलेली होती. पठाण लोक अंगावर येतांच त्यांनीं आपल्या हातांतील दिवट्यांनीं त्या दारूस आग लावून

दिली. त्याबरोबर एकदम आगीचा भडका होऊन तो सर्व किल्ला पायासकट हदरून गेला, व त्यांत त्या स्त्रियांसहवर्तमान असंख्य पठाणांचा प्राणनाश झाला.

याप्रमाणें त्या कठोर आणि तेजस्वी राणीनें पठाणाच्या दुर्वासनेबद्दल त्याचा सूड उगवून स्वतःच्या पातिव्रत्याचें संरक्षण केलें. किल्ल्याबाहेर असलेल्या पठाणांनीं आपल्या अधिपतीचें प्रेत शोधून काढून त्यावर थडगें बांधिलें. हाच खान सांप्रतच्या भोपाळच्या गादीचा स्थापनकर्ता होय असें म्हणतात; आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, जे कोणी त्याच्या थडग्याचें दर्शन घेतात त्यांचा तीन दिवसाआड येणारा हिंवताप नाहींसा होऊन ते चांगले बरे होतात.

वाचकहो, काय हा भयंकर सूड ! आमच्या या चरित्रमालेंतील प्रत्येक स्त्रीच्या अंगीं कांहीं तरी लोकोत्तर गोष्ट तुमच्या नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं.

---

# रत्न आठवें.

## राणी दुर्गावती.

मध्यहिंदुस्थानांत गढामंडळ नांवाचें एक गोंड जातीच्या राजाचें छोटेखानी राज्य होतें. जेव्हां काश्मीर देशाच्या उत्तर सीमेपासून तों दक्षिणेस कुमारिका क्षेत्रापर्यंत अखिल भरतखंडांतील प्रत्येक राज्य अकबर बादशहाच्य ताब्यांत जात चाललें होतें, तेव्हां या छोटेखा नी राज्यानें आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें होतें; आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याचीं राजसूत्रें केवळ अबला ह्मणविलेल्या स्त्रीजातीकडे होतीं.

गढामंडळाचीं राज्यसूत्रें ज्या स्त्रीच्या हातीं होतीं, तिचें नांव दुर्गावती असें होतें. ही महिमावती दुर्गा महोब्याचा रजपूत राजा चंदेल याची कन्या आणि गढामंडळचा शूर राजा दलपतशहा याची पत्नी होती. तिचें अत्युत्तम सौंदर्य आणि लोकोत्तर चातुर्य यांचें माळव्यांतील भाट-कवींनीं फार सुरस वर्णन केलें आहे. राजा चंदेल याचे मनांत आपली कन्या एखाद्या आपल्या बरोबरीच्या रजपूत राजास अर्पण करावी असें होतें. परंतु दलपतशहाच्या रणधुरंधरतेची कीर्ति सर्वत्र पसरून दुर्गावतीच्याही कानीं गेली होती. त्यामुळें दलपतशहाशिवाय दुसऱ्या कोणत्याही राजास वरावयाचें नाहीं

असा तिच्या मनाचा निश्चय झाला होता. जेव्हां दुर्गावतीच्या पाणिग्रहणाविषयीं अनेक राजांकडून मागण्या घालण्यांत येऊं लागल्या, तेव्हां दलपतशहानेंही तिजविषयीं मागणी घातली. चंदेल राजानें दलपतशहास सांगून पाठविलें कीं, जर आपण पन्नास हजार लोकांच्या लव्याजम्यासह महोबा येथें याल तर दुर्गावती आपणांस अर्पण करण्यांत येईल. गढामंडळचें राज्य अतिशय लहान असल्यामुळें दलपतशहाबरोबर इतके लोक येणें अशक्य आहे अशी चंदेल राजाची खात्री होती. परंतु चंदेल राजास या त्याच्या खात्रीनें चांगलेंच फसविलें. दलपतशहानें हां हां म्हणतां पन्नास हजार लोक जमविले, व त्या सर्व लोकांस आपल्या तैनातींत घेऊन तो महोबा येथें येऊन दाखल झाला. आपल्या निरोपाप्रमाणें दलपतशहा जैय्यत सरंजामानिशीं आलेला पाहून चंदेल राजास अगदीं कोड्यांत पडल्यासारखें झालें व तो त्यास आपली कन्या देण्यास काच-कूच करूं लागला. तेव्हां दलपतशहानें राजवाड्यावर हल्ला करून आपल्या भावी श्वशुराचा पराभव केला व त्याचे समक्ष दुर्गावतीचें हरण केलें. आपल्या संकल्पाप्रमाणें आपल्यास शूर पतीची प्राप्ति झालेली पाहून दुर्गावतीस परमानंद झाला.

दलपतशहा आणि दुर्गावती यांनीं कांहीं कालपर्यंत सुखानें कालक्रमणा केली. परंतु निर्घृण काळानें दलपतशहाचें जीवित नष्ट करून त्या प्रेमळ जोडीच्या सौख्याचा भंग केला. दुःखांत सुख येवढेंच झालें कीं, दुर्गावती राणीस एका सुंदर पुत्ररत्नाची प्राप्ति झाली होती. या पुत्राचें नांव वीरनरेंद्र असें

ठेविलें होतें. हें दलपतशाहाचें तेजस्वी पुत्ररत्न वीरनरेन्द्र या नामाभिधानाला खरोखरच पात्र होतें, असें त्याच्या पुढील चरित्रावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. दलपतशहा परलोक वासी झाला त्या वेळीं कुमार वीरनरेन्द केवळ तीन वर्षांचा बाळ होता. दलपतशहाचे पाठीमागें दुर्गावतीनें आपल्या पुत्रास राज्याभिषेक करवून राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपले हातीं घेतलीं.

दलपतशहाच्या मरणानें गढामंडळचे लोक अत्यंत दुःखी झाले, आणि राणी दुर्गावतीची सर्व प्रकारें नागवणूक झाली यांत संशय नाहीं; तथापि दुर्गावतीचे अंगीं लोकोत्तर क्षात्र तेज वास्तव्य करीत असल्यामुळें तिनें आपल्या प्रजाजनांस दलपतशहाचें वियोगजन्य दुःख लवकरच विसरलास लाविलें. तिनें प्रजेच्या सुखाकरितां स्वतःचें दुःख गिळून टाकिलें होतें. तिनें दलपतशहापेक्षांही राज्यकारभाराचें काम उत्तम रीतीनें चालविलें; आणि दळपतशहाच्या वेळेप्रमाणेंच तिचें राज्य अकबराच्या सैन्यानें घेरून टाकिलें असतांही तिनें विलक्षण हातोटीनें आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें होतें.

माळव्याच्या सुभेदारांनीं गढामंडळचें राज्य जिंकून घेण्याबद्दल अकबर बादशहाची अनेक वेळ परवानगी मागितली; परंतु दुर्गावतीचें राजकार्यकौशल्य आणि शौर्य यांची अकबर बादशहास माहिती असल्यामुळें त्यानें तिजवर हल्ला करण्यास आपल्या सुभेदारांस परवानगी देण्याचें नाकारिलें. अकबर हा चांगुलपणाचा भोक्ता होता. राणी दुर्गावती आपले

प्रजाजनांस मातेप्रमाणें प्रिय झाली आहे असें त्यानें ऐकिलें होतें; आणि खरोखरच तिनें आपल्या प्रजेच्या सुखाकरितां ज्या गोष्टी केल्या तशा फारच थोड्या राजांनीं केल्या असतील. तिनें अनेक ठिकाणीं तळीं खणलीं, विहिरी बांधल्या व मंदिरें आणि धर्मशाळा यांची स्थापना केली. हें गढामंढळचें छोटेखानी राज्य साऱ्या हिंदुस्थानांत त्या वेळीं नामांकित झालें होतें. तेथील लोक सुखी, समाधानी आणि श्रीमान असे होते. तेथील जमीन सुपीक असून व्यापारही चांगल्या भरभराटींत आला होता.

अकबरानें गढामंडळावर स्वारी करण्याचें जरी अनेक वेळ नाकारिलें होतें, तरी असफखान नामक सरदाराच्या विनंतीवरून त्यानें त्यास त्या राज्यावर स्वारी करून तें काबीज करण्याची परवानगी दिली. तेव्हां असफखानानें त्या गतभर्तृका राणीच्या हातून तिचें राज्य हिसकावून घेण्याकरितां तिजवर स्वारी केली. वस्तुतः राणीनें त्याचा किंवा अकबरबादशहाचा कांहींएक गुन्हा केला नव्हता. परंतु एखाद्या नित्रस्त वनांतील निरुपद्रवी हरिणीप्रमाणें निष्कारण या असफखानरूपी पारध्याच्या राज्यतृष्णेस तिला बळी पडावें लागलें. असफखानासारख्या सरदाराची आणि दुर्गावतीची बरोबरी होणें कठीण होतें. अकबराची परवानगी असती तर त्यानें तिचें राज्य यापूर्वीं कधींच हिसकावून घेतलें असतें. तिचें राज्य फारच लहान होतें; इतकें कीं, अकबराच्या पदरच्या अगदीं शेवटच्या उमरावाची जहागीरदेखील त्याहून मोठी असेल!

दुर्गावतीस आपले हातून आपल्या राज्याचें संरक्षण होण्याची यत्किंचित् देखील आशा नव्हती. दिल्लीपतीच्या सैन्यास तोंड देऊन लढाईस उभें राहणें ह्मणजे निवळ वेडेपणाचें कृत्य होतें. तथापि, दुर्गावतीनें धैर्य सोडिलें नाहीं. तिनें कांहीं झालें तरी आपल्या आवडत्या राज्याचें संरक्षण करून आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा निश्चय केला.

तिनें लवकरच सैन्याची जमवाजमव करण्यास सुरवात केली; आणि तिच्या सुदैवानें आठ हजार घोडेस्वार आणि दोन हजार हत्ती इतकें सैन्य तिजपाशीं जमा झालें. तिच्या राज्यांतील बहुतेक लोकांचें तिला चांगलें पाठबळ होतें. गढा-मंडळाचे सर्व शूर लोक त्वरेनें तिच्या सैन्यांत भरले; आणि तिनें स्वतः त्याचें सेनापत्य स्वीकारलें. या नवीन जमलेल्या सैन्यांत आवेश जणूं काय मूर्तिमंत भरला होता. आपल्या देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याचा त्यांचा दृढनिश्चय झाला होता, आणि राणीकरितां ते आपला प्राणही खर्ची घालण्यास तयार झाले होते.

गढामंडळासारखें लहानसें संस्थान एवढें मोठें व एवढें जबरदस्त सैन्य जमाविण्यास समर्थ होईल ही गोष्ट असफखानास संभवनीय वाटली नाहीं. गढामंडळासारखें छोटेंसें संस्थान आपण कांहींएक श्रम न पडतां सहज हस्तगत करूं असें वाटल्यावरून त्यानें फक्त पांच हजार स्वारांनिशीं त्यावर चाल केली. त्याला वाटलें होतें कीं, आपल्याला ह्मणण्यासारखें युद्ध देखील करावें लागणार नाहीं. ती बायको-

मनुष्य आपणाशीं कशाची युद्ध करणार ? परंतु तो जेव्हां गढामंडळाजवळ येऊन पोंचला, तेव्हां ती त्याची चूक त्याच्या नजरेस आली. पण त्या वेळीं चूक लक्ष्यांत येऊन काय उपयोग ? जिला आपण अबला स्त्री समजून जिचें विशेष भय बाळगलें नाहीं ती स्त्री सैन्याचें आधिपत्य स्वीकारून युद्धास उभी राहिलेली पाहून असफखान अगदीं थक्क होऊन गेला. आतां त्यास मागें परततां येईना, व त्याच्यानें तिजवर एकदम हल्लाही करवेना. मागें परतावें तर भित्रेपणा पदरीं येतो व हल्ला करावा तर बरोबर सारे पांच हजार स्वार आणलेले ! अशी त्याची द्विधा बुद्धि झाली. तथापि, अशा वेळीं युद्ध न करितां माघारें फिरणें लांछनास्पद वाटून त्यानें आपल्या सैन्यास हल्ला करण्याचा हुकूम दिला. तेव्हां उभय सैन्यांची लढाई जुंपली.

या वेळीं दुर्गावतीनें असफखानाच्या सैन्याचा इतक्या विलक्षण रीतीनें मोड केला कीं, असफखान मोठ्या मुष्किलीनें समरांगण सोडून तेथून आपला जीव घेऊन पळाला; आणि त्याच्या सैन्याची अगदीं वाताहात झाली. हा जय मिळाल्यामुळें गढामंडळच्या लोकांस अत्यानंद वाटला; परंतु दुर्गावतीस त्यापासून म्हणण्यासारखा आनंद वाटला नाहीं. कारण असफ्खानास अकबर बादशाहाकडून मोठ्या सैन्याची मदत मिळून तो पुन्हां आपणावर चाल करून येईल व त्या वेळीं त्याच्या त्या प्रचंड सैन्याबरोबर युद्ध करून जय मिळविणें फार दुर्घट आहे, ही गोष्ट ती पूर्णपणें जाणून होती.

दुर्गावतीस आपले हातून आपल्या राज्याचें संरक्षण होण्याची यत्किंचित् देखील आशा नव्हती. दिल्लीपतीच्या सैन्यास तोंड देऊन लढाईस उभें राहणें ह्मणजे निवळ वेडेपणाचें कृत्य होतें. तथापि, दुर्गावतीनें धैर्य सोडिलें नाहीं. तिनें कांहीं झालें तरी आपल्या आवडत्या राज्याचें संरक्षण करून आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा निश्चय केला.

तिनें लवकरच सैन्याची जमवाजमव करण्यास सुरवात केली; आणि तिच्या सुदैवानें आठ हजार घोडेस्वार आणि दोन हजार हत्ती इतकें सैन्य तिजपाशीं जमा झालें. तिच्या राज्यांतील बहुतेक लोकांचें तिला चांगलें पाठबळ होतें. गढा-मंडळाचे सर्व शूर लोक त्वरेनें तिच्या सैन्यांत भरले; आणि तिनें स्वतः त्याचें सेनापत्य स्वीकारलें. या नवीन जमलेल्या सैन्यांत आवेश जणूं काय मूर्तिमंत भरला होता. आपल्या देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याचा त्यांचा दृढनिश्चय झाला होता, आणि राणीकरितां ते आपला प्राणही खर्ची घालण्यास तयार झाले होते.

गढामंडळासारखें लहानसें संस्थान एवढें मोठें व एवढें जबरदस्त सैन्य जमाविण्यास समर्थ होईल ही गोष्ट असफखानास संभवनीय वाटली नाहीं. गढामंडळासारखें छोटेंसें संस्थान आपण कांहींएक श्रम न पडतां सहज हस्तगत करूं असें वाटल्यावरून त्यानें फक्त पांच हजार स्वारांनिशीं त्यावर चाल केली. त्याला वाटलें होतें कीं, आपल्याला ह्मणण्यासारखें युद्ध देखील करावें लागणार नाहीं. ती बायको-

मनुष्य आपणाशीं कशाचीं युद्ध करणार ? परंतु तो जेव्हां गँढामंडळाजवळ येऊन पोंचला, तेव्हां ती त्याची चूक त्याच्या नजरेस आली. पण त्या वेळीं चूक लक्ष्यांत येऊन काय उपयोग ? जिला आपण अबला स्त्री समजून जिचें विशेष भय बाळगलें नाहीं ती स्त्री सैन्याचें आधिपत्य स्वीकारून युद्धास उभी राहिलेली पाहून असफखान अगदीं थक्क होऊन गेला. आतां त्यास मागें परततां येईना, व त्याच्यानें तिजवर एकदम हल्लाही करवेना. मागें परतावें तर भित्रेपणा पदरीं येतो व हल्ला करावा तर बरोबर सारे पांच हजार स्वार आणलेले ! अशी त्याची द्विधा बुद्धि झाली. तथापि, अशा वेळीं युद्ध न करितां माघारें फिरणें लांछनास्पद वाटून त्यानें आपल्या सैन्यास हल्ला करण्याचा हुकूम दिला. तेव्हां उभय सैन्यांची लढाई जुंपली.

या वेळीं दुर्गावतीनें असफखानाच्या सैन्याचा इतक्या विलक्षण रीतीनें मोड केला कीं, असफखान मोठ्या मुष्कि-लीनें समरांगण सोडून तेथून आपला जीव घेऊन पळाला; आणि त्याच्या सैन्याची अगदीं वाताहात झाली. हा जय मिळाल्यामुळें गढामंडळच्या लोकांस अत्यानंद वाटला; परंतु दुर्गावतीस त्यापासून म्हणण्यासारखा आनंद वाटला नाहीं. कारण असफखानास अकबर बादशहाकडून मोठ्या सैन्याची मदत मिळून तो पुन्हां आपणावर चाल करून येईल व त्या वेळीं त्याच्या त्या प्रचंड सैन्याबरोबर युद्ध करून जय मिळ-विणें फार दुर्घट आहे, ही गोष्ट ती पूर्णपणें जाणून होती.

तिला ठाऊक होतें कीं, अकबरबादशहानें आपलें राज्य हिसकावून घेण्याचा जो एकदां निश्चय केला आहे तो शेवटास नेल्याशिवाय तो कधींही रहावयाचा नाहीं.

तिच्या अटकळीप्रमाणें सुमारें दीड वर्ष होतांच अकबरानें असफ्खानाच्या मदतीस दिल्लीहून मोठें सैन्य रवाना केलें, आणि पूर्वींच्या लढाईत झालेल्या पराभवाचा बदला घेण्याकरितां असफ्खानानें पुन्हां दुर्गावतीवर चाल केली. गढामंडळचें राज्य काबीज करून तें दिल्लीच्या सार्वभौम सत्तेखालीं आणावें असा अकबराकडून असफ्खानास सक्तीचा हुकूम आला होता.

अकबराकडून कसाही सक्तीचा हुकूम आला असला तरी दुर्गावतीसारखी रणपंडिता काय असफखानासारख्यास सहज हार जाणारी होती ? तिच्या मनाचा असा निर्धार झाला होता कीं, आपला प्राणांत होईपर्यंत शत्रूस हार ह्मणून जावयाचें नाहीं. तिनें पुन्हां एकदां मोठें प्रचंड सैन्य जमा केलें आणि असफखानाच्या सैन्याबरोबर लढण्याकरितां ती किल्ल्याबाहेर येऊन उभी राहिली. तेव्हां उभय सैन्यांचें तुंबळ युद्ध होऊन शेवटीं दुर्गावतीसच यश आलें. दुर्गावतीनें असफखानाच्या सैन्यास असा जबरदस्त मार दिला कीं, त्यास अगदीं पळतां भुई थोडी झाली.

समोरासमोर युद्ध करून गढामंडळ स्वाधीन होणें दुर्घट आहे असें जेव्हां असफखानास कळून चुकलें, तेव्हां त्यानें दुर्गावतीच्या सैन्यांत फूट पाडण्याचे उपाय करण्यास सुरवात

केली. त्यानें तिच्या किल्ल्यांत आपले हेर पाठविले, लांचखाऊ लोकांस जबर पैसे चारिले, आणि असले घातकी उपाय योजून दुर्गावतीचे सैन्यांत परस्पर कलह आणि अव्यवस्था यांचें बीजारोपण केलें. खरोखर लांच, फितूर आणि विश्वासघात हीं तीन दुष्ट पिशाच्चें जेथें शिरतील तेथें तीं सत्यनाश केल्यावांचून कधींही रहावयाचीं नाहींत, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. आपल्या सैन्यांतील लोकांत फितूर सुरू झाला आहे ही गोष्ट दुर्गावतीच्या ध्यानांत आली होती व त्याबद्दल ती कांहीं बंदोबस्त करणार, तोंच असफ्खानानें तिजवर तिसऱ्यानें स्वारी केली. आतां मात्र आपल्या संस्थानचें खचित दुर्दैव ओढवलें अशी तिची खात्री झाली. या वेळीं मात्र तिचे हातपाय अगदीं गळाले. तथापि, असफ्खानाशीं युद्ध करून आपलें स्वातंत्र्य रक्षण्याचा तिचा निश्चय मात्र बालाग्र ढळला नाहीं. जेवढे लोक मिळाले तेवढे लोक मिळवून आपल्या चौदा वर्षांच्या पुत्रास बरोबर घेऊन ती शत्रूशीं झुंजण्यास उभी राहिली. या वेळीं जेवढे लोक तिजबरोबर प्राणांत होईपर्यंत शत्रूशीं झुंजण्यास तयार होते, तेवढेच तिनें आपल्या बरोबर घेतले होते.

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उभय सैन्यांचें मोठें घनचक्कर युद्ध झालें. कुमार वीरनेंद्र आपल्या वीरमातेबरोबर मोठ्या आवेशानें शत्रूशीं लढत होता. त्यानें दोन वेळ शत्रूवर अशा वेगानें चाल केली कीं, त्याच्याशीं युद्ध करतांना शत्रुसैन्यांतील लोकांचे पाय लटपटूं लागले. परंतु अखेरीस हें वीर-

रत्न एक जबर जखम लागून रणांगणीं पतन पावलें. कुमार पडलेला पाहतांच राणी दुर्गावती अत्यंत शोकाकुल झाली. तथापि आपला शोक तसाच आवरून, ती आपले लोकांस म्हणाली, "कुमारास तंबूमध्यें घेऊन जा." तेव्हां एका सेवकानें तीस म्हटलें, "आपण तंबूपर्यंत चालून कुमाराची शेवटची व्यवस्था लावावी." त्यावर तिनें उत्तर केलें, "मला तिकडे येतां येत नाहीं; कारण मी जर या वेळीं युद्ध सोडून तिकडे आलें तर हे सैनिक लोक घाबरून जातील. माझा पुत्र रणांत शौर्य गाजवून मरत आहे हें पाहून मला संतोष होतो. हें युद्ध आटपलें म्हणजे मी त्याला स्वर्गांतच भेटेन. राणीनें आपल्या पुत्रास तंबूंत नेण्याची आज्ञा दिली त्या वेळीं कित्येक भित्र्या लोकांना आयतीच सवड सांपडून ते तंबूकडे निघून गेले; आणि राणीजवळ फक्त तीनशें लोक राहिले. तथापि तेवढ्याच लोकांस उत्तेजन देत ती शत्रूशीं लढत होती. इतक्यांत एक तीक्ष्ण बाण येऊन तिच्या डोळ्यांत शिरला, तो तिनें तत्काळ उपटून फेंकून दिला. पुन्हां एक बाण तिच्या छातींत येऊन घुसला. तोही तिनें उपटून टाकला; परंतु या बाणांनीं तिचा देह पीडित झाल्यामुळें तिच्या डोळ्यापुढें अंधेरी येऊं लागली. तरी देखील ती एखाद्या चवताळलेल्या सिंहिणीप्रमाणें एकसारखी शत्रूशीं झुंजत होती. शेवटीं तिला जबर मूर्च्छा येऊन ती एकाएकीं हौद्यांत पडली. तेव्हां एका स्वामिभक्त सरदारानें तिला विनंति केली कीं, "आज्ञा होत असेल तर आपला हत्ती रणांतून दूर घेऊन चलतों." तेव्हां ती म्हणाली

येथून या वेळीं जरी माझा हत्ती तुम्हीं एकीकडे काढून नेलात तरी मला यापुढें असें किती दिवस जगावयाचें आहे? मग थोड्या दिवसांच्या जीविताकरितां रणभूमि सोडून गेल्याचा दोष कशाला पदरीं बांधून घेऊं? तुम्ही जर माझे खरे स्वामिभक्त सेवक असाल तर माझ्याकारितां एक काम करा. तें हें कीं, सत्वर एक बर्चीचा घांव करून मला इललोकच्या यातनेंतून सोडवा, म्हणजे मी आत्महत्येच्या पातकापासून तरी वांचेन." ही तिची दुःखमय निर्वाण वाणी श्रवण करितांच त्या सरदाराच्या नेत्रांस अश्रु आले आणि अत्यंत नम्रतापूर्वक तो तीस म्हणाला, "हे स्वामिनी, ही गोष्ट माझे हातून व्हावयाची नाहीं. आज्ञा होत असेल तर पूर्वीं विनंति केल्याप्रमाणें आपला हत्ती एकाद्या सुरक्षित स्थळीं घेऊन चलतों." सरदाराचे हातून आपली इच्छा शेवटास जात नाहीं असें पाहून राणीनें आपल्या हातानें आपला घात करून घेण्याचा विचार केला. तिनें एकदां अश्रुपूर्ण नेत्रांनीं तेथून दूर असलेल्या गढामंडळचें दर्शन घेतलें आणि एकदम आपल्या हातांतील शस्त्रानें आपलें जीवित नष्ट करून टाकिलें. याप्रमाणें ती वीर्यशालिनी राणी दुर्गावती त्या रणभूमीवर आपला देह ठेवून चालती झाली. तिचा पवित्र देह जिवंतपणीं शत्रूच्या हातीं लागला नाहीं; व पुढें तिच्या विश्वासु सेवकांनीं तिच्या प्रेतासही शत्रूच्या अपवित्र हस्ताचा स्पर्श होऊं दिला नाहीं. तिच्याजवळ असलेला स्वामिनिष्ठ सेवक तिचा सेनापति आपल्या रणशूर स्वामिनीस सोडून न जातां त्याच ठिकाणीं धारातीर्थी पतन

पावला! धन्य आहे या क्षात्रगुणाची व स्वामिनिष्ठपणाची! हें युद्ध झाल्यावर गढागंडळचें राज्य दिल्लीच्या सार्वभौम पातशाहीस जोडलें गेलें हें सांगणें नकोच.

कर्नल स्लीमन साहेब लिहितातः---" रणशूर राणी दुर्गावती हिचें स्मारक ( समाधि ) त्याच पर्वतप्रदेशामध्यें बांधलें गेलें आहे. तेथें दोन पाषाणस्तंभ उभे केले असून ते त्या युद्धभूमीचा देखावा प्रेक्षकांच्या मनांत मूर्तिमंत उत्पन्न करितात. ह्या गिरिशिखरावर रात्रीच्या समयीं अद्यापि भयंकर रणघोष होत असतो असें म्हणतात. ह्या निर्जन परंतु रमणीय प्रदेशामध्यें जे प्रवासी जन जातात, ते मोठ्या आदरानें ह्या स्थळीं येतात व प्रेमपूर्वक त्या रणशूर राणीच्या समाधीचें दर्शन घेतात, आणि तिच्या पराक्रमगुणानें थक्क होऊन स्वानंदचित्तानें तिची पूजा करितात. ह्या प्रदेशामध्यें चकचकीत कांचेचे तुकडे पुष्कळ सांपडतात, ते घेऊन ते लोक तेथें समर्पण करितात. ह्या त्यांच्या प्रघाताप्रमाणें मीं देखील महाराणी दुर्गावतीच्या दिव्य गुणांच्या अभिनंदनार्थ एक तुकडा समर्पण केला!" खरोखर अशा अलौकिक शौर्यगुणाचें कोण अभिनंदन करणार नाहीं? खरेंच, क्षत्रियधर्मास श्रेयस्कर असें जें युद्ध तें करून ज्यांनीं स्वर्गद्वार प्राप्त करून घेतलें त्यांचें भाग्य काय वर्णन करावयाचें आहे!

# रत्न नववें.

## राणी जसरेश्वरी.

जगत्प्रसिद्ध मोंगल बादशहा अकबर यानें जेव्हां बंगालच्या पठाण राजावर स्वारी करून तो प्रांत आपल्या ताब्यांत आणिला त्या वेळीं पूर्वीच्या पठाण राजास खंडणी देऊन स्वतंत्रपणें राज्य करणारे कित्येक छोटेखानी राजे त्या प्रांतांत होते. बंगाल प्रांतावर अकबराचा अंमल सुरू होतांच वर वर्णन केलेल्या मांडलिक संस्थानांनीं त्याचें स्वामित्व कबूल करून ते पूर्वीच्या पठाण राजाप्रमाणेंच अकबरास खंडणी देऊन स्वतंत्रपणें राज्य करूं लागले. या संस्थानिकांपैकीं जेसोरचा राजा विक्रमादित्य हा बहुतेक सर्व दक्षिण-बंगाल प्रांताचा अधिपति होता. तो राजा यथाकाल मृत्युवश होऊन त्याचा मुलगा प्रतापादित्य त्याचे जागीं दक्षिण-बंगालचा अधिपति झाला.

प्रतापादित्य मोठा सामर्थ्यवान् आणि प्रबल राजा निघाला. त्यास एक अत्यंत रूपवती आणि गुणवती अशी पत्नी होती. तिला जसरेश्वरी म्हणत. तिचें खरें नांव काय होतें तें माहीत नाहीं. त्यांच्या घराण्याच्या अधिदेवतेचें नांव जसरेश्वरी असून त्याच नांवानें लोक राणीसही हांक मारीत. कुलस्वामिनी जसरेश्वरीसंबंधानें अशी एक दंतकथा ऐकण्यांत आहे कीं, तिनें पूर्वी एके वेळीं जेसोरच्या राजपूर्वजांस प्रत्यक्ष होऊन

आपली इच्छा प्रदर्शित केली कीं, या राजघराण्यांत कांहीं दुराचरण घडल्याशिवाय मी या नगरास सोडून जावयाची नाहीं. तिनें आणखी असेंही वचन दिलें होतें कीं, जेव्हां मी हें स्थान सोडून जाईन, तेव्हां माझ्या मंदिरांतील माझ्या मूर्तीचें मुख तुम्हांस फिरलेलें दिसेल. त्या खुणेवरून मीं येथून प्रयाण केलें असें तुम्हीं समजावें. याप्रमाणें जेसोर येथें दोन जसरेश्वरी झाल्या. एक राजपत्नी व दुसरी नगरदेवी.

प्रतापादित्य जितका शूर व बलवान् होता तितकाच तो दुष्ट व दुराचारी निघाला. त्यानें आपले भोंवतीं फार मोठें सैन्य जमविलें. त्या सैन्यांत आसपासचे बहुतेक दंगेखोर लोक भरले होते. या दंगेखोर लोकांच्या साह्यानें प्रतापादित्य बंगाल-प्रांतांतील इतर जहागिरदार आणि राजे यांजवर हल्ले करून त्यांचेपासून खंडण्या वसूल करूं लागला. त्यानें आणखी पोर्तुगीज चांचे लोकांची मदत घेऊन या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सारा दक्षिण-बंगाल प्रांत लुटून फस्त केला. अशा-रीतीनें तो बंगालच्या मोंगल सुभेदारासही भारी होऊन बसला, हें सांगण्याची अवश्यकताच नाहीं. त्यानें त्याची उघडपणें निर्भर्त्सना करण्यास सुरवात केली, आणि त्याला खंडणी देण्याचें नाकारिलें.

तो आसपासचे राजेलोकांसच लुटून स्वस्थ राहिला नाहीं, तर त्यानें आपला चुलता बसंतराय याजवरही आपली दुष्ट नजर फिरविली. वसंतराय मोठा सज्जन आणि समंजस मनुष्य होता. जेसोरच्या राजघराण्यांतील तो एक वृद्ध पुरुष असून सर्व

लोक त्यास चहात असत व त्यास मोठा सन्मान देत. त्याला या त्याच्या पुतण्याची वर्तणूक पसंत पडेनाशी झाली. त्यानें त्याला उपदेश करून त्याचें वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रतापादित्यानें त्याचा सोन्यासारखा उपदेश एका कानानें ऐकिला व दुसऱ्या कानानें सोडून दिला. आपली प्रजा आपणाविषयीं नाखुष असून आपला चुलता त्यांना केवळ प्रतिदेवच वाटत आहे, ही गोष्ट प्रतापादित्य पूर्णपणें जाणून होता. कदाचित् हे लोक बंड करून आपणास पदच्युत करतील आणि आपले जागीं आपल्या चुलत्याची स्थापना करितील अशी त्यास मोठी भीति पडली होती. तेव्हां प्रतापादित्यानें बसंतरायाचा खून करून आपल्या मार्गांतील तो जबरदस्त कांटा काढून टाकण्याचा दुष्ट विचार मनांत आणिला.

राणी जसेरश्वरी इजला प्रतापादित्याचा हा बेत कळून आला, व तिनें त्यास या दुष्कर्माचरणापासून परावृत्त करण्याचा अनेक प्रकारांनीं यत्न केला. परंतु, तिचाही यत्न सफल झाला नाहीं. तेव्हां तिनें आपल्या पतीस ताळ्यावर आणण्याकरितां व त्याचे हातून असलें दुराचरण न घडूं देण्याकरितां एक विलक्षण युक्ति योजिली.

बंगाल्यांत फार दिवसांपासून अशी एक रीत चालत आली होती व ती रीत सध्यांही कोठें कोठें अस्तित्वांत आहे कीं, जेव्हां एखाद्या कुलीन स्त्रीस एखाद्या शूर पुरुषाकडून आपलें कार्य करून घ्यावयाचें असतें तेव्हां ती आपले हस्तांतील

कंकण त्या शूर पुरुषाकडे किंवा शूर पुरुषांच्या समुदायाकडे पाठविते तें कंकण एखाद्या दासीच्या हातीं देऊन जेथें शूर लोकांचा समाज जमला असेल तेथें नेऊन टाकण्याची चाल आहे. मग तें सभेंत येऊन पडलेलें कंकण एखादा शूर पुरुष उचलून घेतो, आणि ज्या स्त्रीचें हें कंकण असेल तिचें कसलेंही दुर्घट कार्य असलें तरी तें मी प्रतिज्ञापूर्वक शेवटास नेईन अशी शपथ वाहतो. जसेरेश्वरीनें सदर उपाय करण्याचें मनांत आणिलें. एके दिवशीं प्रतापादित्य दरबारांत बसला असतां एक दासी येऊन तिनें जसेरेश्वरीचें कंकण त्या सभेंतील सरदार लोकांपुढें टाकिलें. कंकण पहातांच सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें, व ते मोठ्या उत्सुकतेनें प्रतापादित्याचे मुखाकडे पाहूं लागले. प्रतापादित्य निष्ठुर मुद्रा करून स्वस्थ बसला होता. सरतेशेवटीं एक योद्धा हळुं हळुं उभा राहिला. हा योद्धा राणीचा भाऊ आणि प्रतापादित्याचा सेनापति होता. त्यानें पुढें होऊन तें कंकण उचलिलें, आणि प्रतापादित्याकडे वळून म्हटलें " हें कंकण आपल्या राणीसाहेबांकडून आलें आहे. आमचे राणीसाहेबांस असें कोणतें संकट पडलें आहे तें कांहीं कळत नाहीं; आणि ज्या अर्थी हें कंकण त्यांचेकडून आलें आहे, त्या अर्थी तें आमचे महाराज उचलून घेतील असें आम्हांस वाटलें होतें; परंतु, ज्या अर्थी महाराजांनीं तें उचलण्याचें कांहींच चिन्ह दर्शविलें नाहीं, त्या अर्थी तें उचलून घेणें मला भाग पडलें आहे. कारण, कोणीच जर तें उचललें नाहीं तर या दरबारांत शूर पुरुषांची उणीव आहे असें

लोकांस वाटेल; म्हणून मीच तें उचलून घेतों, आणि प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं, माझा प्राणांत होईपर्यंत मी राणीसाहेबांचें कार्य शेवटास नेल्याशिवाय रहाणार नाहीं.

सेनापतीचें तें प्रतिज्ञावचन श्रवण करून प्रतापादित्य मनांतल्या मनांत जळफळूं लागला. त्यानें सेनापतीकडे पाहून फक्त आपले कपाळास आंठ्या मात्र घातल्या; परंतु मुखानें एक शब्दही उच्चारिला नाहीं. इकडे तें कंकण घेऊन आलेल्या दासीस मात्र आनंद होऊन तिनें राणीचें इच्छित कार्य आपल्या मंजुल वाणीनें सभेपुढें निवेदन केलें. ती म्हणाली, "आपल्या महाराणीसाहेबांची अशी इच्छा आहे, व त्याबद्दल त्यांची अशी आज्ञा आहे कीं, जो कोणी शूर पुरुष माझ्या कंकणाचा स्वीकार करील त्यानें राजा बसंतराय आणि त्याचें कुटुंब यांचें संरक्षण करण्याचे कामीं आपला प्राणनाश जरी झाला तरी मागेंपुढें पाहूं नये." "ही त्यांची इच्छा पूर्णपणें शेवटास जाईल." असें ह्मणून तो शूर सेनापति आपल्या जागेवर येऊन बसला.

वरील प्रकार घडतांच राजानें दरबार बरखास्त केला आणि मोठ्या त्वरेनें तो आपल्या राणीच्या अंतःपुरांत गेला. राजा प्रतापादित्य जर या जगांत कोणा एकाद्या व्यक्तीचें भय बाळगीत असला तर ती व्यक्ति त्याची राणी जसरेश्वरी होती. राजा प्रतापादित्य इतरांना व्याघ्राप्रमाणें क्रूर होता, तरी तो आपल्या राणीपुढें अगदीं गाय होऊन जात असे. राणीच्या अंगा अशी कांहीं तेजस्विता वास्तव्य करीत होती कीं, तिचें

कोणास दर्शन झालें असतां त्याचे अंगाचा थरकांपच व्हावा. राजा प्रतापादित्य तिजकडे येऊन त्यानें तिची पुष्कळ विनवणी केली, धाक घालून पाहिला, तिला प्रेमानें गोंजारून वश करण्याचा प्रयत्न केला, फार तर काय पण बसंतरायाचे प्राण वांचविण्याच्या प्रतिज्ञेपासून तिचें मन फिरविण्याकरितां तो तिच्या पायांही पडला. तो म्हणाला, "बसंतराय जर जिवंत राहील तर आपणाला सुखानें राज्य करितां येणें अगदीं असंभवनीय आहे. मरण हें त्यांस सुटावयाचें नाहीं. तो या जगांतून नाहींसा होईल तरच मी सुखी होईन." राणी म्हणाली, "तुम्ही सुखी असां कीं असुखी असां; मी तुमच्या हातून असलें हीन कर्म घडूं द्यावयाची नाहीं."

उघडपणें बसंतरायाचा वध होणें कठीण आहे असें जाणून प्रतापादित्यानें विश्वासघाताचा मार्ग स्वीकारिला. त्यानें वरवर आपल्या आजपर्यंतच्या दुष्कृत्यांबद्दल पश्चात्ताप प्रदर्शित करण्यास सुरवात केली. तो बसंतरायाकडे जाऊन त्याचे पायां पडला. त्यानें सहस्त्रवेळ त्याची क्षमा मागितली, आणि मोठ्या मायावी भाषणानें आपल्या राजवाड्यांत येऊन आपल्याबरोबर भोजन करून जावें म्हणून त्याची विनवणी केली. राजा बसंतरायास तें त्याचें आचरण निष्कपटपणाचें वाटून त्यानें राजवाड्यांत येण्याचें कबूल केलें.

प्रतापादित्याचा हा सर्व पश्चात्ताप केवळ वरकरणीचा होता. त्याचे अंतःकरणांत बसंतरायाचा प्राणघात करण्याची दुर्वासना अजून जशीच्या तशीच आहे, ही गोष्ट राणी जसरे-

श्वरी पूर्णपणें जाणून होती. तिनें अगोदर बसंतरायाचा मुलगा आपल्या रखवालीखालीं आणून ठेविला, आणि नंतर प्रतापादित्यास त्याला बोलावणें करण्याची परवानगी दिली. प्रतापादित्याच्या बोलावण्याप्रमाणें बसंतराय जेसोरला यावयास निघाला. तरी त्याचेही मनांत प्रतापादित्याच्या विश्वासघाताबद्दलचा संशय आला होताच. त्यानें आपल्याबरोबर एक कपोत पक्षी घेतला आणि आपल्या राणीस सांगून ठेविलें कीं " हा कपोत जर मला सोडून तुजकडे परत आला तर माझा प्राणनाश झाला, किंवा मला बंदिवास प्राप्त झाला आहे असें त्वां समजावें."

याप्रमाणें राजा बसंतराय आपल्या पत्नीचा निरोप घेऊन थोड्याशा सेवकांसह जेसोरकडे यावयास निघाला. परंतु त्याला सामोरे जाण्याकरितां म्हणून प्रतापादित्यानें जे लोक पाठविले होते, त्यांनीं त्यास आडमार्गांत नेऊन तेथें त्याचा वध केला. झालें! जी गोष्ट घडून येऊं नये म्हणून राणी जसरेश्वरीनें भगीरथ प्रयत्न केले ती गोष्ट तिच्या दुर्दैवानें सरतेशेवटीं घडून आली ती आलीच. बसंतरायाचा प्राणनाश होतांच त्यानें बरोबर आणिलेला कपोतपक्षी तेथून निसटून त्याच्या राणीकडे गेला. कपोत परत आलेला पहातांच राणीचे नेत्रापुढें पुढचें सर्व दिव्य उभें राहिलें. तेव्हां तिनें आपल्या अब्रूचें संरक्षण करण्याकरितां आपल्या परिवारासह आपल्या वाड्यांतील एका तलावांत उडी टाकून प्राणत्याग केला. तिचा पुत्र मात्र राणी जसरेश्वरीच्या संरक्षणाखालीं असल्यामुळें

सुरक्षित राहिला होता.

वाचकहो, असला दुराचारी नराधम या जगांत किती दिवस सुखानें वास करणार? बसंतरायाचा वध झाल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं अकबराचा शूर सेनापति राजा मानसिंग हा प्रचंड सैन्य घेऊन त्याजवर चाल करून आला. राजा प्रतापादित्यही त्याजबरोबर युद्ध करण्यास उभा राहिला. कारण त्याचेंही बळ कांहीं सामान्य नव्हतें; त्याजपाशीं पन्नास हजार खड्गी; तीस हजार शूली (भालेवाले), दहा हजार सादिगण (घोडेस्वार), दोनशें हत्ती आणि शतसंख्य तोफा इतकें साहित्य होतें. शिवाय पोर्तुगीज यांचे लोकांकडूनही त्यास चांगली मदत मिळाली होती. परंतु, एवढें जबरदस्त साहित्य जवळ असतांही अखेर त्याचाच पराभव झाला. त्याचें कारण असें झालें कीं, त्याच्या सैन्यांत, एकाएकीं देवी जसेरेश्वरीनें आपलें मुख फिरविल्याची बातमी पसरली. तेव्हां आपल्या राजाच्या दुष्कृतीनें देवीचा कोप होऊन ती आपलें नगर सोडून गेली, असें समजून जिकडे तिकडे लोकांचे मुखावर औदासीन्याची छाया पसरली. त्यांनीं युद्ध करण्याचें सोडून दिलें. राजानें ही त्यांची भ्रामक समजूत नाहींशी करण्याची पराकाष्ठा करून पाहिली, परंतु कांहींएक उपयोग झाला नाहीं. शेवटीं तो दुर्दैवी राजा सर्वस्वीं पराभूत होऊन राजा मानसिंगाचा बंदिस्त झाला.

प्रतापादित्य हातीं सांपडतांच राजा मानसिंग जेसार शहर हस्तगत करून घेण्याकरितां त्या शहरापाशीं आला. परंतु

शहराच्या संरक्षणाची उत्तम तजवीज केली असलेली पाहून त्यास आश्चर्य वाटलें. शोधांतीं त्यास असें कळलें कीं, राजा प्रतापादित्य याची महाप्रतापी राणी जसरेश्वरी हिनें नगरांतील सैन्याचें आधिपत्य स्वीकारिलें असून तिनें आपला प्राणांत होईपर्यंत नगराचें संरक्षण करण्याचा निश्चय केला आहे. मानसिंगानें तिजकडे एक दूत पाठवून नगर स्वाधीन करून देण्याविषयीं हुकूम फर्माविला. तेव्हां राणीनें आपल्या सामर्थ्याचा विचार करून मोठ्या शहाणपणानें उलट निरोप पाठविला कीं, "माझ्या कांहीं अटी कबूल झाल्याशिवाय मी शहर हस्तगत करून देणार नाहीं. शहराच्या संरक्षणाकरितां रक्तपात करणें व्यर्थ आहे ही गोष्ट मी पूर्णपणें जाणून आहे. राजा मानसिंग जर माझें नगर लुटणार नाहीं, किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचा जुलूम चालविणार नाहीं तर मी बिनहरकत जेसोर नगर स्वाधीन करीन. आणि या अटी जर त्यास मान्य होत नसतील, तर त्यानें खुशाल युद्ध करून नगर जिंकून घ्यावें. माझ्या जिवांत जीव आहे तेथपर्यंत मी नगर हातीं लागूं द्यावयाची नाहीं."

राजा मानसिंगानें तिच्या सर्व मागण्या कबूल करून जेसोर राजधानी आपल्या ताब्यांत घेतली व प्रतापादित्य यास बरोबर घेऊन तो दिल्लीकडे जावयास निघाला. राणी जसरेश्वरी हिची आपल्या पतीच्या ठायीं अत्यंत निष्ठा असल्यामुळें तीही त्याच्या दुःखाची विभागिनी होऊन त्याजबरोबर निघाली. परंतु मार्गांत राजा प्रतापादित्य यास बंदिवासाचें दुःख सहन

न होऊन त्यामुळें त्याचा प्राणांत झाला आणि हिंदु स्त्रियांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें राणी जसरेश्वरी इनें त्याजबरोबर सहगमन केलें.

वाचकहो, असल्या स्त्रिया खरोखर धन्य होत. जसरेश्वरी-सारखी रूपवती, गुणवती, आणि शूर स्त्री प्राप्त झाली असून अभागी प्रतापादित्यानें तिच्या सहवासाचा कांहींच उपयोग करून घेतला नाहीं. उलट तिलाही आपल्या दुष्कृतीचें फळ भोगावयास लाविलें. सती जसरेश्वरीनें आपल्या दुर्वृत्त पतीचा कधींही अव्हेर केला नाहीं.

---

# रत्न दहावें.

## जोधपूरची राणी.

शहाजहान बादशहा दिल्ली येथें राज्य करीत असतां मारवाडांत जोधपूर येथें राठोड-वंशीय राजा जसवंतसिंग याचा अंमल चालू होता. या वेळीं जोधपूरचे राजे आपणांस दिल्लीपदबादशाहीचे मांडलिक म्हणवीत असत. जसवंतसिंग हा शहाजहानाच्या पदरचा एक अत्यंत शूर असा सामंत असून त्यानें अवरंगजेबास उत्तरेकडे न येऊं देतां त्याशीं लढाई करून कित्येक दिवस त्यास माळव्यांतच थोपवून ठेविलें होतें. या वेळीं शहाजहानाचा प्रतापी पुत्र औरंगजेब, आपला भाऊ मुराद याच्या फौजेस मिळून, आपल्या बापास पदच्युत करून, त्याला कैद करण्याकरितां दिल्लीवर चाल करावयास निघाला होता; तेव्हां वाटेंत उज्जनी येथें जसवंतसिंग आणि औरंगजेब यांची गांठ पडून मोठें तुमुलयुद्ध झालें. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत मोठें भयंकर रणकंदन माजून जसवंतसिंगाचे दहा हजार लोक संग्रामदेवतेस बळी पडले, आणि जसवंतसिंग समरभूमि सोडून माघारा परतला. जसजसा तो जोधपूर शहराजवळ येत चालला तसतसा त्याचे पोटांत भीतीनें जसा कांहीं दगड उभा राहिला. कारण आपला पराभव झालेला ऐकून, आपल्या राणीस फारच दुःख होऊन, ती आपली

निंदा करील व आपलें हें अपकीर्तीनें काळें झालेलें मुख ती पहाणार देखील नाहीं अशी त्याची खात्री होती. आणि खरोखरच त्याला जी भीति पडली होती त्याचा प्रत्ययही त्यास लागलींच आला. आपला पति पराजित होऊन परत जोधपुरास येत आहे अशी बातमी कळतांच राणीनें एकदम शहराचे दरवाजे बंद करण्यास सांगितलें.

ती ह्मणाली, " जर जोधपुराधिपति पराभव पावून आपलें निस्तेज झालेलें मुख शहरांतील लोकांस दाखवावयास येत असतील, तर त्यांना शहरांत न येऊं देतां बाहेरच राहूं देणें चांगलें. त्यांना माझे पति ह्मणण्याची मला लाज वाटत आहे. जोधपुरच्या अधिपति आणि मेवाडच्या राण्याचा जांवई म्हण विणाऱ्या रजपुतानें रणभूमि सोडून परत यावें, हें अत्यंत विशोभित दिसतें." असलें कठोर भाषण करूनही ती स्वस्थ बसली नाहीं. तिचे अंगांत संचार झाल्यासारखें होऊन तिनें आपल्या सेवकास एक अग्निकुंड तयार करावयास सांगितलें, आणि म्हणाली " माझी सतीची तयारी करा. बहुधा जोधपुराधिपति रणसंग्रामांत पतन पावले असतील. ते असें अपयश घेऊन कधींही माघारे परतावयाचे नाहींत. मला त्यांचे भेटीकरितां स्वर्गास गेलें पाहिजे. "

याप्रमाणें क्रोध, लज्जा आणि संताप या दुर्धर विकारांनीं तिला अगदीं भानरहित करून सोडिलें. अशा स्थितींत सुमारें आठदहा दिवस लोटले; इतक्यांत ही सर्व हकीकत ऐकून तिची माता उदेपुराहून तेथें येऊन पोंचली, आणि

तिनें आपल्या कन्येची मोठ्या मिन्नतवारीनें समजूत घातली. ती ह्मणाली, "या प्रसंगीं जरी जसवंतसिंग समर सोडून परत आले आहेत, तरी ते पुन्हां सैन्य जमवून औरंगजेबाशीं युद्ध करून झालेल्या पराभवाचा बदला घेतल्याशिवाय रहाणार नाहींत. याप्रमाणें प्रत्यक्ष आईनें येऊन जेव्हां चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, तेव्हां ती कांहींशी शुद्धीवर येऊन, तिनें शहराचे दरवाजे उघडण्याचा हुकुम दिला. आणि पहिला रागाचा झटका अगदीं नाहींसा झाल्यावर तिनें मोठ्या ममतेनें जसवंतसिंगाची भेट घेतली आणि त्याची चांगली शुश्रूषा करून त्याला झालेल्या जखमा चांगल्या बऱ्या करण्याचा प्रयत्न चालविला.

इकडे औरंगजेबानें, आपल्या बंधूंचा निःपात करून, आपल्या जन्मदात्या पित्यालाही कारागृहवास देऊन, दिल्लीच्या बादशाही तख्ताचा अपहार केल्यावर, आपली दृष्टि जसवंतसिंगाकडे वळविली. कारण, त्याला जसवंतसिंगाचेंच काय तें मोठें भय वाटत असे. एकदां जसवंतसिंगाचा कांटा काढून टाकिला म्हणजे आपण पूर्णपणें निर्भय होऊं, असें वाटून औरंगजेबानें त्याच्या नाशाचे उपाय योजण्यास सुरवात केली. प्रथमतः काबुलांत उत्पन्न झालेलें बंड मोडण्याकरितां त्यानें त्यास सेनाधिपत्य देऊन त्याची तिकडे रवानगी केली. औरंगजेबाची अशी पक्की खात्री होती कीं, एकदां जसवंतसिंग तिकडे गेला म्हणजे तो पुन्हां परत इकडे येण्याची भीतिच बाळगावयास नको. कारण काबुलांतील पुंड लोकां-

ध्या तडाक्यांतून तो घडपणीं परत येणें अशक्य होतें. बहुधा तो अफगाण लोकांकडून मारला जाईल किंवा निदान बंदिवान् तरी केला जाईल अशी औरंगजेबाची दृढ समजूत होती.

जसवंतसिंगानें या औरंगजेबाच्या आज्ञेचा तत्काळ स्वीकार केला. त्याला औरंगजेबाच्या मतलबीपणाचा यत्किंचित् देखील संशय आला नाहीं; शिवाय येवढ्या मोठ्या सैन्याचें सेनापत्य मिळणें हें त्यास मोठें सन्मानाचें वाटलें. रजपूत लोकांस मनाचा खोटेपणा कसा तो मुळींच माहित नसतो. लढाई म्हटली कीं तिकडे जाण्याविषयीं त्यांचा तिसरा पाय असावयाचा. जसवंतसिंग जेव्हां काबुलाकडे जावयास निघाला तेव्हां त्याची शूर राणीही त्याजबरोबर जावयास निघाली. या शूर दांपत्याच्या मनांतून त्यांना पूर्वींच्या लढाईंत आलेलें अपयश धुवून टाकावयाचें होतें. त्यांनीं आपला पुत्र पृथ्वीसिंग यास राज्यकारभाराचें काम सांगून आपलें कांहीं निवडक सैन्य बरोबर घेतलें, व अफगाणिस्थानचे मोहिमेकरितां नगराबाहेर ढाला दिल्या.

राणीनें आपल्या स्त्रीवेषाचा त्याग करून पुरुषवेषाचा स्वीकार केला; आणि पूर्वींची राणीपणाची मिजासी वर्तणूक सोडून देऊन नवीन शिपाईबाण्याचा अंगीकार केला. अशा थाटानें ती आपल्या पतिसमवेत राहून कित्येक दिवसपर्यंत श्रम आणि यातना सोशीत, व कडे-डोंगर डोक्यावर घेत, काबूल शहरास जाऊन पोंचली. तेथें जाऊन पहातात तों सारा देश राजद्रोही पुंड लोकांनीं व्यापून टाकिला आहे,

असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेथें गेल्यावर त्यांना विश्रांतिसुखाचें वारें देखील लागलें नाहीं. तेथील हवापाणी त्यांना मानवेना. सारा प्रदेश बर्फानें आच्छादिलेला, भोंवतीं सदा रानटी आणि दाणगट लोकांचा गराडा, अशा असह्य कष्टमय स्थितींत त्यांना दिवस काढावे लागले. या सर्व भयंकर मोहिमेभर जसवंतसिंगाची राणी आपल्या पतीबरोबर सर्व संकटें सहन करीत एखाद्या बरोबरीच्या सरदाराप्रमाणें वागत होती. फार तर काय, पण ती जसवंतसिंगाबरोबर त्याच्या छायेप्रमाणें वागत होती. तिचें शौर्य आणि धैर्य, तिचें सामर्थ्य आणि सहनशीलता, तसेंच तिचा प्रत्येक कामांतील हिय्या इत्यादि गोष्टी एखाद्या अत्यंत शूर म्हणविणाऱ्या रजपुताला देखील चकित करून टाकणाऱ्या होत्या.

इतकें सर्व करूनही राणीस यशाचा वांटा मिळाला नाहीं तो नाहींच. कारण औरंगजेबानें केवळ दुष्टाव्यानें जसवंतसिंगास तो काबूलांत असतां विषप्रयोग करविला ! तसेंच त्यानें पृथ्वीसिंग यास जोधपुराहून दिल्लीस आणवून प्रथमतः त्याचा चांगला सन्मान केलासें दाखविलें, व शेवटीं त्याचाही विषप्रयोगानें प्राणघात केला ! जसवंसिंगाच्या घराण्याचा समूळ नाश करावयाचा, याबद्दल औरंगजेबानें जणूं विडाच उचलिला होता. परंतु गांठ रजपूत लोकांशीं आहे ही गोष्ट औरंगजेबाच्या ध्यानांत आली नाहीं.

जसवंतसिंगाच्या पाठीमागें त्या आफगाणिस्थानासारख्या दूर देशांत त्याच्या राणीची स्थिति काय झाली असेल

याची कल्पना करणें कठीण आहे. आपला प्रिय पति मृत होतांच रजपूत स्त्रियांच्या अढळ व्रतास अनुसरून तिनें आपल्या पतीबरोबर सहगमन केलें असतें; परंतु, या समयीं ती गरोदर असून तिचा प्रसूतिसमय जवळ आला असल्यामुळें तिला सहगमनाचा बेत रहित करणें भाग पडलें. मग तिनें आपल्या रजपूत सैन्याचें आधिपत्य स्वत:कडे घेऊन मोठ्या कष्टानें ती हिंदुस्थानाकडे परत यावयास निघाली. इतक्यांत काबूल येथें असतां ती प्रसूत होऊन तिला एका सुंदर पुत्ररत्नाची प्राप्ति झाली. वाचकहो, हेंच सुकुमार वीराशिरोरत्न पुढें आपल्या पित्याच्या मरणाबद्दल कपटी औरंगजेबाचा सूड घेण्यास समर्थ झालें. अस्तु. प्रवासाचे कष्ट सहन करण्याजोगें सामर्थ्य अंगीं येतांच तिनें हिंदुस्थानचा मार्ग स्वीकारिला. पेशावर शहरीं येऊन पोंचेपर्यंत मार्गांत तिला एकसारखे शत्रूंशीं सामने देत यावें लागलें. तेथें आल्यावर तीस जोधपुराकडून आलेल्या शूर रजपूत सरदारांची कुमक मिळाली. हे रजपूत सरदार तिला काबुलांतून सुरक्षितपणें स्वदेशीं परत आणण्याकरितांच आलेले होते.

पेशावरापासून मात्र रजपूत लोकांस फारसा त्रास पडला नाहीं; परंतु दिल्लीजवळ येतांच पुन: त्रासाला आणि कटकटीला सुरवात झाली. जयवंतसिंगाची राणी अजितसिंग नामक कुमारासह येथपर्यंत सुरक्षित येऊन पोंचली, असें कळतांच औरंगजेबाचें पित्त पुन: खवळलें. तेव्हां राणीनें आपला मुलगा आपल्या दिमतीस पाठवावा अशाविषयीं

औरंगजबानें राणीकडे फर्मान् पाठविला. परंतु राणीनें ती गोष्ट मुळींच नाकारिली. तिनें आपल्या शूर रजपूत लोकांच्या साह्यानें आपलें आणि आपल्या पुत्राचें संरक्षण करण्याचा निश्चय केला. तिनें आपल्या लहान अर्भकास एका बुरडी टोपलींत घालून ती एका विश्वासु मुसलमानाच्या स्वाधीन केली, व तो विश्वासु मुसलमान मेवामिठाई नेण्याचा मिषानें ती टोपली घेऊन एका सुरक्षित स्थळीं जाऊन पोंचला.

इकडे दिल्ली शहरांत ज्या ठिकाणीं राणीचा मुक्काम होता तेथून ती जोधपुरास यावयास निघाली. परंतु तेथून सुखानें निघून जाणें अशक्य होतें. या वेळीं ती औरंगजेबाच्या केवळ जबडयांत येऊन पडली होती. तरी पण औरंगजेबाच्या हजारों वीरांस दाद न देतां रजपूत सरदारांनीं मोठ्या शौर्यानें लढून तिला मेवाडच्या मार्गास लाविलें. या वेळीं राणीनेंही कांहीं कमी पराक्रम केला असें नाहीं. तिनें आपल्या हातांतील तीक्ष्ण तरवारीनें शेंकडों मुसलमान वीरांचीं शिरकमलें छेदून त्यांचीं कलेवरें भर दिल्ली शहरांत रानोमाळ पसरून दिलीं. अशा रीतीनें दिल्ली शहरांतून सुरक्षितपणें बाहेर पडतांच ती ज्या ठिकाणीं तो विश्वासु मुसलमान राजपुत्र अजितसिंगास घेऊन राहिला होता त्या ठिकाणीं आली. आपला मुलगा त्याच्या जिवास यत्किंचितही धक्का न पोंचतां आपल्या दृष्टीस पडलेला पाहून राणीस अत्यानंद झाला. तेव्हां त्यास घेऊन ती मेवाड येथें आपल्या भावाकडे आली, आणि आपला पुत्र मोठा होईपर्यंत त्याचें संर-

क्षण करण्याचें अभिवचन घेऊन, त्यास तिनें आपल्या भावाच्या स्वाधीन केलें.

अजितसिंग मोठा झाल्यावर त्यानें आपल्या पराक्रमानें मुसलमानांस अगदीं त्राहि त्राहि करून सोडिलें. व आपल्या शूर पुत्राचें तें समरकौतुक पाहून राणीच्या नेत्राचें पारणें फिटलें. ही महिमावती राणी पुढें यथाकालीं मृत्युवश होऊन हा भूलोक सोडून चालती झाली.

---

# रत्न अकरावें.

## राणी अहल्याबाई.

वाचकहो, ज्या जगद्विख्यात योषिद्रत्नाचें जीवनचरित्र लिहिण्यास आह्मी उद्युक्त झालों आहों, त्याचें चरित्र इतकें उदात्त, इतकें अनुकरणीय, आणि इतकें वर्णनातीत आहे कीं, आमच्या अल्लड लेखणीच्या हातून तें चांगल्या तऱ्हेनें वठेल किंवा नाहीं, याची आम्हांस मोठी भीति वाटत आहे. साध्वी अहल्याबाई स्वतः मुळींच स्तुतिप्रिय नव्हती, ही गोष्ट तिच्या पुढील चरित्रावरून वाचकांस कळेलच. परंतु तिचें चरित्रच अशा कांहीं लोकोत्तर आणि मनोरम गोष्टींनीं भरलें आहे कीं, त्यांचें यथार्थ वर्णन न झाल्यास देशाभिमानी सहृदय वाचकांच्या कोपास आम्ही पात्र होऊं. असें जरी आहे तरी आम्ही पुढील लेखांत आमच्या बुद्ध्यनुरूप तिचें चरित्र काळजीपूर्वक लिहिण्याचा प्रयत्न करीत आहोंत. तो वाचकांस पसंत पडून त्यापासून त्यांस करमणूक आणि बोध प्राप्त होवोत असें आम्ही इच्छितों.

अहल्याबाई ही, माळवाप्रांतांत होळकराची गादी स्थापन करणारा प्रख्यात वीर मल्हारराव होळकर याचा मुलगा जो खंडेराव त्याची बायको होय. हिचा जन्म नगर जिल्ह्यांत

पाथरडी म्हणून एक टुमदार गांव आहे, तेथें शके १६५७ (इ. स. १७३५) च्या सुमारास झाला. तिच्या आईबापांची गरीबीची स्थिति असतांही मल्हाररावासारख्या सरदाराच्या मुलाशीं तिचा विवाह होण्याचा योग जुळून आला. अहल्याबाईस लहानपणींच लिहिणें वाचणें शिकविलें असावें असें वाटतें. तिच्या माहेरच्या घराण्याची विशेष माहिती इतिहासांत मुळींच उपलब्ध नाहीं. अहल्याबाई रूपानें फारशी देखणी होती असें नाहीं. तथापि तिच्या मुखचर्येंत असें कांहीं विलक्षण तेज वास्तव्य करीत होतें कीं, तिला पाहतांक्षणींच पाहणाराच्या मनांत तिजविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाल्यावांचून राहूं नये. बालपणीं देखील तिचें वर्तन फार स्तुत्य व सभ्यपणाचें असे. एके वेळीं मल्हाररावाच्या छावणीचा तळ पाथरडी येथें पडला असतां अहल्याबाई त्याचे दृष्टीस पडली. तेव्हां तिचें सद्वर्तन पाहून तो इतका मोहित झाला कीं, त्यानें तिच्या आईबापांच्या संमतीनें आपला एकुलता एक मुलगा खंडेराव याजबरोबर तिचें लग्न लावून घेतलें. लग्नसमयीं अहल्याबाईचें वय सुमारें १०।११ वर्षांचें होतें. लग्न झाल्यावर अहल्याबाईचे लोकोत्तर सद्गुण अवलोकन करून तिचे सासूसासरे तिजवर अत्यंत प्रीति करूं लागले.

अहल्याबाईचा नवरा खंडेराव हाही आपल्या बापाप्रमाणेंच शूर, चतुर आणि हुषार असा होता. मल्हारराव होळकरासारखा सासरा, सुशील सती गौतमाबाईसारखी सासू, खंडेरावासारखा पति, आणि अशा सोज्वळ कुळास शोभिवंत

करणारी अहल्येसारखी सून, मग त्या प्रपंचसौख्याचें कोठवर वर्णन करावें ! तशांत अहल्याबाईस मालीराव नांवाचा मुलगा आणि मुक्ताबाई नांवाची मुलगी अशीं एकामागून एक दोन सुंदर अपत्येंही झालीं. परंतु परमेश्वराचे मनांत तें त्यांचें गृहसौख्य तशा उत्तमावस्थेंत नांदूं द्यावयाचें नव्हतें, म्हणून कीं काय, मल्हाररावाचा एकुलता एक मुलगा आणि अहल्याबाईचा प्रियतम पति जो खंडेराव त्याजवर मृत्यूचा घाला पडला. त्या वेळीं अहल्याबाईस पुरतें एकविसावेंही वर्ष लागलें नव्हतें. नुकताच कोठें तिच्या संसारसुखाचा विकास होत चालला होता; इतक्यांत काळानें तिजवर ही आकाशाची कुऱ्हाड आणून घातली ! त्या वेळच्या अहल्याबाईच्या दु खद स्थितीचें काय वर्णन करावें ? अहल्याबाई आणि खंडेराव यांचें एकमेकांवर अप्रतिम प्रेम असल्यामुळें खंडेरावाचा वियोग तिला अति दुःसह होऊन तिनें त्याजबरोबर सती जाण्याचा निश्चय केला. खंडेरावासारखा हातीं-तोंडीं आलेला पुत्र गमावल्यामुळें मल्हारराव अगोदरच कष्टी झाला होता, आणि तशांत अहल्येसारखी गुणवती सूनही सती जाऊन आपणास अंतरूं पाहते, असें जेव्हां त्यानें ऐकिलें, तेव्हां त्यानें मोठ्या कळवळ्यानें तीस म्हटलें, "मुली, अगोदरच पुत्रशोकानें आमचे प्राण नाहींसे होऊं पहात आहेत ! तशांत तूं आणखी सती जाऊन आम्हांला पुरता उन्हाळा करणार काय ! " हें त्या कनवाळू सासऱ्याचें हृदयस्फोट करणारें भाषण श्रवण करून अहल्येच्या

आंतड्यास पीळ पडला. वस्तुतः नवऱ्याच्या मागें वैधव्यानें मलिन झालेलें मुख घेऊन काळ कंठणें अहल्याबाईस जरी अत्यंत दुःसह झालें होतें, तरी सासूसासऱ्यांच्या स्थितीकडे आणि आपल्या लहान लहान अर्भकांकडे पाहून तिनें आपला सती जाण्याचा बेत रहित केला, आणि ईश्वरसंकेतानें प्राप्त झालेल्या स्थितींत सदाचरणानें आणि धर्मानें वागून प्राणिमात्रावर दया करण्याच्या कामीं आपलें आयुष्य खर्च करण्याचा तिनें निश्चय केला. शाबास अहल्याबाई ! वाचकहो, ही एकच गोष्ट जरी घेतली तरी अहल्याबाईच्या वर्णनीय चरित्राचा सर्व भाग उत्तम प्रकारें प्रकाशमान होणार आहे. असो.

मल्हारराव आपल्या सुनेच्या अंगच्या अप्रतिम गुणांस ओळखून होता. खंडेरावाच्या मृत्यूनंतर तो जेव्हां जेव्हां मोहिमेवर जाई, तेव्हां तेव्हां पाठीमागें राज्याचा कारभार अहल्याबाईवर सोंपवीत असे. अहल्याबाई लिहिणें, वाचणें वगैरे कामांत चांगलीच प्रवीण झालेली होती; भारतभागवतादि पुराणग्रंथांच्या वाचनानें राजनीतीसारख्या कठिण विषयाचेंही तीस पूर्ण ज्ञान झालें होतें; व तेणेंकरून ती न्यायाचीं कामें उत्तम प्रकारें पार पाडी. ती जशी धर्मपरायण होती तशी राजकारणांतही अत्यंत निष्णात होती. जेव्हां मल्हारराव कालांतरानें मृत्युवश झाला, तेव्हां आपल्या मालीराव नांवाच्या पुत्रास राज्यावर बसवून ती स्वतंत्रपणें राज्याचा कारभार पाहूं लागली. मालीराव मूर्ख, वेंडगळ आणि दुष्ट असा

निघाला. अहल्याबाई ज्यांना प्रत्यक्ष देव समजून त्यांची पूजा करी, त्या ब्राह्मणांचा मालीराव अनेक प्रकारें छळ करूं लागला. मालीरावासारखें एकुलतें एक लेकरूं असें दुराचारी निघाल्यामुळें अहल्याबाईस फार कष्ट होत! परंतु करते काय? यासंबंधांत तिचा अगदीं निरुपाय झाल्यासारखा झाला होता. तथापि, थोडक्याच काळांत आपल्या दुराचरणाचें फल भोगून मालीराव मरण पावला. मालीराव दुराचारी होता म्हणून, अहल्याबाईनें तो आजारी असतां त्याची यत्किंचित् देखील हयगय केली नाहीं. उलट एकसारखी ती त्याच्या बिछान्याजवळ बसून सर्व प्रकारें त्याची शुश्रूषा करीत असे. परंतु होणारापुढें कोणाचाच कांहीं इलाज चालत नाहीं. मालीराव मरण पावल्यानंतर अहल्याबाई अगदीं स्वतंत्रपणें राज्यकारभार पाहून प्रजेचें यथान्याय पालन करूं लागली.

मालीरावाच्या पश्चात् गादीचा अधिकारी कोण करावा ह्याबद्दल मोठाच वाद होता. अहल्याबाईचा कारभारी गंगोबातात्या याचे मनांत असें होतें कीं, होळकराचे घराण्यांतील एखादा मुलगा अहल्याबाईच्या मांडीवर दत्तक देऊन सर्व राज्याचा कारभार प्रमुखत्वानें आपणच एकट्यानें पहावा. परंतु, अशा व्यवस्थेपासून अहल्याबाईस पराधीन व्हावें लागणार असल्यामुळें ती गोष्ट तिला मान्य झाली नाहीं. गंगोबातात्यानें आपला मतलब सिद्धीस नेण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले, पण अहल्याबाईच्या दृढनिश्चयापुढें व तेजस्वितेपुढें त्याचें कांहींएक न चालून तो दत्तकाचा बेत तसाच राहिला.

ह्या प्रसंगीं अहल्याबाईच्या वर्णनीय चरित्रांतील एक अत्यंत महत्वाची गोष्ट घडून आली. प्रसिद्ध राघोबादादा पेशवे यानें वरील दत्तकाच्या प्रकरणीं गंगोबातात्याच्या भरीस पडून अहल्याबाईवर चाल करून येण्याचा बेत केला, व त्याप्रमाणें तिजकडे निरोपही पाठविला. राघोबासारखा वीराग्रणी मोहरा आपणावर चालून येत आहे, असें कळतांच एखाद्या चांगल्या समरधीर पुरुषाचीही गाळण उडून जावयाची ! मग तेथें अबलाजनांचा पाड काय ? परंतु, अहल्याबाई जशी व्यवहारचतुर आणि राजकार्यकुशल होती, तशीच ती पुरी धैर्याची बायको होती. ती अशा दुर्धर प्रसंगींही अगदीं डगमगली नाहीं. तिनें आपल्या अंगच्या लोकोत्तर धैर्यानें आणि समयचतुरतेनें तो प्रसंग कसा सहज वांचवून नेला ! तिनें राघोबा पेशव्यास उलट जबाब पाठविला कीं, "आपण मजवर चाल करून येतां, तर खुशाल या; मी आपणास मुळींच प्रतिबंध करीत नाहीं. परंतु, आपण येवढी गोष्ट पूर्णपणें ध्यानांत ठेवा कीं, मी वीरस्नुषा आहें; मी म्हणजे युद्धाचे कामीं माघार घेईन असें समजूं नका. युद्धांत जय किंवा अपजय येणें परमेश्वराधीन आहे. ईश्वरसंकेतानें आपणांबरोबरच्या युद्धांत माझा पराजय झाला तर त्याबद्दल मला लोकापवादाचें मुळींच भय नाहीं; कारण, मी बोलून चालून अबला ! परंतु, उलटपक्षीं माझ्या सुदैवानें मी विजयी झालें, तर आपली काय अवस्था होईल, व लोक आपणास काय म्हणतील, याचा विचार करा." अशा प्रकारचें स

सयुक्तिक आणि सणसणीत उत्तर ऐकून राघोबादादा मनां-तल्या मनांत खजील झाला, व त्यानें तो लढाईचा बेत रहित केला. प्रसिद्ध लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांचे लिहिण्यावरून तर असें समजतें कीं, वीरस्नुषा अहल्याबाईनें राघोबादादाशीं टक्कर देण्यास आपल्यासारख्याच कित्येक शूर स्त्रियांची एक पलटणदेखील सज्ज करून ठेविली होती! अस्तु.

याप्रमाणें हें दत्तकाचें प्रकरण अहल्याबाईच्या मताप्रमाणें शेवटास जाऊन ती सर्व राज्याची स्वामिनी झाली व स्वतंत्र-पणें राज्यकारभार पाहूं लागली. तिनें मल्हाररावाचा पुतण्या तुकोजी होळकर यास गादीचा वारस करून त्याजवर बाहे-रची कामगिरी सोपविली. तुकोजीरावानेंही तें काम अहल्या-बाईच्या मर्जीबरहुकूम उत्तम प्रकारें चालविलें.

अहल्याबाईच्या राज्यकारभाराचें, तिच्या नीतिमत्तेचें, व्यवहारचातुर्याचें आणि ईश्वरपरायणतेचें जेवढें वर्णन करावें, तेवढें थोडेंच. अहल्याबाईनें जरी सर्व राज्यकारभाराचीं सूत्रें आपले हातीं घेतलीं होतीं, तरी तें काम ती केवळ आपलें प्रजापालनाचें कर्तव्य ध्यानांत आणून करीत असे. वस्तुतः ऐहिक वैभवाची अथवा राजसत्तेची तिजला बिलकुल आवड नसे. केवळ परमेश्वरचिंतन आणि व्रतोपवासादिकांनीं आपल्या मानवजन्माचें सार्थक्य करावें असा तिचा हेतु होता. या तिच्या उद्देशास अनुसरून ती नेहमीं नर्मदातीरीं महेश्वर येथें वास्तव्य करीत असे. महेश्वरासारखें पुराणप्रसिद्ध आणि अत्यंत रमणीय स्थल, नर्मदेसारख्या गंभीर सरितेचें सान्निध्य

आणि पुण्यचरिता अहल्येचें सत्वगुणपूर्ण अंतःकरण इत्यादि गोष्टी एकत्र जमल्यावर त्यांची फलश्रुति अत्युत्कृष्ट झाली असेल ह्यांत काय नवल? अहल्याबाईनें नर्मदातीरीं उत्तम प्रकारचे घांट आणि देवालयें उभारून आपल्या आवडत्या महेश्वरपुरीस अत्यंत दर्शनीय स्वरूप आणिलें आहे. महेश्वर येथील अहल्याबाईच्या घांटासारखा सुंदर घांट अवघ्या भरतखंडांत क्वचितच दृष्टीस पडेल.

अहल्याबाई जरी नेहमीं महेश्वर येथें राही, तरी होळकराच्या मुख्य राजधानीचें शहर जें इंदूर त्याजवरही तिची प्रीति कमी होती असें नाहीं. इंदूर हें मूळचें लहानसें खेडें असतां अहल्याबाईनें त्याचें मोठें शहर बनविलें.

अहल्याबाईचे वेळीं गोविंदपंत गानू ह्या नांवाचा मोठा इभ्रतदार माणूस दिवाणगिरीचें काम पहात असे. तोही अहल्याबाईच्या इच्छेनुरूप आपलें काम न्यायानें चालवून इमानेंइतबारें वागत असे त्या वेळच्या बहुतेक राजेरजवाड्यांजवळ अहल्याबाई आपले वकील ठेवी, तेणेकरून सर्व ठिकाणीं तिचें वजन राहून राज्यकारभारही सुरळीत चाले. अहल्याबाईची शासनपद्धति आणि प्रजापालनतत्परता इतकी उत्कृष्ट होती कीं, तिचें राज्य चालू असतां चोरांनीं देखील चोरी करणें सोडून दिलें होतें, असें इतिहासांत लिहिलें आहे.

अहल्याबाईची आज जी इतकी जगद्विख्यात कीर्ति श्रवणीं पडते, तिला मुख्य कारण तिची दानशूरता होय. तिच्या दानशूरतेचें समग्र वर्णन केल्यास एक स्वतंत्र ग्रंथच

होईल; तथापि या स्थळीं त्याचें थोडेंसें तरी दिग्दर्शन करणें अवश्यक आहे.

अहल्याबाई नित्य गरीबगुरीब लोकांस जेवूं घालून संतुष्ट करीत असे. ग्रीष्मऋतूंत मार्गस्थांच्या सोईकरितां ती ठिकठिकाणीं पाणिपोया घाली. शरदतूंत गरीब लोकांस उबदार पांघरुणें वाटी. फार तर काय, पण तिच्या राज्यांत पशुपक्षी देखील उपाशीं रहात नसत. काशीपासून रामेश्वरापर्यंत अखिल भरतखंडांत जेवढीं म्हणून पुण्यक्षेत्रें आहेत तेवढया ठिकाणीं अहल्याबाईच्या धार्मिक औदार्याचें कांहींना कांहीं चिन्ह आहेच; इतकेंच नव्हे, तर काशी-गयेसारख्या अत्यंत पवित्र मानलेल्या क्षेत्रांचें अस्तित्व कायम राहण्यास या देवी अहल्येची धार्मिकताच पुष्कळ अंशांनीं कारणीभूत आहे, असें म्हटल्यास मोठासा बाध येईल असें नाहीं.

वर वर्णन केलेल्या गुणांनीं युक्त असतां अहल्याबाईस गर्वाचें वारें देखील शिवलें नाहीं. त्यांतून आत्मस्तुतीचा तर तिला अत्यंत तिटकारा असे. एके वेळीं एका ब्राह्मणानें तिच्या स्तुतीनें भरलेला एक ग्रंथ लिहून तिजकडे आणिला असतां त्याबद्दल त्या ब्राह्मणास कांहींएक न देतां तिनें तो ग्रंथ नर्मदेंत बुडवून टाकिला. आणि ती त्या ब्राह्मणास म्हणाली "तुम्ही माझ्यासारख्या दीन पामराची व्यर्थ स्तुति केलीत; ह्यापेक्षां तुम्हीं जर परमेश्वराची स्तुति करण्यांत आपल्या वेळेचा सद्व्यय केला असता तर फार बरें झालें असतें." वाचकहो, अहल्याबाईसारख्या खरोखर परोपकारी स्त्रीच्या

अंतःकरणाची ही नम्रता पाहून कोणास बरें धन्य वाटणार नाहीं ! अहल्याबाई आपला सारा वेळ भजनपूजनांत घालवी. तिचा पोषाख अगदीं साधा असे. एवढया मोठ्या राज्याची मालकीण असतां ती अलंकारांना शिवत देखील नसे. तिचे कंठांत नेहमीं एक शिवलिंग-रत्नहार मात्र असे. हा शिवलिंगरत्नहार अद्यापपर्यंत महेश्वर येथील देवस्थानांत जतन करून ठेविला आहे. आमच्या सुदैवानें जेव्हां आम्हांस त्या हाराचें शुभदर्शन झालें, तेव्हां आमच्या नेत्राचें केवळ पारणेंच फिटलें असें आम्हांस वाटलें.

अहल्याबाई फारच कोमळ मनाची बायको होती; आणि तिला अन्याय कसा तो मुळींच खपत नसे. एके वेळीं इंदूर येथील कोणी देवीदास नांवाचा सावकार मरण पावून पुत्रसंतान नसल्यामुळें त्याच्या संपत्तीला कोणी वारस नाहींसा झाला. ते वेळीं अहल्याबाईचा मानलेला पुत्र आणि सेनापति जो तुकोजी होळकर त्यानें देवीदासाची सर्व संपत्ति त्याच्या विधवेपासून बळकावण्याचा विचार केला. तें पाहून तिनें महेश्वरीं अहल्याबाईकडे फिर्याद केली. अहल्याबाईनें तुकोजीरावास तत्क्षणीं सांगून पाठविलें कीं, आपणास मृतमनुष्याच्या संपत्तीचा अभिलाष करण्याचें कारण नाहीं. देवीदासाच्या संपत्तीवर त्याच्या स्त्रीचा पूर्ण अधिकार आहे. हा अहल्याबाईचा निरोप ऐकून तुकोजीस आपला बेत रहित करणें भाग पडलें.

अहल्याबाईच्या आयुष्यांत तिजवर जे अनेक दुःखाचे

डोंगर कोसळले त्यांचें मागें दिग्दर्शन केलेंच आहे. त्यांतच आणखी भर घालण्याकरितां अगदीं म्हातारपणीं अत्यंत शोकदायक असा एक प्रसंग तिजवर ओढवला. अहल्याबाईला मुक्ताबाई नांवाची एक कन्या होती. ती आपल्या घरीं सुखानें संसार करीत असतां तिचा पति परलोकवासी होऊन तिनें त्याजबरोबर सहगमन केलें. अहल्याबाईनें तिचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला तिला परोपरीनें सांगून पाहिलें, परंतु व्यर्थ! मुक्ताबाई म्हणाली, "आई, तुम्ही आतां वृद्ध झालां आहांत; तुम्हांलाही या जगांत फार थोडें रहावयाचें आहे. माझे प्रिय पति तर परलोकवासी झालेच; आणि थोडक्याच दिवसांत तूंही जेव्हां हा मृत्युलोक सोडून जाशील तेव्हां हें दुर्वह आयुष्याचें ओझें मला कसें सहन करितां येईल! आजच्यासारखा भूलोक सोडून जाण्याचा सौभाग्यदायक प्रसंग मला पुढें कसा प्राप्त होईल!" आपल्या कन्येचा असा दृढ निश्चय पाहून अहल्याबाईनें मोठ्या कष्टानें तिला सती जाण्याची परवानगी दिली. हा दुःखद प्रसंग घडल्यापासून अहल्याबाईचें अंतःकरण ह्या जगतांतील गोष्टींविषयीं अगदींच उदासीन झालें. ती पूर्वीपेक्षांही अधिक व्रतोपवासादि कृत्यें करूं लागली. वृद्धावस्थेमुळें आणि राज्यकारभाराच्या दगदगीमुळें तिची प्रकृति अगोदरच अत्यंत क्षीण झाली होती; आणि मुक्ताबाईच्या वियोगानें तर फारच डबघाईस आली. त्यांतच आणखी उपासतापासांचे कष्ट! असें झाल्यामुळें अखेरीस शके १७१७ म्हणजे इ० स० १७९५

ह्या वर्षी तिचा देहांत होऊन, तें अपूर्व स्त्रीरत्न भारतभूमीला अंतरलें.

अहल्याबाईसंबंधानें मध्यहिंदुस्थानच्या इतिहासाचे कर्ते मालकमसाहेब लिहितात:—"तिचा बांधा मध्यम व फार सडपातळ होता. ती जरी फार सुंदर नव्हती, तरी तिचें सावळें मुख स्वच्छ होतें. मरणाच्या शेवटच्या घडीपर्यंत तिचा चेहरा गोड होता; व संसारांत हरएक कामीं जो चांगुलपणा तिनें दाखविला, तो जसा चेहऱ्यावर लिहिलाच आहे असें दिसे. तिची वृत्ति सर्वकाळ आनंदित असून तिला क्वचित् प्रसंगीं राग येई. परंतु अधमपणा व गुन्हा पाहून जेव्हां तीस कोप चढे, तेव्हां अत्यंत मानिलेलीं माणसेंही तिजपुढें जाण्यास कांपत. अहल्याबाईविषयीं ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांच्या आधारासंबंधानें संशय घेण्यास जागा नाहीं. खरोखरीच ती एक अद्वितीय मूर्ति होती. स्त्री असून तिच्यामध्यें अभिमान नव्हता; धर्मवेड असून तिच्यामध्यें छळ नव्हता; व अन्यधर्मी लोकांचे ठायीं देखील तिची नेहमीं समदृष्टि असून तिच्या मनावर प्रजेच्या कल्याणाखेरीज दुसरा ठसाच उठला नाहीं. माळव्यांतील लोकांनीं तिच्या नांवास साधुसंतांची योग्यता दिली आहे. व ते तिला ईश्वरी अवतार समजतात. तिच्या गुणांविषयीं अत्यंत सावधगिरीनें जरी विचार केला, तरी असें खचित दिसून येईल कीं, पृथ्वीवर जे अत्यंत पवित्र व अनुकरण करण्यास योग्य असे अधिकारी उत्पन्न होतात त्यांपैकीं आपल्या लहानशा मंडळांत ती एक होती.

ऐहिक कृत्यें करितांना, शेवटीं ईश्वरास जाब द्यावा लागेल अशी दृढ बुद्धि ठेविल्यापासून कसे अनुभवसिद्ध लाभ होतात या गोष्टीचें अहल्याबाई हें एक ध्यानांत ठेवण्याजोगें उदाहरण आहे.''

---

# रत्न बारावें.

## देवी चौधराणी.

भारतखंडांतील ब्रिटिश राजसत्तेचा पहिला गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स् याची कारकीर्द चालू असतां बंगाल प्रांताची स्थिति फारच विलक्षण झालेली होती. बंगालचा नबाब वार्षिक तैनात घेऊन स्वस्थ बसला होता. फौज आणि वसूल या गोष्टी इंग्लिशांनीं ताब्यांत घेतल्या होत्या; आणि पूर्वीची जहागिरी पद्धत पूर्णपणें नाहींशी करून टाकिली होती. प्रांतांतील जमीदार लोकांना इंग्लिश लोक केवळ आपले वसूल गोळा करणारे नोकर समजत. इंग्लिशांनीं सुरू केलेल्या चमत्कारिक राज्यपद्धतीच्या योगानें पुष्कळ जमीदार लोक अगदीं गडबडून गेले होते. पुष्कळांनीं इंग्लिशांची ताबेदारी पतकरण्याचें नाकारिलें आणि पुष्कळांनीं तर उघड उघड बंडावा मांडिला. परंतु, इंग्लिशांच्या तोफखान्यापुढें त्यांचा टिकाव लागणें कठिण होतें. जिथें तिथें त्यांचा पराभव होऊन ते हाकलले जात. इंग्लिशांनीं कित्येकांच्या जहागिरी हिसकाविल्या, कित्येकांस फांशीं दिलें, आणि कित्येक तर बिचारे तुरुंगांतच कुजून मेले. ज्यांनीं कलकत्ता येथील कामगार लोकांस पैसे चारिले ते मात्र अपहार, यातना, कारागृहवास आणि मृत्यु ह्यांच्या तडाक्यांतून सुटले.

अशा रीतीनें सर्व देश जणूं काय प्रचंड वादळांतच सांपडल्यासारखा झाला होता. जिकडे तिकडे बेबंदशाही माजली होती. अधिकारापासून भ्रष्ट झालेले जमीदार लोक दरवडेखोर आणि वाटमारे बनले होते. त्यांनीं देश उद्वस्त केला. शहरें आणि खेडीं लुटून फस्त केलीं; आणि आपल्या निर्बल शेजाऱ्यांस वाटेल तसा त्रास दिला. त्या वेळीं दुर्बलांना कोणीच वाली राहिला नव्हता. नबाबशाही तर नष्टच झाली होती आणि इंग्लिश लोक प्रजेविषयीं बेफिकीर होते. त्यांचें मुख्य धोरण थोडक्या वेळांत निघेल तितका पैसा काढून गबर होऊन परत स्वदेशीं जाण्याकडे होतें. सदा सुखी आणि शांत असा तो वंगदेश या वेळीं मोठ्या दुर्धर पेचांत सांपडला होता.

वीरभूमीपासून गंगातीरापर्यंतचा सारा पश्चिम बंगाला एका जबरदस्त लुटारू लोकांचे टोळीच्या तावडींत सांपडला होता. ते लुटारू लोक इंग्लिशांना धाब्यावर बसवून तो सारा प्रदेश बळकावून बसले होते, आणि त्यांनीं दिवसाढवळ्या शहरें लुटण्याचा सपाटा लाविला होता; व विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या लुटारूंचा नायक कोणी एक स्त्री होती! या नायिकेचें खरें नांव कोणासच माहीत नव्हतें; कोणी तिला राणी मा म्हणत, कोणी गौरी मा म्हणत, आणि कोणी देवी चौधराणी म्हणत. तिच्या निवडक टोळींतील लोकांनीं देखील तिला क्वचितच पाहिली असेल. ती कोण आहे व कोठें राहते हेंही कोणासच माहीत नव्हतें. ती सुवासिनी आहे किंवा विधवा आहे ह्याचाही कोणास पत्ता नव्हता; आणि

ती या लुटारू लोकांत कशी सामील झाली हें कळणें सोपें नव्हतें. परंतु, तिचें नांव नुसत्या पश्चिमबंगाल प्रांतांतच नव्हे तर सगळ्या बंगाल प्रांतभर केवळ भयप्रद झालें होतें. बायका आपल्या मुलांना धाक घालतेवेळीं तिच्या नांवाचा बागुलबुवा करीत आणि जमीदार लोक तिचें नांव ऐकतांच भयानें थरथर कांपत!

आम्हीं मागें म्हटलें आहेच कीं, नबाबास तें बंड मोडण्याचा अधिकार राहिला नव्हता, आणि इंग्लिशांना तर द्रव्यसंपादनावांचून दुसऱ्या गोष्टींचा विचार करण्यास फुरसत नव्हती. अशी स्थिति असल्यावर देवी चौधराणी आणि तिचे लोक यांना हवा तसा धुडगूस घालण्यास फावलें यांत काय नवल? लवकरच तिनें आपला पूर्वीचा रोख बदलल्याचें दिसून आलें. ती आतां आपलें लुटारूपणाचें नातें टाकून देऊन, आपणास बंगाल इलाख्याची मालकीण ( राणी ) म्हणवूं लागली. तिनें आपल्या भोंवतीं नुसते लुटारू लोकच जमविले असें नाहीं, तर तिनें एक मोठें बलवान सैन्य उभें केलें; आणि पुष्कळ जहागिरदार लोकही तिला येऊन मिळाले. तिनें आपला हेतु फार वेळ गुप्त ठेविला नाहीं, तर इंग्लिश आणि मुसलमान ह्या दोघांनाही बंगाल्यांतून हांकून लावून तो प्रांत स्वतंत्र करण्याचा हेतु तिनें उघडपणें व्यक्त केला.

जरी ही सर्व हकीकत बंगाल प्रांतांतील सर्व लोकांस माहीत झाली होती, तरी तिच्या लोकांखेरीज ती कोणाच्याही दृष्टीस पडली नव्हती. अथवा तिचें मुख्य राहण्याचें

ठिकाण कोणतें तें माहीत नव्हतें. परंतु, आतां ती खरोखरच बंगालची राणी झाली असून लोक तिला खंडणी देऊं लागले होते हें स्पष्ट होतें.

जेव्हां प्रथमतः ही बातमी कलकत्त्यास येऊन पोहोंचली तेव्हां ती ऐकून इंग्लिश अधिकाऱ्यांस हंसू आलें. कारण, ज्यांची नायिका केवळ एक बंगाली स्त्री होती, त्या चोरांची त्यांनां काय भीति होती ! जेव्हां बंडवाल्यांच्या जुलमाच्या आणि लुटीच्या गोष्टी वॉरन हेस्टिंग्सच्या कानावर घातल्या गेल्या, तेव्हां त्यानें, "या लुटारू स्त्रीच्या मागें लागण्यापेक्षां अधिक महत्त्वाचीं कामें आम्हांस पहावयाचीं आहेत" असें उत्तर दिलें.

इकडे देवी चौधराणी अधिकाधिक प्रबल होत जाऊन तिनें मोठ्या युद्धाची तयारी केली. एवढा वेळपर्यंत तिचे लोक कांहीं मर्यादित प्रदेशांतच लूटमार करीत होते; परंतु आतां त्यांस तिनें, इंग्लिश लोकांचे खजिने लूटून त्यांना त्यांच्या वसतिस्थानांतून हांकून लावण्याचा हुकूम फर्माविला. एकामागून एक प्रांतिक खजिने त्यांच्या हातीं पडूं लागले. एकामागून एक इंग्लिश अधिकारी तें बंडाचें वर्तमान सांगण्याकरितां कलकत्त्यास येऊं लागले. एके दिवशीं ऐन मध्यरात्रीं बंडखोर लोकांनीं थेट कलकत्ता शहरांत शिरून एका एतद्देशीय सावकाराचें घर लुटिलें. इंग्लिश शिपाई त्याच्या बचावाकरितां मोठ्या तयारीनें बाहेर पडताहेत तोंच देवी चौधराणी आणि तिचे लोक दिसेनासे झाले.

सरते शेवटीं गव्हर्नर-जनरलाची खात्री झाली कीं, चेत-सिंगाचा खजिना लुटणें किंवा नंदकुमारास फांशीं देणें या-पेक्षां देवी चौधराणीचें बंड मोडणें कमी महत्त्वाचें नाहीं. सर्व देशभर बंडाचा प्रसार झालेला पाहून इंग्लिश लोक भिऊन गेले. त्यांना वाटलें कीं, फार दिवसांपासून वागवीत आण-लेली पारतंत्र्याची बिडी आतां हिंदू लोक खास झुगारून देतात ! इंग्लिश लोकांचा असा समज होता कीं, देवी चौध-राणी कोणी एक काल्पनिक स्त्री असून बंडखोर लोकांनीं आपले लोकांच्या अंगीं उत्साह भरविण्याकरितां तिचें नांव पुढें केलें असावें. कसेंही असलें तरी बंड मोडण्याचा उपाय करणें जरूर होतें, ह्मणून त्यांनीं बंडखोर लोकांवर हल्ला करून त्यांचा उच्छेद करण्याकरितां सैन्य घेऊन येण्याविषयीं गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स् ह्यास आग्रहाचें बोलावणें केलें.

लवकरच बंडखोर लोकांवर निकराची स्वारी करण्यांत आली. त्या वेळच्या प्रत्येक गोष्टीचें वर्णन करण्याचें कारण नाहीं. पावलोंपावलीं बंडखोर लोकांचा पराभव होत होता, एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे. त्यांची एकसारखी पिछेहाट होतां होतां शेवटीं त्यांना शहरें आणि गांवें सोडून देऊन जंगलें जवळ करावीं लागलीं. इंग्लिश सैन्य त्यांचा पाठपुरावा करीतच होतें. सरते शेवटीं बंडखोर लोकांनीं मोठ्या निक-रानें इंग्लिश सैन्याशीं तोंड दिलें. त्या वेळीं ते केवळ राक्ष-सांप्रमाणें लढत होते. इंग्लिशांना एक एक पाऊल जमीन संगिनीच्या टोंकावर जिंकावी लागली. बंडवाले लोक शू-

प्रमाणें मारतां मारतां मेले. इंग्लिशांचेंही अतोनात नुकसान झालें. अखेरीस उरलेल्या बंडखोरांस इंग्लिशांनीं त्यांच्याच एका किल्ल्यांत नेऊन कोंबिलें.

ज्या किल्ल्याचा बंडवाल्यांस आश्रय मिळाला होता, त्या किल्ल्याकडे इंग्लिश लोक जाऊं लागले तेव्हां त्यांजवर किल्ल्याच्या तटावरून बाणांचा आणि बंदुकींच्या गोळ्यांचा एकसारखा वर्षाव होऊं लागला. इतक्यांत जंगलाच्या बाजूनें एक बंडखोरांची टोळी निघून तिनें इंग्लिश सेनेच्या एका बाजूवर हल्ला केला. सुमारें तीन तासपर्यंत एकसारखी निकराची लढाई चालली होती. किल्ल्याच्या दरवाज्याजवळ असलेली एक तोफ कृतांतदूतीप्रमाणें इंग्लिश सैन्यांत मृत्यूचा फैलाव करीत होती. इंग्रजसेनापतीनें ती तोफ बंद करण्याचा निश्चय केला, आणि स्वयंसेवकांस बोलावून त्यांच्यासहवर्तमान खिळा ठोकून तोफेचा काना बुजविण्याकरितां तो धांवला. त्या वेळचें युद्ध अत्यंत निर्वाणीचें झालें. कारण, प्रत्येक बंडवाला तोफेच्या संरक्षणार्थ मरेपावेतों झटला. शेवटीं अखेरचा वीर मोठ्या कौशल्यानें तोफ चालवितांना दृष्टीस पडला. तें पाहून इंग्लिश सेनेंतील एक रजपूत शिपाई तरवार पडताळून त्याला मारण्याकरितां त्याजवर धांवला. बंडवाल्या वीरानेंही मोठ्या शिताफीनें प्रतिपक्ष्याचा वार चुकविला. परंतु, पुढें तो लवकरच थकून गेला असतां एका इंग्लिश शिपायानें संगीन भोंसकून त्याचा प्राण घेतला.

वाचकहो, ज्या बंडखोर वीराचें शेवटीं देहावसान झालें,

तो कोणी वीर पुरुष नसून ती जातीची अबला म्हणविणारी स्त्री होती ! कोणी म्हणतात, ती स्त्री प्रत्यक्ष देवी चौधराणीच होती. परंतु, पुष्कळांचें असें ह्मणणें आहे कीं, देवी चौधराणी शत्रुहस्तानें मरण पावली नाहीं; तर ती अंतरिक्षांत अंतर्धान पावली. तें कांहींही असो; आद्यपर्यंत सगळ्या बंगाल प्रांतांत ती पूज्य मानिली जात आहे.

---

# रत्न तेरावें

## कृष्णा–कुमारी.

यां पुढें ज्या वीरबालेचें पवित्र चरित्र लिहिण्यास आम्ही प्रारंभ करीत आहोंत, तिचें जन्म मेवाडदेशाधिपति उदेपुरवासी महाराणा भीमसिंग याच्या विमल वंशांत झालें होतें. इ० स० १७९२ ह्या वर्षी हें अमोल स्त्रीरत्न या भरतखंडांत उत्पन्न झालें. हिचें नांव कृष्णाकुमारी असें होतें. ती आपल्या मातेची अत्यंत आवडती असल्यामुळें तिचें संगोपन मोठ्या सावधगिरीनें होत असे. दिवसेंदिवस कृष्णाकुमारी द्वितीयेच्या चंद्रकलेप्रमाणें वाढत जाऊन दोन तीन वर्षें मोजतां मोजतां तिला किशोरवयस्था प्राप्त झाली. कृष्णा मोठी होत चाललेली पाहून राणा भीमसिंह ह्याच्या चित्ताला तिच्या विवाहचिंतेनें घेरिलें. त्या वेळीं कृष्णाकुमारीच्या रूपलावण्याची कीर्ति सर्व भरतखंडभर पसरत चालली होती. तिचें मंद गमन आणि मृदु भाषण असें मनोहर होतें कीं, सर्व लोक तिला "राजस्थानसरोवरास शोभविणारें कमल" म्हणत असत. प्रसिद्ध इतिहासकार मालकम साहेब यांनीं कृष्णाकुमारीच्या एका भावास प्रत्यक्ष पाहिलें असून त्याच्या स्वरूपावरून त्यांनीं कृष्णेच्या स्वरूपाविषयीं अटकळ केली आहे. कृष्णेचा हा बंधु राजकुमार राजसिंह या नांवाचा

होता. त्याचा रंग सांवळा असून त्याच्या मुखावर स्पृहणीय कोमलता दृष्टीस पडे. तसेंच त्याला पाहतांक्षणीं त्याची बुद्धि अत्यंत तीव्र असावी असें वाटे. या त्याच्या वर्णनावरून त्याची बहीण कृष्णा अत्यंत लावण्यवती असेल यांत संशय नाहीं.

असलें हें सुंदर कन्यारत्न कोणत्या योग्य वराला अर्पण करावें, या विचारातच महाराणा नेहमीं निमग्न राहूं लागला. त्याला विशेष चिंता प्राप्त होण्याला आणखी एक कारण होतें; तें हें कीं, राजपुतान्यांतील सर्व क्षत्रियांत उदेपूरचा महाराणा वंशमर्यादेनें श्रेष्ठ मानला जात होता; आणि आपल्यापेक्षां नीच कुलांत कन्यादान करणें ही गोष्ट त्या वेळीं फारच अयोग्य मानली जात होती. बरोबरीच्या मानाचा वर पहावा तर तो गुणवान् मिळणें कठिण, आणि दुसरा एखादा कोणी गुणवान् आणि सुंदर असा जांवाई पहावा तर कुलाचाराची जबरदस्त नड; अशी त्याला दोहोंकडून आडविहीर झाली होती. शेवटीं पुष्कळ विचार केल्यानंतर मारवाडचा राणा भीमसिंह याजबरोबर कन्येचा विवाह करावा असें त्यानें ठरविलें. परंतु, थोडे दिवसांचे आंतच अभागी भीमसिंह परलोकवासी झाला.

नंतर जयपूरचा राणा जयसिंह यानें कृष्णाकुमारीच्या पित्याकडे मागणी घालण्याकरितां आपला दूत पठविला. तेव्हां कृष्णेच्या पित्यानेंही त्याजबरोबर तिचा विवाह करून देण्याचें ठरविलें. परंतु, भीमसिंहाचे मागून मारवाडच्या गादीवर बसलेला राणा मानसिंह यानें कृष्णाकुमारीच्या पित्याला

सांगून पाठविलें कीं, "कृष्णेचा विवाह आमच्याबरोबर झाला पाहिजे; आपण पूर्वी ती भीमसिंहाला देण्याबद्दल वाचादत्त झालां आहां, आणि आतां तो जरी गत झाला आहे, तरी गादीचा मालक मी आहेंच. ह्यास्तव, ती मलाच दिली पाहिजे. हा गादीचा मान आहे, मनुष्याचा नव्हे. उदेपूरचा राणा भीमसिंह यानें हें त्याचें म्हणणें कबूल केलें नाहीं. त्यामुळें उदेपूर आणि मारवाड या दोन ठिकाणच्या राजांमध्यें वैमनस्य पडून परस्पर युद्धाची तयारी झाली. त्या वेळीं ग्वालेरचे महाराज शिंदेसरकार जयपूरवाल्यांच्या उलट होते. म्हणून त्यांनीं महाराणा भीमसिंह ह्यास सांगून पाठविलें कीं, " जर आपण जयपूरच्या राजाबरोबर कृष्णकुमारीचें लग्न लावाल तर आम्ही मानसिंहाला साह्य देऊन आपल्याबरोबर युद्ध करूं. या शिंद्यांच्या म्हणण्याकडेही भीमसिंहानें विशेष लक्ष्य दिलें नाहीं. आपल्या सांगण्याचा उदेपूरवाल्यांनीं अनादर केला असें पाहून शिंद्यांनीं ताबडतोब उदेपुराजवळ डेरे दिले; आणि आपल्या सर्व सैन्यासह युद्धाची तयारी केली. पुढें कांहीं दिवसांनीं लिंगेश्वरनामक महादेवाचे देवळांत शिंद्यांची आणि भीमसिंहाची गांठ पडून त्यांचा आपसांत तह झाला, व त्या तहान्वयें भीमसिंहानें जयपूरच्या राजाचा दूत निराश करून माघारा पाठविला. महाराणा जयसिंह यानें जेव्हां आपल्या आशा-लतेच्या कुठाररूपी वचनास ऐकिलें तेव्हां तो क्रोधानें लाल झाला; आणि त्यानें मानसिंहाचा सूड घेण्याकरितां

सेना जमविण्याची आज्ञा दिली. तिकडे मानसिंहही युद्ध करण्याकरितां कंबर कसून तयार झाला. इतक्यांत मानसिंहाच्या कित्येक प्रतिपक्ष्यांनीं दुसरेंच एक निराळें दळ तयार केलें. त्यांनीं एक लक्ष वीस हजार फौज एकत्र केली; आणि ह्या सर्व फौजेसह ते जयसिंहास साह्य करण्याकरितां त्याच्या फौजेस जाऊन मिळाले. त्या प्रसंगीं पर्वतशिरनामक ठिकाणाजवळ जयसिंह आणि मानसिंह यांचें मोठें भयंकर युद्ध झालें. मानसिंहाच्या सैन्यांतील पुष्कळ लोक जयसिंहास जाऊन मिळाले. असें झाल्यामुळें मानसिंहाला समरांगण सोडून पळून जावें लागलें. मानसिंह पळतां पळतां योधगड नामक एका किल्यांत जाऊन लपून राहिला. जयसिंहाच्या सेनेनें योधगडासही चारी बाजूंनीं वेढा घालून गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. परंतु, योधगड किल्ला फारच मजबूत असल्यामुळें जयपूरची सेना हार मानून माघारी परतली. या योधगडच्या युद्धांत जयसिंहाच्या सैन्याचा फार नाश झाल्यामुळें तो आपला जीव घेऊन जयपुरास पळून गेला. राणा मानसिंग याच्या प्रतिपक्षी मंडळींपैकीं ज्या नकली राजानें त्याच्या उलट सैन्य जमवून जयसिंहाला साह्य दिलें होतें, तो त्याच्याच सैन्यांतील नबाब अमीरखान नामक एका विश्वासघातकी मुसलमानाच्या हातून मारला गेला. हाच दुराचारी अमीरखान पुढें कांहीं युक्तिप्रयुक्ति करून उदेपूरच्या महाराण्याचा मुख्य मसलतगार झाला; आणि अजितसिंहनामक एका धूर्त मनुष्यास त्यानें कृष्णाकु-

मारीच्या पित्याच्या सेवेस ठेविलें.

इतकें झालें तरी जयसिंह आणि मानसिंह या दोघांच्या हृदयकुंडांत अजूनही युद्धाग्नि प्रज्वलित होता. या कारणानें ते दोघेही उदेपूरच्या राज्यावर हळूं हळूं चढाई करून येऊं लागले. तेव्हां राणा भीमसिंग यास मोठी चिंता प्राप्त झाली. तो दोघांनाही शांत करण्याचा उपाय शोधूं लागला. त्यानें अमीरखानास एकांतीं बोलावून मसलत विचारिली. त्या वेळीं त्या अविचारी अमीरखानानें अशी मसलत दिली कीं, एकतर कृष्णेचा विवाह मानसिंहाबरोबर करावा, नाहींतर तिला मारून तरी टाकावी. कृष्णेचा प्राणघात करण्याची मसलतच राण्यास पसंत वाटली. परंतु, हें स्त्रीहत्येच्या पातकाचें ओझें शिरावर घेण्यास कोण तयार होईल, याची त्यास मोठी चिंता पडली. प्रथमतः महाराज दौलतसिंह नामक एका सरदारास हें कृत्य करण्याविषयीं त्यानें आज्ञा केली. परंतु, दौलतसिंहानें मोठ्या निस्पृहतेनें आणि धैर्यानें उलट जबाब दिला कीं "धिक्कार असो अशी आज्ञा करणाऱ्या नराधमाला ! आणि हजार वेळा धिक्कार असो जो राक्षस असल्या आज्ञेचें पालन करील त्याला ! !" यानंतर राण्यानें आपल्या यौवनसिंहनामक दुसऱ्या एका सरदाराला हें घोर कर्म करण्याची आज्ञा केली. यौवनसिंहानें राण्याचें मन पाहून होय म्हटलें; आणि तो खड्गासहवर्तमान कृष्णाकुमारीच्या अंतःपुरात शिरला. परंतु, निद्रावश झालेल्या तिच्या स्वर्गीय रूपास पाहून यौवनसिंहाच्या हातांतील तलवार गळून खालीं पडली. व तो शोका-

कुल होऊन तेथून परत आला. हळूं हळूं अमीरखानाची दुर्मंत्रणा बाहेर पडून तें सारें राजभवन कृष्णेच्या मातेच्या रुदनार्त नादानें दणाणून गेलें.

राजवाड्यामध्यें एवढा मोठा दुःखकल्लोळ चालला होता, तरी कृष्णाकुमारीच्या चित्तावर मृत्यूच्या भयाचा किंचित् देखील विकार घडला नाहीं. नेहमींप्रमाणेंच तिचें मुख सुप्रसन्न दिसत होतें. अमीरखानानें महाराण्यास पुन्हां सल्ला दिली कीं, कृष्णेचा प्राणघात विषप्रयोगानें करावा. वाचकहो, त्या मूढमति महाराण्याला असली पैशाचिक मसलतही मान्य झाली! महाराण्याचा एक सेवक सोन्याच्या कटोऱ्यांत विष घालून तो कटोरा कृष्णाकुमारीपाशीं घेऊन गेला; आणि मोठ्या विनीत भावानें तिला ह्मणाला, "हा विषरस आपल्या वडिलांनीं पाठविला आहे, याचा आपण स्वीकार करावा." कृष्णेनें पित्याच्या नांवाचा आदर करून सेवकाच्या हातून तो विषाचा कटोरा घेतला; आणि परमेश्वरापाशीं पित्याचें आयुष्य व राज्यवृद्धि यांविषयीं प्रार्थना करून तो विषरस एखाद्या मधुर रसाप्रमाणें प्राशन केला. तथापि, कृष्णेच्या मुखावर मृत्यूच्या भयाचें कांहींएक चिन्ह दिसलें नाहीं. ती तशीच हंसतमुखानें इष्टदेवतेचें आराधन करूं लागली. परंतु, आपल्या आईला मोठ्या आक्रोशानें विलाप करतांना पाहून ती तिची समजूत करूं लागली कीं, "आई, तूं कां रडतेस? दुःख जितकें लवकर हलकें होईल तितकें चांगलें. मी वीरक्षत्रियाची कन्या आहें, म्हणून मला मृत्युभय स्पर्शही करूं शकत

नाहीं. हें शरीर मरण्याकरितांच जन्म धारण करितें, मग त्याबद्दल शोक तो कशाला हवा ?" चमत्कार आहे. कीं, या विषप्राशनानें देखील कृष्णाकुमारीला कांहींएक झालें नाहीं ! ती पूर्ववत् हंसत खेळत बसली होती. पुन्हां दुसऱ्या एका सेवकानें आणखी एक विषाचा कटोरा आणून दिला. तोही कृष्णेनें सहजवृत्त्या प्राशन केला; तरी त्यानेंही तिला मृत्यु आला नाहीं !

शेवटीं तिसऱ्या सेवकानें एक कुसुमरस नामक भयंकर विषानें भरलेला कटोरा तिला आणून दिला. तो प्राशन करितांच कृष्णकुमारीचें जीवन समाप्त झालें. हर हर ! ज्या अंगांचें सौंदर्य आणि लावण्य उपभोगण्याकरितां अनेक नरपतींना एकसारखी आशा लागली होती, तीं तिचीं कोमल अंगें रंगरहित होऊन भूमीवर पतन पावलीं, आणि अल्पकालांत तें तिचें दुर्लभ शरीर भस्म होऊन प्रत्यक्ष स्मशानालाही भेसुर करूं लागलें. वाचकहो, केवढें तिचें अचल धैर्य ! केवढी पितृभक्ति ! काय तो समजूतदारपणा ! काय तें सौंदर्य ! परंतु, या सर्व गुणांच्या पायीं असा घोर अनर्थ घडावा असा ईश्वरी नेमच होता, असें ह्मणावयाचें, दुसरें काय ?

---

# रत्न चवदावें.

## श्रेष्ठिकन्या असामान्या.

या पुढें ज्या कुलयुवतीचें जीवनचरित्र आम्ही देणार, तिचें जन्म बंगालप्रांतांतील एका श्रीमान् जगतशेटाच्या कुलांत झालें होतें. बंगालचा नबाब सुराजउद्दौला हा जेव्हां गादीचा अधिकारी झाला, तेव्हां तो केवळ वीस वर्षांचा तरणा बांड होता. त्याच्या पूर्वीचा नबाब अलिवर्दीखान हा सुराजउद्दौला याचा आजा होय. सुराजउद्दौला यास त्याच्या आजानें अतिशय लाड करून अगदीं बिघडवून टाकिलें होतें. तशांत तो गादीवर बसल्यावर त्यास दुर्व्यसनी लोकांची संगत लागून तर तो फारच बदफैली निघाला. या कारणामुळें तो आणि त्याचे दोस्त यांचे हातून नानाप्रकारचे घोरतर अन्याय घडूं लागले, कुलीन स्त्रियांचीं पातिव्रत्यें भ्रष्ट होण्यास सुरवात झाली. तेणेंकरून सर्व प्रजा गांजून गेल्यासारखी झाली, आणि बंगालचें राज्य केवळ अंधेरीनगरी बनून गेलें. सुराजउद्दौल्यानें उघडपणें आपल्या उमराव लोकांच्या स्त्रिया जबरदस्तीनें ओढून आणण्यासही कमी केलें नाहीं.

या वेळीं मुर्शिदाबाद येथें मोठमोठे श्रीमान् व्यापारी वास्तव्य करीत होते; त्यांना जगतशेट म्हणत. सर्व देशभर त्यांच्या व्यापाराच्या पेढ्या होत्या. मोठमोठाले संस्थानिक

आणि जमीनदार हे नेहमीं त्यांचे रिणको बनलेले असत. इतकेंच केवळ नव्हे, तर प्रत्यक्ष दिल्लीच्या बादशहालादेखील उसनें द्रव्य मागण्याकरितां त्यांच्या दाराशीं यावें लागे. अशी स्थिति असल्यामुळें राजदरबारांत त्यांचा मोठा मान असे.

सुराजउद्दौल्याच्या कारकीर्दीत मुर्शिदाबाद नगरींत मातबचंद नांवाचा एक प्रसिद्ध शेट रहात असे. त्यास असामान्या नांवाची एक फार सुंदर कन्या होती. तिच्यासारखी सुंदर स्त्री हजारांतही सांपडणें विरळा. दुर्दैवानें तिजवर सुराजउद्दौल्याची पापदृष्टि फिरली. तिच्या सौंदर्यानें त्याला अगदीं वेड लावून सोडिलें. परंतु, मातबचंद हा साऱ्या हिंदुस्थानांत वजनदार सावकार असल्यामुळें सुराजउद्दौल्यास उघडपणें तिचें हरण करतां येईना. हें स्त्रीसौंदर्याचें वेड मनुष्याच्या हातून कोणकोणतीं हास्यास्पद कृत्यें घडवील याचा नियम नाहीं. सुराजउद्दौला असामान्येच्या सौंदर्यदर्शनाविषयीं इतका अधीर झाला होता कीं, त्यानें एके दिवशीं स्त्रीवेष धारण करून ज्या वाड्यांत असामान्या रहात होती, तेथें प्रवेश केला. त्यानें स्त्रीवेष धारण केला असल्यामुळें थेट तिच्या समोर जाईपर्यंत त्यास कोणीं अटकाव केला नाहीं. प्रथमतः तिचें फक्त दर्शन घेण्याचाच कदाचित् त्याचा विचार असेल; परंतु, त्यानें जेव्हां तिचें तें कमनीय रूप अवलोकन केलें, तेव्हां आपण कोठें आहों याचा यत्किंचितही विचार न करितां तो तिला आलिंगन देण्यास धांवला. तें पहातांच ती भयानें गर्भगळीत होऊन तेथून पळाली, आणि

आपल्या पतीकडे जाऊन तें भयंकर वर्तमान तिनें त्यास निवेदन केलें. त्याबरोबर रागानें लाल झालेला तिचा पति त्या वेषधारी नबाबाच्या पाठीस लागला, आणि तो त्याच्या वाड्यांतून निसटून जाणार, इतक्यांत त्यानें त्यास पकडून त्यावर यथेच्छ आपल्या पादत्राणांची वृष्टि केली. त्या वेळीं नबाब प्राणासच मुकावयाचा; परंतु, तें कृत्य थोडक्यांतच आटपून तो तेथून जिवानिशीं सुटला. तथापि त्याचा तो अपमान आणि असामान्येच्या प्राप्तीची निराशा या गोष्टी मात्र त्याचे हृदयांतून नाहींशा झाल्या नाहींत.

कांहीं दिवस गेल्यानंतर एके दिवशीं संधी साधून त्या दुष्टानें असामान्येच्या पतीचा उघडपणें भररस्त्यांत खून करविला. तो निर्दय नबाब आपल्या शत्रूचा नुसता खून करवूनच राहिला नाहीं, तर त्यानें आपल्या लोकांस असा हुकूम केला कीं, असामान्येच्या पतीचें शिर धडापासून वेगळें करून तें एका चांदीच्या ताटांत ठेवून तिजकडे नजर ह्मणून पाठवून द्यावें. खून करणाऱ्या लोकांनीं ही नबाबाची आज्ञा तत्काल अमलांत आणिली. या वेळच्या असामान्येच्या अंतःकरणाच्या स्थितीचें वर्णन करणें फार कठीण आहे. भीति, क्रोध, त्वेष आणि सूड इत्यादि मनोविकारांनीं तिच्या अंतःकरणांत एकच गोंधळ करून सोडला. आपल्या पतीचें शिर धडापासून वेगळें झालेलें अवलोकन केल्यापासून त्या अभागिनीच्या शरीरांत उन्माद वायु शिरून अखेरीस तिला बुद्धिभ्रंश झाला.

अशा प्रकारचा जुलमी, बदफैली आणि अल्पवयस्क नबाब

बंगालच्या गादीवर स्वस्थपणें टिकून रहाणें त्या काळीं अशक्य होतें. सुराजउद्दौला यास आपल्या दुराचरणाचा परिणाम लवकरच भोगावा लागला. त्याच्या असह्य जुलुमास त्रासून बंगालच्या जमीनदार लोकांनीं इंग्लिशांच्या साह्यानें त्यास पदच्युत करून त्याचे जागीं मिरजाफराची स्थापना केली, ही गोष्ट मागील चरित्रांत आलीच आहे. प्लासीच्या लढाईंत पराभव पावून सुराजउद्दौला सैरावैरा पळत सुटला असतां त्यास मिरजाफराच्या लोकांनीं भागवंगाला येथें पकडून मुर्शिदाबादेस आणिलें व तेथें आणिल्यावर मिरजाफराचा मुलगा मिरान याच्या हुकमावरून महंमद इ बेग नांवाच्या मनुष्यानें त्याचा शिरच्छेद केला. पुढें त्याचें छिन्नविच्छिन्न झालेलें शरीर एका हत्तीच्या पाठीवर घालून एकाद्या महान् अपराधी मनुष्याप्रमाणें मूठमाती देण्याकरितां स्मशानभूमींत वाहून नेलें.

हा कालपर्यंत असामान्या भ्रमिष्ट स्थितींतच होती. ती कधीं बहिऱ्याप्रमाणें, कधीं मुक्याप्रमाणें आणि कधीं लहान मुलाप्रमाणें पोरकटपणाचें आचरण करी. परंतु बहुतकरून तिच्या आचरणांत आततायीपणा वारंवार दृष्टीस पडे. तिच्या पित्यानें तिला ताळ्यावर आणण्याकरितां अनेक प्रकारचे वैद्यकी आणि मंत्रतंत्रादि उपाय करून पाहिले; परंतु व्यर्थ. सुराजउद्दौल्याचा खून झाल्याचें वर्तमान ऐकून कोणी तिजला त्याचा मूठमातीचा विधि अवलोकन करण्यास न्यावें अशी तिचे पित्यास सूचना केली. कदाचित् आपल्या पतीचा प्राणघात करणाऱ्या नराधमाची ती दुर्दशा अवलोकन करून

तिच्या चित्तास समाधान वाटेल अशी ती सूचना करणाऱ्याची कल्पना होती. त्या सूचनेप्रमाणें असामान्येच्या पित्यानें तिला तो भयंकर देखावा दाखविण्याकरितां स्मशानभूमीकडे नेलें; आणि चमत्कर असा झाला कीं, तो देखावा पाहून सुमारें अडीच वर्षांच्या भ्रमांतून असामान्या शुद्धीवर आलेली दिसली. ती कांहीं वेळपर्यंत त्या छिन्नभिन्न झालेल्या प्रेताकडे टक लावून पहात होती. नंतर ती आपल्या एका दासीकडे वळून ह्मणाली. "हें काय आहे?" दासीनें उत्तर केलें "बाईसाहेब, हें आपल्या प्रिय पतीचा खून करणाऱ्या मनुष्याचें मूठमाती देण्यास आणिलेलें प्रेत आहे. हा आपल्याविषयीं चित्तांत दुर्वासना धारण करणारा नबाब सुराजउद्दौला असून परमेश्वरानें त्याच्या दुराचरणास योग्य असें फल त्यास भोगावयास लाविलें आहे." दासीच्या म्हणण्याचा भावार्थ तिला प्रथम चांगला कळला नाहीं असें दिसलें. परंतु, क्षणभरानें तिच्या अंतःकरणांत एकाएकीं प्रकाश पडल्यासारखें होऊन ती मोठ्यानें म्हणाली, "ठीक ठीक! फार चांगलें झालें! आतां मला परत घरीं घेऊन चला."

असामान्येच्या सांगण्याप्रमाणें सेवकजन तिला तेथून घरीं घेऊन आले. तिच्या वृत्तींत जमीनअस्मानाचें अंतर दिसूं लागलें. तिची पूर्वींची भ्रमिष्टावस्था समूळ नाहींशी होऊन ती इतर लोकांप्रमाणें चांगली बोलूं चालूं लागली. ती तिची वृत्ति पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें व मोठा आनंदही झाला. परंतु, ती वारंवार आपल्याशींच कांहीं पुटपुटत असे.

मीराबाईनें चटकन् उठून दार उघडिलें. राणाजीनें पाहिलें तों मंदिरांत एका गिरिधरलालजीशिवाय दुसरें कोणी देखील नव्हतें ! मग तो अंतःकरणांत अत्यंत ओशाळा होऊन तेथून चालता झाला. मीराबाईच्या सद्वर्तनाबद्दल आणि निस्सीम भगवद्भक्तीबद्दल राण्याची बरीच खात्री होत चालली; तथापि, त्याच्या मनांतील राग समूळ असा कधींच नाहींसा झाला नाहीं. नित्यशः नवीन नवीन कारणें उपस्थित होऊन राण्याच्या मनांतील संशय आणि तज्जन्य क्रोध सतत कायम राही.

मीराबाईच्या भक्तिप्रभावाची कीर्ति देशांतरावर जाऊन तिच्या दर्शनार्थ अनेक ठिकाणांहून साधुसंत, गोसावी, बैरागी इत्यादिकांच्या झुंडीच्या झुंडी उदेपुरास येऊं लागल्या. त्यांत कित्येक मुद्दाम तिचा छळ करण्याच्या हेतूनेंही येण्यास चुकत नसत. परंतु, मीराबाईच्या वर्तनांत पापाचा लवलेशही नसल्यामुळें कोणी कोणत्याही उद्देशानें आले आणि कितीही छळ केला, तरी त्यापासून मीराबाईस यत्किंचित् देखील दोष न लागतां उलट तिचें वर्तन कसास लागून त्याचा चांगुलपणाच सिद्ध होत असे.

एके वेळीं एक असाधु कामी अंतःकरणांत नीच हेतु धारण करून तिजकडे आला, आणि तीस ह्मणाला, " तूं जशी गिरिधरलालजीची दासी आहेस, तसा मीही त्याचा दास आहें. मला त्याचा दृष्टांत झाला आहे कीं, तूं मीराबाईचा अंगिकार करून तिचें दुःख निवारण कर. " मीराबाईस त्या कपटी कामांधाचा मतलब तेव्हांच समजला. तिनें

मोठ्या शांत चित्तानें त्यास उत्तर दिलें, "आपल्या इच्छे प्रमाणें वागण्यास मी तयार आहें. आपण सध्यां भोजन वगैरे करून थोडीशी विश्रांति घ्यावी. मग आपल्या ह्मणण्याचा यथायोग्य विचार करूं.", मीराबाईचें हें शांतपणाचें वर्तन कोणास बरें आश्चर्यानें चकित करून सोडणार नाहीं? प्रत्यक्ष दुष्टबुद्धि धारण करून छळ करावयास आलेल्या मनुष्याशीं असें नम्र आणि सरळ भाषण म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हे! असो; मिराबाईनें त्या साधुरूपी खळास मिष्टान्नाचें भोजन घालून तांबूल खावयास दिला, आणि त्यास म्हटलें, "माझ्या दृष्टीनें साऱ्या त्रिभुवनांत एकांत स्थळ कोणतेंच नाहीं. सर्व ठिकाणीं गिरिधरलालजी वास करीत आहे. शिवाय सूर्यचंद्रादि तेजोगोल आणि अश्विनीकुमारादि देवगण नेहमीं पापपुण्याचें निरीक्षण करीत असतात. तेव्हां आपल्या इच्छेप्रमाणें आतां एकांतस्थान कोठें सांपडणार! करितां यापुढील आपली इच्छापूर्ति एकांताशिवायच करण्यास काय हरकत आहे?" मीराबाईचें तें भाषण श्रवण करितांच त्या दुष्टाच्या हृदयांत लख्ख उजेड पडला! त्यानें अत्यंत दीन वदनानें मीराबाईचे चरणावर मस्तक ठेवून तिची क्षमा मागितली; आणि हा चमत्कार पाहून तेथें जमलेल्या साधुसंतांस परमानंद झाला. मीराबाईनेंही परमेश्वरानें आपल्यावरील संकट निवारण केल्याबद्दल त्याची अनन्यभावानें स्तुति केली.

मीराबाईच्या पुण्याचरणाचा कीर्तिपरिमल चहूंकडे पसरतां

प्रसरतां तो दिल्लीस प्रसिद्ध अकबर बादशहाच्या समीप पोंचून त्यासही मीराबाईच्या दर्शनाची इच्छा उत्पन्न झाली. तेव्हां तो आपल्या तानसेन नामक गवयास बरोबर घेऊन वेषांतरानें मीराबाईची भेट घेण्याकरितां उदेपुरास आला. तेथें आल्यावर त्यानें भूतमहालांत जाऊन इतर संतजनांबरोबर मीराबाईचें आणि तिच्या परमप्रिय देवतेचें दर्शन घेऊन आपल्या कंठांतील एक बहुमोल रत्नहार गिरिधरलालजीस अर्पण केला. तसेंच त्यानें मीराबाईस अनेक प्रकारचे प्रश्न करून आपल्या ईश्वरविषयक शंकांचें निरसन करून घेतलें. त्या वेळीं मीराबाईची लोकोत्तर भावना पाहून तो फार खुष होऊन गेला. त्यानें तानसेनाकडून तिजला कित्येक गानविषयक प्रश्न करविले, त्यांचींही तिनें समर्पक उत्तरें दिलीं. मीराबाई जशी भगवद्भक्तीमध्यें पूर्णता पावली होती, तशीच ती उत्तम कवयित्री असून गायनकलेंतही अत्यंत निष्णात होती, ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे.

अकबर जरी वेषांतरानें मीराबाईचे भेटीस आला होता, तरी त्याचें तें आगमन छपलें गेलें नाहीं. त्यानें गिरिधरलालजीस अर्पण केलेल्या रत्नमालेवरून ती गोष्ट लोकांचे लक्ष्यांत आली, आणि त्यांनीं मत्सरानें पुन्हां राण्याचे कानावर ती गोष्ट घालून त्याचा क्रोधाग्नि प्रदीप्त केला. अगोदरच मोंगलांचें व उदेपूरच्या रजपूतांचें केवढें सूत होतें, तें इतिहासज्ञ वाचकांस माहीत आहेच. तशांत अकबरानें प्रत्यक्ष भूतमहालांत जाऊन मीराबाईशीं संभाषण केलेलें! मग काय विचारतां? राज-

वाड्यांतील समस्त स्त्रीपुरुषांस ती गोष्ट अत्यंत लांछनास्पद वाटली. त्यांनीं पुन्हां एकदां मीराबाईस या जगांतून नाहींशी करण्याची राण्यास मसलत दिली. राण्यानें त्या क्षुद्रबुद्धि लोकांच्या सांगण्यावरून एक अत्यंत विषारी कृष्णसर्प डबींत घालून ती डबी मीराबाईकडे पाठवून सांगितलें कीं, " या डबींत एक फारच सुंदर असा शालिग्राम पाठविला आहे. त्याचें दर्शन घ्यावें. " मीराबाईस आपल्या पतीकडून आलेली ती डबी पाहून फारच आनंद झाला. तिनें मोठ्या भक्तियुक्त अंतःकरणानें शालिग्रामाचें दर्शन घेण्याकरितां ती डबी उघडली आणि पाहते तों तिला एक अत्यंत दिव्य असा शालिग्राम तेथें दृष्टीस पडला ! अहाहा ! काय हा भक्तिप्रभाव ! ! राण्यानें आपल्याकडून प्रत्यक्ष कृष्णसर्प पाठविला असतां मीराबाईच्या पुण्यप्रभावानें त्याचा शालिग्राम बनला ! परमेश्वर आपल्या भक्तांच्या संरक्षणार्थ काय काय चमत्कार दाखवील आणि काय काय योजना करील त्याचा कांहीं अंत लागावयाचा नाहीं. मीराबाईस राण्याचा दुष्ट हेतु कळल्यावर परमेश्वराच्या अलौकिक करणीचें कौतुक वाटून तिनें त्याची अत्यानंदानें स्तुति केली.

मीराबाईस राण्याकडून आणि राजघराण्यांतील इतर लोकांकडून इतका त्रास सोसावा लागला कीं, तेणेंकरून तिला आपल्या जिवाचा देखील कंटाळा आला. अखेर तिनें एके दिवशीं आत्मघात करून घेऊन त्या त्रासांतून सुटण्याचा संकल्प केला. मीराबाईसारख्या शांत आणि धीर स्वभावाच्या

साध्वीसंबंधानें विचार करितां वरील गोष्ट सुसंगत दिसत नाहीं. तथापि, मन्मथनाथदत्त यांनीं आपल्या पुस्तकांत हा प्रसंग मोठ्या खुबीदार रीतीनें वर्णन केला असून त्यापासून मीराबाईच्या उज्ज्वल कीर्तीस फारसा बाध न येतां उलट परमेश्वर तिचा कसा पाठिराखा झाला हें उत्तम प्रकारें व्यक्त होत असल्यामुळें आम्हीही तो प्रसंग पुढें देत आहोंत.

मीराबाई एके दिवशीं रात्रीं कोणास न कळत भूतमहालांतून बाहेर पडली, ती एका तुफान वहात असलेल्या नदीच्या कांठीं येऊन पोहोंचली. तेथें आल्यावर मीराबाईनें अनन्यभावानें परमेश्वराचा एकवार स्तव केला आणि मोठ्या गंभीर मुद्रेनें त्या अगाध सरितेंत उडी घातली ! इतक्यांत काय चमत्कार झाला पहा; मीराबाईस असें वाटलें कीं, आपण जणूं काय त्या नदीच्या तीरावरच उभ्या आहों, आणि दिव्यरूप धारण केलेला एक विलक्षण तेजस्वी पुरुष अंतरिक्षमार्गानें आपणाकडे येत आहे. मग तो दिव्य पुरुष मीराबाईपाशीं येऊन तिचें सांत्वन करून तीस म्हणाला, "मीराबाई, तूं या जगांतून नाहींशी व्हावीस अशी राण्याची इच्छा होती; त्याप्रमाणें तूं नदींत देहत्याग करून त्याची इच्छा पूर्ण केली आहेस. परंतु, तुझ्या जन्मधारणाचें कर्तव्य तुला अद्याप बजावावयाचें आहे. ईशभक्तीचा खरा महिमा काय आहे तो जगतास दाखवून त्याला त्या मार्गास लावण्याकरितांच तुझा अवतार आहे. करितां, जा आणि तें आपलें कर्तव्य बजाव." अशा प्रकारचें भाषण करून तो

दिव्य पुरुष अंतर्धान पावला. मीराबाई जागी झाल्याशारखी होऊन आसपास पहाते तों ती नदीतीरावर उभी असून चहूंकडे बालार्कांचे कोमल किरण पसरले आहेत व तेणेंकरून तो तीरप्रदेश अत्यंत रमणीय भासत आहे. मीराबाईस तिनें रात्रौ नदीच्या तुफान झालेल्या प्रवाहांत उडी घेतल्याचें स्मरण झालें; आणि त्या भयंकर प्रसंगांतून आपणास परमेश्वरानें वांचवून देहसार्थकतेचा मार्ग सांगितला याबद्दल अत्यानंद वाटला.

वरील प्रसंग घडण्याचे पूर्वी मीराबाईनें प्रसिद्ध वृंदावनवासी साधुश्रेष्ठ तुळशीदास यांस आपल्या समग्र स्थितीचें वर्णन करून पत्र लिहिलें होतें. त्याचे उत्तरांत तुळशीदासांनीं तिजला वृंदावनास येऊन राहण्याविषयीं सुचाविलें. त्याप्रमाणें मीराबाई वृंदावनास जावयास निघाली. उदेपुराहून निघतांना मीराबाईबरोबर एका गिरिधरलालजीच्या मूर्तीवांचून दुसरें कोणीही नव्हतें. परंतु वृंदावनास जाईपर्यंत तिचे बरोबर अनेक साधुसंतांची दाटी झाली. मीराबाईची लोकोत्तर ईशभक्ति आणि प्रेमळ भजन यांचा लोकांस इतका चटका लागला कीं, ते सर्वसंगपरित्याग करून तिजप्रमाणेंच परमेश्वराराधनेच्या मार्गास लागले. वृंदावनास येऊन पोंचल्यावर मीराबाई आपल्या मूळ संकल्पाप्रमाणें आणि दिव्य पुरुषाच्या आज्ञेप्रमाणें आपला सर्व काळ अज्ञ जनांस भक्तिमार्गाचा उपदेश करण्यांत आणि गिरिधरलालजीच्या भजनपूजनांत घालवूं लागली.

मीराबाईचे वेळीं वृंदावनांत कोणी जीव गोसावी नामें करून मोठा महात्मा साधु वास्तव्य करीत असे. त्याच्या संबंधाच्या अनेक गोष्टी ऐकिल्यावरून मीराबाईस त्याच्या दर्शनाची लालसा उत्पन्न झाली. जीव गोसावी याचा स्त्रियांच्या संबंधानें मोठा कटाक्ष होता. इतकेंच केवळ नव्हे, तर तो स्त्रियांचें दर्शनही कधीं घेत नसे. तेव्हां मीराबाईनें त्यास निरोप पाठविला कीं, मजला प्रत्यक्ष जरी आपलें दर्शन झालें नाहीं तरी चिंता नाहीं; निदान दाराचे आड बसून आपल्याशीं संभाषण करण्याचा तरी मला लाभ घडावा. मीराबाईची उत्कट इच्छा जाणून जीव गोसावी यानें ती गोष्ट मान्य केली. ठरल्याप्रमाणें जीव गोसावी याच्या मठांत जाऊन तेथील दाराआड बसून संभाषण करीत असतां मीराबाई त्यास म्हणाली, " महाराज, मी तर अल्पमति अज्ञान स्त्री आहे; तथापि, मला एक शंका उत्पन्न झाली आहे. तिचें निरसन आपणांवाचून दुसरें कोण करणार ? मी आजपर्यंत कथापुराणांतरीं अशी गोष्ट ऐकली आहे कीं, व्रजमंडलामध्यें केवळ एका श्रीगिरिधरजीवांचून दुसरा पुरुषच नाहीं. मग आपण इतर जनांस स्त्री व पुरुष या भेदानें अवलोकन करितां, हें काय ? " हा मीराबाईचा मार्मिक प्रश्न श्रवण करितांच गोसावीबोवांचा संदेह नाहींसा झाला; व त्यांनीं त्या दिवसापासून स्त्रीपुरुषभेदाभेद सोडून देऊन, सर्वां भूतीं समदृष्टि ठेविली. त्यानंतर जीव गोसावी आणि मीराबाई यांचें अनेक पारमार्थिक विषयांवर संभाषण होऊन यांचा

काळ पुढें मोठ्या आनंदांत जात असे.

याप्रमाणें वृंदावनक्षेत्रीं श्रीकृष्णभक्तिसुधारसाचें यथेच्छ पान करून संतसमागमांत पुष्कळ काळ घालविल्यानंतर मीराबाईस श्रीक्षेत्र द्वारका येथें जाऊन श्रीद्वारकाधीशाचें दर्शन घेण्याची इच्छा उत्पन्न झाली. तेव्हां ती अनेक संतमंडळीं घेऊन हरिभजन करीत अत्यानंदानें द्वारकेस जाऊन पोहोंचली. तेथें गेल्यावर तिनें द्वारकाधीशाचें अत्यंत प्रेमपूर्वक दर्शन घेतलें. ती द्वारकेस आल्यावर द्वारकानाथाच्या मंदिरांत अहोरात्र नृत्यगायन करून भगवन्नामाचा जयघोष करूं लागली. तिची परमेश्वराच्या ठायीं असलेली अपार भक्ति अवलोकन करून द्वारकावासी जनांस आश्चर्य वाटूं लागलें. अल्पकाळांत मीराबाईचा भक्तिमहिमा साऱ्या सौराष्ट्र देशामध्यें प्रसृत होऊन तिच्या दर्शनाविषयीं उत्कंठित झालेले हजारों लोक द्वारकापुरीस येऊं लागले. मीराबाईची संसाराविषयींची विरक्तता आणि परमेश्वराविषयींची निस्सीम भक्ति अवलोकन करून समस्त जन आनंदसागरांत पोहूं लागत.

वर वर्णन केल्याप्रमाणें मीराबाई सर्व भाव द्वारकाधीशाचे ठिकाणीं ठेवून सौख्यानंदांत मग्न रहात असतां तिचा अवसानकाल समीप येऊन पोंचला. उदेपुरास महाराणा कुंभ आपल्या राज्यकारभारांत मग्न असतां त्याच्या कानावर मीराबाईच्या लोकोत्तर भक्तीचें वृत्त गेलें. द्वारकेकडून आलेला मीराबाईचा कीर्तिप्रकाश त्याच्या हृत्पटावर पडतांच त्याच्या चित्तांतील सर्व मोहांधकार नाहींसा झाला, व त्याच्या चित्तास

उपरांत घेऊन आपल्या सुशील पत्नीचें दर्शन घेण्याची त्यास वासना झाली. तेव्हां त्यानें आपल्या पुरोहितास बोलावून आणून त्यास मीराबाईस सन्मानपूर्वक उदेपूर नगरास घेऊन येण्याची आज्ञा केली. राण्याची आज्ञा होतांच राजपुरोहित स्वारशिबंदी घेऊन तावडतोब द्वारकेस आला, आणि त्यानें मीराबाईस परत उदेपुरास चलण्याविषयीं विनंति केली. मीराबाईस द्वारकाधीशाच्या मंदिराशिवाय अन्यत्र स्थळीं जाऊन राहण्याची मुळींच इच्छा नसल्यामुळें तिनें पुरोहिताच्या विनंतीस रुकार दिला नाहीं. पुरोहित तिला परत नेण्याची प्रतिज्ञा करून आला असल्यामुळें त्यास तसें परत जातां येईना. तेव्हां तो तसाच अन्नपाणी वर्ज्य करून तेथें निग्रहानें ठाण देऊन बसला. ते वेळीं मीराबाईस मोठें संकट प्राप्त झालें. ती तर असार संसाराचा त्याग करून परब्रह्यस्वरूपामध्यें अगदीं गुंग झाली होती. अशा स्थितींत तिला उदेपुरास परत जाणें कसें गोड वाटावें ! तिनें त्या वेळीं दीनवत्सल करुणाकर प्रभूचा अनन्यभावें धांवा करण्यास सुरुवात केली. मीराबाईचें हृदय ह्या वेळीं सद्गदित होऊन परमेश्वरचरणीं लीन होऊन गेलें होतें. नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा वहात होत्या. भक्तिरसानें तिचें हृदय उचंबळत होतें. असें होतां होतां मीराबाईची चित्तवृत्ति भगवान् द्वारकाधीशाच्या स्वरूपीं तन्मय होऊन गेली, आणि सर्व जनांसमक्ष तिचे पंचप्राण चिदानंद-स्वरूपांत मिळून जाऊन तिला सायुज्यता मुक्तीचा लाभ घडला.

- मीराबाई आपल्या अंगच्या भक्तिबळानें परमानंदस्वरूपीं विलीन झाल्यानंतर सर्व लोकांस अद्भुत चमत्कार वाटला, आणि मीराबाईस परत नेण्याकारितां आलेले लोक विन्मुख

होऊन परत उदेपुरास गेले. कुंभराण्यास तो सर्व प्रकार कळ-तांच त्याला आपल्या पूर्व कृतीबद्दल फारच पश्चात्ताप झाला. अखिल मेवाड देशांत मीराबाईची कीर्ति पसरून तिला सर्व लोक पूज्य आणि वंदनीय मानूं लागले. तेव्हांपासून रण-छोडजीजवळ मीराबाईची मूर्ति ठेवून तिची पूजा करण्याचा त्या देशांत प्रघात पडला आहे.

## उपसंहार.

इसवी सनाचे दहाव्या शतकापासून भरतखंडाचे अर्वा-चीन इतिहासास सुरवात होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हांपासून तों एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत काल-चक्राच्या प्रचंड धांवेनें अब्दशतांचे नऊ फेरे घेऊन भरतखंडाचें भाग्य सर्वथा बदलून टाकिलें. इतक्या काळांत या देशांत अनेक अनुपमेय स्त्रीरत्नें निर्माण होऊन त्यांनीं आपल्या अंगच्या सद्गुणकांतीनें अखिल भरतखंडास उज्ज्वल करून सोडलें. त्यांपैकीं आम्हांस उपलब्ध झालेल्या रत्नांची माला गुंफून ती महाराष्ट्रीय स्त्रीवर्गास अर्पण केली आहे. आतां शेवटीं शिष्टसंप्रदायाप्रमाणें पूर्ववर्णित युवतिरत्नांच्या अंगच्या अत्युत्तम गुणांचें सम्यगवलोकन करून या पुस्तका-चा उपसंहार करावयाचा.

बहुधा अढळ पातिव्रत्य, अलौकिक तेजस्विता, अप्रतिम दृढनिश्चय आणि अमानुष क्षात्रतेज इत्यादि सद्गुण सामा-न्यतें सर्वच नायिकांचे अंगीं वास्तव्य करीत असल्याचें दि-सून येतें. त्यांतही संयोगिता, कर्मदेवी, आणि दुर्गावती यांची इच्छित पतीच्या प्राप्तीविषयीं उत्कंठा, अढळ पातिव्रत्य आणि अमानुष क्षात्रतेज इत्यादि सद्गुण केवळ लोकोत्तर अतएव अनुकरणीय होत. राणी पद्मिनीनें अल्लाउद्दिनाचे गोटांत

जातेवेळीं प्रकट केलेलें विलक्षण धैर्य आणि चातुर्य, अर्गलच्या राणीची निष्ठावृत्ति, ताराबाईचें निस्सीम पितृप्रेम, पन्नादाईची विलक्षण स्वामिभक्ति, गनोरच्या राणीनें आपल्या पातिव्रत्याच्या संरक्षणार्थ योजिलेला असुरी उपाय, जसरेश्वरीनें आपल्या दुर्वृत्त पतीच्याठायीं ठेविलेली निष्ठा, जोधपूरच्या राणीचें अस्सल क्षात्रतेज, जगद्विख्यात अहल्याबाई आणि राणी भवानी यांची धार्मिकता, आणि अस्सल कारस्थानीपणा, चौधराणीची वीरता, कृष्णाकुमारीची सात्त्विकता आणि स्वार्थत्याग, असामान्येची उच्च मनोवृत्ति, मैनाबाई, चंद्रावती आणि राजबाई यांची स्वराज्यसंरक्षणाची उत्कट इच्छा, लक्ष्मीबाईची लोकोत्तर समरधीरता, आणि साध्वी मीराबाईची असामान्य ईश्वरपरायणता इत्यादि गोष्टी खरोखर अद्भुत असून परम अनुकरणीय आहेत.

आमच्या मतें या भारतवर्षीय युवतिरत्नांच्या तोडीचीं, आणि त्यांतही महाराणी अहल्याबाई आणि लक्ष्मीबाई यांच्या तोडीचीं रत्नें पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही देशाच्या इतिहासांत सांपडणें कठीण आहे; आणि म्हणूनच आम्ही भारतवासी जनांनीं त्याबद्दल अभिमान बाळगावा हें अत्यंत स्वाभाविक आहे. काळाच्या कुटिल गतीमुळें सांप्रत भारतवासी पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांच्या अंगचेही अप्रतिम गुण दिसून येण्यास अवकाश मिळेनासा झाला आहे. तथापि प्रस्तुत काळच्या परिस्थित्यनुरूप डॉ. आनंदीबाई जोशी यांच्यासारखीं सुंदर रत्नें मधून मधून चमकतातच. अस्तु.

ज्यांनीं आपल्या पातिव्रत्याच्या संरक्षणार्थ धडाधड अग्निकुंडांत उड्या घालाव्या; जन्मभूमीच्या संरक्षणार्थ ज्यांनीं राक्षसतुल्य शत्रूंशीं टक्कर देऊन "युद्धं देहि" या वीरमंत्राचा जप जपावा; मानधनाच्या संरक्षणार्थ ज्यांनीं खडतर

संकटें सहन करावीं, स्वामिभक्तीस्तव ज्यांनीं पोटच्या गोळ्याची देखील माया सोडावी; पतिप्रेम, प्रजावात्सल्य आणि परोपकार इत्यादि गोष्टींच्या प्राप्तीस्तव ज्यांनीं परम दुर्लभ अशा मनुष्यदेहास झिजवून घ्यावें आणि ईशभक्तीस्तव ज्यांनीं प्रपंचसुखाचाही त्याग करावा. त्या आमच्या भारतवासी युवतिजनांच्या चरित्राचे किती जरी पोवाडे गाइले तरी ते थोडेच होणारे आहेत.

मागें वर्णन केलेल्या चरित्रांपैकीं सर्वांचेंच जरी सर्वथैव अनुकरण करितां येणें अशक्य आहे, तरी साध्वी अहल्याबाई-सारख्यांचीं चरित्रें संसारांतील सामान्य स्त्रियांस अत्यंत अनुकरणीय होत. इतर स्त्रियांच्या चरित्रांतूनही पातिव्रत्य, दृढनिश्चय, मनाचा मोठेपणा, आणि व्यवहारचातुर्य इत्यादि गोष्टींचें सामान्य स्त्रियांसही अनुकरण करितां येण्यासारखें आहे. तें त्यांनीं अवश्य करावें, अशी त्यांस विनंति आहे; आणि सांप्रतकाळीं जें चहूकडे नेभळेपणाचें साम्राज्य दृष्टीस पडतें त्याचा कांहीं परिहार होण्याची तजवीज करणें असेल तर प्रस्तुतच्या पुढारी मंडळींनीं आपला स्त्रीसमाज सुशिक्षित करण्याचा अवश्य प्रयत्न करावा म्हणजे पुढील संततीस नीतीचें वळण लागून ती आपल्या अंगच्या राजनिष्ठादि सद्गुणांच्या बळावर देशोन्नति करण्यास समर्थ होईल. प्रस्तुत चरित्रमालेच्या वाचनानें महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणावर सत्परिणाम घडावा अशी या मालाकाराची उत्कट इच्छा आहे, ती सत्यसंकल्पदाता विश्वंभर सफल करो, अशी प्रार्थना करून हा उपसंहार--लेख या स्थळीं मर्यादाविराजित करितों.

॥ दोहा ॥ है मर्जी जगदीशकी, सदा न एकै दौर ॥
॥ वे दिन भारतके गये, अब आये दिन और ॥

समाप्त.

## ह्या पुस्तकासंबंधानें

### कित्येक विद्वान् व थोर गृहस्थांचे अभिप्राय.

**नामदार बाळ गंगाधर टिळक** बी. ए. एल्एल्. बी. हे लिहितात " **भारतवर्षीय-युवतिरत्नमाला** " या पुस्तकांतील बऱ्याच गोष्टी आम्हीं वाचल्या. ग्रंथाची भाषा सरळ व सोपी असून ज्या स्त्रियांचीं चारित्रें यांत दिलीं आहेत त्या आमच्या देशांतल्या होत्या याबद्दल आमच्यापैकीं प्रत्येकास आनंद व अभिमान वाटला पाहिजे. युवतिरत्नमाला गुंफतांना ग्रंथकारास इतकीं रत्नें मिळतील कीं नाहीं याबद्दल आम्हास पहिल्यानें शंका होती; पण या ग्रंथांतील चारित्रें वाचल्यावर ती शंका दूर झाली; इतकेंच नव्हे तर आपल्या देशांतही सद्गुणी व पराक्रमी स्त्रियांचीं पुष्कळ उदाहरणें दाखविण्यासारखीं आहेत हें पाहून समाधान वाटलें. हा ग्रंथ स्त्रियांनींच नव्हे तर सर्वत्रांनीं सारखाच वाचण्याजोगा आहे, व त्यास सर्वांकडून योग्य आश्रय मिळेल अशी अशा आहे.

**प्रोफेसर महादेव यशवंत डोळे** एम्. ए. एल्. सी. ई. गव्हर्नमेंट कॉलेज जबलपूर, हे लिहितात " **भारतवर्षीय-युवतिरत्नमाला** " हें पुस्तक मीं समग्र वाचलें. पुस्तक फार चांगलें साधलें आहे. यांत कांहीं गोष्टी अशा रीतीनें लिहिल्या आहेत कीं, त्या वाचल्यापासून कोणाच्याही अंतःकरणांत स्फुरण आल्यावाचून राहणार नाहीं. सगळ्याच गोष्टी बोधपर असून कुलीन स्त्रियांनीं व मुलांनीं ह्या अवश्य वाचण्यासारख्या आहेत. हें पुस्तक प्रत्येक महाराष्ट्रकुटुंबाच्या संग्रहीं असण्याला योग्य आणि विशेषेंकरून मुलांच्या आणि मुलींच्या शाळांत बक्षीस देण्याच्या अगदीं लायक आहे.

प्रसिद्ध महाराष्ट्रग्रंथकार रा. सा. **विनायक कोंडदेव ओक** हे लिहितात. " **भारतवर्षीय युवतिरत्नमाला** " हें आपलें

पुस्तक मीं बहुतेक वाचून पाहिलें त्यानें मला फार आनंद झाला. आपण माहिती पुष्कळ मिळविली आहे आणि तिची योजना गोड आणि सरळ भाषेनें, आपल्या पुस्तकांत केली आहे, हें आपणांस फार भूषणावह आहे. अशीं आणखी चरित्रें मराठींत झालीं पाहिजेत. ह्याच्या अवलोकनानें आमच्या स्त्रीशिक्षणास आणि स्त्रियांच्या उन्नतीस पुष्कळ साह्य होईल असें मला वाटतें. आपली लिहिण्याची पद्धति शुद्ध आहे, विचार प्रगट करण्याची रीति सरळ आहे आणि गोष्टीचें तात्पर्य दाखविण्याची हतोटी सुंदर आहे. हा ग्रंथलेखनाचा आपला स्तुत्य उद्योग असा निरंतर चालावा आणि त्यांत आपणास उमोप यश परमेश्वरानें द्यावें असें मी मनापासून इच्छितों.

" मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें " या पुस्तकाचे कर्ते **रा. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे** बी. ए. हे लिहितात–तुमच्या " **भारतवर्षीय युवतिरत्नमाला** " या पुस्तकाचा कांहीं भाग मीं वाचून पाहिला. तुमची भाषापद्धति अत्यंत साधी असूनही तिच्यांत वक्तृत्वशक्ति ओतप्रोत भरली आहे. तुम्ही कांहीं मूलशोधनाविषयीं आपला हक्क सांगत नाहीं; तर प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें बंगाली आणि हिंदी ग्रंथकारांचें अनुकरण करून खरोखरच अत्यंत वाचनीय असें एक नवीन पुस्तक निर्माण केलें आहे. महाराष्ट्रीय स्त्रीवाचकांस तें योग्य रीतीनें पसत् पडेल, असें मला वाटतें.

**रा. रा. श्रीनिवास त्र्यंबक द्रविड**, बी. ए. एल्. एल्. बी. हे लिहितातः–तुमचा '**भारतवर्षीय युवतिरत्नमाला**' नामक प्रसिद्ध हिंदु स्त्रियांच्या संक्षिप्त चरित्रांचा संग्रह फारच बहारदार वठला आहे आणि तुमची भाषापद्धति उत्तम प्रकारचा ठसा उमटविणारी आहे.

**रा. रा. हरी शिवराम मुंजे** बी. ए. म्यूर सेंट्रल कॉलेज

... हे लिहितातः–' भारतवर्षीय युवतिरत्नमाला'
... वाचीत असतां मला फारच समाधान वाटलें. ... त्यांची भाषा साधी, सुंदर व सरळ अशी आहे. यांतील अनेक प्रसिद्ध स्त्रियांचीं चरित्रें जरी प्रथमतः फारच संक्षिप्त आहेत असें वाटतें, तरी लक्ष्यपूर्वक अवलोकन केलें असतां असें दिसून येईल कीं, तीं फार श्रमानें आणि विचारपूर्वक लिहिलीं आहेत. ग्रंथकार सर्वांच्या उत्तेजनास आणि उदार आश्रयास पात्र आहेत.

... रा. विनायक रामचंद्र जोशी बी. ए. संपादक "सुधारक" यांचा अभिप्रायः—

"भारतवर्षीय युवतिरत्नमाला" या पुस्तकाचा ... भाग आमचेकडे अभिप्रायार्थ आला आहे. यांत हिंदुस्थानच्या इतिहासांतील प्रसिद्ध राजपूत घराण्यांतील विख्यात बाणेदार स्त्रियांचीं चरित्रें ग्रंथित केलीं आहेत. सध्यां प्रसिद्ध झालेल्या संग्रहांत अहिल्याबाई होळकरणीचेंही चरित्र आहे. राजपूत स्त्रियांच्या चरित्रांत शौर्य, वीरश्री, इत्यादि रणांगणावर शोभा देणारे गुण पाहून मन थक्क झाल्यावांचून राहत नाहीं. तथापि आहल्याबाईसारख्या सत्वशील व शांत वृत्तीच्या अल्पवयी विधवा स्त्रीनें नाना तऱ्हेच्या संकटांतून निभावून अपणास व आपल्या कुलास थोरवी आणिली. तिचें चरित्र संसारांतील सामान्य स्त्रियांस विशेष उपयोगी पडण्यासारखें आहे. पुस्तकाची भाषा सोपी व स्त्रियांस समजण्यासारखी आहे. छपाई उत्तम आहे. पुस्तक तयार ... म्हणजे स्त्रियांनीं अवश्य संग्रहीं ठेवण्यासारखें आहे.

प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे एम्. ए. संपादक "काळ" यांचा अभिप्राय "भारतवर्षीय-युवतिरत्नमाला" पुस्तकाचा जो भाग आमच्याकडे आला आहे. त्यावरून

पाठ्शाळां हें पुस्तक कुलीन स्त्रीपुरुषांच्या व लहान मुलींच्या हा झाला. तांत ठेवण्यायोग्य होत आहे असें आह्मांस वाटतें. या योजना हासप्रसिद्ध अशा पतिव्रता, धर्मपरायण, मुत्सद्दी, व राजकारण पटु स्त्रियांचीं मनोहर चारित्रें येत आहेत. तीं त्रोटक व आटपशीर असून साध्या, सरळ व शुद्ध भाषेनें लिहिलेलीं आहेत.

नागपूर येथील " देशसेवक " नामक वर्तमानपत्राच्या विद्वान् संपादकांचा अभिप्राय.

" या पुस्तकांत विशेषतः पत्येकनिष्ठ व प्रतापी अशा स्त्रियांचीं चरित्रें चटकदार भाषेंत दिलीं आहेत. व ग्रंथकारास मुख्य हेतु स्त्रियांच्या वाचनास योग्य आणि पातिव्रत्यादि गुणांचा ठसा उमटविणारें पुस्तक व्हावें असा असून तो पुष्कळसा सफळ झाला आहे, असें आम्हांस वाटतें...

मराठी भाषेंत नव्या व जुन्या अशा दोन्ही सांप्रदायाच्या लोकांच्या मतें स्त्रियांनीं वाचण्यालायक अशीं पुस्तकें फार विरळा. पण अशा विरळ पुस्तकांतही हें पुस्तक वरच्या प्रतीचें आहे असें आमचें मत आहे. आपली संस्था जोमदार व प्रमाणनिष्ठ व्हावी अशी ज्या कुटुंबनायकाची इच्छा असेल त्यानें ही रत्नमाला आपल्या नित्य-मंगलमयी गृहदेवतेच्या अवश्य स्वाधीन करावी."

रा. रा. " नेटिव्ह ओपिनियन "कर्ते यांचा अभिप्रायः- सदरहू पुस्तकास रा. चितळे यांनीं " भारतवर्षीय युवतिरत्नमाला " असें नामाभिधान दिलें आहे. रत्नांस मराठी भाषेचें कोंदणही फार चांगलें घातलें आहे. कोंदणाचा घाट साधा, सुबक आणि सरळच, परंतु मोठा चित्ताकर्षक आहे.

५८२८

ती म्हणे, " मीं जें काय करावयास पाहिजे होतें तें परमेश्वरानें केलें. ज्या अर्थीं माझें कर्तव्य त्यानें बजाविलें आहे, त्याअर्थीं त्यानें जें करावयास पाहिजे होतें तें आतां मला केलें पाहिजे. " या तिच्या म्हणण्याचा अर्थ त्या वेळीं कोणासही उमगला नाहीं. आणि ज्या वेळेस तो उमगला त्या वेळीं त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण, असामान्या घरांतील लोकांचा डोळा चुकवून कोणीकडे निघून गेली याचा कोणास थांगही लागला नाहीं.

तिच्या मनांत असें आलें कीं, " माझ्या पतीचा प्राणघात करणाऱ्या मनुष्यास मजकडून शासन व्हावयास पाहिजे होतें, त्याच्या दुष्कृत्यांचा सूड मीं घ्यावयास पाहिजे होता, व त्याचा देह माझे हातून छिन्नविच्छिन्न व्हावयास पाहिजे होता. परंतु या सर्व गोष्टी माझे ऐवजीं परमेश्वराकडूनच घडून आल्या आहेत. वस्तुतः अमोघ दयावान् परमेश्वरानें त्याचें संरक्षण करणें योग्य होतें. ज्या अर्थीं तो दुराचारी आणि मूढ होता, त्या अर्थीं त्यानें त्यावर प्रीति करून त्याचें भलें करावयाला पाहिजे होतें. परंतु, ज्या अर्थीं त्यानें तसें केलें नाहीं, त्या अर्थीं तें काम त्यानें मजकरितां राखून ठेविलें असावें, हीच गोष्ट खरी. तें काम आतां मला केलें पाहिजे. " असा विचार मनांत येऊन तिनें आपलें घर सोडिलें होतें. आतां ती सुराजउद्दौल्याचें बरें काय करणार ? तो बिचारा भूगर्भांत पडून त्याच्या अस्थि मृत्तिकेशीं मिळत चालल्या आहेत ! तथापि, ज्याचें चांगलें केलें असतां सुराजउद्दौल्याचेंच चांगलें

केल्याप्रमाणें आहे, असा कोणी तरी प्राणी या जगावर असला पाहिजे; व त्याचेंच कल्याण करण्याकरितां आपण झटावें, असा असामान्येच्या मनाचा दृढनिश्चय झाला.

ती प्रथमतः भागबंगाला येथें आली. तेथें आल्यावर तिची इच्छा पूर्ण होण्याजोगी एक हकीकत तिला कळली. सुराजउद्दौला जेव्हां मुर्शिदाबाद सोडून पळाला होता, तेव्हां त्याच्या हजारों परिचारक आणि सुहृदमंडळीपैकीं फक्त एक प्राणी त्याच्या दुःखद स्थितीचा भागीदार झाला होता. हा प्राणी कोण म्हणाल तर त्याची सर्वथा अवहेलना केलेली विवाहित स्त्री मेहेरुनशा बेगम होय. सुराजउद्दौला तिला गुल ( पुष्प ) ह्मणत असे. त्या नरपशूनें आपल्या बदफैलीपणाच्या नादांत तिची अत्यंत हेटाळणी करीत असावें; परंतु, गुलनें अखेरपर्यंत त्याची संगति सोडिली नाहीं. ती या वेळीं केवळ सोळा वर्षांची तरुणी होती व तिला या वेळपर्यंत दुःखाचा संसर्गही लागला नव्हता. परंतु, आपल्या पतीच्या संकटकाळीं ती त्याजबरोबर रानावनांतून आणि डोंगरदरींतूनही धांवा घेण्यास कचरली नाहीं. भागबंगाला येथें असतां ती प्रसूत होऊन तिला एका सुंदर कन्यारत्नाची प्राप्ति झाली; व या प्रसंगामुळेंच सुराजउद्दौला यास तेथें मुक्काम करावा लागून तो शत्रूंच्या तावडींत सांपडला, व शेवटीं प्राणास मुकला. आपल्या लोकांच्या समजुतीप्रमाणें ती कन्या जणूं काय त्याचे मुळावर जन्मास आली होती ! अथवा असें म्हणण्यापेक्षां परमेश्वरानें तो नराधम या जगांतून

अजीबात नाहींसा व्हावा म्हणून ती कृत्याच त्याचे पोटीं जन्मास घातली, असें म्हटल्यास काय हरकत आहे ! असो. वरील हकीकत समजतांच असामान्या तिच्या शोधास लागली. गुलनें एका गरीब बाईच्या घरांत प्रथमतः आश्रय घेतला होता. परंतु, आपणाविषयीं कोणी बारकाईनें चौकशी करीत आहे, असें समजतांच ती तेथून निघून दिल्लीच्या मार्गास लागली. मग गुल पुढें आणि असामान्या पाठीमागें अशा त्या दोघीजणी एकसारख्या पळत होत्या. गुलला वाटे कीं, ज्यांनीं आपल्या पतीचा प्राणघात केला, त्यांच्यापैकींच कोणी आपला व आपल्या लेंकराचा घात करण्याकरितां आपल्या मागें धांवत आहे. इकडे असामान्येचा हेतु त्याच्या अगदीं उलट होता, हें उघडच आहे. पळतां पळतां एके दिवशीं ऐन तुफानाचा वारा सुटून गंगानदीचें पात्र खवळून गेलें असतां गुल तेथें आली. पाठीमागें असामान्या होतीच. वेळ अशी भयंकर होती कीं, त्या वेळीं एकही नावाडी गंगेंत नाव घालण्यास तयार होईना. शेवटीं गुलनें आपल्या हातां-तील मूल्यवान् अंगठी एका नावाड्यास देऊन त्याजकडून गंगेंत नाव घालविली. गुल नावेंत बसून पलीकडच्या तीरास जावयास निघाली तों मोठमोठ्या लाटा उसळून नौका पाण्यावर जोरानें हेलकावे खाऊं लागली. इकडे असामान्या तीरावर येऊन पाहते तों गुल नावेंत बसून पैलतीरास जाण्या-करितां निघाली असून, ती नाव अगदीं बुडण्याच्या बेतांत आहे. जिचें कल्याण करण्याच्या उद्देशानें ती तिचा पाठलाग

करीत होती ती अखेर त्या खवळलेल्या गंगाप्रवाहींत नौका बुडून प्राणास मुकली. जणों गंगामातेनें तिच्या सद्वर्तनास्तव तिला आपल्या उदरांत ठाव दिला ! नौका बुडालेली पाहतांच असामान्या पाण्यांत उडी टाकून, ज्या स्थळीं नौका बुडाली होती त्या स्थळीं आली. तिला चांगलें पोहतां येत असल्यामुळें तिनें गुलचे केश धरून तिला लाटेच्या जोरावर किनाऱ्यापर्यंत ओढून काढिलें. बिचारी गुल तर गतप्राण झालीच होती, परंतु तिचें तें उराशीं घट्ट धरून ठेविलेलें लेंकरूं मात्र अद्याप जिवंत होतें. खरोखर परमेश्वराची करणी कांहीं अगाध आहे ! असामान्येनें तें लेकरूं घेऊन त्याची चांगली जोपासना केली व त्या कन्या-अर्भकाच्या शुश्रूषेंतच तिनें आपला पुढील काळ घालविला. वाचकहो, असामान्येची पुढील हकीकत फारशी माहीत नाहीं, व ती विशेष मनोरंजक असण्याचाही संभव नाहीं. ती त्या मुलीसह बंगालच्या पूर्वेकडील भागात कोठेंशी रहात होती. तिकडील भागांतील लोक अद्याप तिची एखाद्या देवतेप्रमाणें पूजाअर्चा करितात, असें कळतें.

दृढनिश्चयाचें फळ असेंच असतें. असामान्येच्या इच्छेप्रमाणें शेवटीं सुराजउद्दौल्याच्या कन्येचें लालनपालन करून तिचे मनोरथ पूर्ण होण्याचा योग जुळून आला हें केवळ तिच्या दृढनिश्चयाचें आणि दीर्घ प्रयत्नाचें फळ होय.

---

# रत्न पंधरावें.

## राणी भवानी.

बंगालप्रांतामध्यें ज्या कित्येक राजकार्यधुरंधर वीर्यशालिनी आणि सद्धर्मपरायण अशा स्त्रिया होऊन गेल्या, त्यांत नटोर राज्याची स्वामिनी राणी भवानी ही अत्यंत प्रख्यात होय. ज्याप्रमाणें पराक्रमी मराठ्यांच्या इतिहासांत होळकरकुलशोभा राणी अहल्याबाई हिनें आपलें नांव अक्षय करून ठेविलें आहे, त्याप्रमाणेंच राणी भवानी हिनेंही बंगालच्या इतिहासांत आपलें नांव अक्षय करून ठेविलें आहे. अशा त्या महिमावती स्त्रीचें संक्षिप्त चरित्र पुढें दिलें आहे.

बंगालप्रांत मुसलमानांच्या ताब्यांत असतांही तेथिल कित्येक राजे व जमीनदार हेच त्या सर्व प्रांताचे खरे राज्यसूत्रचालक असत. ते सर्व स्वतंत्र व सामर्थ्यवान् असून त्यांच्या ताब्यांत सैन्यही चांगलें असे. फक्त त्यांच्यावर दिल्लीपतीचें सार्वभौमत्व असल्यामुळें त्याच्या सुभेदारास खंडणी देणें त्यांस भाग पडत असे. दिल्लीपतीचा ह्या प्रांतावरील सुभेदार मुर्शीदाबाद येथें रहात असे. वस्तुतः तो बंगालचा नबाबच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, त्याच्या राजकार्यचातुर्यावर बंगाल प्रांतांतील बादशाही अंमल अवलंबून असे.

करीत होती ती अखेर त्या खवळलेल्या गंगाप्रवाहांत नौका बुडून प्राणास मुकली. जणों गंगामातेनें तिच्या सद्वर्तनास्तव तिला आपल्या उदरांत ठाव दिला ! नौका बुडालेली पाहतांच असामान्या पाण्यांत उडी टाकून, ज्या स्थळीं नौका बुडाली होती त्या स्थळीं आली. तिला चांगलें पोहतां येत असल्या-मुळें तिनें गुलचे केश धरून तिला लाटेच्या जोरावर किना-ऱ्यापर्यंत ओढून काढिलें. बिचारी गुल तर गतप्राण झालीच होती, परंतु तिचें तें उराशीं घट्ट धरून ठेविलेलें लेंकरूं मात्र अद्याप जिवंत होतें. खरोखर परमेश्वराची करणी कांहीं अगाध आहे ! असामान्येनें तें लेकरूं घेऊन त्याची चांगली जोपा-सना केली व त्या कन्या-अर्भकाच्या शुश्रूषेंतच तिनें आपला पुढील काळ घालविला. वाचकहो, असामान्येची पुढील हकी-कत फारशी माहीत नाहीं, व ती विशेष मनोरंजक अस-ण्याचाही संभव नाहीं. ती त्या मुलीसह बंगालच्या पूर्वेकडील भागांत कोठेंशी रहात होती. तिकडील भागांतील लोक अद्याप तिची एखाद्या देवतेप्रमाणें पूजाअर्चा करितात, असें कळतें

दृढनिश्चयाचें फळ असेंच असतें. असामान्येच्या इच्छे-प्रमाणें शेवटीं सुराजउद्दौल्याच्या कन्येचें लालनपालन करून तिचे मनोरथ पूर्ण होण्याचा योग जुळून आला हें केवळ तिच्या दृढनिश्चयाचें आणि दीर्घ प्रयत्नाचें फळ होय.

---

# रत्न पंधरावें.

## राणी भवानी.

बंगालप्रांतामध्यें ज्या कित्येक राजकार्यधुरंधर वीर्यशालिनी आणि सद्धर्मपरायण अशा स्त्रिया होऊन गेल्या, त्यांत नटोर राज्याची स्वामिनी राणी भवानी ही अत्यंत प्रख्यांत होय. ज्याप्रमाणें पराक्रमी मराठ्यांच्या इतिहासांत होळकरकुलशोभा राणी अहल्याबाई हिनें आपलें नांव अक्षय करून ठेविलें आहे, त्याप्रमाणेंच राणी भवानी हिनेंही बंगालच्या इतिहासांत आपलें नांव अक्षय करून ठेविलें आहे. अशा त्या महिमावती स्त्रीचें संक्षिप्त चरित्र पुढें दिलें आहे.

बंगालप्रांत मुसलमानांच्या ताब्यांत असतांही तेथील कित्येक राजे व जमीनदार हेच त्या सर्व प्रांताचे खरे राज्यसूत्रचालक असत. ते सर्व स्वतंत्र व सामर्थ्यवान् असून त्यांच्या ताब्यांत सैन्यही चांगलें असे. फक्त त्यांच्यावर दिल्लीपतीचें सार्वभौमत्व असल्यामुळें त्याच्या सुभेदारास खंडणी देणें त्यांस भाग पडत असे. दिल्लीपतीचा ह्या प्रांतावरील सुभेदार मुर्शिदाबाद येथें रहात असे. वस्तुतः तो बंगालचा नबाबच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, त्याच्या राजकार्यचातुर्यावर बंगाल प्रांतांतील बादशाही अंमल अवलंबून असे.

बंगालचे मांडलिक राजे व जमीनदार हे अत्यंत प्रबल असल्यामुळें ते केव्हां स्वतंत्र होतील, व केव्हा खंडणी देण्याचें नाकारतील, ह्याचा नियम नसे. अनेक वेळां तसले प्रसंग घडूनही येत.

गेल्या शतकाच्या अखेरीस बंगाल प्रांतांतील मुसलमानी राजसत्ता अगदीं डळमळीत होऊन कोसळण्याच्या बेतास आली होती. दिल्लीचा बादशहा केवळ नामधारी झाला असून, त्याचे सुभेदार व सरदार यांनीं त्याचें वर्चस्व झुगारून देऊन ते आपणच स्वतंत्र राजे म्हणवूं लागले होते. अशांपैकीं बंगालचा सुभेदार हाही एक होता. परंतु त्याचे पायही ठिकाणावर नसून त्याच्या ताब्यांतील मांडलिक राजे उत्तरोत्तर स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करीत होते. बंगालचा प्रतापी मुसलमान सुभेदार अलिवर्दीखान परलोकवासी होऊन त्याचा तरुण नातु नबाब सुराजउद्दौला हा त्याचे गादीवर बसला. अलिवर्दीखानानें मोठ्या प्रयासानें आपल्या अंगच्या राजकारस्थानीपणाच्या जोरावर बंगालच्या राजे लोकांस आपलें अंकित करून घेतलें होतें; परंतु, खरें पाहिलें असतां तेथील सत्ता तेथील पुढारी राजेलोकांचे हातांत होती. ह्या राजांमध्यें कृष्णनगरचा राजा कृष्णचंद्र, डाक्काचा राजा राजवल्लभ, पाटणाचा राजा रायदुर्लभ आणि नटोरची राणी देवी भवानी हीं चार माणसें सर्वांत श्रेष्ठ आणि सामर्थ्यवान होतीं. या चौघांशिवाय दुसरे दोन वजनदार पुरुष बंगाल प्रांतांतील सर्व कारस्थानांमध्यें प्रमुख होते. ह्यांचीं नांवें

जगत्शेट व मिरजाफर अशीं होतीं. ह्यांपैकीं जगत्शेट मोठा प्रतिष्ठित सावकार असून मिरजाफर यवनसेनेचा मुख्य अधिपति होता. ह्या सहा मंडळींच्या हातीं बंगालचा राज्यकारभार असून पुढें त्यांच्या आपसांतील घातक दुहीमुळें तो सारा कारभार अचानक परस्थ इंग्रज लोकांच्या हातीं गेला ! असो. ह्या वर सांगितलेल्या कारस्थानी मंडळींपैकीं राणी भवानी इचा आपल्या प्रस्तुतच्या लेखाशीं संबंध आहे.

राणी भवानी ही बंगाल्यांतील राजशाही परगण्यांत असलेल्या छातिम नांवाच्या गांवीं कोणीएक आत्माराम चौधरी नांवाचा गृहस्थ रहात असे त्याची कन्या, आणि नटोर राज्यांची स्वामिनी होती. राणी भवानीच्या अगत्य, शील, सौजन्य आणि सौंदर्यादि अप्रतिम गुणांवर लुब्ध होऊन नटोरचा जमीनदार राजा रामजीवन यानें आपल्या रामकांतनामक पुत्राशीं तिचा विवाह करून घेतला होता. नटोरचें राज्य चांगलें विस्तृत असून त्याजकडून बंगालच्या नबाबास बावन लक्ष नुसती खंडणी मिळत असे. ह्यावरून राज्याचें उत्पन्न ह्यापेक्षां पुष्कळच पटीनें जास्त असलें पाहिजे हें उघड आहे. तें सरासरीनें दीड कोट रुपयांचें होतें ! शिवाय, पन्नास हजार सैन्य संस्थानच्या पदरीं होतें त्याचा खर्च वेगळा. एवढ्या मोठ्या राज्याचें स्वामित्व राजा रामकांत ह्याच्याकडे होतें. प्रस्तुत विषयनायिका राणी भवानी ही राजा रामकांत ह्याची प्रियपत्नी होय, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. रामकांत हा आपल्या बापाच्या पश्चात् अगदीं

तरुण असतांनाच नटोर राज्याचा मालक झाल्यामुळें, जगांतील सर्वसाधारण नियमाप्रमाणें तो विलास आणि व्यभिचार या दोन राक्षसी प्रवाहांच्या भोंवऱ्यांत सांपडला. त्याच्या बापाचा जुना दिवाण दयाराम म्हणून नांवाजलेला मुत्सद्दी होता. त्यानें ह्या ऐषआरामांत आणि विषयरंगांत गुंगलेल्या राजेसाहेबांस ताळ्यावर आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो अगदीं निष्फळ झाला! रामकांताची सुशील आणि तरुण पत्नी राणी भवानी हिनें आपल्या पतीस अनेक प्रकारांनीं विनवून व वारंवार नेत्रांत आंसवें आणून त्यास व्यसनपंकांतून काढण्याचा प्रयत्न केला, पण तोही अगदीं विफळ झाला! अविचार आणि मोह ह्यांनीं त्याजवर आपला पगडा चांगलाच बसविल्यामुळें त्यास दुर्दैवपिशाचिका अधिकाधिक बाधा करूं लागली. त्यानें आपला जुना प्रधान दयाराम यास राज्यांतून घालवून दिलें. राज्यांतील द्रव्यभांडार केवळ विलासांत उडून गेल्यामुळें सैन्यास वेळेवर पगार मिळेनासा झाला व त्या योगानें राज्याचा बंदोबस्त कमी झाला. बंगालच्या नबाबास त्याजकडून वेळेवर खंडणी मिळेनाशी झाली. इकडे दयारामाचें मन दुखविल्यामुळें त्यानें ही नटोरची हकीकत कळवून नबाबाचे कान भरले! तेव्हां नबाबाकडून सैन्य घेऊन त्यानें राजा रामकांत ह्यास पदच्युत केलें, आणि दुसऱ्या एका इसमास नटोरच्या गादीचा मालक बनविलें. बिचारा रामकांत शेवटीं आपल्या धर्मपत्नीस बरोबर घेऊन मुर्शिदाबाद येथें पळून गेला; व तेथील प्रसिद्ध सावकार जगत्शेट

याच्या आश्रयास जाऊन राहिला.

मुर्शिदाबाद येथें गेल्यानंतर राजा रामकांत यास पुष्कळ पश्चात्ताप झाला. आपण विषयांध बनून सर्व राज्यलक्ष्मीचा नाश केला ह्याबद्दल त्याला फार वाईट वाटूं लागलें. राज्यच्युत झाल्यामुळें प्राप्त होणारीं विविध संकटें आणि निराशा ह्यांनीं त्याच्या अंतःकरणास अगदीं व्यग्र करून सोडिलें. आतां त्याचे डोळे चांगलेच उघडले, व आपल्या बुद्धिमती आणि चारुशीला अशा प्रियतमेचा उपदेश आपण ऐकिला नाहीं, त्याचें हें सर्व फळ होय असें वाटून, तो आपल्या सुशील भार्येस शरण गेला व त्यानें तिच्या आज्ञेंत राहण्याचा संकल्प केला. राणी भवानी ही फार चतुर स्त्री होती. तिनें आपल्या पतीस धैर्य देऊन दुर्दैवानें प्राप्त झालेल्या संकटांतून मुक्त होण्याचा प्रयत्न चालविला. स्त्रियांची बुद्धि फार लोकोत्तर असते. सुवर्णरेषेची परीक्षा करण्याकरितां ज्याप्रमाणें निकषप्रयोगाची अवश्यकता असते, त्याप्रमाणेंच स्त्रीबुद्धीचें तेज प्रकाशित होण्यास संकटप्रसंगच विशेष कारणीभूत होतात. अशा वेळीं प्रचंड वादळानें खवळून गेलेल्या महासागरांतील कर्णधाराप्रमाणें त्या मोठ्या धैर्यानें आपली बाजू कशी सांभाळतात, हें पहाणें मोठें मजेचें असतें. राजा रामकांत व्यसनार्णवांत सांपडून सर्व राज्य गमावून बसला असतां व त्याच्या हातांत काडीचीही सत्ता राहिली नसतां अबला म्हटलेल्या त्याच्या स्त्रीनें नटोरचें राज्य पुन्हां मिळविण्याचा प्रयत्न करावा, ही किती आश्चर्यकारक गोष्ट आहे बरें?

राणी भवानी हिनें आपली नष्ट झालेली राज्यलक्ष्मी परत मिळविण्याचा प्रयत्न मोठ्या युक्तीनें चालविला. नटोरच्या गादीचा स्वामिनिष्ठ सेवक वृद्ध दयाराम जो तिची राज्यलक्ष्मी नाहींशी करण्यास कारण झाला होता, त्यास तिनें पाचारण केलें व त्याची चांगली कानउघाडणी करून त्याच्या सल्ला-मसलतीनें नबाबाच्या दरबारांत राजकारण चालविलें. ह्या वेळीं बंगालच्या नबाबसाहेबांचा सर्व दरबार अक्कलशून्य आणि लांचखाऊ मंत्रिमंडळीनेंच विराजित झाला असल्यामुळें तेथें थोडासा लांच दिला कीं वाटेल तो कार्यभाग होत असे. राणी भवानीनें हें धोरण लक्ष्यांत आणून आपल्या अंगा-वरील सर्व रत्नालंकार व जडजवाहीर विकून टाकिलें, व नबाबाच्या मंत्रिमंडळाकडे संधान बांधून नटोरची गादी मिळविण्याचा प्रयत्न केला. या तिच्या प्रयत्नास तात्काळ यश येऊन, राजा रामकांत ह्यास नटोरची गादी पुन्हा देण्या-बद्दल नबाबसाहेबांनीं हुकूम फर्माविला, व थोड्याच अव-काशामध्यें तो आपल्या प्रियपत्नीसहवर्तमान नटोरनगरीमध्यें पूर्ववत् स्वराज्याच्या उपभोग घेऊं लागला.

राणी भवानीच्या बुद्धिचातुर्यानें राजा रामकांत ह्यास पुन्हां स्वराज्य प्राप्त झालें. परंतु, त्याचा उपभोग घेण्यास तो फार दिवस जगला नाहीं. नटोरास येऊन राज्यारूढ झाल्यानंतर राणी भवानीच्या दुर्दैवानें त्यावर लवकरच मृत्यूचा घाला पडला; व सर्व राज्यकारभाराचा भार आपल्या पत्नीच्या शिरावर टाकून तो परलोकीं गेला. स्त्रियांचें सुखसर्वस्व किंब-

हुना जीवितसर्वस्व काय तो त्यांचा पति. त्याचा वियोग झाला ह्मणजे त्यांची काय अवस्था होत असेल ह्याची कल्पनाच केली पाहिजे ! राणी भवानी मोठी राजकार्यकुशल व धीराची बायको खरी; परंतु, पतिवियोगदुःखानें तिचें अंतःकरण विव्हल होऊन गेलें. तशांत तिचे दोन पुत्र बालपणींच निवर्तल्यामुळें तिला पुत्रसुखाचीदेखील आशा राहिली नव्हती. तरी तिनें आपला सर्व शोक आवरून धरून नटोर संस्थानचा कारभार आपल्या शिरावर घेतला, आणि होळकरकुलभूषा देवी अहल्येप्रमाणें आपल्या विस्तृत राज्यांतील सर्व प्रजेस सुखी व संतुष्ट ठेवण्याचा क्रम आरंभिला. खरोखर, मागें दिलेलें देवी अहल्येचें चरित्र आणि प्रस्तुतचें हें राणी भवानीचें चरित्र या दोन्ही चरित्रांमध्यें जें विलक्षण तऱ्हेचें साम्य दिसून येतें तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. असो.

नटोरचीं सर्व राज्यसूत्रें राणी भवानी हिच्या हातांत आल्यानंतर तिला असें वाटूं लागलें कीं, सध्यांच्या बंगालच्या नबाबाच्या कारकीर्दींत स्वराज्याचें संरक्षण करण्यास पुष्कळ सैन्य ठेविलें पाहिजे; त्यावांचून दुसरा मार्ग नाहीं ! हिंदुस्थानच्या इतिहासाच्या वाचकांस, त्या वेळीं बंगालप्रांतावर राज्य चालवीत असलेला नबाब सुराजउद्दौला हा किती मूर्ख होता हें निराळें सांगावयास नको. त्यानें पूर्वजार्जित सर्व द्रव्य विषयरंगांत उधळून टाकून आपल्या मांडलिक राजांपासून करभाराच्या रूपानें काढवेल तितका पैसा काढण्याकरितां त्यांच्यावर एकसारखा जुलूम चालविला होता. जे मांडलिक राजे

त्यास शरण येऊन आपलें द्रव्यभांडार त्याच्या स्वाधीन करीत नसत, त्यांचे हालहाल होऊन त्यांना मृत्युपंथ सुधरावा लागत असे.

राणी भवानी ही फार धूर्त बायको होती. तिला, ह्या जुलुमाचा परिणाम फार भयंकर होऊन बंगाल प्रांतामध्यें कांहींतरी राज्यक्रांति होईल, अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं, व त्यावरून मुसलमानी राज्यसत्ता नाहींशी होणार असें भविष्य तिनें करून ठेविलें होतें. खरोखर बंगालमध्यें पुन्हां हिंदुस्वराज्य प्रस्थापित करण्यासारखा हा योग होता यांत संशय नाहीं. राणी भवानी ही आपलें सामर्थ्य पाहून चालणारी बायको होती. तिला सर्व बंगालचें स्वामित्व मिळविण्याची मुळींच इच्छा नव्हती. तथापि त्या स्वामित्वाबद्दल बंगालप्रांतामध्यें एक भयंकर रणकंदन माजणार असें तिला वाटत होतें. तेव्हां त्यांतून आपला बचाव करून घेण्यासाठीं तिनें अगोदरपासून स्वसैन्याची चांगली सुधारणा केली; एवढेंच नव्हे, पण बंगाल्यांतलि सर्व सैन्यामध्यें तें अग्रगण्य करून सोडिलें.

राणीच्या युद्धकौशल्याची आणि तिच्या पराक्रमी सैन्याची परीक्षा पहाण्याची वेळ लौकरच आली. राणी भवानी हिला तारा नांवाची एक सुस्वरूप कन्या होती. तिचा पति बालपणींच परलोकवासी झाल्यामुळें ती आपल्या आईजवळच रहात असे. तिच्या अलौकिक रूपलावण्याची कीर्ति दूरवर पसरून तिच्या वैधव्यदग्धावस्थेंतही तिच्या प्राप्तीची राजेलोकांस लालसा उत्पन्न झाली; एवढेंच नव्हे तर, कांहीं उप-

द्यापी नराधमांनीं बंगालच्या नबाबास तिचा लावण्यमहिमा निवेदन करून त्याला मोहित करून सोडिलें. त्यानें तिच्या सौंदर्यास भुलून जाऊन, तिला हस्तगत करून घेऊन यावें म्हणून आपल्या सैन्यास हुकूम दिला. कोण हा अविवेक! व काय ही विषयलोलुपता! नबाबसाहेबांचा असा हुकूम सुटतांच दरबारी लोकास चांगलेंच फावलें. त्यांनीं प्रथमतः राजकन्येची मागणी करण्याकरितां राणी भवानीकडे एक दूत पाठविला. तो नटोरास गेल्यानंतर त्याची ती चमत्कारिक मागणी ऐकतांच राणी क्रोधानें संतप्त होऊन तिचें आपादमस्तक सर्व शरीर खदिरांगारासारखें तांबडेंलाल झालें. तिला असला अपमान कोठून सहन होणार? तिनें तात्काळ आपल्या लोकांस हुकूम करून त्याचा शिरच्छेद करविला. वाचकहो, असला अपमानकारक निरोप घेऊन येणारास जिवंत परत जाऊं देण्याइतकी निस्तेजता नटोरच्या स्वामिनीमध्यें त्या वेळीं आलेली नव्हती.

हें वर्तमान नबाबाच्या दरबारांत कळलें, व अनायासें नटोरवर स्वारी करून, तेथील खजीना लुटण्यास हें चांगलें निमित्त होऊन, नबाबाचें सैन्य राणी भवानीकडे रवाना झालें. बंगालप्रांताचा नबाब म्हणजे पूर्वहिंदुस्थानांतील एक मोठेंच बंड होतें. तेव्हां त्याचें सैन्य आपणावर चाल करून येत आहे असें समजतांच, राणी भवानीस केवढें संकट वाटलें असेल बरें? पण छे! तेजस्वी क्षत्रियबीजास हें संकट कसलें! उलट त्यास समरभूमीवर शत्रूशीं लढाई करण्यांत भूषणच

वाटतें. राणी भवानी ही अशाच रणशूर रत्नापैकीं एक होती. नबाबाचें सैन्य आपणावर रवाना झालें आहे असें समजतांच तिनें आपलें सर्व सैन्य एकत्र केलें, व त्याचें आधिपत्य स्वतः स्वीकारून ती नबाबाच्या सैन्याशीं टक्कर देण्यास सिद्ध झाली. नबाबाचें सैन्य नटोर राजधानीवर हल्ला करण्याकरितां समीप येत आहे, तोंच तिनें आपली सेना त्याच्या तोंडावर नेली, व मोठ्या निकरानें त्याच्या अघाडीवर मारा करून त्याची दाणादाण करून सोडिली. मुसलमान सैन्याची व नटोरच्या सैन्याची कांहीं वेळ खडाजंगी उडाली. शत्रूकडील लोकांनीं आपल्या युद्धकौशल्याची कमाल केली. परंतु, राणी भवानीच्या विचित्र रणावेशापुढें त्यांचा कांहीं उपाय चालला नाहीं. तिच्या दुःसह माऱ्यास जेर येऊन नबाबाच्या सैन्यानें पळ काढिला, व राणी भवानीस विजय प्राप्त झाला. मुसलमानी सैन्य मुर्शिदाबादेकडे पळूं लागलें; परंतु, राणी भवानीच्या सैन्यानें मोठ्या वीर्योत्साहानें त्याचा दूरवर पाठलाग करून त्याची अगदीं वाताहात केली, व त्यायोगें सर्व वंगदेशामध्यें राणी भवानीच्या शौर्याची आणि समरधीरतेची कीर्ति प्रसृत झाली.

नबाबाच्या सैन्यास राणी भवानीकडून अपयश प्राप्त झालें, असें नसून सर्व बंगाल प्रांतांतील मांडलिक राजे त्याच्या विरुद्ध असल्यामुळें त्या सर्वांनींही त्याच्या सैन्याची जागोजाग अशीच दाणादाण उडवून दिली; त्यामुळें नबाबाची सर्व शक्ति नाहींशी झाली. अशी संधि साधून त्यास पद-

च्युत करण्याचा विचार वंगदेशांतील मुख्यमुख्य राजेलोकांनीं सुरू केला. राजा कृष्णचंद्र, राजा राजवल्लभ, राजा रायदुर्लभ व जगत्शेट ह्यांनीं कांहीं खलबत करून नबाबाच्या सैन्यावरचा मुख्य अधिपति मिरजाफर ह्यास गादीवर बसविण्याचा संकल्प केला, आणि राणी भवानीस तत्प्रीत्यर्थ पाचारण केलें व तिचें मत विचारिलें. राणी मोठी बाणेदार असून तिच्या मनांतून वंगदेशावर पुन्हां हिंदुसाम्राज्य व्हावें अशी फार इच्छा होती. तिनें त्या राजेलोकांस अशी विनंति केली कीं, सध्यांचा काल अनेक शतकें नष्ट झालेलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यास अतिशय अनुकूळ आहे. ह्या वेळीं जर एखाद्या हिंदुराजास अध्वर्युत्व देऊन त्यास सार्वभौम कराल तर फार उत्तम होईल. परंतु, तिची ही मसलत कोणास पसंत पडली नाहीं. बंगालच्या ह्या प्रमुख राजेलोकांमध्यें मत्सरभाव वागत असून त्यांना असें वाटत होतें कीं, आपल्यापैकींच जर कोणी सार्वभौम झाला व त्याच्या हातून राज्यचक्र यथास्थित चाललें नाहीं, तर ह्या वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत आपल्या भुजबलानें शत्रूस कर्दनकाळ भासणारे मराठे लोक तेव्हांच येऊन बंगालप्रांत खालसा करितील. ह्या भीतीनें त्यांनीं इंग्रजांचें साहाय्य घेऊन मिरजाफरास गादीवर बसविण्याचा बेत कायम केला. ह्या बेतास राणी भवानीची संमति नव्हती. ती फार धूर्त बायको होती. तिनें त्या वेळीं स्पष्ट बोलून दाखविलें होतें कीं, "इंग्रजांचें तुम्ही या वेळीं साह्य घेतां खर, परंतु कदाचित् सध्यां जुळून आलेली घडी विस

कडून आपली शक्ति कमी झाली म्हणजे तेच सत्ताधीश होतील, व त्यांच्या ताब्यांत सर्व प्रांत जाईल. ह्यापेक्षां मराठ्यांच्या ताब्यांत गेला तर काय वाईट आहे! ते आपल्या देशांतले तरी आहेत." हें राणी भवानीचें म्हणणें त्या वेळीं कोणास रुचलें नाहीं. ते म्हणाले "इंग्रज लोक केवळ व्यापारी आहेत, त्यांना आपल्या देशांतील राज्यकारभाराशीं काय कर्तव्य आहे? ते फक्त आपल्या विनंतीवरून आपणांस साहाय्य करणार." ह्याप्रमाणें संभाषणें होऊन शेवटीं इंग्रज लोकांच्या साह्यानें मिरजाफरास गादीवर बसविण्याचें ठरलें. असो. पुढें प्लासीची लढाई, मिरजाफराचें राज्यारोहण व पदच्युति, इंग्रजांचें बंगाल्यांत वाढत गेलेलें प्राबल्य, वगैरे गोष्टी इतिहासप्रसिद्धच आहेत. ह्या सर्व राज्यक्रांतीपासून राणी भवानी ही अलिप्त असून ती वारा वाहील तशी पाठ देऊन आपलें राज्य रक्षण करीत होती. तिनें वंगदेशाच्या उत्तरभागावर मोठ्या शहाणपणानें सुमारें अर्धशतक राज्य केलें, व आपल्या प्रजेस चांगलें सुख दिलें.

अखेरीस आपली इतिकर्तव्यता संपली असें पाहून तिनें दत्तक मुलगा घेऊन त्यास सर्व राज्याचा अधिकार दिला, व आपण पारलौकिक सुखप्राप्तीच्या उद्देशानें गंगातीरीं राहून ईश्वरभक्तींत कालक्रमण करण्याचा निश्चय केला. मुर्शिदाबादेपासून थोड्या अंतरावर वरच्या बाजूस तिनें एक राजवाडा बांधिला आहे व तेथें हळूं हळूं बरेंच मोठें शहर वसत चाललें आहे. या स्थळीं तिनें आपल्या अवशिष्ट आयुष्याचा

दानधर्मादि पुण्यकृत्यें करण्यांत व्यय केला. तिनें प्रतिवर्षी संस्कृत भाषेच्या उत्तेजनार्थ पुष्कळ द्रव्य दिलें, आणि असंख्य दीनजनांस अन्नदान केलें. वंगदेशामध्यें तिनें पुष्कळ ठिकाणीं देवालयें व धर्मशाळा बांधिल्या. काशीनगरीमध्यें राणी भवानीचें देवालय अद्यापि सुप्रसिद्ध आहे. एके ठिकाणीं असें लिहिलेलें ऐकण्यांत आहे कीं, ह्या साध्वीचा प्रतिवार्षिक दानधर्म सुमारें पंचवीस लक्षांचा होता.

ह्या पुण्यशील साध्वीनें आपलीं ऐहिक व पारमार्थिक संबंधाचीं कर्तव्यें उत्तम प्रकारें करून इसवी सन १८०३ त आपल्या वयाच्या ७९ व्या वर्षी परलोकवास स्वीकारला. या स्त्रीचें युद्धकौशल, राजकार्यधुरंधरत्व, पातिव्रत्य आणि धर्माचरण हीं सर्व अगदीं अहल्याबाईच्या तोडीचीं होतीं. तिच्या पश्चात् तिचा दत्तकपुत्र राजा रामकृष्ण हा नटोरच्या राज्याची व्यवस्था पहात होता. परंतु, तोही पुढें वैराग्यशाली होऊन त्यानें सर्व संपत्ति दानधर्मांत खर्च केली. पुढें कांहीं राज्य राहिलें त्याजवर कालचक्राची वक्रदृष्टि होऊन तेंही परकयांच्या अमलांत जात चाललें. अजूनही नटोरच्या राज्याचा थोडासा भाग राहिला असून तो राणी भवानीच्या वंशजाकडे चालत आहे, व त्यास अद्यापि "महाराजा बहादूर" अशी किताबत चालली आहे.

---

# रत्न सोळावें.

## मैनाबाई पवारीण.

वाचकहो, ज्या धैर्यशाली स्त्रीचें जीवनचरित्र पुढें यावयाचें आहे, तिचें जन्म बडोद्यांतील एका मोठ्या कुलीन घराण्यांत झालें असून, तिनें आपल्या अंगच्या धैर्यादि लोकोत्तर गुणांनीं धारच्या पवार-घराण्यास शोभिवंत केलें होतें. किंबहुना धारचें संस्थान प्रस्तुत्च्या स्थितींत रहाण्यास केवळ मैनाबाईचें कर्तृत्वच कारण आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मैनाबाई ही बडोदें येथील गोविंदराव गायकवाडाच्या गहिनाबाई नांवाच्या बायकोची भाची आणि धार येथील आनंदराव पवाराची पत्नी होती. आनंदराव पवार गोविंदराव गायकवाडाच्या मुलीचा मुलगा होता. तो सतरा वर्षांचा होईपर्यंत आपले आजोळीं म्हणजे बडोद्यास रहात असे. त्यानंजर तो धारेस आपल्या बापाची गादी मिळविण्याच्या हेतूनें आला असतां, तेथील दिवाण रंगराव आवडीकर त्यास आड आला; तथापि अखेरीस रंगरावास आपला हट्ट सोडून देणें भाग पडून, धारची गादी आनंदरावास प्राप्त झाली.

आनंदराव बडोद्याहून परत आल्यापासून धार संस्थानावर जणूं दुर्दैवाचा फेरा आला होता. त्या संस्थानास भोंव-

ताळच्या अनेक संस्थानिकांनीं अगदीं गांजून सोडलें होतें. त्यांत शिंदे आणि होळकर यांनीं जशी धारानगरीची नागवणूक केली तशी दुसऱ्या कोणाच्याही हातून झाली नसेल. आपल्या राज्याचें संरक्षण करण्याकरितां अश्रांत श्रम करून शेवटीं त्या श्रमाचें कांहींएक फळ न मिळतां आनंदराव मृत्यु पावला. हें वर्तमान इसवी सन १७९७ चे सुमारास घडलें. आनंदराव मृत्यु पावला ते वेळीं त्याची पत्नी मैनाबाई गरोदर होती, आणि गर्भस्थ बारसाशिवाय राज्याला दुसरा कोणीच वारस नव्हता. त्यामुळें राज्यकारभाराचें ओझें मैनाबाईला आपल्या शिरावर घेणें भाग पडलें त्या वेळीं मुरारीराव नामेंकरून माजी यशवंतराव पवाराचा दासीपुत्र होता, त्याला ही गोष्ट न आवडल्यामुळें तो मैनाबाईस एकसारखा पाण्यांत पाहूं लागला. त्यानें आपला एक स्वतंत्र पक्ष उभा करून मैनाबाईला कारभारांत ढवळाढवळ करण्यास सुरवात केली. त्याचे पक्षास कित्येक वजनदार लोक मिळून, त्याचें माहात्म्य मनस्वींच वाढत चाललें. त्याच्या आज्ञेवांचून पानही हालेनासें झालें. तो स्वभावानें फारच क्रूर होता. अशा प्रकारची प्रतिकूळ अवस्था प्राप्त झाल्यामुळें मैनाबाईस आपल्या गर्भाचें संरक्षण करण्याकारितां धार सोडून मांडवचे किल्ल्यांत पळून जावें लागलें.

मांडव येथें गेल्यावर अल्प काळांतच मैनाबाई प्रसूत होऊन तिला पुत्ररत्नाची जोड मिळाली. मग काय विचारतां! तिच्या आनंदास पारावार नाहींसा होऊन, आपल्या राज्यास

मुरारीरावाच्या कचाट्यांतून सोडविण्याची तिची हिम्मत अधिकच वाढली. तसेंच ह्या गोष्टीपासून तिच्या पक्षाच्या लोकांनाही चांगला जोर आला. धारचा किल्लेदार तर पूर्वीपासूनच तिच्याशीं एकनिष्ठपणानें वागत आला होता. या वेळीं मैनाबाईच्या पक्षाच्या लोकांनीं अशी कांहीं उचल मांडिली कीं, मुरारीरावास आपलें वजन कायम राखण्याकरितां कपटप्रयोग करणें भाग पडलें. मैनाबाई जातीची हिम्मतदार बायको खरी; तथापि, स्त्रीस्वभावामुळें ती मुरारीरावाच्या मानभावी भाषणास भुलून फशीं पडली. मुरारीरावाच्या अभयवचनावरून ती आपल्या रामचंद्रराव नामक सुकुमार कुमारास बरोबर घेऊन धारेस आली. परंतु, तेथें आल्यावर मुरारीरावानें तिला किल्ल्यांत न जाऊं देतां खालीं गांवांतच राहणें भाग पाडिलें. मैनाबाईस मुरारीरावाचें कपट तेव्हांच कळून आलें. परंतु उपयोग काय? ती त्याच्या तावडींतून सुटण्याची कांहीं तरी क्लृप्ति काढणार, तोंच तिच्या घराभोंवतीं प्रतिपक्षी मंडळीनें वेढा दिला. ते नुसते वेढा देऊनच राहिले नाहींत; तर त्यांनीं घरास आग लावून मैनाबाईस, तिचा पुत्र आणि कित्येक अनुयायी ह्यांसह, जाळून टाकण्याचा प्रयत्न केला.

परंतु, मैनाबाई असल्या गोष्टींत भिऊन होष सोडणारी बायको नव्हती. इकडे वेढा घालणाऱ्या लोकांची गडबड सुरू असतां, मैनाबाईनें मोठ्या शिताफीनें आपला मुलगा एका कुणब्याच्या बायकोजवळ देऊन तिचा मुलगा आपले

जवळ घेतला, आणि युवराजास मुकाट्यानें किल्ल्यांत नेऊन किल्लेदाराच्या स्वाधीन करण्यास त्या बाईस सांगितलें. त्या कुणब्याच्या बाईनेंही मोठ्या सावधगिरीनें रात्रीची वेळ साधून तें काम शेवटास नेलें. ही बातमी मुरारीरावास कळतांच तो रागानें लाल झाला, आणि मी या गोष्टीचा पुरापुरा सूड उगवीन, अशी तो मैनाबाईस धमकी देऊं लागला. आपला मुलगा सुरक्षितपणें किल्ल्यांत पोंचल्याची मैनाबाईस खात्री असल्यामुळें, तिनें मुरारीरावाच्या धमकावणीस मुळींच जुमानिलें नाहीं. ती त्यास म्हणाली, "तूं वाटेल त्या रीतीनें मजवर राग काढ. त्याची मला मुळींच क्षिति नाहीं. पवारांच्या गादीचा मालक जो माझा प्रिय पुत्र, तो तुझ्या कबजांतून बाहेर गेला इतकें बस आहे." वाचक हो, ह्या वेळीं मैनाबाईनें प्रकट केलेल्या धैर्याची आणि प्रसंगावधानाची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. मध्यहिंदुस्थानचे इतिहासकार मालकम साहेब लिहितात, "सन १८१८ च्या डिसेंबर महिन्यांत मी धारेस होतों; तेव्हां खुद्द मैनाबाईनें मजपाशीं या गोष्टीचें मोठ्या आविर्भावानें वर्णन केलें, तें ऐकून मी फार खूष झालों. ती म्हणाली:—बापू रघुनाथ वगैरे मंडळी तुमच्याजवळच आहेत. त्यांना विचारा कीं, ज्या घरांत मी होत्यें, त्या घरास आग लावण्याची अगदीं सिद्धता झाली असतां, त्यांनीं मला काय सांगितलें? तुम्ही पळून जा म्हणून त्यांनीं माझी पुष्कळ विनवणी केली; परंतु, मीं उत्तर केलें कीं, पळून न जातां येथेंच रहावें यांतच माझी अब्रु

आहे. मी मोठ्या कुलांतील बायको आहें. मला भलत्याच ठिकाणीं जाऊन बसतां येत नाहीं; म्हणून मी येथेंच रहाणार. जर कदाचित् माझ्या शत्रूंचा हेतु सिद्धीस जाऊन मी मरण पावलें, तर मी माझ्या स्वर्गवासी भ्रताराबरोबर सती जावयास पाहिजे होतें, तसें सतीच गेलें म्हणून समजेन." अस्तु.

मैनाबाईनें किल्लेदारास सांगून पाठविलें होतें कीं, माझें काय होईल याची यत्किंचित् देखील काळजी न करितां तुम्ही शेवटपर्यंत मुलाचें संरक्षण करावें. मैनाबाईचा मुलगा अर्थात् गादीचा वारस आपले हातून गेला, आणि इकडे त्याची आईही आपले धमकावणीस जुमानीत नाहीं, असें पाहून मुरारीरावानें आपल्या पक्षाच्या लोकांनिशीं किल्ल्यावर हल्ला करून तो काबीज करण्याचा प्रयत्न चालविला. परंतु तो त्याचा प्रयत्नही सिद्धीस गेला नाहीं. मैनाबाईनें ह्या प्रसंगीं आपले व आपल्या राज्याचे संरक्षणार्थ उद्योगाची शिकस्त केली. तिनें हा आणीबाणीचा प्रसंग जाणून आसपासच्या सर्व राजेलोकांपाशीं मदत मागितली. धारचें संस्थान नागवणाऱ्यांमध्यें शिंदा प्रमुख होता. तथापि धारच्या गादीच्या खऱ्या मालकाचा नाश न होऊं देण्याविषयीं तिनें त्यासही प्रार्थिलें होतें. तसेंच बडोद्याच्या रेसिडेंटामार्फत इंग्रजसरकारचीही विनवणी केली होती कीं, तुम्ही मध्यें पडून संस्थानचें संरक्षण करावें; परंतु, त्या वेळीं या तंट्यांत मन घालण्याची शिंदा व इंग्रज या दोघांसही सोय नव्हती. शिवाय त्यांच्या मसलतीचा रोखही वेगळाच होता. अखेर तिच्या आर्जवांस

कानु देऊन, व तिच्यावर कसा प्रसंग आहे, व त्या प्रसंगांत धीर न सोडितां ती कसे यत्न करीत आहे हें पाहून, गुजराथेंतील तिचे सोयरेधायरे व इष्टमित्र येथपर्यंत वळले कीं, त्यांनीं तिच्या मदतीसाठीं सखाराम चिमणाजी नांवाच्या सरदाराबरोबर कांहीं सैन्य देऊन त्यास तेथून रवाना केलें.

मैनाबाईचे मदतीस बडोद्याहून सैन्य आलेलें पाहून, मुरारीरावाचे हातपाय अगदीं गळून गेले व तो तेथून पळाला. मैनाबाईच्या साह्यास कुमक पाठविण्यांत, धार संस्थानचें रक्षण व्हावें व नाश होऊं नये असा गायकवाडांचा मुख्य हेतु होता खरा; तथापि, आंतून त्यांचा हेतु असा होता कीं, धार संस्थानानें पुढें आपल्या वशिल्याखालीं रहावें. शिवाय ज्यांनीं या स्वारीची योजना केली होती, व ज्यांची त्या स्वारीवर योजना झाली होती त्यांना हें एक खासगत नफ्याचचें कलम वाटलें होतें. बडोदेकरांचा वरील हेतु म्हणण्यासारखा सिद्धीस गेला नाहीं. कारण कीं, धारचा कारभार हातीं घेतल्यावर सखाराम चिमणाजीस मनस्वी कर्ज काढावें लागलें. त्याची वारासार करीत असतां तो एकाएकीं मरण पावला. आणि त्याचें काम त्याच्या हाताखालचा कोणी बापू रघुनाथ नांवाचा कामदार पाहूं लागला. बापू रघुनाथास बडोद्याच्या दरबारचे हेतु सिद्धीस नेतां आले नाहींत. तथापि मैनाबाई व बापू रघुनाथ यांच्या सततोद्योगानें धार संस्थानाचें संरक्षण होऊन त्यानें पुढील शांतिसौख्याचे दिवस पाहिले.

नानाप्रकारच्या संकटांतीं झगडून आपल्या संस्थानाचें

संरक्षण करीत असतां मैनाबाईवर एक प्रचंड दुःखाचा डोंगर कोसळला. ज्या प्रिय पुत्राचे बिकट प्रसंगीं संरक्षण करून तिनें त्याला गादीचा उपभोग घेण्यास वांचविलें होतें, त्या तिच्या पुत्रास निर्घृण काळानें अकालीं ओढून नेऊन तिला पुत्रशोकाच्या यातना भोगावयास लाविलें. वाचकहो, एवढें दुर्वह दुःखाचें ओझें शिरावर वाहूनही मैनाबाईनें दूरवर दृष्टि देऊन राज्यशकट ओढण्यांत हयगय केली नाहीं. तिनें आसपासच्या राजेरजवाड्यांच्या संमतीनें लागलीच आपल्या बहिणीचा मुलगा दत्तक घेतला. व त्याचेंही नांव रामचंद्र पवार ठेवून त्यास गादीवर बसविलें. रामचंद्र पवार हा वयानें मैनाबाईच्या मुलाच्या बरोबरीचाच होता.

यानंतर नानाप्रकारच्या भानगडी होऊन अगदीं परकीय लोकांच्या राज्याधिकाराच्या योगानें धार संस्थानास चिरंतनची सुरक्षितता मिळाली. तो इतिहास वेगळा आहे; परंतु, हा प्रकार घडून येण्याचे पूर्वीं कांहीं वर्षें मैनाबाईनें सगळ्या राज्याला आंवर घालून आणि आसपासच्या प्रांतांत स्वाऱ्या करून आपलें राज्य चालविलें होतें. हें तिच्या कीर्तीस भूषणावह झालें. तिनें त्या वेळीं तें संस्थान राखिलें म्हणून तें प्रस्तुतच्या उत्तमावस्थेप्रत पावलें होतें. मैनाबाईसंबंधानें मालकमसाहेबांचे पुढील उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणतात, " प्रस्तुतची राज्य चालविणारी स्त्री मैनाबाई जरी संसारांतील सुखदुःखांच्या निरनिराळ्या स्थिति पाहून अनुभविलेल्या वृद्ध बायांसारखी झाली आहे, तरी वयानें अजून

तरुण आहे; व ती इंग्रजसरकाराच्या उपकारांचें अत्यंत कृतज्ञताबुद्धीनें स्मरण करिते."

ही धैर्यशाली स्त्री पुढें यथाकालीं मृत्युवश होऊन हा भूलोक सोडून चालती झाली. तिचें मनोरम चरित्र धारच्या पवार राजांनीं अभिमान बाळगण्यास योग्य असें आहे.

---

# रत्न सतरावें.

## महाराणी चंद्रावती.

वाचकहो, ज्या स्त्रीरत्नाचें जीवनचरित्र पुढें यावयाचें आहे, त्याचें जन्म भारतवर्षांतील एका युद्धविद्याप्रवीण आणि सद्धर्मपरायण अशा ज्ञातींत झालें होतें. पंजाबचा प्रसिद्ध शूर पुरुष महाराणा रणजितसिंह याचें नांव आणि कीर्ति ज्यास माहीत नाहीं असा इतिहासवाचक क्वचित्‌च आढळेल.

महाराणी चंद्रावती ही वर वर्णन केलेल्या प्रसिद्ध राजपुरुषाची सर्वांत धाकटी पत्नी होय. रणजितसिंहाचें हिजवर अप्रतिम प्रेम होतें. ही रणजितसिंहाची प्रिय पत्नी महाराणी जिनदन या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. ज्यानें शीख राष्ट्राचा जम बसवून त्यास सामर्थ्यवान् बनविलें, ज्यानें आपलें राज्य काबूलापासून दिल्लीपर्यंत वाढविलें, तसेंच त्या काळीं दिल्लीचें राज्य हस्तगत करून समर्थ झालेले इंग्रज लोकसुद्धां ज्याचा वचक बाळगून मान राखीत, ज्यानें पंजाबांतील खालसा लोकांचें उत्कृष्ट सैन्य तयार केलें, व ज्याच्याशीं इंग्लिश सैनिकांना अनेक ठिकाणीं निकरानें झुंजावें लागलें, त्या रणजितसिंहाची सहधर्मिणी होण्यास राणी चंद्रावती योग्य स्त्री होती, ही गोष्ट तिच्या पुढील चरित्रावरून पूर्णपणें वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

यथाकालीं रणजितसिंह मृत्युवश होऊन मागें त्याचे खड्ग-सिंह, शीरसिंह आणि धुलीपसिंह असे तिघे पुत्र राज्याकारितां वारसदार ह्मणून उभे राहिले. तसेंच त्याच्या अलौकिक बुद्धि-सामर्थ्यानेंच जे केवळ दबले जात असत असे त्याचे कित्येक महत्वाकांक्षी आणि कावेबाज सरदार, त्याचा दाब नाहींसा होतांच अधिकारप्राप्तीसाठीं बुभुक्षित लांडग्याप्रमाणें एक-मेकांशीं झगडूं लागले. अशा प्रकारें अव्यवस्था सुरूं हो-ऊन अल्प काळांतच खड्गसिंह मारला गेला व त्याचा धाकट भाऊ शीरसिंह यास गादी प्राप्त झाली. परंतु कांहीं दिवसांनीं त्यालाही वडील भावाचीच गति प्राप्त झाली. सुमारें चार वर्षांचे अंतरांत रणजितसिंहाचे दोन पुत्र मारले जाऊन सारा पंजाबप्रांत गृहकलह आणि बेबंद बाच्छाई ह्यांनीं विदीर्ण हो-ऊन गेला. एकामागून एक अनेक कारभारी आणि सेनापति अधिकारप्राप्तीसाठीं झगडतांना प्राणास मुकले. शेवटीं राजपुत्र धुलीपसिंह यास गादीवर बसवून महाराणी चंद्रावती हिनें राज्याचीं सर्व सूत्रें आपले हातीं घेतलीं. ह्या वेळीं धुलीपसिंह केवळ पांच वर्षांचा बाळ होता. महाराणी चंद्रावती अत्यंत बुद्धिमती, अपूर्व धैर्यशालिनी आणि हिम्मतवान् बायको होती. खरोखरच ती शूर आणि नाठळ शीख लोकांची स्वामिनी होण्यास योग्य होती. ती जशी राजकारस्थानांत तशीच समरकर्मांतही प्रवीण होती. सारांश, तिच्या नवऱ्याचे अंगचीं सर्व उत्तम लक्षणें तिचे अंगीं वास करीत होतीं. तिनें मोठ्या शिताफीनें सरदारलोकांचीं भांडणें मिटवून आपल्या

अधिकाराचा पगडा बसविला, आणि पूर्वीप्रमाणेंच आपलें सैन्य शत्रूशीं सामना देण्यास योग्य असें बनविलें. राज्यांतील मोठमोठ्या जागा योग्य आणि हुशार लोकांच्या हातीं दिल्या, व सेनापतीचे जागीं शीरसिंगनामक सरदाराची योजना केली.

इंग्रजी राज्याची सरहद्द तिच्या राज्याशीं अगदीं मिळून गेली होती; व तिची राजकार्यकुशता आणि सैन्यव्यवस्था पाहून इंग्लिश लोकांना भीति वाटूं लागली होती. त्यामुळें त्यांना आपलें सैन्य पंजाबच्या सरहद्दीवर नेऊन बसविणें अवश्य आहे असें वाटलें. शतद्रुनदीच्या तीरीं इंग्लिशांचें सैन्य जमा झालें असतां शिखांच्या व त्यांच्या कटकटीस सुरुवात झाली. शिखांचें ह्मणणें कीं, इंग्लिश लोक आमचा सरहद्दिवरील प्रांत हळूहळू दडपीत चालले आहेत. इंग्लिशांनींही शिखांच्या संबंधानें उलट तीच तक्रार पुढें आणिली. कोणाचेंही ह्मणणें खरें असो; परंतु, या सरहद्दीच्या प्रकरणावरून उभयतांचें युद्ध जुंपून तें एक वर्षभर चाललें होतें.

ह्या युद्धांत राणी चंद्रावती सर्व कामें प्रमुखतेनें पहात असे. परंतु, तिच्या दुर्दैवानें तिचे कित्येक अविश्वासी आणि कृतघ्न कामगार गुप्तपणें आंतून इंग्लिशांना साह्य करूं लागले ! असें झाल्यामुळें आपल्या विख्यात पतीचें नांव आणि स्वदेशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याचें काम तिला एकटीलाच शिरावर घ्यावें लागलें. तथापि, अशा आणीबाणीच्या प्रसंगींही ती डगमगली नाहीं. ती मोठ्या धैर्यानें राज्यसूत्रें व युद्धसूत्रें हालवीत एखाद्या प्राकारभित्तीप्रमाणें निश्चल राहिली. इंग्लि-

ह्यांचें शीख लोकांशीं युद्ध हें एक हिंदुस्थानच्या इतिहासांतील मोठेंच प्रकरण आहे. त्यासंबंधानें विस्तरपूर्वक लिहिण्यास येथें अवकाश नाहीं. मुडकी, फेरोजपूर, सोब्रान इत्यादि ठिकाणीं मोठीं प्रचंड युद्धें झालीं. तसलीं निकराचीं युद्धें इंग्लिशांना हिंदुस्थान काबीज करितांना फारच थोड्या ठिकाणीं करावीं लागलीं असतील. परंतु, स्वतःच्याच सरदारांच्या विश्वासघातापुढें बिचाऱ्या एकट्या राणीचें काय चालणार ? तिच्या सेनेचा एकसारखा पराभव होत जाऊन, शेवटीं तिला इंग्लिशांशीं तह करणें भाग पडलें. सोब्रानच्या लढाईंत जेव्हां तिचा एक सरदार तिजकडे येऊन पराभवाचें वर्तमान सांगूं लागला तेव्हां तिनें त्याचें भाषण शांतपणानें ऐकून घेऊन ह्मटलें, " चिंता नाहीं, माझ्या खालसा सेनेनें पुनः लढाई दिली पाहिजे." तसेंच तिच्या कारभाऱ्यानें तिला युद्ध बंद करण्याविषयीं विनंती केली असतां ती ह्मणाली, " अशा प्रसंगीं माझ्या शूर पतीनें जें केलें असतें, तेंच मीही करीत आहें. जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत माझा पंजाबप्रांत फिरंगी लोकांच्या ताब्यांत गेलेला मी पहाणार नाहीं. असो. राणी चंद्रावतीची एवढी दृढ प्रतिज्ञा असूनही विपरीत दैवगतीमुळें तिला तहाचीं कलमें कबूल करावीं लागलीं.

वर सांगितलेल्या तहांत राणीचे दरबारीं इंग्लिशांचा रेसिडेन्ट राहून, सर्व राजकीय कामांत राणीनें त्याची सल्लामसलत घेऊन चालावें असें ठरलें, व त्याप्रमाणें जॉन लॉरेन्स

याची त्या ठिकाणीं योजना झाली. खरें पाहिलें असतां या व्यवस्थेनें पंजाबचें राज्य इंग्लिश रेसिडेन्टाच्या हातीं आलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यानें अंतस्थ साधनांनीं राणीस दूर करून पंजाब प्रांत इंग्लिशांच्या सार्वभौमसत्तेखालीं आणण्याचा प्रयत्न केला. उघड रीतीनें त्याचा हेतु सिद्धीस जाणें शक्य नसल्यामुळें त्यानें नसतीं कुलंगडीं उपस्थित करण्यास सुरवात केली. त्यानें राणीवर तिनें धुलीपसिंहांच्या राजकीय हक्कांत व्यत्यय आणून त्याच्या विरुद्ध वर्तन केल्याचा आरोप आणिला, त्यानें धुलीपसिंहाकडून त्याच्या प्रिय मातेला हद्दपार करण्याच्या आज्ञापत्रावर सही करविली, आणि अशा रीतीनें बिचाऱ्या राणीस पंजाबांतून उचलून प्रथम शिकपूर येथें व तेथून बनारसेस आणून ठेविलें.

जेव्हां हद्दपार करण्याचें आज्ञापत्र घेऊन एक कामगार तिजकडे आला, आणि तिला तो पंजाब सोडून जाण्याबद्दलचा हुकूम वाचून दाखवूं लागला, तेव्हां ती फक्त त्यास एवढेंच म्हणाली कीं "हा हुकूम कोणीं पाठविला आहे?" कामगार म्हणाला "खुद्द महाराज धुलीपसिंह यांनींच हा हुकूम पाठविला आहे." राणी म्हणाली "बरें, असो. राजाज्ञा मला पाळली पाहिजे; मी कांहीं पंजाबची मालकीण नव्हे, मी फक्त राजमाता आहें. राजाचीच आज्ञा असेल तर मला गेलें पाहिजे. मजपासून तुम्हांला भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मी आपल्या पुत्राच्या विरुद्ध चळवळ करण्यास कधींही प्रवृत्त व्हावयाची नाहीं. पंजाबचा सर्वस्वनाश झाला

हें मला कळून चुकलें."

राणीस प्रथमतः शिकपूर येथें ठेविलें होतें; परंतु पुढें कांहीं दिवसांनीं तेथून तिची पवित्र क्षेत्र काशी येथें रवानगी झाली. तिचें बनारस येथें पाठविणें केवळ खालसा सैन्याची संतुष्टता राखण्याकरितांच होतें. तिला जेव्हां काशीस जाण्याची गोष्ट कळली, तेव्हां ती म्हणाली "यांत काय विशेष झालें! कारागृहांतच रहावयाचें मग तें पवित्र ठिकाणीं काय आणि अपवित्र ठिकाणीं काय!" राजाज्ञेप्रमाणें ती शिकपूर सोडून शांतपणें काशी येथें येऊन राहिली. परंतु, या गोष्टीनें तिच्या अंतःकरणास बसलेला धक्का तिला सहन होणें कठीण होतें. तिला आपल्या पुत्राविषयीं वाईट वाटलें, नाहीं, प्रस्तुतच्या कारागृहवासाबद्दलही वाईट वाटलें नाहीं, अथवा आपला अधिकार आणि संपत्ति नष्ट झाली ह्याबद्दलही वाईट वाटलें नाहीं; तर पंजाबचें वैभव आणि स्वातंत्र्य यांचा चिरंतन नाश झालेला पाहून तिला अतोनात वाईट वाटलें. तिचें हृदय विद्ध झाल्यासारखें होऊन ती अत्यंत आजारी झाली आणि त्या पवित्र क्षेत्रीं मरणाच्या दारीं बसली.

राणीच्या आजारीपणाची बातमी खालसा सैन्यास आणि पंजाबचे लोकांस समजली. राणी त्यांना इतकी प्रिय होती कीं, तिजकरितां ते आपला प्राणही खर्चीं घालण्यास तयार होत असत. ती त्यांना केवळ प्रतिदेवताच वाटत असे. त्यांनीं तत्काल इंग्लिशांच्या विरुद्ध बंड उभें केलें. इंग्लिशांचें कारस्थान आणि शीख सरदारांची देशाभिमानशून्यता यांपासून

बंडाच्या उद्भवास यत्किंचितही प्रतिबंध झाला नाहीं.

वर वर्णन केल्याप्रमाणें बंड उपस्थित होऊन इंग्लिशांची शीख लोकांबरोबरची दुसरी लढाई सुरू झाली. लॉर्ड गो याचे आधिपत्याखालीं इंग्लिशसेनेचा पराभव होऊन कांहीं काळपर्यंत शीख लोकांची चढती कमान राहिली. परंतु, गुजरतच्या लढाईत त्यांचा सर्वस्वीं पराजय होऊन अगदीं वाताहत झाली. इंग्लिशांनीं पंजाबचें राज्य खालसा करून धुलीपसिंहास श्वेतद्वीपची हवा दाखविली. त्याच्या पुढील चांगल्या अगर वाईट स्थितीचें वर्णन करण्यास येथें अवकाश नाहीं. इकडे महाराणी चंद्रावती काशीक्षेत्रीं आजारी पडली असतां तिची कोणी वास्तपुस्तही केली नाहीं. कित्येक वर्षेपर्यंत तिचें दुःख कळसास जाऊन पोहोंचलें होतें. तिला वायु होऊन त्यांत ती "माझे शूर खालसा वीर हो, चला युद्ध करा. तुमचा पूर्वीचा धनी तुमच्या अंगांत आला आहे. चला, आणि शीख राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि वैभव यांचें रक्षण करा" असें बडबडत असे.

सरते शेवटीं तिची हृदयद्रावक अवस्था पाहून इंग्रज सरकारास दया आली. परंतु तिच्या मनाची शांतता होण्यास कोणतें साधन होतें ? इंग्रजसरकारास वाटलें कीं, तिला तिच्या पुत्रासंनिध नेऊन ठेवलें असतां कदाचित् ती सुखी होईल; म्हणून त्यांनीं तिला कलकत्यास नेलें व तेथें गलबतावर बसवून तिची विलायतेस रवानगी केली. वातसंचारानें राणीचें चित्त ठिकाणावर नव्हतेंच. त्यामुळें आपण कोठें आहों व

कोठें जातो हें तिला कळलें नसावें. कांहींही असो, सर्व दुःखांतून मृत्यूनें तिची लवकरच सुटका केली. इंग्लंडांत जात असतां मार्गांतच ती मृत्युवश होऊन तिचें शरीर त्या अगाध जलाशयास अर्पण झालें.

प्रसिद्ध हिंदी चरित्रकार श्रीयुत लाला काशीनाथ खत्री यांनीं आपल्या पुस्तकांत राणी चंद्रावतीचें चरित्र वरच्या लेखाहून बऱ्याच फरकानें लिहिलें आहे. ते म्हणतात, राणी चंद्रावती शेवटीं पंजाब सोडून नेपाळच्या राजाच्या आश्रयास जाऊन राहिली. इंग्लिशांनीं तिजला मागून घेण्याची पुष्कळ खटपट केली. परंतु, नेपाळच्या राजानें तिला तिच्या शत्रूच्या स्वाधीन करण्याचें नाकारलें. अखेर नेपाळच्या राज्यांतच त्या महिमावती राणीचा अंत झाला. या दोन विधानांपैकीं खरें कोणतें हें ताडून पहाण्यास आमचेजवळ साधन नाहीं, याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहों.

# रत्न अठरावें.

## महाराणी लक्ष्मीबाई.

अतुलपराक्रमशाली ज्या स्त्रीरत्नानें आपल्या अंगच्या अलौकिक वीर्यतेजानें संपूर्ण भूमंडळास दिपवून चकित करून टाकिलें, आणि परम युद्धविद्याविशारद म्हणविणाऱ्या आंग्लभौम वीरांसही भारतवर्षीय युवतीजनांच्या शौर्यसाहसाची पूर्ण प्रतीति आणून दिली, त्या झांशीकर महाराणी लक्ष्मीबाईचें जीवनचरित्र पुढें दिलें आहे.

उत्तर हिंदुस्थानांत विंध्यपर्वताच्या दक्षिण उतरणीवर आणि यमुनेच्या उत्तरेकडे झांशी हा प्रांत आहे. या प्रांताचें क्षेत्रफळ ४९८३ चौरस मैल असून लोकसंख्या ९३४९३४ आहे. या प्रांतांत खुद्द झांशी येथें दक्षिणेंतील जवानमर्द ब्राह्मणभाईचें एक टुमदार संस्थान होतें. त्याचे आद्यसंस्थापक रघुनाथराव हरि नेवाळकर या नांवाचे कोणी महान् पराक्रमी पुरुष होऊन गेले. झांशी संस्थानचे शेवटचे अधिकारी व उपरिनिर्दिष्ट नेवाळकरांचे वंशज महाराज गंगाधरराव बाबा साहेब हे होत. हे परलोकवासी झाल्यामुळें झांशी संस्थान लयास जाऊन महाराणी लक्ष्मीबाई इच्या अलौकिक शौर्याचें प्रदर्शन होण्याचा प्रसंग आला. अशी ही झांशी संस्थानची संक्षिप्त हकीकत झाली. आतां आपण महाराणी लक्ष्मीबाई इच्या जन्मविवाहादि वृत्तांताकडे वळूं.

दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांचे आश्रित मोरोपंत तांबे वाईकर म्हणून कोणी एक शीलसंपन्न गृहस्थ होते. त्यांची कन्या महाराणी लक्ष्मीबाई. इचें माहेरचें नांव मनूबाई होतें. इसवी सन १८३५ च्या जानेवारी महिन्याच्या १९ व्या तारखेस श्रीक्षेत्र काशी येथें हें अपूर्व कन्यारत्न जन्मास आलें. पुढें ईश्वरसंकेतानुरूप इसवी सन १८४२ या वर्षी ब्रह्मावर्त येथें झांशीकर महाराज गंगाधरराव बाबासाहेब यांचे बरोबर लक्ष्मीबाईचा विवाह झाला. बाबासाहेब हे मोठे विद्वान, मार्मिक आणि रसिक पुरुष होते. त्यांच्या संग्रहीं अनेक संस्कृत ग्रंथ ठेविलेले असत. ते मोठे सज्जन आणि समंजस म्हणून त्यांची ख्याति होती. लक्ष्मीबाईचे पोटीं बाबासाहेबांस एका सुंदर पुत्ररत्नाची प्राप्ति झाली होती; परंतु, तें शुद्ध-बीजापोटीं उत्पन्न झालेलें रसाळ आणि गोमटें फळ अल्पायुषी होऊन त्याच्या जन्मदात्यांस आणि आम्हां अभागी भारतवासी जनांस लाभलें नाहीं. असो.

यापुढील वृत्तांत नीट लक्ष्यांत येण्याकरितां त्या वेळच्या राजकीय परिस्थितीचें वर्णन करणें अवश्य आहे. त्या वेळीं भरतखंडाच्या बहुतेक भागावर दयाळू इंग्रजसरकारचें राज्य सुरू झालें असून प्रसिद्ध देशी-राज्यभक्षक लॉर्ड दलहौसी यांची कारकीर्द चालू होती. एकादा एतद्देशीय संस्थानिक निपुत्रिक होऊन मरण पावला असतां त्या महद्दोषाबद्दल त्याचें संस्थान बेवारशी ठरवून तें घशांत टाकावयाचें, अशा प्रकारची या लॉर्ड साहेबांची राजनीति होती. वस्तुतः ही

कुटिल राजनीति न्यायी म्हणविणाऱ्या इंग्रजसरकारास शोभ-ण्यासारखी नव्हती. तथापि, मुख्य सरकारचें तिकडे दुर्लक्ष होऊन सातारा, नागपूर वगैरे कित्येक मोठमोठीं राज्यें त्यांचे मालक निपुत्रिक वारल्यामुळें इंग्रजी राज्यांत सामील केलीं गेलीं; आणि देशी राज्यावर आपला कराल कर फिर-विण्याची दलहौसी यांची हौसही पूर्ण झाली. हिंदुधर्मशास्त्रा-न्वयें दत्तक घेतलेला पुत्र मृत राजाच्या राज्याचा वारिसदार होऊन संपत्तीचा मालक होतो, ही गोष्ट वरील लाट साहे-बांस त्या वेळीं मान्य नव्हती.

अशा प्रकारची परिस्थिति असतां, इसवी सन १८५३ च्या नोव्हेंबर महिन्याच्या २१ व्या तारखेस महाराज गंगा-धरराव बाबासाहेब मरण पावले. त्यांना औरस पुत्रसंतति नसल्यामुळें त्यांनीं मृत्यूच्या अगोदर कांहीं दिवस मोठ्या समारंभानें एका मुलास दत्तक घेतलें होतें, व झांशीच्या रेसिडेंटमार्फत गव्हर्नर जनरल साहेब लॉर्ड दलहौसी यांचे-कडे त्याबद्दल एक खलिता पाठविला होता. तात्पर्य, ह्या-संबंधांत कोणत्याही प्रकारें गैरशिस्त प्रकार किंवा लबाडी बिलकुल झालेली नव्हती. भर दरबारामध्यें हजारों लोकांस-मक्ष महाराजांनीं दत्तक मुलास आपल्या मांडीवर घेतलें. त्या वेळीं गव्हरनर जनरलचे प्रतिनिधि ऊर्फ झांशीचे रेसिडेंट स्वतः हजर होते. त्यांच्या समक्ष हा दत्तविधानविधि हो-ऊन महाराजांनीं त्यांस खलिता वाचून दाखविला व त्यावर आपली स्वदस्तूरची सही केली. ज्या मुलास दत्तक घेतलें

होतें तो मुलगाही महाराजांचा जवळचा नातेवाईक होता, हें येथें सांगणें अवश्य आहे. महाराजांनीं आपल्याकडून इतकी खबरदारी घेतली खरी; परंतु, तिचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. लॉर्ड दलहौसी यांनीं आपल्या ब्रीदास अनुसरून त्या दत्तक पुत्रास नावारिस ठरविलें व झांशीचें राज्य खालसा करून इंग्रजी राज्यांत सामील केलें.

येथपासून पुढें महाराणी लक्ष्मीबाईच्या कर्तृत्वचरित्रास प्रारंभ झाला. महाराज वारले त्या वेळीं संस्थानच्या खजिन्यांत सुमारें सहा लक्ष वसूल शिल्लक होता. त्यांतून संस्थानचा खर्च व माजी महाराजांच्या सैन्याचा पगार वजा जातां बाकी सुमारें दोन लक्ष पन्नास हजार रुपये शिल्लक राहिले. संस्थानचें सैन्य सुमारें एक हजार असून त्यांत मुख्यतः घोडेस्वारच होते. संस्थान खालसा केलें त्या वेळीं त्यास रजा देण्यांत आली; व राणीस फक्त साठ हजार रुपये सालाची नेमणूक करून दिली गेली. आपलें संस्थान आपल्या दत्तक पुत्राकडे चालावें, म्हणून लक्ष्मीबाईनें भगीरथ प्रयत्न केले. हजारों रुपये खर्च करून विलायतेपर्यंत वकील पाठवून खटपट केली. परंतु, इंग्रज सरकारचा यत्किंचित् देखील घुणा घामला नाहीं. राज्य गेलें तें गेलें, आणि वरती हजारों रुपये खर्च होऊन व्यर्थ गेले. लक्ष्मीबाई अत्यंत तेजस्वी, मानी आणि बुद्धिमती बायको होती. तिला राज्य गेल्याबद्दल भारीच वाईट वाटत होतें. इंग्रज सरकारानें ठरवून दिलेल्या साठ हजार रुपयांच्या नेमणुकीस तिनें कधीं स्पर्शही

केला नाहीं ! यावरून राज्य नष्ट झाल्याचा संताप तिला किती आला होता तें स्पष्ट दिसून येतें.

लक्ष्मीबाईस राग येण्यास आणखीही कित्येक कारणें घडलीं. झांशी खालसा केल्यावर त्या ठिकाणीं एक गोऱ्या लोकांची पलटण ठेविली होती, त्यांच्या आहाराकरितां गोवध होऊं लागले ! भूतदयेच्या तत्वावर ज्यांच्या धर्माचा पाया, आणि धेनु म्हणजे ज्यांना प्रतिदैवत त्या हिंदु लोकांस अशा गोष्टींपासून किती चिरड येते याचा अनुभव पुढें चांगलाच आला ! आपलें राज्य हरण करून शिवाय आपल्या देखत गोवध करण्यास प्रारंभ केला ही गोष्ट लक्ष्मीबाईच्या मनास फारच लागली. शिवाय झांशी संस्थानांतून देवस्थानादिकांकडे जो खर्च चालत होता तोही दलहौसी यांनीं अजीबात बंद करण्याचा क्रम आरंभिला. अशा प्रकारच्या चित्ताला क्षुब्ध करणाऱ्या गोष्टी घडत चालल्यामुळें लक्ष्मीबाईचा क्रोध अतोनात वाढला. तेव्हां ती पतिनिधनदुःखानें पोळलेली, राज्यापहारानें अपमान पावलेली, धर्मच्छलानें वैतागलेली, आणि सर्वस्वनाशानें चिडलेली मानी स्त्री लक्ष्मीबाई एकाद्या नागिणीप्रमाणें चवताळून आपल्या शत्रूचा कसा कडकडून दंश घेऊं म्हणून जणूं टपून बसली होती. इतक्यांत उत्तर हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या काळ्या इंग्रज पलटणींतील लोकांनीं बंड केल्याची वार्ता लक्ष्मीबाईच्या कानावर आली. बंडवाल्यांचे मुख्य पुढारी दुसऱ्या बाजीरावसाहेब पेशव्यांचे दत्तकपुत्र धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब पेशवे हे होते. हे शिपायांचे

बंड इसवी सन १८५७ सालीं झालें. या बंडाचा इतिहास फारच मोठा आहे, आणि यापासून उभय पक्षाच्या लोकांस अनेक प्रकारें बरीं वाईट फळें भोगावीं लागलीं आहेत. या संबंधानें जास्त विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. राणी लक्ष्मीबाईनें या प्रचंड गर्दीची सवड साधून आपल्या वैऱ्यांचा यथास्थित सूड उगविला. इतर ठिकाणच्या काळ्या लोकांप्रमाणेंच झांशी येथील काळे लोकही आपल्या इंग्रज सेनापतीला धाब्यावर बसवून राणीस मुजरा करावयास आले. राणीनेंही त्या चालून आलेल्या लोकांस आपले नोकर करून त्यांची योग्य ती व्यवस्था लाविली. झांशीच्या वातावरणांत बंडाचें वादळ स्पष्ट दिसूं लागून त्यानें उत्पात करण्यास सुरवात केली. या वेळीं झांशी येथें कॅप्टन स्केनी आणि कॅप्टन डनलाप असे दोन इंग्रज अधिकारी होते. त्यांनीं राणीच्या हालचालीवर जसें लक्ष्य ठेवावें तसें ठेविलें नाहीं असें दिसतें. ऐन बंडाच्या प्रसंगीं दोन इंग्रजसरदार राणीकडे तह करण्यासाठीं आले होते, परंतु राणीनें त्यांचें ह्मणणें कांहीं एक न ऐकतां उलट त्यांना कैद करून टाकिलें. लक्ष्मीबाई अबला स्त्री, तिच्या हातून आपलें काय व्हावयाचें आहे, अशा समजुतीवर इंग्रज अधिकारी स्वस्थ घोरत पडले होते! परंतु, भारतवासी स्त्रियाही पुरुषांप्रमाणेंच साहसाचीं कामें करण्यास समर्थ होतात हें कोठें त्यांना ठाऊक होतें? योग्य संधि मिळतांच लक्ष्मीबाई एकाद्या प्रचंड ज्वालामुखीप्रमाणें शौर्याग्नीला बाहेर टाकूं लागली. तिनें हां हां म्हणतां मोठें थोरलें प्रचंड सैन्य

जमा केलें. लपवून ठेवलेले तोफा, दारुगोळा वगैरे युद्धोपयोगी सामान बाहेर काढिलें, आणि झांशीच्या सर्व इंग्रज लोकांची कत्तल करवून सर्व शहरांत आपल्या स्वामित्वाची द्वाही फिरविली.

अशा रीतीनें झांशी प्रांतावर महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांची सत्ता चालू झाली. तें पाहून त्यांच्या कुळांतले कोणी सदाशिवराव नारायण या नांवाचे गृहस्थ आपण झांशीच्या गादीचे मालक आहों असें म्हणून कांहीं सैन्य जमवून राणीसाहेबांवर चालून आले. त्यांनीं आपलेकडून पुष्कळ धामधूम करून पाहिली. परंतु, राणीच्या पराक्रमापुढें त्यांचें काय चालणार! राणीनें त्यांचा पराभव करून त्यांस झांशीच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. इतक्यांत वोरछा संस्थानचा दिवाण नथेखां हा झांशी संस्थानावर चालून आला व गांवचे गांव आपले ताब्यांत घेऊं लागला. त्याजबरोबरही राणीस युद्ध करावें लागलें. ते वेळीं राणीच्या सैन्यांतील रघुनाथसिंग नांवाच्या सरदारानें त्याचा पराभव करून त्यास अगदीं जेरीस आणिलें. तेव्हां त्यानें लक्ष्मीबाईशीं सख्यत्वाचा तह केला. अशा प्रकारें लक्ष्मीबाईनें मध्येंच आलेल्या या आगंतुक संकटाचें निवारण केलें.

शिपायांचे बंडांत सामील होऊन इंग्रज सरकारच्या विरुद्ध वर्तन करण्यांत आपलें हरण केलेलें राज्य परत मिळवावें एवढाच लक्ष्मीबाईचा मुख्य हेतु होता; व तो शेवटासही गेला. त्यामुळें इतर बाबतींत आपली राजनिष्ठा प्रकट करून इंग्रज

सरकारची प्रीति संपादन करावी असा तिचा मानस होता. व त्याप्रमाणें तिचे प्रयत्नही चालू होते. परंतु शिपायांच्या बंडा सारख्या धामधुमीच्या वेळीं एकमेकांचे खरे मनोरथ एकमेकांस कळून सर्व गोष्टींत सुयंत्र फांसा पडणें अशक्य होतें.

लक्ष्मीबाई बंडवाल्यांस सामील होऊन झांशी प्रांत बळकावून बसल्याची वार्ता वरिष्ठ सरकारास कळतांच त्यांनीं एक मोठें सैन्य तिजवर पाठविलें. या सैन्याचें सेनापतित्व सर ह्यू रोज ह्या नामांकित सरदाराकडे होतें. हें सैन्य इसवी सन १८५८ च्या मार्च महिन्यांत झांशीजवळ येऊन पोंचलें. तेव्हां नाना भोपटकर वगैरे जी राणीच्या पदरीं जुनी मुत्सद्दी मंडळी होती त्यांनीं इंग्रज सैन्यास कोणत्याही प्रकारें अडथळा न करितां त्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांस भेटून त्यांचा गैरसमज दूर करावा व त्यांच्याशीं सलोखा करावा असा पोक्त विचार सुचविला; पण तो त्या आणीबाणीच्या प्रसंगीं कोणास पसंत पडला नाहीं. तेव्हां अर्थातच उभय पक्षांचें युद्ध जुंपलें. झांशी शहरांत बंडवाले लोक राणीचें स्वामित्व मान्य करून युद्धास सज्ज होऊन उभे राहिले. बाहेरून सर ह्यू रोज यांनीं त्यास वेढा दिला होता. वारंवार उभय पक्षांच्या लोकांच्या निकराच्या झटपटी चालत. पण इंग्लिशांची तयारी विशेष असल्यामुळें बंडवाल्यांचें फार नुकसान होई. अशा प्रकारें राणी झांशी शहरांत अडकून पडल्याची बातमी काल्पीस नानासाहेबांस कळली. तेव्हां तिकडून त्यांचे सेनापति तात्या टोपे हे आपल्याबरोबर वीस हजार सेना घेऊन तिला साह्य करण्यासाठीं

धांवून आले. परंतु, ते झांशीस येऊन पोंचण्याचे पूर्वी वाटें-तच सर ह्यू रोज यांनीं त्यांस गांठून त्यांचे १५०० लोक मारून त्यांचा पराभव केला. त्यामुळें ते परत काल्पीकडे निघून गेले. हें वर्तमान एप्रिल महिन्याच्या प्रारंभीं घडलें.

झांशीभोंवतीं पडलेला वेढा अद्याप जशाचा तसा कायम होता, आणि एकमेकांचे वीर एकमेकांशीं मोठ्या निकरानें सिंहनाद करून लढत होते. कोणी कोणास हार जाईनात. मार्चच्या २३ व्या तारखेपासून एप्रिलच्या तिसरे तारखेपर्यंत एकसारखें भयंकर रणकंदन चाललें होतें. जिकडे तिकडे रक्तपात आणि कापाकापी चालली होती. हें झांशीच्या युद्धाचें वर्णन वाचून—

॥ श्येन क्रव्यार्थ जैसे झगडति विजयाक.रणें मत्तमल्ल ॥
॥ स्ववींसिस्वांतगर्वापह करिति भुजायुद्ध गोविंद मल्ल ॥

या मयूरोक्तीचें कोणास स्मरण होणार नाहीं! शेवटीं बंड-वाले लोक अगदीं थकून जाऊन इंग्लिश सैन्याचा जय झाला. वेशींचे दरवाजे फोडून इंग्लिशांचे शिपाई आंत शिरले; तथापि राणीनें धीर सोडिला नाहीं. ती इंग्लिशाचे हातीं न लागतां एकदोन जिवाचीं माणसें बरोबर घेऊन त्यांच्या हातून निस-टली, ती थेट काल्पी येथें नानासाहेबांचे बंधू रावसाहेब, तात्या टोपे इत्यादि मंडळी पुष्कळ सैन्य बाळगून मोठ्या बंदोबस्तानें राहिली होती, त्यांस जाऊन मिळाली. आपल्या लोकांचा पराभव झालेला पाहून लक्ष्मीबाईचे वडील मोरो-पंत तांबे हे झांशींतील खजिना एका हत्तीवर घालून घेऊन

चालले असतां इंग्लिशांच्या हातीं सांपडले. त्यांस त्यांनीं झांशीच्या राजवाड्यासमोर भर दोनप्रहरीं फांशीं दिलें! या एकंदर अनर्थांत झांशीस पांच हजार माणसांची कत्तल उडाली, असें म्हणतात !

लक्ष्मीबाई काल्पीकडे गेल्याचें वृत्त कळतांच तिचा पाठलाग करण्याकरितां सर ह्यू रोज पुन्हां तिकडे वळले. त्यांनीं वाटेंत कुंच येथें बंडवाल्यांचा पराभव करून नंतर काल्पीवर चाल केली. काल्पी येथील लोकांनींही युद्धाची कमाल केली. परंतु, ती सर्व फुकट जाऊन या वेळींही त्यांचाच पराभव झाला, आणि मे महिन्याच्या अखेरीस काल्पी शहरांत इंग्लिशांचा पूर्ण अंमल बसला. येथें तात्या टोपे यांनीं युद्धार्थ तयार करून ठेविलेली पुष्कळ सामुग्री इंग्लिशांस सांपडली. तींत साठ हजार पौंड नुसती बंदुकीची दारू होती !

काल्पी येथें पराभव पावल्यावर लक्ष्मीबाईसह सर्व बंडवाली मंडळी ग्वाल्हेरीकडे फिरली. ग्वाल्हेरीचे गादीवर महाराज जयाजीराव शिंदे असून रावराजे दिनकरराव राजवाडे हे त्यांचे कारभारी होते. रावसाहेब पेशव्यांनीं त्यांस आपल्या येण्याचें कारण कळवून त्यांचेपाशीं साह्य मागितलें. शिंदेसरकार इंग्लिशांचे दोस्त असल्यामुळें त्यांनीं दिनकररावांचे सल्ल्यानें बंडवाल्या लोकांशीं युद्ध करण्यास सुरुवात केली. मुरारजवळ उभयपक्षांचें युद्ध होऊन शिंद्याचा पराभव झाला. तेव्हां शिंदे तेथून निघाले, ते थेट आग्रा येथें इंग्रज सरकारच्या आश्रयास येऊन राहिले. ग्वाल्हेर शहर बंडवाल्यांचे

हातीं जाऊन तेथें त्यांनीं आपला अंमल चालू केला. रावसाहेब यांनीं आपणांस पेशवेपदाचा अभिषेक करविला, आणि मोठ्या थाटानें तेथें हिंदुपदबादशाहीचें दरबार भरूं लागलें! ते वेडेचार दूरदर्शी लक्ष्मीबाईस आवडले नाहींत. आपल्या राजसत्तेस बळकटी आणण्याचा प्रयत्न करण्याचें सोडून तुह्मी ऐषआराम आणि थाटमाट करण्यांत आपला कालक्षेप करितां, हें तुह्मांस घातक आहे; असें राणीनें स्पष्टपणें बोलून दाखविलें. परंतु, या तिच्या शहाणपणाच्या भाषणाकडे त्या हुरळलेल्या मंडळीनें लक्ष्य दिलें नाहीं. यावरून महाराणी लक्ष्मीबाई ही नुसती बंडवाली नसून तिच्या अंगीं किती शहाणपणा वास्तव्य करीत होता तें दिसून येतें. असो. लक्ष्मीबाईचें भाषण केवळ अरण्यरोदन होऊन तिच्यासह सर्व बंडवाल्यांस त्यांच्या अविचारीपणाचें प्रायश्चित्त भोगावें लागलें.

ग्वाल्हेर शहरांत थेट बाजीरावी थाटाचे आनंदोत्सव चालू असतां त्याजवर इंग्रज सरकारचें सैन्य येऊन थडकलें! त्यानें ग्वाल्हेरीस वेढा दिला. उभयतांची लढाई जुंपली. बंडवाल्यांत रावसाहेब, तात्या टोपे, आणि वीरवनिता लक्ष्मीबाई हीं माणसें प्रमुख होतीं. दोन्हीकडचे वीर आपलीं शिरकमळें तळहातावर घेऊन त्या संग्रामभूमीवर युद्धतांडव करीत होते. रणपंडिता लक्ष्मीबाई हिनें तर समरदेवतेचें आराधन मोठ्या निकरानें चालविलें होतें. त्या वेळीं तिच्या अंगच्या शौर्यसाहसाची शिकस्त झाली. तिनें त्या वेळीं वीरवेष धारण केला होता आणि एका तेजस्वी समरवाजीवर आरूढ होऊन एक

सारखी आपल्या लोकांस प्रोत्साहन देत विद्युल्लतेप्रमाणें ती इकडून तिकडे चमकत होती. परंतु, इंग्रजी सैनिकांची इभ्रत मोठी असल्यानें अखेरीस त्यांचाच जय होऊन बंडवाल्यांची दाणादाण झाली. एकसारखें तीन दिवस रणकंदन माजलें होतें. शेवटीं इ० स० १८५८ च्या जून महिन्याच्या १८ व्या तारखेस माहराणी लक्ष्मीबाई हीस घोड्यावरच्या घोड्यावर एक जबरदस्त जखम लागून ती त्या घोर रणमैदानावर पतन पावली ! याप्रमाणें त्या अतुलपराक्रमी वीरांगनेचा शेवट झाला ! ते वेळीं तिचें वय केवळ तेवीस वर्षांचें होतें.

वाचकहो, लक्ष्मीबाईच्या बाजूनें विचार करितां—

॥ होती सर्वहि यत्न निष्फळ, जरी होई विधी वांकडा ॥

असेंच ह्मणावें लागतें. मोठमोठ्या विचारी इंग्रज ग्रंथकारांनीं तिचा पराक्रम आणि तिची कार्यक्षमता यांचें मोठ्या कौतुकानें वर्णन केलें आहे. खरोखर आमच्या भरतखंडांत लक्ष्मीबाई हें एक लोकोत्तर स्त्रीरत्न निर्माण झालें होतें, आणि त्या काळाच्या परिस्थितीकडे पाहतां तिच्या वर्तनाच्या विहिताविहितत्वाबल जरी कितीही वाद उपस्थित झाले तरी तेवढ्यानें ह्मणजे तिच्या अंगच्या सद्गुणांची किंमत कमी होईल असें नाहीं. कारण, प्रतिकूल परिस्थितीनें ह्मणजे मनुष्याच्या अंगच्या खऱ्या सद्गुणांला बाध येतो असें नाहीं. लक्ष्मीबाईसही ह्याच सिद्धांत लागू केला पाहिजे. असो, लक्ष्मीबाई जरी आज या नश्वर जगांतून नाहींशी झाली आहे, तरी ती कीर्तिरूपानें जिवंतच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आणि जोंपर्यंत

खऱ्या इतिहासांचें लोकांस विस्मरण होणार नाहीं, तोंपर्यंत तीही लोकांचे स्मरणांतून नाहींशी होणार नाहीं.

---

# रत्न एकोणिसावें.

## महाराणी राजबाई.

गुजराथ प्रांतांत वढवान नांवाचें एक संस्थान आहे. त्या संस्थानची सर्व व्यवस्था सुमारें अर्धशतकापूर्वी एका महापराक्रमी आणि कारस्थानी स्त्रीच्या हातांत होती. तिचें नांव महाराणी राजबाई असें होतें या पराक्रमी बाईनें आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी युद्धकर्माचें अवलंबन करून आपल्या शत्रुहृत राज्याचा उद्धार केला ! तिचें संक्षिप्त चरित्र पुढें दिलें आहे.

राजबाई इसवी सन १८३७ च्या सुमारास वढवान संस्थानचा राज्यकारभार पहात होती. प्रजाशासनयोग्य असे संपूर्ण गुण राजबाईच्या अंगीं वास्तव्य करीत होते. तिच्या अंगीं जशी तेजस्विता प्रकाशमान होती, तशीच स्वभावाची सौम्यताही तिला शोभवीत होती. जसें तिचें कोमल स्त्रीहृदय अनेक गुणांचें आगर होतें, तशीच तिची कठोरता आणि सहनशीलता हीं पुरुषासही लाजवीत होतीं. ती अपरिमित धनसंपदेची स्वामिनी असतांही विलाससुखापासून दूर रहात असे. प्रजापालनाचे सर्व कष्ट ती सहज सहन करीत असे; आणि अबला ह्मणविली जात असतांही आपल्या कर्तृत्वबळानें सर्वांस थक्क करून सोडी. तसेंच लोकवार्तेवरून असें कळतें

कीं, तिनें आपला सासरा, पति, आणि पुत्र अशा तिघां-जणांची वाट लावून प्रजेच्या हिताकरितांच सर्व सूत्रें आपल्या हातांत घेतलीं होती. यासंबंधानें पुष्कळांनीं तिला दूषणेंही दिलीं आहेत. परंतु खऱ्या दृष्टीनें पाहणारांस तिच्या ठिकाणीं कांहीं दोष वास्तव्य करीत होते असें वाटणार नाहीं. यासंबं-धानें खुलासेवार जितकी माहिती मिळणें इष्ट आहे, तितकी आम्हांस मिळाली नाहीं. तथापि ज्या लेखांच्या आधारानें हें चरित्र आम्हीं लिहिलें आहे, त्यांवरून आमची अशी खात्री झाली आहे कीं, राजबाई राज्यशासनयोग्य अशा संपूर्ण गुणांनीं प्रजाजनांस आवडती झाली होती. तिचें राज्य सुर-ळीत चाललें असून त्यांत धनधान्याची समृद्धि असे. त्या वेळचे इंग्रज कामगारही तिच्या या शासनपद्धतीची भारी प्रशंसा करीत असत.

राज्यशासन करितां करितां राजबाईनें वृद्धावस्था प्राप्त झाली. तेव्हां सत्तर वर्षांच्या उमरींत राजबाईनें आपल्या उरलेल्या आयुष्याचे दिवस तीर्थयात्रा करण्यांत घालवावे असा निश्चय केला. तेव्हा शुभ दिवस पाहून तिनें आपल्या नातवास गादीवर बसविलें आणि त्याची माता गोवलबाई म्हणून होती तिच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें सोंपविलीं. गोवलबाई ही स्त्री देखील राजबाईप्रमाणेंच राज्यकारभारास योग्य अशी होती.

वर लिहिल्याप्रमाणें नातवास गादीवर बसवून आणि सुन-बाईचे हातीं राज्यकारभार देऊन राजबाई आपल्या पवित्र

हेतूप्रमाणें तीर्थयात्रेस निघून गेली. मागें गोवलबाई राज्य चालवीत असतां तिचे मनांत स्वतंत्रपणें राज्य करण्याची महत्वाकांक्षा उद्भवली. खरोखरच राज्यतृष्णा ही फार दुर्धर आहे. त्याकरितां मनुष्य काय करील याचा नेम नाहीं. राज्यलोभाची दुर्वासना उत्पन्न होतांच राजबाईनें आपल्या पक्षास दरबारी मडळी अनुकूळ करून घेण्याची खटपट आरंभिली. पूर्वी वृद्धेच्या हातीं कारभार असतां दरबारच्या ज्या मंडळीचें मन दुखावलें होतें त्या मंडळीनें गोवलबाईचा पक्ष उचलिला, आणि राजबाई परत आल्यावर तिला राज्यांत न येऊं देतां परत तीर्थाटणास पाठविण्याचा निश्चय केला.

इच्छित हेतूप्रमाणें अनेक तीर्थांच्या यात्रा करून राजबाई परत आली. परंतु, नगररक्षक वीरांनीं गोवलबाईच्या आज्ञेवरून तिला नगरांत येऊं दिलें नाहीं. नगराचीं सगळीं द्वारें बंद झालीं. राजबाई आपल्या स्वतःच्या राज्यांतून हांकलली गेली. तिच्या विश्वासघातकी सुनेनें तिला निरोप पाठविला कीं, आपण आतां वृद्ध झालां आहांत, आपणांस राज्यभाराचें ओझें झेंपणार नाहीं; याकरितां तें आतां कायमचें मजवर सोंपवून उरलेले आयुष्याचे दिवस आपण तीर्थाटनांत घालवावे; राज्यांत परत येण्याचें काम नाहीं. वाचकहो, हा तिचा बुद्धिवाद राजबाईसारख्या स्त्रीला कसा पसंत पडावा? अर्थात्च दोघींमध्यें बाचाबाच सुरू झाली. आपल्या साध्या भाषणानें सुनबाई वळत नाहींत असें पाहून राजबाई राजकोटास पोलिटिकल एजंटकडे गेली. त्या वेळीं सर त्रिलोगवी हे

पोलिटिकल एजंट होते. त्यांनीं राजबाईचें सर्व म्हणणें ऐकून घेतलें. परंतु, इंग्रजांच्या राजकारणपद्धतीस अनुकूल असें कांहीं कलम त्यांत नजरेस न आल्यामुळें म्हणा किंवा कांहीं अन्य कारणानें म्हणा, त्यांनीं त्या गोष्टीचा मुळींच विचार केला नाहीं. राजबाईला विन्मुख होऊन परत यावें लागलें.

मग सामोपायानें सुनबाई ऐकत नाहीं असें पाहून वृद्धा राजबाईनें पोलिटिकल एजंट वगैरे मंडळीस एकीकडे ठेवून केवळ तरवारीचे बळावर शत्रुहृत राज्याचा उद्धार करण्याचा विचार केला. या वेळीं वार्धक्यामुळें तिचे केंस सफेत होऊन गेले होते. सर्व शरीर शिथिल होऊन अंगाची त्वचा लोंबूं लागली होती. तोंडावर सुरकुत्या पडल्या होत्या. एवंच एका काळीं टवटवीत असलेली ती लता आतां अगदीं कोमेजून जात चालली होती. परंतु, अद्यापपर्यंत देखील तिची पूर्वीची वीरता, तिचा पूर्वीचा उत्साह, आणि पूर्वीची धीरता जशाची तशीच कायम होती. राजबाईनें आपल्या वतीची सेना जमविण्यास प्रारंभ केला. हळूं हळूं एक हजार योद्धे एकत्र होऊन तिची आज्ञा पाळण्यास तयार झाले. राजबाईनें रणभूषणें परिधान केलीं. तिच्या वृद्ध तनूवर कठोर कवच शोभूं लागलें. तेजस्वी तलवार तिच्या हातांत चमकूं लागली. याप्रमाणें ती सत्तर वर्षांची वृद्धा अश्वारूढ होऊन समरांगणीं शत्रूशीं सामना देण्यास तयार झाली.

वस्तुतः या गृहकलहाचें कांहीं एक कारण नव्हतें. गोवलबाईचा मुलगा राज्यावर होताच. शिवाय, राजबाईचाही

वृद्धापकाल झाला असल्यामुळें तिची ' दस गेले आणि पांच राहिले ' अशांतलीच स्थिति झाली होती. गोवलबाईनें केवळ कोत्या बुद्धीनें तिचा उपमर्द करून आपणावर संकट ओढून घेतलें. अधिकारतृष्णा आणि महत्वाकांक्षा मनुष्याकडून काय काय चुका घडवील याचा नेम नाहीं, हेंच खास.

राजबाईनें युद्धाची सिद्धता करून आपल्या लोकांस नगरावर हल्ला करण्याचा हुकूम केला. ती केवळ घोररूपा भैरवीसारखी होऊन नगराच्या मुख्य दरवाजावर येऊन थडकली. नगररक्षक सैन्यानें या वेळींही तिची आज्ञा मान्य केली नाहीं. तें आंतून बाहेर असलेल्या राजबाईच्या सैन्यावर दणादण गोळयांचा वर्षाव करूं लागलें. परंतु, राजबाई किंचित् देखील डगमगली नाहीं. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं तिचा एक मुख्य सेनानायक गमावला. तें पाहून तिला अपार दुःख झालें खरें, तरी त्या योगानें तिच्या राज्योद्धाराच्या प्रतिज्ञेंत मुळीं देखील बदल झाला नाहीं. उलट ती तिची प्रतिज्ञा दृढ होत चालली. त्या वेळीं जणूं काय तारुण्यावस्थेंतील पराक्रम तिच्या शरीराच्या प्रत्येक स्नायूंत येऊन पोंचला. तिच्या अंगची तेजस्विता नव्या प्रभावानें उच्छृंखळ झाली. तिला आपलें शरीर महान् बलशाली वाटूं लागलें. घोड्यावरून तरवार चमकावीत आपल्या असामान्य सेनेसह ती शत्रूवर चाल करून गेली. तिच्या सैन्यांत उत्साहरूप अग्नि अधिकाधिक भडकत चालला. नगररक्षक सैन्य या भैरवी मूर्तीला पाहून भयानें एकदम विव्हल होऊन गेलें. त्याच्यांत

पोलिटिकल एजंट होते. त्यांनीं राजबाईचें सर्व म्हणणें ऐकून घेतलें. परंतु, इंग्रजांच्या राजकारणपद्धतीस अनुकूल असें कांहीं कलम त्यांत नजरेस न आल्यामुळें म्हणा किंवा कांहीं अन्य कारणानें म्हणा, त्यांनीं त्या गोष्टीचा मुळींच विचार केला नाहीं. राजबाईला विन्मुख होऊन परत यावें लागलें.

मग सामोपायानें सुनबाई ऐकत नाहीं असें पाहून वृद्धा राजबाईनें पोलिटिकल एजंट वगैरे मंडळीस एकीकडे ठेवून केवळ तरवारीचे बळावर शत्रुहृत राज्याचा उद्धार करण्याचा विचार केला. या वेळीं वार्धक्यामुळें तिचे केंस सफेत होऊन गेले होते. सर्व शरीर शिथिल होऊन अंगाची त्वचा लोंबूं लागली होती. तोंडावर सुरकुत्या पडल्या होत्या. एवंच एका काळीं टवटवीत असलेली ती लता आतां अगदीं कोमेजून जात चालली होती. परंतु, अद्यापपर्यंत देखील तिची पूर्वींची वीरता, तिचा पूर्वींचा उत्साह, आणि पूर्वींची धीरता जशाची तशीच कायम होती. राजबाईनें आपल्या वतीची सेना जमविण्यास प्रारंभ केला. हळूं हळूं एक हजार योद्धे एकत्र होऊन तिची आज्ञा पाळण्यास तयार झाले. राजबाईनें रणभूषणें परिधान केलीं. तिच्या वृद्ध तनूवर कठोर कवच शोभूं लागलें. तेजस्वी तलवार तिच्या हातांत चमकूं लागली. याप्रमाणें ती सत्तर वर्षांची वृद्धा अश्वारूढ होऊन समरांगणीं शत्रूशीं सामना देण्यास तयार झाली.

वस्तुतः या गृहकलहाचें कांहीं एक कारण नव्हतें. गोवलबाईचा मुलगा राज्यावर होताच. शिवाय, राजबाईचाही

वृद्धापकाल झाला असल्यामुळें तिची ' दस गेले आणि पांच राहिले ' अशांतलीच स्थिति झाली होती. गोवलबाईनें केवळ कोत्या बुद्धीनें तिचा उपमर्द करून आपणावर संकट ओढून घेतलें. अधिकारतृष्णा आणि महत्वाकांक्षा मनुष्याकडून काय काय चुका घडवील याचा नेम नाहीं, हेंच खास.

राजबाईनें युद्धाची सिद्धता करून आपल्या लोकांस नगरावर हल्ला करण्याचा हुकूम केला. ती केवळ घोररूपा भैरवीसारखी होऊन नगराच्या मुख्य दरवाजावर येऊन थडकली. नगररक्षक सैन्यानें या वेळींही तिची आज्ञा मान्य केली नाहीं. तें आंतून बाहेर असलेल्या राजबाईच्या सैन्यावर दणादण गोळ्यांचा वर्षाव करूं लागलें. परंतु, राजबाई किंचित् देखील डगमगली नाहीं. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं तिचा एक मुख्य सेनानायक गमावला. तें पाहून तिला अपार दुःख झालें खरें, तरी त्या योगानें तिच्या राज्योद्धाराच्या प्रतिज्ञेंत मुळीं देखील बदल झाला नाहीं. उलट ती तिची प्रतिज्ञा दृढ होत चालली. त्या वेळीं जणूं काय तारुण्यावस्थेंतील पराक्रम तिच्या शरीराच्या प्रत्येक स्नायूंत येऊन पोंचला. तिच्या अंगची तेजस्विता नव्या प्रभावानें उच्छृंखळ झाली. तिला आपलें शरीर महान् बलशाली वटूं लागलें. घोड्यावरून तरवार चमकावीत आपल्या असामान्य सेनेसह ती शत्रूवर चाल करून गेली. तिच्या सैन्यांत उत्साहरूप अग्नि अधिकाधिक भडकत चालला. नगररक्षक सैन्य या भैरवी मूर्तीला पाहून भयानें एकदम विव्हल होऊन गेलें. त्याच्यांत

आतां बंदुका डागण्याचें बिलकुल अवसान राहिलें नाहीं. तेव्हां त्यानें हळू हळू दरवाजे उघडून देण्यास सुरवात केली. राजबाईची अमानवी तेजस्विता पाहून सारें वढवाण नगर तिच्या पायावर लोटांगण घालूं लागलें. त्या वेळीं विश्वासघातकी सुनबाईची काय अवस्था झाली असेल हें सांगावयासच नको. राजबाईनें मोठ्या समारंभानें नगरांत प्रवेश केला. राजवाड्यांतील एक सरदार अगोदरच फितूर झालेला होता. त्यानें आजीबाई वाड्यांत येतांच राजपुत्रास तिच्या स्वाधीन केलें. खुद्द राजपुत्रच हातीं आल्यावर मग काय पाहिजे? त्यायोगें थोड्याशा विरुद्ध असलेल्या रयतेवर तिचा अंमल तत्क्षणींच बसला. अशा प्रकारें पराजय झाल्यावर अर्थातच गोवलबाईस "न्याय द्या" म्हणून पोलिटिकल एजंटाकडे तोंड वेंगाडावें लागलें. राजबाई पुन्हां आपले मस्तकीं शासनभार घेऊन प्रजेला पूर्ववत् सुख देऊं लागली.

याप्रमाणें या भरतखंडवासी वृद्धा स्त्रीनें अपार वीरता दाखविली. ज्या अवस्थेमध्यें मनुष्य आपल्या चलनशक्तीला आंचवून केवळ बसून कालक्रमण करितो, त्याच अवस्थेमध्यें या कारस्थानी वीरवनितेनें आपल्या राज्याधिकाराचा उद्धार केला. शिपायांच्या बंडापर्यंत ही अपार शक्तिमंती राणी आपल्या अधिकारांत दृढ होती. ब्रिटिश सिंहानेंही या शक्तीचा कधीं अपमान केला नाहीं.

# रत्न विसावें.

## साध्वी मीराबाई.

परम वैराग्यशीलयुक्त ज्या साध्वीनें आपल्या अंगच्या निस्सीम भक्तिप्रभावानें सर्व भरतखंडास चकित करून त्याचे कीर्तिसुगंधांत भर टाकिली, आणि या क्षणभंगुर संसृतिसुखाचा परित्याग करून जी सच्चिदानंदरूप परमेशाच्या चरणीं अखंड लीन होत्साती अंतीं मोक्षपदाप्रत पावली, त्या रजपूत राजकुमारी मीराबाईचें मनोरम जीवनचरित्र पुढें दिलें आहे.

मारवाडांत मेरत नामक एक लहानसें नगर आहे. तेथें परम कुलशीलसंपन्न राठोडवंशीय जयमल्ल नांवाचा राणा राज्य करीत होता. त्याचे पोटीं संवत् १४७५ ह्मणजे इसवी सन १४१८ च्या सुमारास आपली परमपूज्य चरित्रनायिका मीराबाई हिचें जनन झालें. कुमारी मीराबाई खरोखर स्वर्गीय सौंदर्यानें मंडित असून शिवाय किशोरवयस्थेंतही तिच्या अंगीं तिच्या भावी भक्तिप्रभावाचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. तिच्या सर्व बाललीला परमेश्वराच्या भजनपूजनादि कृतींनीं सदां परिपूर्ण असत. तिचे ते ईश्वरभक्तीचे खेळ अवलोकन करून राणा जयमल्ल यास फार कौतुक वाटे. सुलक्षण संततीच्या मनोरम बाललीला कोणाचें चित्त मोहित करीत नाहींत ? असो.

राणा जयमल्ल संसारसुखाचा यथेच्छ उपभोग घेत असतांही परमार्थसाधनाविषयीं नेहमीं तत्पर असे. त्याचे घरीं अनेक ठिकाणांहून साधुसंतांचे मेळे येऊन त्याच्या भक्तिपूर्ण सत्काराचा उपभोग घेत. एके वेळीं कोणी वैराग्यसंपन्न महात्मा त्याचे घरीं आला असतां त्याच्या भजनपूजनाचा थाट पाहून मीराबाई अगदीं तल्लीन झाली आणि त्या साधूच्या दैवतांत एक श्रीकृष्णमूर्ति होती तिनें तर मीराबाईस केवळ वेडें बनविलें. त्या मूर्तीचें अपूर्व सौंदर्य पाहून मीराबाईनें साधूस तिचें नांव विचारिलें असतां, ती श्रीगिरिधरलालजीची मूर्ति आहे, असें साधूनें सांगितलें. किशोरी मीराबाईनें साधूजवळ त्या मूर्तीविषयीं मोठ्या काकुळतीनें याचना केली. परंतु, ज्या मूर्तीच्या ठिकाणीं साधूची निस्सीम भक्ति जडलेली होती, ती मूर्ति तो तिला कसचा देतो ? अर्थातच त्यानें ती मूर्ति तिजला देण्याचें नाकारिलें. मीराबाईनें तर ती मूर्ति मिळावी ह्मणून फारच हट्ट धरिला. तेव्हां राणा जयमल्ल आणि राणी या उभयतांनीं साधूची अनेक प्रकारें विनवणी केली. तरी देखील साधू ती साजिरी मूर्ति आपणापासून दूर करण्याचें कबूल करीना. अशा रीतीनें साधु आणि मीराबाई यांच्या भक्तिविषयक आसक्तीमध्यें त्या देवमूर्तीची ओढाताण चालली असतां बालिका मीराबाईच्या दृढनिश्चयानें जय मिळविला. मीराबाईच्या भक्तिभावास भुलून प्रत्यक्ष गिरिधरलालजींनीं रात्रौ त्या महात्म्या साधूस दृष्टांत देऊन आपणास मीराबाईचे स्वाधीन करण्यास सांगितलें. तेव्हा दुसरे दिवशीं

साधूनें ती मूर्ति मोठ्या प्रेमानें मीराबाईस अर्पण केली ! मग काय विचारतां ! मीराबाईचा आनंद गगनांत मावेना. ती मोठ्या भक्तिभावानें त्या मूर्तीची पूजा करून आपला काळ सर्वदां भजनानंदांत घालवूं लागली.

पुढें यथाकालीं मीराबाई उपवर झाली असतां राण्यानें उदेपुरच्या घराण्यांतील राणा कुंभ याजला वर योजून तिच्या विवाहसमारंभास सुरवात केली. विवाहसमारंभाकरितां आपल्या परिवारासह राणा कुंभ मेरत येथें आला होता. राणा जयमल्ल यानें उभयतांच्या मोठेपणास साजेल अशा रीतीनें लग्नसमारंभाची व्यवस्था मोठ्या थाटाची केली होती. रीतीप्रमाणें नवरदेव लग्नमंडपांत आल्यावर उपाध्यायांनीं मीराबाईस घेऊन येण्याची सूचना केली. राजस्त्रिया मीराबाईस जेव्हां लग्नमंडपांत घेऊन जाऊं लागल्या तेव्हां मीराबाई आपल्या आवडत्या गिरिधरलालजीस बरोबर घेऊन जाण्याचा हट्ट धेऊन बसली. लग्नमंडपांत मूर्ति घेऊन जाणें वेड्यासारखें दिसेल म्हणून त्यांनीं तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु व्यर्थ. मीराबाई आपला हट्ट सोडीना. शेवटीं पोरबुद्धि समजून त्यांनीं तिजला मूर्ति बरोबर घेण्याची परवानगी दिली. मीराबाईचा हेतु अगदीं वेगळा होता. कोणाच्याच लक्ष्यांत तो आला नाहीं. मीराबाईनें गिरिधरलालजीसच आपला पति मानिलें होतें; त्यामुळें ऐहिक पतीची कल्पनाही तिचे मनांत नव्हती. ती केवळ मातापितरांच्या आणि इष्टमित्रांच्या आग्रहास्तव लग्नमंडपांत आली; आणि राणा कुंभ याजबरोबर

बाह्यात्कारीं तिचा विवाह झाला.

अशा रीतीनें लग्नसमारंभ समाप्त झाल्यावर मीराबाई निरुपायास्तव राणा कुंभ याजेबरोबर उदेपुरास जावयास निघाली. मीराबाईनें आपलीं काकुळतीस येऊन आपल्या मातेपासून गिरिधरलालजीची मूर्ति मागून घेतली. मातेचें आंतडें तें, तिनें कन्येच्या प्रेमास्तव तिजला ती मूर्ति बरोबर घेऊन जाण्याची परवानगी दिली. उदेपुरास आल्यावर मीराबाईचा भजनपूजनाचा पूर्वक्रम सुरू झाला. तिची अढळ भक्ति पाहून देशांतरावरचे साधुसंत तिच्या दर्शनास येऊं लागले. परंतु, राणा कुंभ आणि राजवाड्यांतील इतर लोक यांना तिचें वर्तन मुळींच आवडेना. उघडच आहे, सदां लौकिक गोष्टींमध्येंच ज्यांनी निमग्न असावें त्यांना मीराबाईचें भाग्य कसें कळून येणार? त्यांना तिच्या सर्व गोष्टी त्यांच्या उच्च कुळाला बट्टा लावणाऱ्या वाटूं लागल्या! त्यांनीं तिची परोपरीनें कानउघाडणी केली आणि ते भजनपूजनाचे आणि साधुसमागमाचे चाळे टाकून देण्यास सांगितलें. मीराबाईची चित्तवृत्ति परमेश्वरचरणांच्या ठायीं रतली असल्यामुळें तिनें त्यांच्या सांगण्याकडे यत्किंचित् देखील लक्ष दिलें नाहीं. शेवटीं राण्यानें तिजला उदेपुरासंन्निध असलेल्या एका भूतमहाल नामक ओसाड जागेंत पाठवून देऊन आपण दुसऱ्या एका कुळांतील सुंदर स्त्रीशीं विवाह केला.

भूतमहालांत जाऊन राहिल्यावर मीराबाईनें आपल्या खर्चानें तेथें एक मंदिर बांधवून त्यांत गिरिधरलालजीची

स्थापना केली, आणि अनेक प्रकारें साधुसंतांचा मेळा जमवून भजनपूजनाचा कडाका सुरू केला. मीराबाईच्या या वर्तनानें राजघराण्यांतील लोक अधिकाधिक चिडत जाऊन त्यांनीं शेवटीं राण्यास तिचा वध करण्याची मसलत सांगितली. आप्तजनांच्या मुखानें मीराबाईची निंदा करून श्रवण राणा फारच क्रोधावला आणि त्यानें हातांत खंजीर घेऊन मीराबाईचा वध करण्याकरितां भूतमहालाकडे गमन केलें. तथापि मीराबाईच्या पुण्यप्रभावानें म्हणा किंवा अन्य कांहीं कारणानें म्हणा मीराबाईवर खंजीर चालविण्याचें राण्यास धैर्य होईना. मग तो तसाच तिला न मारितां परत राजवाड्यांत निघून आला. असें जरी झालें तरी आपल्या उच्च कुलाला कलंक लावणारी स्त्री जिवंत ठेवणें त्या मूढ जनांस इष्ट वाटेना. मग त्यांनीं मीराबाईस विष देऊन नाहींशी करण्याची सल्ला दिली.

मीराबाईची योग्यता न जाणणाऱ्या लोकांनीं आणि विशेषतः राजवाड्यांतील स्त्रियांनीं एक विषाचा प्याला तयार करवून तो एका चतुर दासीच्या हस्तें तिजकडे पाठविला. व राणाजीनें हें परमेश्वराचें पादतीर्थ पाठविलें आहे, त्याचा स्वीकार करावा म्हणून तिजला निरोप सांगितला. मीराभाईस तें राणाजीनें पाठविलेलें पादतीर्थ पाहून परमानंद झाला. तिनें तत्काळ राणाजीच्या निरोपास मान देऊन भक्तियुक्त अंतःकरणानें त्या तीर्थरूपी विषाचें प्राशन केलें. वाचकहो! त्या जहर विषानें मीराबाईची काय अवस्था व्हावी बरें ? परंतु नतजनांचा कनवाळू परमेश्वर तिचा संरक्षणकर्ता असल्यामुळें

बाह्यात्कारीं तिचा विवाह झाला.

अशा रीतीनें लग्नसमारंभ समाप्त झाल्यावर मीराबाई निरुपायास्तव राणा कुंभ याजबरोबर उदेपुरास जावयास निघाली. मीराबाईनें अगदीं काकुळतीस येऊन आपल्या मातेपासून गिरिधरलालजीची मूर्ति मागून घेतली. मातेचें आंतडें तें, तिनें कन्येच्या प्रेमास्तव तिजला ती मूर्ति बरोबर घेऊन जाण्याची परवानगी दिली. उदेपुरास आल्यावर मीराबाईचा भजनपूजनाचा पूर्वक्रम सुरू झाला. तिची अढळ भक्ति पाहून देशांतरावरचे साधुसंत तिच्या दर्शनास येऊं लागले., परंतु, राणा कुंभ आणि राजवाड्यांतील इतर लोक यांना तिचें वर्तन मुळींच आवडेना. उघडच आहे, सदां लौकिक गोष्टींमध्येंच ज्यानीं निमग्न असावें त्यांना मीराबाईचें भाग्य कसें कळून येणार? त्यांना तिच्या सर्व गोष्टी त्यांच्या उच्च कुळाला बट्टा लावणाऱ्या वाटूं लागल्या! त्यांनीं तिची परोपरीनें कानउघाडणी केली आणि ते भजनपूजनाचे आणि साधुसमागमाचे चाळे टाकून देण्यास सांगितलें. मीराबाईची चित्तवृत्ति परमेश्वरचरणांच्या ठायीं रतली असल्यामुळें तिनें त्यांच्या सांगण्याकडे यत्किंचित् देखील लक्ष दिलें नाहीं. शेवटीं राण्यानें तिजला उदेपुरासंन्निध असलेल्या एका भूतमहाल नामक ओसाड जागेंत पाठवून देऊन आपण दुसऱ्या एका कुळांतील सुंदर स्त्रीशीं विवाह केला.

भूतमहालांत जाऊन राहिल्यावर मीराबाईनें आपल्या खर्चानें तेथें एक मंदिर बांधवून त्यांत गिरिधरलालजीची

स्थापना केली, आणि अनेक प्रकारें साधुसंतांचा मेळा जमवून भजनपूजनाचा कडाका सुरू केला. मीराबाईच्या या वर्तनानें राजघराण्यांतील लोक अधिकाधिक चिडत जाऊन त्यांनीं शेवटीं राण्यास तिचा वध करण्याची मसलत सांगितली. आप्तजनांच्या मुखानें मीराबाईची निंदा करून श्रवण राणा फारच क्रोधावला आणि त्यानें हातांत खंजीर घेऊन मीराबाईचा वध करण्याकरितां भूतमहालाकडे गमन केलें. तथापि मीराबाईच्या पुण्यप्रभावानें म्हणा किंवा अन्य कांहीं कारणानें म्हणा मीराबाईवर खंजीर चालविण्याचें राण्यास धैर्य होईना. मग तो तसाच तिला न मारितां परत राजवाड्यांत निघून आला. असें जरी झालें तरी आपल्या उच्च कुलाला कलंक लावणारी स्त्री जिवंत ठेवणें त्या मूढ जनांस इष्ट वाटेना. मग त्यांनीं मीराबाईस विष देऊन नाहींशी करण्याची सल्ला दिली.

मीराबाईची योग्यता न जाणणाऱ्या लोकांनीं आणि विशेषतः राजवाड्यांतील स्त्रियांनीं एक विषाचा प्याला तयार करवून तो एका चतुर दासीच्या हस्तें तिजकडे पाठविला. व राणाजीनें हें परमेश्वराचें पादतीर्थ पाठविलें आहे, त्याचा स्वीकार करावा म्हणून तिजला निरोप सांगितला. मीराबाईस तें राणाजीनें पाठविलेलें पादतीर्थ पाहून परमानंद झाला. तिनें तत्काळ राणाजीच्या निरोपास मान देऊन भक्तियुक्त अंतःकरणानें त्या तीर्थरूपी विषाचें प्राशन केलें. वाचकहो! त्या जहर विषानें मीराबाईची काय अवस्था व्हावी बरें? परंतु नतजनांचा कनवाळू परमेश्वर तिचा संरक्षणकर्ता असल्यामुळें

त्यानें तिला त्यापासून यत्किंचित् देखील इजा होऊं दिली नाहीं. त्या भक्तसंकटीं उडी घालणाऱ्या गिरिधरानें तें विष स्वतांच प्राशन केलें. केवढा हा मीराबाईचा भक्तिप्रभाव! मीराबाईनें गिरिधरलालजीच्या मूर्तीकडे अवलोकन केलें तों ती नखशिखांत हिरवीचार झालेली पाहून मीराबाईस सर्व प्रकार कळून आला. प्रत्यक्ष परमेश्वरानें, आपला प्राण वांचविण्याकरितां राणाजीकडून आलेल्या विषाचें सेवन केलें, हें पाहून तिचें अंतःकरण गहिंवरानें दाटून आलें. मग तिनें आपल्या प्रेमळ वाणीनें नवीन पद्यरचनायुक्त भजन आरंभिलें. तेव्हां तें परमेश्वराच्या मूर्तीतील विष उतरून ती पूर्ववत् सोज्वळ दिसूं लागली. मीराबाईनें आपल्या अढळ भक्तिबळानें विषाचें अमृत केलें, तरी राणाजीच्या मनाची खात्री होईना. तो तिचा अधिकच द्वेष करूं लागला; आणि इतर लोक त्यास भर देऊं लागले.

मीराबाई नित्य रात्रीच्या वेळीं मंदिराचीं दारें बंद करून अनन्यभावानें गिरिधरलालजीपुढें भजन करीत असे. एके दिवशीं कित्येक मत्सरी आणि विघ्नसंतोषी लोकांनीं राणाजीस वर्दी दिली कीं, मीराबाई मंदिराचीं कपाटें बंद करून आंत कोणा परपुरुषाशीं गोष्टी बोलत बसली आहे! मग काय विचारतां? राणा ती गोष्ट ऐकून क्रोधांध होत्साता हातांत खड्ग घेऊन मीराबाईचें पारिपत्य करण्याकरितां भूतमहालांत गेला आणि त्यानें मोठ्या आवेशयुक्त वाणीनें मीराबाईस मंदिराचें द्वार उघडण्याची आज्ञा केली. राणाजीचा शब्द ऐकतांच